
म. ग्रं. सं. ठाणे
...रय
... नं.

# अभंग-गीताई



REFBK-0003721
REFBK-0003721



गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर.

# अभंग-गीताञ्जलि.

लेखक

"ऋग्वेदी"

REFBK-0003721

प्रकाशक

व्ही. प्रभा आणि कंपनी,

गिरगांव-मुंबई.

( या ग्रंथाच्या मालकीचे हक्क ग्रंथकर्त्यांकडे आहेत. )

किंमत रु. २.

Printed by M. N. Kulkarni at the Karnatak Printing Press,
318 A, Thakurdwar, Bombay.

# गुरुदेवांचा संदेश.

Ref. No.

VISVA-BHARATI

शान्तिनिकेतन

RABINDRANATH TAGORE

SANTINIKETAN

Santiniketan Oct. 9 1928.

I have been assured by some of my friends in Bombay that "Abhang Gitanjali" written in Marathi by Mr. [illegible] is likely to bring some of my poems closer to my readers in Maharashtra. I am specially glad to learn from the same source that the translation is based on a careful study of the Bengali original, ensuring greater accuracy in the rendering of ideas contained in my poems.

Rabindranath Tagore

# गुरुदेवांचा संदेश.

रा. ऋग्वेदी यांनीं मराठींत लिहिलेल्या "अभंग-गीताञ्जली"च्या योगानें माझीं कांहीं पद्यें महाराष्ट्रांतील माझ्या वाचकांस सध्यांहून अधिक परिचित होण्याचा संभव आहे असें मुंबईतील माझ्या कांहीं मित्रांनीं मला खात्रीपूर्वक सांगितलें. त्यांच्याकडून मला कळलें आहे कीं मूळ बंगाली पद्यांचा लक्षपूर्वक अभ्यास करून त्यांच्या अनुरोधानें हें भाषांतर केलें आहे. त्यामुळें माझ्या काव्यांतील विचार यथार्थ स्वरूपांत मांडण्यांत येत आहेत, याबद्दल मला विशेष आनंद होतो. शांतिनिकेतन, ता. ९ आक्टोबर १९२८.

रवींद्रनाथ टागोर.

## विश्वभारती पब्लिशिंग बोर्डास सादर झालेले अभिप्राय.

( १ ) " मी हे अभंग प्रथमतः काव्य या दृष्टीनें वाचून पाहिले. खरें काव्य असावें तसे हे अभंग अत्यंत आल्हाददायक आणि कर्णमधुर आहेत. भाषासरणी सुबोध व गोड असून शब्दयोजना काळजीपूर्वक करण्यांत आली आहे. गीतांच्या विवेचनामुळें त्यांचा अर्थ विशेष स्पष्ट होतो. मराठी साहित्यांत या ग्रंथामुळें अमोलिक भर पडेल. "

( २ ) " मी अभंग-गीताञ्जलींतील गीतें बंगाली पद्यांशीं ताडून पाहिलीं. श्रीयुत रवींद्रनाथ टागोर यांच्या पद्यांचें भाषांतर यथार्थ झालें आहे, इतकेंच नव्हे तर, त्यांतील शब्दलालित्यही या अभंगांत उत्तम रीतीनें वठलें आहे. महाराष्ट्रांतील हजारों वाचकांस या ग्रंथामुळें श्री. रवींद्रनाथांच्या विचारांची आणि काव्याची प्रतिभा समजून येईल, याबद्दल मला फार आनंद होतो.

# अभंग-गीताञ्जलि समर्पण

मी यापूर्वी माझ्या महाराष्ट्रांतील बंधुभगिनींस सादर केलेलें ' आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास " हें पुस्तक त्यांस पसंत पडलें. यामुळें पुनः एकवार त्यांची सेवा करावी, अशी इच्छा उत्पन्न झाली. प्रस्तुत पुस्तक या इच्छेचें कार्य आहे.

जगद्विख्यात वंगदेशीय कविवर्य **गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर** यांनीं लिहिलेलें गीताञ्जलि हें काव्य, त्यांस आठ हजार गीनीचें नोबेल बक्षीस मिळाल्यापासून, सर्व विद्वज्जनांच्या विशेष परिचयाचें झालें आहे. परंतु इंग्रजी पोषाख चढविलेल्या या भाषांतरामध्यें जो अर्थ व प्रसाद आहे त्याहून अधिक अर्थ व प्रसाद त्यांच्या मूळ बंगाली काव्यांत आहे. आपल्या तुकारामादि साधुसंतांच्या अभंगांप्रमाणें हीं पद्यें बंगाल्यांत सर्वतोमुखीं झालीं आहेत. तीं अत्यंत प्रेमळ, उदात्त, आणि शब्दलालित्यादि गुणांनीं परिप्लुत अशीं आहेत. माझे मित्र श्रीयुत गोपाल कृष्ण राव, एम्. ए. एल्‌एल्. बी. यांच्या अनुग्रहामुळें या बंगाली पद्यांचा लक्षपूर्वक अभ्यास केल्यावर मला गीताञ्जलीचा अर्थ विशेष चांगल्या रीतीनें आकलन करतां आला. त्यामुळें मनाला जो अवर्णनीय आनंद झाला त्या आनंदाचे माझे महाराष्ट्रीय बंधु समभागी व्हावे म्हणून हा ग्रंथ मी रचला आहे.

गुरुदेवांच्या गीताञ्जलीचें भाषांतर करावें हा विचार येतांक्षणीं प्रथम गीत वाचतांच

**अनंत अव्यय केलें त्वां मजला। काय वर्णूं लीला तुझी देवा॥**

असे अभंग वृत्तांत सहज उद्गार निघाले. तेव्हां महाराष्ट्राची भूमि निर्मल धार्मिक जीवनाच्या योगानें ज्या साधुसंतांनीं पुनीत केली त्यांच्याच अभंग वाणींत ही सेवा करावी असा मी संकल्प केला. आणि या वाणीची जागोजागीं आठवण देण्यासाठीं त्यांच्या प्रासादिक अभंगांचा मुबलक उपयोग करण्याचें मी ठरविलें.

गुरुदेवांच्या गीतांमध्यें अध्यात्मज्ञान गोविलें आहे. कांहीं भाग रूपकाप्रमाणें असून कित्येक ठिकाणीं गूढार्थ भरलेला आहे. यामुळें या गीतांचें मर्म समजण्यास जड जातें. म्हणून आपल्या साधुसंतांच्या आणि तत्त्वज्ञान्यांच्या विचारांची मदत घेऊन गीताञ्जलींतील पद्यें, त्यांचा भावार्थ आणि रहस्य देऊन, सुबोध होतील असें करण्याचा, मी शक्य तितका प्रयत्न केला आहे.

**प्रपंच आणि परमार्थ या दोन स्वतंत्र बाबी आहेत असें न मानतां परमार्थयुक्त प्रपंच किंवा निवृत्तिपर प्रवृत्ति हीच मानवी जीविताचें साफल्य करण्याची नामी युक्ति आहे हें सत्य या अभंग-गीताञ्जलीच्या वाचनानें वाचकांच्या हृत्पटलावर बिंबून त्याप्रमाणें आचार-विचार-शुद्धि झाल्यास माझ्या सेवेचें सार्थक झालें असें मी समजेन.**

हें पुस्तक प्रसिद्ध होण्याच्या कामीं मला अनेकांकडून सहाय्य मिळालें. **विश्वभारती पब्लिशिंग बोर्ड** या मंडळानें हें गीताञ्जलीचें अभंगवृत्तांतील भाषांतर, मुंबईंतील दोघां विद्वान् गृहस्थांकडून तपासून घेतल्यावर, त्यांचें अनुकूल मत पाहून, तें छापून प्रसिद्ध करण्याची, नेहमींच्या अटी न घालतां, मला परवानगी दिली. या कामीं विश्वभारती संस्थेचे एक आस्थेवाईक सभासद श्रीयुत हिरजीभाई मोरीस, यांची मला फार मदत झाली. हें पुस्तक लिहीत असतां मूळ बंगाली पद्यांचा परिचय माझे मित्र श्रीयुत राव यांनीं करून दिला. इतकेंच नव्हे त्यांनीं गीताञ्जलीबाहेरचीं कित्येक पद्यें मला समजावून दिलीं. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. कर्नाटक प्रिंटिंग प्रेसचे मालक श्रीयुत मंगेशराव कुळकर्णी यांच्या औदार्यामुळें हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याचें मी धाडस करीत आहें. त्यांनीं व्यवहाराची सर्वसामान्य पद्धति दूर लोटून देऊन केवळ मित्रभावानें हा ग्रंथ छापून देण्यास लागणाऱ्या श्रमाचा आणि द्रव्याचा बोजा उचलला. त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्यास माझे महाराष्ट्रीय बांधव ग्रंथास आश्रय देऊन मदत करतील असा मला पूर्ण भरंवसा आहे. याशिवाय माझें कार्य सुकर होण्यास शेठ शांतिकुमार नरोत्तम मुरारजी आणि माझे तरुण सहाय्यक यशवंत जगन्नाथ पंडित यांची मदत कारणीभूत झाली आहे. या सर्वांचा मी आभारी आहें.

गुरुदेवांचा आशीर्वाद आणि विश्वभारती पब्लिशिंग बोर्डनें नेमलेल्या परीक्षकांचे अभिप्राय ग्रंथारंभीं दिले आहेत. यांच्या योगानें या ग्रंथाकडे महाराष्ट्राचें लक्ष वेधेल अशी मला आशा आहे. यांचे देखील मी उपकार मानतों.

पुस्तकास प्रस्तावना जोडण्याचें काम मी माझ्या पूर्व वयांतील विद्यार्थ्यांपैकीं एक असे श्रीयुत दत्तात्रेय बाळकृष्ण ऊर्फ काका कालेलकर, बी. ए. यांजकडे सोंपविलें. यास कारण अन्योन्य प्रेम व वात्सल्य हें आहे. गुजरात विद्यापीठाचे **आचार्य कालेलकर** यांनीं कांहीं काल **शांतिनिकेतन** मध्यें राहून गुरुदेवांच्या सहवासाचा लाभ मिळविला आहे. आणि गीताञ्जलींत व्यक्त झालेल्या

भक्त-जीवनाचा जे अखंड साक्षात्कार करूं पहात आहेत अशा **महात्मा गांधी** यांच्या आश्रमांत राहून ते धर्मप्रधान समाजसेवेंत गुंतले आहेत. विचार व आचार यांचा योग, वाचा व क्रिया यांचा मेळ, भक्तिपूर्ण प्रेमळ वर्तन, अत्युच्चशील आणि अत्यंत साधी राहणी यांच्या योगानें श्री. कालेलकर हे भगवंताच्या गुणानुवादाचें रहस्य जाणण्यास योग्य आहेत असें मला वाटल्यावरून ग्रंथकर्त्यांच्या नेहमींच्या रिवाजाबाहेर माझ्या छात्र-मित्रासच मी प्रस्तावना लिहिण्यास सांगितलें. माझा शब्द मोडवेना म्हणून हें काम करण्याचें त्यांनीं कबूल केलें याबद्दल मला आनंद होतो.

शेवटीं माझे मित्र व्ही. प्रभा आणि मंडळी यांनीं प्रेमभावानें या पुस्तक प्रकाशनाचें कार्य हातीं घेतलें आहे, याबद्दल मी त्यांचे उपकार मानतों.

हें माझें वाङ्मय तप भगवत्कृपेस पात्र होवो.

ॐतत्सत् ब्रह्मार्पणमस्तु !

विलेंपार्लें
बलि प्रतिपदा शके १८५०.

“ ऋग्वेदी ”

७८

१०२८

# प्रकाशकांचे दोन शब्द.

आमचे विद्वान मित्र रा. **ऋग्वेदी** यांनीं लिहिलेलें "**अभंग-गीताञ्जलि**" हें पुस्तक प्रकाशित करण्याचा सुयोग प्राप्त झाल्याबद्दल आम्हांस आनंद होतो. यापूर्वी आम्ही प्रकाशित केलेल्या त्यांच्या "**आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास**" या ग्रंथाप्रमाणें हें पुस्तकदेखील महाराष्ट्रीय वाचकांस प्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं. **कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर** यांच्या काव्यांतून निवडून काढलेलीं हीं गीतें कालें करून आबालवृद्धांस मुखोद्गत होऊन तुकारामादि साधुसंतांच्या अभंगांप्रमाणेंच या गीतांजलींतील अभंग जनतेच्या धार्मिक उत्कर्षांस मदत करतील अशी आम्हांस आशा आहे. महाराष्ट्रांतील बंधुभगिनींनीं अभंगगीतांजलीसारख्या प्रसादपूर्ण ग्रंथास मदत देऊन आम्हांस प्रकाशनाच्या कामीं उत्तेजन द्यावें आणि ग्रंथकर्त्यास पुनः याचप्रकारची वाङ्मय-सेवा करण्यास स्फूर्ति द्यावी अशी विनंति आहे.

मुंबई ( गिरगांव ),
ता. १३–११–२८

व्ही. प्रभा आणि कंपनी.

# उपोद्घात.

बं.—कत अजानारे जानाइले तुमि ( गीत ३ ).

केलेंसी पारख्या जनां परिचित । परगृहा आत बैसूं दिलें ॥
दूर जनां केलें निकट बांधव । परकी मानव बंधु झाले ॥
जुनें वासस्थान त्यागोनी जायाला । वाटते मनाला खंती मोठी ॥
तूंची पुरातन नूतन निवासी । येवोनी वससी भुलतों मी ॥
जीवनीं मरणीं अखिल भुवनीं । जेथ तूं घेवोनी जासी मज ॥
अखंड जन्मींचा सखा परिचित । असती निश्चित तूंची एक ॥
तुजसी जाणतां नसे आपपर । परक्याचें घर ऐसें नुरे ॥
नसे प्रतिबंध नसे कोठें भय । सर्वांशीं परिचय जुळविशी ॥
विविध असंख्य भूतमात्रीं तुज । पहावें सहज ऐसें करी ॥

कविवर रवींद्रनाथ ठाकुरांच्या गीतांजलीचा आस्वाद जगांतील एकूणएक संस्कारी भाषेंतून मिळणें शक्य झालें आहे. आज कोणच्याही भाषेला रवींद्रनाथ ठाकूर परकीयसे वाटत नाहींत. पृथ्वीवरील सातही खंडांमधील लोक रवींद्रनाथांचे हृदयोद्गार वाचून नवीन आश्वासन, अद्भुत प्रेरणा आणि दिव्य दृष्टि मिळवीत आहेत. आणि प्रत्येकाला वाटतें कीं कवींद्र आपल्याच हृदयांतील चिरसंचित गूढ भाव व्यक्त करीत आहेत.

जाहिरातीच्या या यांत्रिक युगांत कोणतीहि गोष्ट सर्वतोगामी अथवा सर्वमुखी करणें अशक्य नाहीं. पण तो फक्त बाह्य विजय होय. मनुष्यमात्राच्या हृदयांत प्रवेश करणें आणि त्याच्याशीं जिव्हाळ्याच्या गोष्टी करणें ही कांहीं यांत्रिक युगाची ( अथवा रवींद्रनाथांचा शब्द वापरावयाचा म्हणजे कळ-युगाची ) शक्ति खास नव्हे. ती शक्ति सर्वांगसंपूर्ण संस्कारतेची, अथवा वर उद्धृत केलेल्या अभंगांत म्हटल्याप्रमाणें ईश्वरी कृपेची अतर्क्य लीला आहे. ईश्वराला जाणल्यानंतर कोठेंही परक्याचें घर असें रहातच नाहीं; कोठेंही जा, प्रतिबंध किंवा भय असावयाचें नाहीं.

गीतांजलीची खुबी याच गोष्टींत आहे कीं, मनुष्यसामान्य हृदयाची पारख असलेल्या कवीची प्रतिभा तिच्यांत झळकत आहे. आणि याच कारणास्तव

ज्याच्या ज्याच्या वाणीमध्यें कवित्वाचा प्रसाद आहे त्याला त्याला ती विशेष रूपानें आपलीशी करावीशी वाटते.

मराठीमध्यें गीतांजलीचा अनुवाद झाला नाहीं असें नाहीं. निरनिराळ्या कवींनीं गीतांजलीपैकीं खास आवडतीं गीतें भिन्न भिन्न वृत्तांत आणलीं आहेत. पण गीतांजलीचे कोमल आणि सात्त्विक भाव व्यक्त करण्याला श्री तुकोबारायांचें प्रेमळ वृत्तच अनुकूळ आहे. कथावर्णनें ज्याप्रमाणें ओवींतच शोभतात त्याप्रमाणें भक्तवाणी अभंगांतच वक्तृत्वपूर्ण होऊन स्वतःच्या सोळाही कळा प्रगट करते. सतारीचा सूर बरोबर लागला म्हणजे ज्याप्रमाणें गायकाचा कंठ आपोआप खुला होतो, त्याप्रमाणें कवीला विषयानुकूल वृत्त मिळालें म्हणजे त्याची पदविन्यास-शक्तिहि खुली होते. प्रस्तुत अभंग–गीतांजलीमध्यें असा सुयोग साधलेला आहे हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. गीतांजलीचें गद्य भाषांतर सुंदर झालें आहे यांत शंका नाहीं; पण नामदेव, जनाबाई, ज्ञानदेव, तुकाराम यांच्या आध्यात्मिक वारशावर परिपुष्ट झालेली भाविक महाराष्ट्राची भाविक जनता अभंगवाणींतील गीतांजलीच नेहमीं पसंत करील. आणि आशा आहे कीं गुरुवर्य 'ऋग्वेदी'ना लवकरच या पुस्तकांतील मूळ अभंगांची एक लहानशी आवृत्ति काढावी लागेल. 'अभंगगीतांजली' नित्य पाठाचा ग्रंथ होऊन बसली तर त्यांत आश्चर्य वाटाव-याचें कारण नाहीं. जुन्या विचाराचे आणि नव्या विचाराचे, वारकरी संप्रदायाचे आणि प्रार्थनासंप्रदायाचे, भाविक वृत्तीचे आणि चिकित्सक वृत्तीचे सर्वच लोक या अभंगगीतांजलीचा आदर करतील, आणि आध्यात्मिक वृत्ति कमावण्याच्या कामीं तिचा उपयोग करतील.

बाह्यसृष्टींत ज्याप्रमाणें तुफान आणि शांति, कोमलता आणि कठोरता, व्याकु-ळता आणि धन्यता वगैरे भाव असतात त्याचप्रमाणें हृदय-सृष्टींतही असतात. बुद्धींतील शंकाकुशंकांचें काहूर एखादे वेळीं शांत होईल, पण हृदयांतील कल्लोळ कधीं शांत झाल्याचें आणि हृदय थंड पडल्याचें कोणी ऐकिलें नाहीं. हृदयसाग-रांत भरती ओहटी चालावयाचीच; लहानमोठ्या लाटांचा अखंड महोत्सव असाव-याचाच. आणि असें आहे तोंपर्यंत गीतांजलीसारख्या हृदयकाव्याची आवश्यकता मनुष्याला असणारच. **गीताञ्जलि वाचत असतां आपण काव्यसुख घेत आहोंत असा अनुभव होत नाहीं पण हृदयाला दिव्य आहार मिळत आहे, पौष्टिक रसायण पोहोंचत आहे असेंच वाटतें. मनुष्य जीव-नाला जीवन मिळत आहे, असा आनंद प्राप्त होतो.** आणि म्हणूनच

गीतांजलि हा ग्रंथ जगाच्या धार्मिक साहित्यांत कायमचें स्थान मिळविणार आहे याविषयीं शंका उरत नाहीं.

काव्याबरोबर त्याचा भावार्थ आणि रहस्य यांसारखी मदत द्यावी किंवा न द्यावी याविषयीं नेहमींचा मतभेद आहे. कोणी म्हणतात कीं कवितेंत असलेला बोध अथवा गर्भितार्थ गर्भांतच राहूं द्यावा हें चांगलें. त्यायोगानें कवितेचें सौंदर्य अत्यंत खुलून निघतें. गर्भितार्थाचा सुईणपणा कधींही करूं नये. कवितेमध्यें अनंत अर्थ साठवण्याची शक्ति असते. वाचक आपापल्या अनुभवाप्रमाणें किंवा कल्पना-शक्तीप्रमाणें त्यांतून हवा तितका अर्थ घेऊं शकतो. एवढेंच नव्हे, पण भिन्न भिन्न समयीं वृत्तिभेदामुळें एकच मनुष्य निरनिराळा बोध कवितेंतून घेऊं शकतो, आणि प्रासादिक कवितेंतील खरा बोध तर कधीं शब्दबद्ध होऊंच शकत नाहीं. तुडुंब भरलेल्या सरोवराचा बांध एका बाजूनें फोडल्यास त्यांतून जोराचा प्रवाह वाहूं लागेल हें खरें, पण सरोवराची शक्ति एकांगी होईल, आणि आपण कवितेचा भावार्थ देण्यांत आपली स्वतःची दृष्टि वाचकावर लादून त्याची स्वतंत्र आकलन-शक्ति कुंठित केल्यासारखें होत नाहीं काय? प्रत्यक्ष कवीला देखील स्वतःच्या काव्यावर भाष्य करण्याचा अधिकार नाहीं. मग इतरांची तर कथा काय?

हा पक्ष बलवत्तर आहे यांत शंका नाहीं. पण याला दुसरी बाजूही आहे. बाह्य सृष्टीचें सौंदर्य आणि अंतःसृष्टीचें गांभीर्य अनुभवल्यानंतर त्याचा आनंद काव्य-रूपानें व्यक्त करण्याचा जर कवीला अधिकार पोहोंचतो, तर कवीची दिव्य कृति वाचून रसिकानें स्वतःचा परितोष काय म्हणून व्यक्त न करावा? काव्यांतून अनंत अर्थ निघूं शकतात, एवढ्याच कारणासाठीं त्यांतील एकही अर्थ व्यक्त न करावा हा न्याय कोठचा? एकानें काव्यार्थाचें रहस्योद्घाटन केलें तर त्यायोगें दुसऱ्याची बोधशक्ति कुंठित होण्याचा जितका संभव आहे तितकाच तिला जागृति येऊन चालन मिळण्याचाही संभव आहे. गीतांजलींतील गीतें वाचून गुरु-वर्य 'ऋग्वेदीं'ना तुकारामाचे अथवा उपनिषत्कालीन ऋषींचे जे उद्गार सुचले तेच प्रत्येक वाचकाला सुचतील असें नाहीं. पण येथील रहस्य वाचून वाचकाला स्वतःचेंच स्वतंत्र रहस्य शोधण्याला मदतच होईल. आणि जें काम प्रत्येक कॉले-जांत विद्यासंपन्न अध्यापक करीत असतात तेंच पुस्तकरूपानें छापून काढल्यास त्यांत औचित्यभंग तर कोणता झाला?

रवीन्द्रनाथांनीं मानसशास्त्र आणि समाजशास्त्र या दोहोंमध्यें खूप खोल उतरून कवित्वाचा एक नवाच आणि कष्टसाध्य असा आदर्श आपलेपुढें ठेवला आहे.

नुसत्या गुळगुळीत कल्पना, ठसकेदार किंवा लुशलुशीत भाषेंत व्यक्त केल्या म्हणजे मनुष्य कवि झाला असें आतां कोणीही मानणार नाहीं. कवि म्हटला म्हणजे त्यानें संस्कृतीच्या अंगप्रत्यंगांचें आकलन केलेलें असलें पाहिजे. प्रेम-भावना आणि धर्मभावना यांचें रहस्य त्याला अवगत असलें पाहिजे. व्यक्तीचे विशिष्ट अनुभव आणि त्याचा आंतरिक विकास याचीही त्याला यथार्थ कल्पना असली पाहिजे. आणि मनुष्य जातीचा इतिहास व तिची निकटवर्ती आणि दूरवर्ती दोन्ही भविष्यकाळांसंबंधीं आकांक्षा यांची त्याच्या हृदयांत अखंड वसती असली पाहिजे. मनुष्य जीवनाच्या तीनही सप्तकाचे सर्व सूर, त्यांतील बारीक सारीक सर्व श्रुति त्याला काढतां आलें पाहिजे. आणि इतकें करूनही त्याची छाप सुभग व शुभपरिणामीच असली पाहिजे. आणि ही झाली कवीची फक्त बाह्य तयारी. आजकालचा धर्मकार अथवा खराखुरा सामाजिक पुढारी देखील इतक्या तयारीवांचून स्वतःचें कार्य सांगोपांग पार पाडूं शकणार नाहीं. पण कवि तो कविच. त्याच्यामध्यें अद्भुत वशीकरणविद्या असते. तो परिचित आणि अपरिचित सर्वच लोकांचीं हृदयें काबिज करतो. आणि जणूं काय त्याची ही मोहिनी विद्या पाहूनच सरस्वती देवी त्याला वाचाशक्तीचें वरदान देत असते. जो भाव व्यक्त करावयाचा असेल त्याला अनुरूप असे शब्द जणूं काय आपो-आप, न बोलावतां येऊन उभे राहतात. एकही शब्द प्रयत्नपूर्वक आणून बसवला असेल अशी शंकादेखील मनांत येत नाहीं.

कवि सहज बोलून गेला आणि मग विद्वानांनीं त्याच्या अस्पष्ट उक्तींचा फायदा घेऊन त्याच्या उक्तींत वाटेल तेवढा अर्थ कोमला, असें ठाकुरांच्या कवितेंत दिसत नाहीं. या विभूतीनें मनुष्यजीवनाचा ठाव पाहण्याचा अनेक रीतीनें प्रयत्न केला आहे. भवाटवीमध्यें रस्ते पाडून त्याचें जीवनभोग्य उपवन करण्याचा मानवी प्रयत्न यांना परिपूर्ण अवगत आहे, आणि म्हणूनच **यांच्या वाणीमध्यें आत्मविश्वास, सामर्थ्य आणि व्यापकता आली आहे,** असें ठाकुरांची कविता वाचणाऱ्याच्या मनावर ठसल्यावांचून रहात नाहीं. खरोखर ठाकुरांनीं कवित्वाचा एक महान् आदर्श जनतेपुढें मांडला आहे.

रवींद्रनाथांची प्रतिभा जितकी स्वतंत्र आहे तितकीच ती आर्य संस्कृतीचें परिपक्व फळ आहे. त्यांच्या लेखांत आणि भाषणांत, कवितेंत आणि नाटकांत हिंदुस्तानांतील साहित्याच्या उत्तमांशाची छाप स्पष्ट दिसते. भास कालिदासाचा हा कवि वारस आहे, हें ओळखावयास फारसे परिश्रम पडत नाहींत. हिंदुस्तानच्या

संत कवींच्या सरस्वतीचें यांनीं आकंठ पान केलें आहे. याची गीताञ्जलीपैकीं कोणचेंही पद्य साक्षी देऊं शकेल. हिंदुस्थानचे भाष्यकार आणि स्मृतिकार, साहित्यकार तसे कलाकोविद, शिल्पकार आणि गायक आपआपलें रहस्य योग्य पात्र ओळखून यांच्या कानांत बोलून गेले आहेत, याविषयीं खात्री त्यांच्या अनेक निबंधांवरून सहज होते. कवितेंत ज्याप्रमाणें प्रथम निसर्गकाव्य, नंतर प्रेमकाव्य, आणि सरतेशेवटीं भक्तिकाव्य असा विकास रवीन्द्रनाथांनीं दाखविला आहे, त्याचप्रमाणें प्रथम देशभक्ति आणि त्यानंतर मानवी भक्ति याचाही विकास त्यांनीं साधला आहे.

या सर्वांच्या मूळांत महर्षि देवेंद्रनाथ ठाकुरांची तालीम दिसून येते. खरोखर रवींद्रनाथांना देवेंद्रनाथांसारख्या पित्याकडून शिक्षण मिळणें हें अनेक रीतीनें अनुरूपच आहे. गीताञ्जलि वाचतांना आपण हें विसरतां कामा नये कीं महर्षींची भक्ति आणि प्रयत्ति तींत प्रगट झालेली आहे.

उपनिषद्, बौद्ध वाङ्मय, वैष्णव संप्रदायाचे साधुसंत, आणि महर्षि देवेंद्रनाथ आदि आधुनिक तत्त्वज्ञ यांची छाप रवींद्रनाथांच्या कृतीवर पडलेली दिसते. कांहीं मिशनरी लोकांना वाटलें, बाईबलची छापही त्यांच्या लेखांमध्यें असलीच पाहिजे. राजा राममोहनराय यांचेवर ज्याप्रमाणें इस्लामची छाप होती, केशवचंद्रसेन यांचेवर ख्रिस्ती धर्माची छाप होती, त्याचप्रमाणें रवींद्रनाथांच्या उक्तीमध्यें जगांतील कोणत्याही साहित्याची छाप दिसून येईल तर त्यांत आश्चर्य किंवा लाज वाटण्याचें कारण कांहींच नाहीं. आजचें युग एकांड्या शिलेदाराचें नाहीं. पण संपूर्ण रागांत ज्याप्रमाणें सर्वच स्वरांचा मिलाफ असतो, तसें आजच्या कोणत्याही संस्कारी व्यक्तीच्या विचारांत आणि उद्गारांत जगांत पाहणाऱ्या सर्वच विचार-लहरींचें प्रतिबिंब दिसल्यावांचून कसें राहणार ? पण ठाकुरांना स्वतः असें वाटत नाहीं कीं, बायबलचा त्यांचेवर फारसा परिणाम झाला असावा. त्यांनीं एकाठिकाणीं म्हटलें आहे कीं, बायबलच्या कर्कशतेमुळें त्यांना तें पुरेंच करवेना. गांधीजींनींही बायबलच्या जुन्या कराराविषयीं आपला असाच अभिप्राय व्यक्त केला आहे.

नेहमीं असें मानण्यांत येतें कीं वैष्णव धर्म फार सोपा आहे. तपस्या, इंद्रिय-दमन आणि वैराग्य यांचें त्याला वाकडें आहे. गीताञ्जलींतील कांहीं गीतांवरून कित्येकांच्या मनावर अशीच छाप पडली आहे. ' **वैराग्यसाधनेच्या द्वारा जी मुक्ति मिळत असते ती मला नको आहे.** ' अथवा, ' **हे प्रभो,**

**तूं सांगितलेलें कार्य मी मागाहून करीन. पण क्षणभर मला तुझ्‍-जवळ प्रथम बसूं दे.'** अथवा, **'मला झोंप येऊं लागली तर ती दूर करून मी ईश्वराची उपासना करणार नाहीं. प्रथम डोळाभर निजून घेईन. व ताजा होऊन पूजेचा विचार करीन.'** अशासारखे विचार कितीही गोड व गोंडस असले तरी ते साधकाचे खास नव्हेत, असें कित्येकांचें म्हणणें आहे. रवींद्रनाथांच्या तत्त्वज्ञानांत तपस्या, इंद्रियदमन, पुरुषार्थ, पराक्रम, असल्या गोष्टींना फारसें स्थान नाहीं, येथून तेथून व्याकुळता किंवा समाधान यांचीच रेलचेल आहे, असें कांहीं लोकांना वाटतें.

ज्याप्रमाणें बीजामधून अंकुर, अंकुरांतून पालवी, आणि त्यांतून फूलफळ असें आपोआप निघत असतें, त्याप्रमाणें सरळपणें राहिलें आणि मांगल्यावर निष्ठा ठेवली म्हणजे कसलीच धांवाधांव केल्याशिवाय सर्व कांहीं आयतें मिळणार आहे, अशासारख कविवरांचें तत्त्वज्ञान आहे असें समजून कित्येक म्हणतात कीं हें सर्व गर्भश्रीमंती तत्त्वज्ञान आहे. मनुष्यजीवन हें धकाधकीचा मामला आहे. जीवन म्हणजे कांहीं काव्य नव्हे, पण रणसंग्राम होय, असें म्हणून कवींच्या काव्यमय मधुर तत्वज्ञानाला कांहीं लोक बाजूस सारतात. पण गीताञ्जलि ध्यानपूर्वक वाचणाऱ्याला सर्वत्र साधना दिसल्याशिवाय राहणार नाहीं. संस्कारी पुरुषाला, आणि विशेषतः कविहृदयाला कष्ट आणि आयास यांचें स्तोम माजविणें आवडत नसतें. **जीवनाला सुवासमय, सौंदर्यमय व आनंदमय करणें हेंच तर कवीचं काम.** 'हस्तं हस्तेन संपीड्य दंतैर्दंतान् विचूर्ण्य च । अंगान्यंगैः समाक्रम्य जयेदादौ स्वकं मनः' अशासारखी साधना गीताञ्जलींत न सांपडल्यास तो कवीचा दोष नव्हे.

गीतांजलींत येथून तेथून सर्वत्र ईश्वरभक्ति, ईश्वरनिष्ठा आणि मांगल्याचीच उपासना दिसून येते. 'आमार सकल अंगे तोमारे परश' (गीत ९४ पहा) या शुभ संकल्पाहून अधिक उच्चतर साधना ती कोणची ?

'सर्व कर्म्म तव शक्ति एइ जेने सार. करिब सकल कर्म्मे तोमारे प्रचार !' (गीत ९४ पहा) याहून मोठी तपस्या कोठून सांपडणार ?

**गीताञ्जलिमध्यें सर्वत्र आर्य भावनाच दिसून येते.** गीतांजलि ही एकच 'फिलसुफी' किंवा एक कवित्वृत्ति नसून एक सबंध संस्कृतीच आहे.

शांतिनिकेतनमध्यें रवींद्रनाथ ठाकुरांना ‘ गुरुदेव ’ असें म्हणतात. तेथें असतांना एके दिवशीं मी त्यांना म्हटलें, ‘ गुरुदेव, आपलेकडून कांहीं बोध ऐकावा अशी माझी इच्छा आहे.’ लगेच ते म्हणाले, ‘ मी कवि आहें.’ कवीची वृत्ति हीच माझी साधना. मी कोणाचा गुरु होऊं शकत नाहीं. पुष्कळ लोक मजजवळ उपदेश मागावयास येतात. पण माझा विश्वासच नाहीं कीं कोणी कोणाला गुरु करूं शकेल. मी **सत्यं शिवं सुन्दरम्** याचें ध्यान करतों. तेव्हां ही **सर्व सृष्टि सत्यरूप आहे, कल्याणकारी आहे, सुंदर आहे,** असें मला दिसूं लागतें.’

थोड्याच वेळानें विषय बदलला, आणि सृष्टिसौंदर्याच्या मनावर होणाऱ्या परिणामाविषयीं चर्चा चालली. मी म्हटलें, ‘ लहानपणीं मी कारवारला होतों. तेथील समुद्राची शोभा, सुरूचें उपवन, आणि सूर्यास्ताचे सुवर्ण यांची मजवर कांहीं अवर्णनीय छाप पडली; आणि त्याच काळीं माझ्या सुदैवानें मला एक असे शिक्षक भेटले कीं ज्यांनीं मजमध्यें नैतिक जीवनाच्या भव्यतेविषयीं आदर उत्पन्न केला. ईश्वराची भक्ति करावी व चांगलें वागावें याविषयींचे संस्कार बाळपणापासून मिळाले होते खरे, पण नैतिक जीवनांत लागणारा करारीपणा, व त्यासाठीं सोसाव्या लागणाऱ्या कष्टांतच मिळणारें आध्यात्मिक समाधान याविषयींची जाणीव मला गुरूजीपासूनच प्रथम मिळाली.

कारवारचें नांव घेतांच गुरुदेवांना जणूं आनंदाचा उमाळा आला, व ते म्हणाले, ‘ कारवार ! तेथें मी लहानपणीं राहिलों आहें. अत्यंत सुंदर स्थान आहे ! ’

वरील प्रसंगाला आज जवळ जवळ चौदा वर्षें झालीं. आणि आज त्याच गुरुदेवांच्या जगत्प्रसिद्ध गीताञ्जलीच्या त्याच माझ्या गुरुवर्यांनीं केलेला अभंगानुवाद हातीं पडून त्या प्रसंगाचें पुन्हा स्मरण झालें. पण गुरुवर्यांनीं स्वतःच्या कृतीसाठीं उपोद्घात मजकडे मागून मला अडचणींत घातलें. ज्यांच्या नित्य प्रवचनांमधून आणि तत्त्वनिष्ठ जीवनामधून मला धर्मबोध प्राप्त झाला, ज्यांचेकडून हरिश्चंद्राख्यानासारखीं प्रेमळ आख्यानें मी ऐकलीं, आणि ज्यांनीं माझ्या आध्यात्मिक कल्याणासाठीं गीतेची एक सुंदर प्रत मला आशीर्वाद म्हणून दिली, त्यांच्याच प्रवचन मालेला मी उपोद्घात कसा लिहावा ? अंधश्रद्धा काढून टाकून तिचे जागीं नास्तिकता येऊं न देतां धर्मश्रद्धेचें बीजारोपण करण्याची ज्यांची हातोटी मला दीक्षारूप झाली, त्यांच्या गीताञ्जली भाष्यासंबंधानें मी कसें काय लिहावें ? पण

' आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया ' अशा तालमींत वाढलेला मी त्यांना नाहीं कसें म्हणावें ? सरतेशेवटीं मनानें ठरविलें कीं, गीताञ्जलि वाचून आणि रवींद्रांचें जीवन निहाळून आपणास जो आनंद झाला आहे तोच लिहून पाठवावा, आणि आज्ञा-पालनाच्या जबाबदारींतून मुक्त व्हावें. वाचकांना यांत कांहीं नवीन न सांपड-ल्यास मला आश्चर्य किंवा दुःख होणार नाहीं. गुरुवर्यांच्या चरणीं ही माझी प्रणामांजली आहे असेंच त्यांनीं समजावें.

दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर.

# विषयानुक्रमणिका.

खंड १ ते १०—यांत इंग्रजी गीताञ्जलींतील १०३ व इतर ९ गीतें मिळून ११२ गीतें अभंगांत दिलीं आहेत.

यानतर **पदें** या सदराखालीं ९ बंगाली पद्यांचें रूपांतर दिलें आहे.

अभंगगीताञ्जलि लिहितांना ग्रंथकर्त्यास सुचलेले विचार शेवटीं **भगवद्भजन** या सदराखालीं दिले असून यांत १९ अभंग, एक शरण-गीत, करुणाष्टक, पूजा आणि आरती आहे.


| खंड | अभंग-गीतें | इंग्रजी गीतें | पृष्ठें |
|---|---|---|---|
| १ आत्म्याचें अमरत्व व पुनर्जन्म | १ ते ७ | १, ३७, ६३, ६९, ७१, ७२, ९५, | ३ ते १६ |
| २ वासनात्याग | ८ ते १५ | ९, २७, ते ३१, ३३, ३४ | १७ ते ३१ |
| ३ ईश्वराचा शोध | १६ ते २५ | १२ते१४, १७, २०, २६, ४१, ८२, १००, १०१ | ३२ ते ५४ |
| ४ ईश्वराचा साक्षात्कार | २६ ते ३७ | ४३ ते ४८, १०, ११, इतर ४ | ५५ ते ७९ |
| ५ ईश्वराशीं सख्य | ३८ ते ५६ | २, ३, ५ ते ७, १५, १६, ३२, ४९, ५६, ६५, ६८, ७६, ७७, ९७, ९९, १०२ इतर २ | ८० ते ११२ |
| ६ ईशकृपा | ५७ ते ६३ | ५२, ५३, ५०, ५९, ८१, ८३, ८५ | ११३ ते १२७ |
| ७ करुणापर प्रार्थना | ६४ ते ७३ | १८, २१ ते २५, ४२, ७४, ८० आणि १ | १२८ ते १४७ |
| ८ मृत्यु व पुनर्जन्म | ७४ ते ८४ | ५१, ८६, ८९ ते ९४, ९६, ९८, ८८ | १४८ ते १६८ |
| ९ ईशप्रार्थना | ८५ ते ९३ | ३६, ३८ ते ४०, ५८, ७९, ३५, १०३ आणि १ | १६९ ते १८५ |

| खंड | अभंग-गीतें | इंग्रजी गीतें | पृष्ठें |
|---|---|---|---|
| १० प्रासंगिक विचार | ९४ ते ११२ | ४, ५०, ६०, ६६, ७५, ६७, ५७, ६४, ७३, ७८, १९, ५५, ७०, ८, ८४, ८७, ६१, ६२, आणि १ | १८६ ते २२० |
| पदें | १ ते ९ | | २२१ ते २२४ |
| भगवद्भजन | १ ते १९ | | २२५ ते २३४ |
| | शरणगीत | | २३५ |
| | पूजा | | २३६ |
| | करुणाष्टक | | २३७ |
| | आरती | | २३८ |

३५२९

# ॥ अभंग-गीताञ्जलि ॥



## ॥ समर्पण ॥

जय भारतमाते । शिकविलेंसि त्वां निज बाळांतें ॥ ध्रु० ॥

मुकुट दंड सिंहासन भूमि ।
प्रपंच वैभव जन जे प्रेमी ।
त्यागुनि सकलहि घ्याया केवल दरिद्र-वेषातें ॥ शिक० ॥ १ ॥

धर्मयुद्धिं शर धनु आवरुनी ।
जयापजयही सर्व विसरुनी ।
क्षमा कराया अरिसी प्रेमें समरीं वीरांतें ॥ शिक० ॥ २ ॥

सदा योगयुत चित्तें कार्यें ।
फलेच्छाविना करण्या धैर्यें ।
आज्ञापियलें त्वां ब्रह्मार्पण कर्में करण्यातें ॥ शिक० ॥ ३ ॥

गृहस्थाश्रमी जनां सांगसी ।
अनाथ बांधव अतिथी यांसी ।
आत्मवत्सदा मानुनि त्यांवरि प्रेम करायातें ॥ शिक० ॥ ४ ॥

विषय भोग ते संयमपूर्वक ।
भोगायातें, संसारीं सुख ।
सेवन करितां दमन कराया इंद्रियसंघातें ॥ शिक० ॥ ५ ॥
दैन्यें करण्या विराग निर्मल ।
नम्रत्वेंयुत सुंदर उज्ज्वल ।
पदोपदीं तूं सांगसि माते दुहितापुत्रांतें ॥ शिक० ॥ ६ ॥
सुपुण्यकर्मैं संपत्कालीं ।
करण्या, व्हाया दीनां वाली ।
उपदीक्षसि तूं परार्थ हाची स्वार्थ गणायातें ॥ शिक० ॥ ७ ॥
सुखदुःखीं मन–समता राखुनि ।
ब्रह्माठायीं चित्त लक्षुनी ।
संसार सदोदित देवकार्य हें म्हणुनी करण्यातें ॥ शिक० ॥ ८ ॥
तनु मन तुजसी अर्पण केलें ।
नम्रपणें पदिं शिर वांकविलें ।
मुक्त करीं "वामना" त्वरेनें छेदुनि पाशांतें ॥ जय० ॥ ९ ॥*

—"ऋग्वेदी."

* कविवर्य रवींद्रनाथ यांच्या एका पद्याचा अनुवाद

## ॥ प्रथम खंड ॥

# आत्म्याचें अमरत्व व पुनर्जन्म.

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ भ. गीता. ॥

**अर्थ**—या अखिल विश्वास व्यापून असणारें अविनाशी आहे हें तूं जाण आणि जें अविनाशी आहे त्याचा नाश करायाला कोणी समर्थ होत नाहीं.

यतो वा इमानि भूतानि जायंते ।
येन जातानि जीवंति ।
यत्प्रयन्त्यभिसंविशांति तद्ब्रह्म ॥ तै. उपनिषत् ॥

**अर्थ**—ज्यापासून सर्व भूतमात्र उत्पन्न होतें, ज्याच्या सत्तेनें तें जिवंत राहतें आणि अंत समयीं ज्याच्या मध्यें भूतमात्राचा प्रवेश होतो तें ब्रह्म होय.

अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ॥ भ. गीता. ॥

**अर्थ**—हा देह अंतवंत असून ह्या देहामध्यें असणारा आत्मा नित्य आहे.

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥ भ. गीता. ॥

**अर्थ**—ज्याप्रमाणें मनुष्यें जुनीं वस्त्रें टाकून देऊन नवीन वस्त्रें धारण करतात त्याप्रमाणें देही म्हणजे आत्मा जीर्ण शरीरांचा त्याग करून नवीन देह धारण करतो.

### अभंग.

अमर आहां अमर आहां । खरें कीं पहा खोटें हें ।
न म्हणा देह माझा ऐसा । मग भरंवसा कळेल ॥
कैंचा धाक कैंचा धाक । सकळिक हें आपुलें ॥
देवचि वरे देवचि वरे । तुका म्हणे खरे तुम्ही ॥ १ ॥

## ॥ गीत १ ॥

बं.—आमारे तुमि अशेष करेचो. ( इं. १ )

अनंत अव्यय केलें त्वां मजला । काय वर्णूं लीला तुझी देवा ॥
नश्वर ही नौका रिकामी करोनी । भरिसी फिरोनी नव जीव ॥
गिरिकंदरांत कधीं नदीतीरीं । हिंडतोसि हरी वेणूसह ॥
वेणूंतुनी या मनोहर ताना । घेवोनी जीवांना चेतविसी ॥
तवामृतस्पर्शें माझ्या हृदयांत । अति हर्ष होत सीमा नसे ॥
वाणीचा उमाळा उठे अंतर्यामीं । उठताति ऊर्मि असंख्यात ॥
अनंत हस्तें तूं अहर्निश देसी । तुझ्या दातृत्वासी नसे सीमा ॥
लहान या करीं घेऊं कैसे वर । साहूं उपकार देवा किती ॥
जन्मावरि जन्म युगावरि युगें । जाती परि घे घे म्हणतोसी ॥ १ ॥

**भावार्थ**—हे परमेश्वरा, तुझी लीला वर्णन करण्याला मी सर्वथैव असमर्थ आहें. तुंवा मला अव्यय केलें असून अनंत कालापासून मी या संसारांत वावरत आहें. ही कायारूपी नौका जीर्ण होतांच ती रिकामी करून तूं पुनः ती दुरुस्त करतोस. तिच्यांत नवीन चेतना भरतोस. पर्वत, दऱ्या, नदीचे तीर वगैरे ठिकाणीं तुझा संचार होत असून तुझ्या मुरलीच्या तानांच्या योगानें सर्वत्र तुझ्या चैतन्याचा प्रसार होतो आणि नवजीवन स्फुरूं लागतें. तुझा अमृतोपम स्पर्श होतांच अंतःकरणास उमाळा येतो, वाणीस स्फुरण येतें आणि आनंदामध्यें मी बुडून जातों. तुझें दातृत्व अपार आहे; रात्रंदिवस तूं माझ्यावर तुझ्या दातृत्वाचा वर्षाव करीत आहेस. या लहान हातांमध्यें तुझे वर घेऊं तरी कसे ? अनेक युगें झालीं, असंख्यात जन्मही झाले. परंतु तुझें दातृत्व चालूच आहे. देवा, हा माझ्यावर तुझा महदुपकार आहे.

**रहस्य**—या विश्वाच्याठायीं आपला जन्म झाल्यावर आपल्या वांट्यास कांहीं तरी कामगिरी येते. ही कर्म करण्याची जागा हा मृत्युलोक असून कर्मसमुच्चय म्हणजेच संसार आहे. संसारास समुद्राची उपमा देण्यांत येते; आणि देहाच्या योगानें या संसारांतील कृत्यें पार पाडावयाचीं असतात म्हणून देहाला नौका हें अभिधान देण्यांत आलें आहे. भवसागर तरून जाणें म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ साधणें होय असें सुज्ञजन सांगतात

**महता पुण्यपण्येन क्रीतेयं कायनौस्त्वया ।**
**पारं दुःखोदधेर्गंतु तर यावन्न भिद्यते ॥**

म्हणजे महत् सुकृतरूपी धनाच्या योगानें विकत घेतलेली ही देहनौका भंग पावण्यापूर्वी (अर्थात् मृत्यु प्राप्त होण्या आधीं) दुःखसमुद्रांतून तिच्या मदतीनें तरून जा. ही नौका जीर्ण होतांच भंग पावते. तेव्हां परमेश्वर तिचा पुनरुद्धार करून तिला गति देतो. ती रिकामी करणारा, पुनः भरणारा आणि तिला चालन देणारा, सुकर्णधारहि तोच आहे. परमेश्वराचा मधुर वीणारव अर्थात् त्याची प्रेममय चेतनाशक्ति त्याच्याकरवीं अरण्यपर्वतादिकांस प्राप्त होतांच पशुपक्षि, तरुलता, मानव, जलाशय इत्यादिकांना नवजीवन प्राप्त होतें. या सर्वांच्या ठायीं हर्षोत्साह उदय पावतो, आणि जीवितास चैतन्य लाभतें. म्हणूनच भगवंतानीं गीतेंत "जीवनं सर्व भूतेषु" म्हणजे सर्व भूतमात्राच्या ठिकाणीं मीच जीवन आहें असा इषारा दिला. ही नवजीवनाची देणगी ईश्वराकडून अनंत कालापासून प्राप्त होत आली आहे. अनादिकालापासून अनंत युगांपर्यंत चालणारी ही ईश्वरी कृपेची क्रिया अखंड असल्यामुळें या नश्वर आणि वारंवार बदलणाऱ्या विश्वांतील संसाराला भगवंतांनीं अश्वत्थाची (शाश्वत वृक्षाची) उपमा दिली आहे. आणि तो वृक्ष अव्यय, अनादि आणि प्रत्यक्ष ईश्वरापासून उत्पन्न झाला आहे असेंही सांगितलें. यांतील रहस्य जाणणें म्हणजे संसाराचें रहस्य जाणणें आहे. ज्यानें हें रहस्य जाणलें त्यानें कायानौकेच्या योगानें भवसागर ओलांडला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननीजठरे शयनम् ॥**

पुनः जन्म त्यानंतर मृत्यु त्यानंतर पुनः मातेच्या उदरीं जनन असा हा अव्याहत क्रम चालला आहे. त्या अर्थी या जन्ममृत्यूच्या प्रकाराबद्दल सुखदुःखाच्या बाधा जीवास लावून घेणें अयोग्य नाहीं काय ? अपरिहार्य गोष्टींबद्दल दुःख मानूं नको असें भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें यांतील रहस्य जाणलें पाहिजे. या रहस्याचें पूर्ण ज्ञान झालेले तुकोबा म्हतात—

**मीचि मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ॥**
**आतां पुरले नवस । निरसोनि गेली आस ॥**
**झालों बरा बळी । गेलों मरोनी ते काळीं ॥**
**दोहींकडे पाहे । तुका आहे तैसा आहे ॥ १ ॥**

## ॥ गीत २ ॥

बं.—भेवेछिनु मने जा हबारतारि शेषे. ( इं. ३७ )

**मजसी वाटलें यात्रा पूर्ण झाली । शक्ति न राहिली अंगीं आतां ॥**
**मार्ग न राहिला काज ही सरलें । पाथेय उरलें नाहीं हातीं ॥**
**वाटे आतां मौनें एकांतीं दडावें । जीवित कंठावें दीन वेषें ॥**
**परि आजि काय पडे हें दृष्टीसी । लीला तूं दावीसी भगवंता ॥**
**अंतःकरणासी नवीनता आली । स्फुर्ति उद्भवली अवचित ॥**
**जंव जीर्ण शब्द जिव्हाग्रीं निमाले । अंतःकरण व्यालें नव गीतें ॥**
**पथ पुरातन लोपतां विकास । पावला प्रदेश नूतन जो ॥ १ ॥**

**भावार्थ**—ईश्वरा, मला वाटलें कीं माझी सर्व शक्ति नाहींशी झाली. कार्यही संपलें. पुढील रस्ता दृष्टिआड झाला. आतां सर्व व्यवहाराचा त्याग करून कोठें तरी एकांतस्थलीं दडून बसावें आणि आयुष्याचे राहिलेले दिवस अज्ञातवासांत घालवावे असा विचार आला. परंतु काय हा चमत्कार! भगवंता, तुझी लीला अतर्क्य आहे. तुझी कृपा होतांच माझ्या ठायीं नवीन स्फूर्ति उत्पन्न झाली आहे. जुने विचार, निराशेचे उद्गार आणि क्रियेवांचून पडून राहण्याची इच्छा या सर्वांचा लोप होऊन मन उल्हसित आणि उत्साहयुक्त झालें आहे. मला नवीन कार्यक्षेत्र दिसत आहे ही तुझी कृपा होय.

**रहस्य**—या संसारांतील अनेक कामें करीत असतां कायिक व मानसिक शक्ति क्षीण झाली म्हणजे आपणास या संसारक्षेत्रांतून निघून जावें असें वाटूं लागतें. ज्या अर्थी कार्य करण्याची आपणामध्यें शक्ति नाहीं त्या अर्थी या संसारांत गुंतून राहण्यांत तरी अर्थ कोणता असें मनाला वाटतें. औदासिन्याच्या कचाट्यांत सांपडलेला आणि वैतागलेला मनुष्य स्वकर्माविषयीं उदासीन होतो. परंतु अकस्मात् अंतःकरणांतील विचार बदलतात. मनामध्यें नवीन उत्साह उत्पन्न होतो. यास कारण काय?

**आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना ॥**

हेंच खरें आहे. मुक्याला वाचा देणाऱ्या, आणि पांगळ्यास पर्वत उल्लंघून जाण्याची शक्ति देणाऱ्या भगवंताची लीला कोण जाणतो? या भावनेनें संसारांत कार्य करीत गेल्यास उदास होण्याचें कारण नाहीं. जगांत उत्पन्न झालेला प्राणि

कर्मबद्ध आहे. या दृढतर कर्मबंधनापासून मुक्त होण्यास जाग्रतापूर्वक हें कर्म पार पाडलें पाहिजे. हाच कर्मसांगतेचा उपाय आहे. कर्मसांगता होण्यापूर्वी पळवाट काढण्याची इच्छा उत्पन्न होतांच भगवंतास शरण जावें आणि कर्म करण्यासाठीं सामर्थ्य देण्याबद्दल त्याची प्रार्थना करावी. कर्ता करविता भगवंत आहे आणि त्याच्याच कृपेनें सर्व कांहीं व्यवहार चालत आहे असें मानल्यावर औदासिन्यास मुळीं जागाच राहणार नाहीं. सदैव आपल्या मनामध्यें जाणावें कीं—

**आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ।**
**साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ।**
**काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ।**
**तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायावीण॥१॥**

---

## ॥ गीत ३ ॥

बं.–कत अजानारे जानाइले तुमि. ( ई. ६३ )

**केलेंसी पारख्या जनां परिचित । परगृहा आंत बैसूं दिलें ॥**
**दूर जनां केलें निकट बांधव । परकी मानव बंधु झाले ॥**
**जुनें वासस्थान त्यागोनी जायाला । वाटते मनाला खंती मोठी ॥**
**तूंची पुरातन नूतन निवासी । येवोनी वससी भुलतां मी ॥**
**जीवनीं मरणीं अखिल भूवनीं । जेथ तूं घेवोनी जासी मज ॥**
**अखंड जन्मींचा सखा परिचित । असशी निश्चित तूंची एक ॥**
**तुजसी जाणतां नसे आपपर । परक्याचें घर ऐसें नुरे ॥**
**नसे प्रतिबंध नसे कोठें भय । सर्वांशीं परिचय जुळविशी ॥**
**विविध असंख्य भूतमात्रीं तुज । पहावें सहज ऐसें करीं ॥**

**भावार्थ**—हे परमेश्वरा! तुंवा मला परक्या लोकांमध्यें जन्मास घातलें. परंतु तुझ्या कृपेमुळें हे सर्व परिचित व ममतेचे आप्तेष्ट झाले. हा देह टाकून जाण्याचा जेव्हां समय प्राप्त होतो तेव्हां अतिशय वाईट वाटतें. परंतु त्यावेळीं माझ्या लक्षांत येत नाहीं कीं अनंत जन्मींचा जो तूं माझा सांगाती तो पुढील जन्मींदेखील सांगाती आहेस. तुझी ओळख पटल्यावर आपपर भाव कोठून राहणार? तुझा परिचय घडल्यावर भीतीचा नाश झालाच. अखिल विश्वाच्या ठायीं तुझा साक्षात्कार व्हावा असें कर.

रहस्य—पूर्वकर्मानुसार पुनर्जन्माची प्राप्ती व्हावयाची असें तत्वज्ञानी जनांनीं ठरविलें. हें तत्व सनातन धर्मीय भारतीय जनांस मान्य आहे. अर्थात् जात, धर्म, पंथ, देश इत्यादि पूर्वजन्मींच्या ऋणानुबंधाच्या गोष्टी पुढील जन्मीं प्राप्त होतील असें सांगतां येत नाहीं. पूर्वसंचिताप्रमाणें नव्या कार्यक्षेत्रीं नूतन जन्माचा लाभ होईल. परंतु निरनिराळ्या योनी प्राप्त झाल्या तरी अंतर्यामीं वास करणारा पुराण पुरुष एकच आहे.

**भोळें भाविक जुनाट चांगलें । होय तैसें केलें भक्तिभावें ॥**
**म्हणवुनि चिंता नाहीं आम्हां दासां । न भ्यों गर्भवासा जन्म घेतां ॥**
**तुका म्हणे आम्हा देवाची सांगात । नाहीं विसंवत येर येरां ॥**

आपपर बुद्धि नष्ट झाली आणि सर्वत्र आत्मवत् दिसूं लागलें म्हणजे जगांतील सर्व गृहांचीं द्वारें आपल्या स्वागतासाठीं खुलीं झाल्याप्रमाणें होईल.

**रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सुदलें डोळां ॥**
**तेणें अंजन गुणें दिव्य दृष्टि जाली । कल्पना निवाली द्वैताद्वैत ॥**
**देश काल वस्तु भेद मावळला । आत्मा निर्वाळिला विश्वाकार ॥**
**न जाला प्रपंच आहे परब्रह्म । अहं सोहं ब्रह्म आकळलें ॥**
**तत्त्वमसि विद्या ब्रह्मानंद सांग । तेंचि झाला अंग तुका आतां ॥**

गीता, उपनिषदें व वेदांतसूत्रें या तीन तारा असलेल्या वीणेंतून निघणारा जो ध्वनि तोच साधुसंतांच्या वाणींतून निघाला आहे. या ध्वनीचा अर्थ एकच आहे तो हा कीं देह नश्वर असून देही हा अवध्य, अनादि व नित्य स्वरूपाचा आहे. या देहाची पुनःपुनः रचना होते आणि त्याच्याठायीं पुराण पुरुष मानलेल्या आत्म्याचा प्रवेश होतो. यामुळें अपरिचित देश, अपरिचित लोक आणि अज्ञात परिस्थिति यांचा परिचय होतो. हें जरी खरें आहे तथापि या देहाचा नाश होण्याचा प्रसंग येतांच अंतःकरणाच्या ठायीं वियोगव्यथा उत्पन्न होते. जीवात्म्याला आपल्या देहाचा आणि ज्ञात झालेल्या एकंदर वस्तुमात्राचा व परिस्थितीचा मोह लागलेला असतो. हा मोह तोडणें फार कष्टाचें वाटून तो विव्हळतो. या स्थितीला विरह–वेदना असें म्हणतात.

मृत्यु हें जननाचें द्वार आहे ही भावना आमच्या अंतःकरणाच्या ठायीं बिंबली नसल्यामुळें हा आत्मा अविनाशि आहे हें सत्य मनाला उमगत नाहीं. त्याच-

प्रमाणें हाच आत्मा जन्मजन्मांतरीं आमचा एकच सहवासी आहे हें आम्हीं जाणत नाहीं. ही एक गोष्ट योग्य प्रकारें जाणली असतां आमचें प्रपंचांतील राहाणें सध्यांहून कितीतरी जास्त सुखावह, निर्भय, निश्चिंत आणि शांततामय होईल.

---

## ॥ गीत ४ ॥

बं.—ए आमार शरीरेर शिराय शिराय. ( इं. ६९ )

**प्राण जो तरंगे नख शिखांतरीं । देहाच्या भीतुरी वाहिन्यांत ॥**
**निघाला तो प्राण विश्व-दिग्विजया । अखिल जगा या जिंकीयेलें ॥**
**तोची प्राण नाचे भुवनीं त्रिकाल । लय छंद ताल यांच्यासवें ॥**
**भूवरी धुळीच्या सूक्ष्म रोमकूपीं । लक्ष तृणरूपीं प्राण स्फुरे ॥**
**हर्षें हा विकासे सुमपल्लवांत । तैंवीं पर्जन्यांत वर्षाकाळीं ॥**
**विश्वव्यापी जन्म-मृत्यु-दोलार्णवीं । प्राण अनुभवी आंदोलन ॥**
**प्राण हा आंदोळे भवाब्धीच्या जळीं । वृद्धि क्षय काळीं अंतहीन ॥**
**ऐसा हा अनंत प्राण-स्पर्श होतां । मज ओजस्वीता प्राप्त झाली ॥**
**युगें असंख्यात विराट हा प्राण । करीत नर्तन शरीरांत ॥ १ ॥**

**भावार्थ**—आपल्या देहामध्यें चैतन्य उत्पन्न करणारा जो प्राण तोच प्राण या अखिल विश्वास व्यापून आहे. सर्व जग या प्राणशक्तीच्या ताब्यांत आहे. पृथ्वीवर कोट्यवधि तृणांकुरांच्या रूपानें हा प्राण स्फुरत असतो. तसेंच पर्जन्याच्या ठायीं आणि सुमपल्लवांमध्येंही हा प्राण दृग्गोचर होतो. तालसुरावर जणूं नृत्य करीत आहे अशा रीतीनें व्यवस्थित आणि नियमितपणें या प्राणाचें कार्य चाललें आहे. विश्वाला ‘उत्पत्ति आणि लय’ या महासागराप्रमाणें अफाट असलेल्या हिंदोळ्यावर वर खालीं आंदोलन घ्यावें लागतें. यावर बसून हा प्राण आंदोलनाची स्थिति अनुभवीत असतो. वृद्धि आणि क्षय या ज्या अवस्था जगाच्या अंगभूत आहेत त्यांत या प्राणास पुढें मागें किंवा वर खालीं जावें लागतें. अनादिकालापासून या प्राणाची आणि आपल्या देहाची गांठ पडली असून त्याच्या स्पर्शामुळेंच चैतन्याची प्राप्ति झाली आहे.

**रहस्य**—या विश्वांत सर्वांतर्यामीं एकच दिव्य आणि चैतन्ययुक्त अशी प्राणशक्ति भरून राहिली आहे. हा सिद्धांत उपनिषत्कारांनीं प्रस्थापित केला. मनुष्य,

पशु, पक्षी, जलचर, कृमिकीटकादिकांच्या ठायीं मात्र हा प्राण आहे असें नसून वनस्पति आणि अचल वाटणाऱ्या पदार्थांमध्यें देखील या प्राणाचें सार्वभौमत्व चालतें असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. चालू मन्वंतरांत या प्रकारच्या सिद्धांतांवर विश्वास बसणें शक्य नव्हतें. कारण प्रयोगांतीं प्रत्यक्ष प्रमाणाच्या कसाला जी गोष्ट उतरते तीच खरी असें हल्लींच्या कालीं मत बनत चाललें आहे. अशा वेळीं शास्त्रीय शोधांअंतीं उपनिषत्कारांचें मत प्रस्थापित झालें आहे ही आनंदाची गोष्ट होय. प्राणि व वनस्पति यांतील प्राणशक्ति एकच प्रकारची असून दोघांसही हर्षदुःखादि व्यथा व अवस्था समान आहेत हें श्री. जगदीशचंद्र बोस या वंगदेशीय शोधकांच्या प्रयोगांवरून सप्रमाण सिद्ध झालें आहे. या शोधामुळें जगांतील विद्वज्जनांच्या दृष्टींत बराच फेर पडला असून ते या विश्वांतील रचनेविषयीं जिज्ञासापूर्वक विचार करूं लागले आहेत. प्राचीन कालीं तर्क, विचार, मनौदार्य आणि दैविक भावना यांच्या योगानें जी गोष्ट सिद्ध झाली तीच प्रयोगांतीं सिद्ध व्हावी हें मानवी प्रगतीचें सुचिन्ह होय. अखिल विश्वाच्या ठायीं एकच प्राण अनेक रूपांनीं अव्याहत आणि अविरत दृग्गोचर होत आहे हें सत्य मानवी समाजानें जाणणें म्हणजे जगांतील दुःखच कमी करणें आहे. जन्म आणि मृत्यु या अवस्था चुकविणें शक्य नसून त्यांच्याविषयीं हर्षशोकादि व्यथांमध्यें पडणें हें चुकीचें आहे हें जाणण्यास हा प्राण शाश्वत, अनंत व अनादि आहे हें सत्य अंतःकरणांत बिंबलें पाहिजे.

**नाहीं रूप नाहीं नांव । नाहीं ठाव धराया ॥**
**जेथें जावें तेथें आहे । विठ्ठल माय बहीण ॥**
**नाहीं आकार विकार । चराचर भरलेंसे ॥**
**नव्हे निर्गुण सगुण । जाणे कोण तयासी ॥**
**तुका म्हणे भावावीण । त्याचें मन बोलेना ॥**

अवर्णनीय असा हा प्राण चराचरास व्यापून राहिला आहे. तो मातेप्रमाणें जन्म देऊन पालन-पोषण करीत आहे आणि भगिनीप्रमाणें प्रेमानें सांवरून धरीत आहे. या प्राणाचें ज्ञान म्हणजेच विश्वात्म्याचें ज्ञान होय. या ज्ञानाचें आकलन होतांच मनुष्य विश्वाशीं ऐक्य पावतो. याप्रमाणें विश्वाशीं ऐक्य पावल्यावर आपपर भाव नष्ट होतो आणि वियोगसंयोगाच्या—दुःख-सुखाच्या—अवस्था बाधा देऊं शकत नाहींत. नामदेव म्हणतात—

ज्याचियारे मनें देखियेलें तुज । त्याची लोकलाज मावळली ॥
नाहीं तया क्रिया नाहीं तया कर्म । वर्णाश्रम धर्म सुखदुःख ॥
नाहीं देहस्फूर्ति जाती कुळ भेद । अखंड आनंद ऐक्य तया ॥
नामा म्हणे त्याचे चरण रज व्हावें । हेंचि भाग्य द्यावें केशिराजा ॥

---

## ॥ गीत ५ ॥

बं.—आमि आमाय करबो बडो ( इं. ७१ )

जगीं माझें मीच स्तोम माजवावें । नित्य अहंभावें, त्वन्माया ही ॥
नाना वर्ण देई माझी रंगी छाया । आकाशा तुझिया माया तुझी ॥
करितोसि तूंचि तुज परिच्छिन्न । देसी अंशां भिन्न नाम रूपें ॥
तुझ्या अंशें माझी व्यापिली ही काया । हीच तुझी माया भगवंता ॥
तुझ्या विरहाचें जीव गाई गीत । विश्वीं गगनांत घुमे गान ॥
कधीं दुःख हास्य कधीं आशा भय । स्वप्नोत्पत्ति लय ऐसें चाले ॥
कधीं उसळति लहरी प्रचंड । कधीं त्यांचा खंड होत असे ॥
माझ्याठायीं एवीं जन्म त्वां पावोनी । घेतला करोनी पराजय ॥
त्वां जो चित्रपट रचिला त्यावरी । चित्रें नानापरि रंगविलीं ॥
पटामागें तुझें गूढासन असे । दिव्य हें विलसे रेषांकित ॥
सरळ व्यर्थ रेषा नसती आसना । वक्र रेषा नाना शोभताती ॥
ऐसा माझा तुझा खेळ हा चालला । आमुची ही लीला नभा व्यापी ॥
एवीं तुझा माझा लपंडाव खेळ । खेळण्यांत वेळ जात सदा ॥ १ ॥

**भावार्थ**—हे परमेश्वरा, तुझी माया अगाध आहे. या मायेच्या योगानें माझी मला ओळख न पटतां मी अहंभावानें पछाडला जातों. माझ्यांतील व्यंगें आणि कलंक तुझ्या निर्मलत्वाला कलंकित करतात. तूं अंशरूपानें माझ्या ठायीं वास करतोस, हीदेखील तुझी माया. तुंवा स्वतःस विभागून अंश रूपानें माझ्यामध्यें वास करावा हा एका परीनें तुझा पराजय ( व माझा विजय ) आहे. तुझी भेट या जीवाला न झाल्यामुळें तो सदैव कष्टी असतो. तुझ्या मायेच्या योगानें माझ्या जीवनांत दुःख, आनंद, आशा-निराशा, भीति, स्वप्नवत् भ्रम, उत्पत्ति आणि लय अशा अनेक अवस्था प्राप्त होतात. हें विश्व म्हणजे तुंवा रंग-

विलेला चित्रपट असून या पटाच्यामागें तुझें दिव्य आसन आहे. याप्रमाणें तुझा आणि माझा खेळ चालला असून हा खेळ खेळण्यामध्यें माझा काल जात आहे.

**रहस्य**—भगवंतांनीं अर्जुनास असें सांगितलें कीं ( गीता अ. ७, श्लो. ५, ६, ७ ) पृथ्वी, आप, तेज, वायु आकाश, मन, बुद्धि आणि अहंकार ही परमेश्वराची अपरा म्हणजे खालच्या प्रतीची प्रकृति आहे. याशिवाय ज्या प्रकृतीच्या योगानें या जगाचें धारण केलें आहे अशी परा म्हणजे श्रेष्ठ प्रतीची जीवस्वरूपी दुसरी प्रकृति आहे. या दोहोंपासून भूतें उत्पन्न होतात. परमेश्वर हाच जगताचा मूळकारण–प्रभव–आणि प्रलय म्हणजे शेवट आहे. परमेश्वराहून पलीकडे दुसरें कांहीं नाहीं. दोऱ्यांत अनेक मणी ओंवावे त्याप्रमाणें परमेश्वराच्या ठायीं सर्व ओंवलेलें आहे. ही विचारसरणी उपनिषदांमध्यें ठायीं ठायीं व्यक्त होते.

**यथा अग्नेः विस्फुलिंगाः व्युच्चरंति एवम् इव**
**अस्मात् आत्मनः सर्वे प्राणाः सर्वे लोकाः सर्वे**
**देवाः सर्वाणि भूतानि व्युच्चरंति ॥** ( बृहदारण्यक ४ )

म्हणजे ज्याप्रमाणें अग्नीपासून ठिणग्या उडतात त्याप्रमाणें या परमात्म्यापासून सर्व प्राण, सर्व लोक, सर्व देव, सर्व भूतमात्र जन्मास आलें आहे. अर्थात् परमात्म्यापासून अनेक जीवात्मे निघाले आहेत. तेच या विश्वांतील गणनातीत योनीमध्यें संचार करून हा विश्वाचा प्रचंड संसार चालवीत आहेत. हीच परमात्म्याची माया होय. या विचारांचें रहस्य फार मननीय आहे. ज्यांनीं याचें आकलन केलें त्या साधुसंतांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेतः—

**तरुवर बीजा पोटीं । बीज तरुवरा पोटीं ॥**
**तैसें तुम्हां आम्हां जालें । एकीं एक समावलें ॥**
**उदकावरील तरंग । तरंग उदकाचें अंग ।**
**तुका म्हणे बिंब छाया । ठायीं पावली विलया ॥ १ ॥**

या प्रकारची उदात्त मनःस्थिति प्राप्त होण्यास विश्वैक्यबुद्धि जाग्रत झाली पाहिजे. संसारांतील संकटें, कष्ट, सुख किंवा दुःख यांच्या योगानें ज्यांच्या दृष्टीस भ्रम उत्पन्न होत नाहीं, तेच या विश्वव्यापी परमात्म्याचें विश्वव्यापित्व जाणूं शकतील. त्यांच्या मुखावाटे उद्गार निघावयाचे ते पुढील प्रकारचे असतील यांत संदेह नाहीं:—

बाहेरीं भीतरीं तुजचि मी देखें । चित्त तेणें सुखें वेडावलें ॥
संतसंग मज पालट हा झाला । पाहतां विठ्ठला रूप तुझें ॥
वृत्तींसह मन आनंदीं बुडालें । न निघे कांहीं केलें चित्त माझें ॥
नामा म्हणे एक उरलीसे वासना । स्वामी सेवकपणा देईं देवा ॥१॥

---

## ॥ गीत ६ ॥

बं.–को गो अंतरतरसे. ( इं. ७२ )

कोण अंतःसाक्षी दे मज चेतना । उठवी वेदना निजस्पर्शें ॥
नेत्रांवरि मंत्रजाल पसरीतो । संसारीं पाडीतो भ्रम तोची ॥
वाजवी आनंदें हृदयाची वीणा । तोची मारी ताना सुखदुःखीं ॥
तंतु हरित् नील रौप्य सुवर्णाचे । रची तो तयांचें मायाजाल ॥
चरण जो माया-जालाच्या बाहेरी । दावोनीयां तारी जनां तोची ॥
ज्याचा पादस्पर्श बुडवी मजसी । ज्ञानसुधारसीं तोची हा रे ॥
किति दिन गेले झालीं युगांतरें । तरी याप्रकारें वर्ते सदा ॥
नाना नामें नाना रूपें धरोनीयां । हालवी हृदया तोची एक ॥
हर्ष दुःख यांचा वर्षी नित्य रस । अंतर्यामीं वास करोनीयां ॥ १ ॥

**भावार्थ**—माझें अंतःकरण चेतविणारा, आपल्या स्पर्शांच्या योगानें मनोवेदना उत्पन्न करणारा आणि नेत्रांवर मोहजाल पसरून संसारांत भ्रम पाडणारा तोच आहे. हृदयांत आनंदाचा नाद उत्पन्न करणारा आणि सुखदुःखाच्या समयीं माझ्या सुरांत सूर मिळविणारा तोच आहे. सर्वप्रकारच्या तंतूंनीं ( भावनांनीं ) विणून तय्यार केलेल्या मायाजालाच्या मागें पाहावें अर्थात् या मायेंतून पार पडावें तेव्हांच त्याचे चरण दिसतात. आणि या चरणांचें दर्शन घडतांच जनांचा उद्धार होतो. या ( ईश्वर ) चरणांचा लाभ घडतांच ज्ञानप्राप्ति होते. अनेक युगांपासून हा अशाच रीतीनें वर्तत आहे. अनेक नामरूपें धारण करून अंतःकरणाच्याठायीं हर्षदुःखादि विकारलहरी उत्पन्न करणारा हा देही ( देहांत वास करणारा ) आहे.

**रहस्य**—आम्ही संसारकार्यांत गुंतून राहिल्या वेळीं आम्हांला अनेक प्रकारचे सुखदुःखाचे प्रसंग येतात. आम्ही अहंभावनेच्या योगानें सुखाच्या प्राप्तीमुळें बेहोष होऊन स्वकर्माविषयीं हेळसांड करतों. निराशा, वियोग किंवा अहंभाव

यांच्यामुळें दुःख प्राप्त होतांच स्वकर्मांचा त्याग करून आम्ही कर्तव्य-कर्मास मुकतों. अशा स्थितींत ईश्वरचरणाचा स्पर्श होणें म्हणजे भगवत्कृपेचा लाभ होणें हें महद्भाग्य आहे. हा स्पर्श होतांच दुःखाच्या वेदना पार नाहींशा होतात. आणि सुख-दुःखाच्या पडद्याच्या मागें परमेश्वराचे चरण दृष्टीस पडतात. अर्थात् या अवस्थांतून मन काढल्याशिवाय ईश्वरकृपेचा लाभ होणें शक्य नाहीं. आणि हा लाभ झाल्यावांचून मनःस्वास्थ्य कोठून मिळणार? ईश्वराची माया म्हटली म्हणजे नर-जन्माचें सार्थक करणारी ईश्वरी कृपा आहे असें आम्ही जाणल्यास सर्व प्रकारची व्यथा नाहींशी होईल. ज्याच्या कृपेमुळें क्षुब्ध अंतःकरणाला स्थिरता व शांति प्राप्त होते, त्याच्या कृपेची आवड आणि त्यावरील विश्वास वाढविणें हाच सुखी होण्याचा खरा उपाय आहे. या उपायाला साधुजनांनीं भक्ति हें नांव दिलें आहे. पुनः पुनः या अंतःकरणाला चेतविणारा हाच परमेश्वर होय.

**सर्व भावें तूंतें जे ध्याती दातारा । त्यांचिया संसारा तूंचि होसी ।**
**ज्याचे चित्तीं नाहीं आणिक कांहीं काम । त्याचा योगक्षेम तूंचि होसी ।**
**ऐहिक परत्र जें कांहीं देखिजे । तें तुंवा होईजे मायबाप ॥**
**नामा म्हणे माझी भक्ति हे माऊली । केशवा वाहिली क्षणमात्रें ॥१॥**

या प्रकारच्या अढळ विश्वासानें ज्यांनीं तनु व अंतःकरण ईश्वरास अर्पण केलें त्यांस संसारभीति राहील तरी कशी?

---

## ॥ गीत ७ ॥

बं.—जीवनेर सिंहद्वारे पशितु जे क्षणे. (इं. ९५)

कधीं जीवनाच्या सिंहद्वारीं केला । प्रवेश पहिला न जाणें मी ॥
आश्चर्यकारक भव निकेतनीं । आलों कोण्या क्षणीं न जाणें मी ॥
घोरतम वनीं मध्यरात्रीकालीं । सुमनाची कळी उमलते ॥
तैसें या विपुल रहस्यीं मजला । आणी विकासाला कोण शक्ति ॥
तथापि प्रभातीं उन्नत शिरानें । खोलोनी नयनें देखिलें म्यां ॥
रम्य वसुंधरा नीलांबरधारी । निरखिलि सारी रश्मियुक्त ॥
सुख दुःखमय प्रचंड संसार-। रहस्य अपार निरखीलें ॥
तंव वाटे मज नसे हें अज्ञात । असे परिचित विश्व सारें ॥

**जेवीं शिशु जाणे मातृवक्षस्थळ । तेवीं हें सकल ओळखीचें ॥**
**अरूप भीषण शक्ति ज्ञानातीत । जननी ही घेत कडेवरि ॥**
**मृत्यु असे मज अज्ञात म्हणोनी । भयें क्षणोक्षणीं कांपतों मी ॥**
**संसार त्यागावा लागेल या भयें । नयनांतुनी ये दुःखजल ॥**
**मिठी मी मारितों बळें या जीवना । मृत्यूच्या यातना चुकवाया ॥**
**सकल जीवन संसार आपुला । ऐसा कां मानिला मूढा त्वां रे ॥**
**तुझ्या वासनांच्या पूर्वीं जन्मलासी । ज्ञानशून्य होसी जन्मवेळीं ॥**
**होतां मृत्यूदय जें मुख अज्ञात । तेंची परिचित वाटेल बा ॥**
**प्रियतम असे जीवन म्हणोनी । जडेल मरणीं पूर्ण प्रेम ॥**
**काढितां शिशूच्या मुखांतुनि स्तन । करी तें रोदन विरहानें ॥**
**परि तया मुखीं देतां दुजा स्तन । पूर्ण समाधान होय त्याचें ॥ १ ॥**

**भावार्थ**—या जगांत प्रथमतः मी केव्हां जन्मास आलों हें मला माहित नाहीं. या संसाररूपी भव्य मंदिरांत मी केव्हां आलों हेंदेखील सांगणें शक्य नाहीं. भयानक अरण्याच्या ठायीं मध्यरात्रीच्या कालीं जशी पुष्पकलिका उमलते त्याप्रमाणें या संसाररहस्यांत मला कोणत्या शक्तीनें विकसित केलें हें मला सांगतां येत नाहीं. तथापि जन्मास आल्यानंतर चहूंकडे निरखून पाहिलें तेव्हां सर्व विश्व माझ्या पूर्वपरिचयाचें आहे असें वाटलें. मातेचें वक्षस्थल ज्याप्रमाणें नूतन जन्मास आलेल्या शिशूला ज्ञात आहे, त्याप्रमाणेंच हें विश्व ओळखीचें आहे असें मला वाटलें. जी प्रचंड शक्ति जगांत वावरत आहे तीच मला सांवरून धरून माझें संगोपन करीत आहे. जन्माला आल्यावर मला काय ती मृत्यूची तेवढी भीति वाटते. संसाराचा त्याग करून जावें लागेल या भीतीनें या मृत्यूस चुकविण्यासाठीं मी यत्न करतों. हा संसार माझा आहे या मूढ भावनेनें वागल्या-मुळेंच या मृत्यूची मला भीति वाटते. जन्मास आल्यावेळीं “ माझें माझें ” हा लोभ मनांत उत्पन्न झाला नव्हता. आणि ज्या कांहीं वासना संसारांत गुंतवितात त्यादेखील जन्मास आल्यानंतरच उद्भवलेल्या आहेत. त्या अर्थी ममत्वबुद्धीचा त्याग करून वासनांच्या तडाक्यांतून सुटल्यास मृत्यूची देखील भीति बाळगण्याचें कारण नाहीं. ज्या परब्रह्मस्वरूपाची आपणास संसारांत मग्न असतांना ओळख पटत नाहीं तें स्वरूप मृत्यु प्राप्त होतांच ज्ञात होईल. जीवन प्रिय आहे म्हणून मृत्युदेखील प्रिय होय. कारण मृत्यूवांचून नवीन जीवनाचा लाभ व्हावयाचा

नाहीं. एका जीवनावस्थेंतून दुसऱ्या जीवनावस्थेंत जाण्याच्या संधिकालीं जीवास व्यथा होते ती केवल मातेच्या एका स्तनापासून दुसऱ्या स्तनाकडे दुग्धपानासाठीं जातांना शिशूला निमिषमात्र घडलेल्या वियोगाच्या व्यथेप्रमाणें आहे. *ही व्यथा तत्काल नाहींशी होऊन बालकाला अमृतोपम मातेच्या दुग्धाचा आस्वाद* घेतां येतो.

**रहस्य**—या विश्वांत चालणाऱ्या प्रचंड घडामोडींकडे पाहिलें, किंवा स्थिर-चरपदार्थमात्राविषयीं विचार करूं लागलों म्हणजे आम्ही आश्चर्यचकित होतों. केवढी प्रचंड शक्ति या विश्वांत संचरत आहे बरें ! आणि तिच्या योगानें किती विलक्षण कार्यें घडत आहेत ! या ब्रह्मांडाच्या ठायीं अत्यंत नियमबद्ध रीतीनें घडणारीं कार्यें, सृष्टीच्या उत्पत्तीस, वृद्धीस व क्षयास कारणीभूत होणाऱ्या अनेक क्रिया, जन्म-मृत्यु आणि पुनर्जन्म ही अव्याहत चालणारी जीवनावस्था, या सर्व गोष्टींविषयीं कितीहि विचार केला तरी शेवटीं या कोड्याचा उलगडा होत नाहीं म्हणून स्वस्थ बसावें लागतें. सांप्रत कालीं शास्त्रीय ज्ञानाच्या योगानें अनेक चमत्कार करून दाखविणाऱ्या भौतिक शास्त्रज्ञांस आणि आध्यात्मिक मार्गानें या विश्वाचें रहस्य जाणण्याचा प्रयत्न केलेल्या प्राचीन उपनिषत्कारांस हें कोडें सोडवितां आलें नाहीं. म्हणून उभयतांनीं " कोण जाणें " " नेति नेति " असे उद्गार काढले. जन्म-मृत्यु या दोन्ही अवस्था त्यांना सहज वाटल्या याचें रहस्य पुढील अभंगांत आहे:—

**सर्व जीव तूं झालासी आपण । आम्ही कां पतित तूं कां पावन ॥**
**मन इंद्रियें तूंचि झालासी चाळिता । आमुच्याठायीं कोणें ठेविली सत्ता ॥**
**सुवर्णाच्या पोटीं झाला अलंकार । एकीं भला साचार वाखाणिती ॥**
**गंगा सिंधु मिळती झाली सहस्रमुख । ओघ तो उदक अन्य नाहीं ॥**
**बीजाचिया पोटीं वटाचा विस्तार । सर्व तो आकार तूंचि असे ॥**
**नामा म्हणे सर्व तुझेंचि करणें । उगें खवळून घेऊं नको देणें ॥**

## ॥ द्वितीय खंड ॥

# वासना-त्याग

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ भ. गीता ॥

**अर्थ**—कर्म करीत राहणें हा तुझा अधिकार आहे. कर्मांपासून निष्पन्न होणाऱ्या फलाविषयीं तुझी सत्ता नाहीं. कर्मांचें फल प्राप्त व्हावें या हेतूनें प्रेरित होऊन कर्माचरण करूं नको. आणि कर्म करण्याचेंहि सोडून देऊं नको.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ॥ भ. गीता. ॥

**अर्थ**—कर्मफलाचा त्याग करून कर्माचरण करणारास शांति प्राप्त होते. आणि कामनायुक्त कर्म करणारा त्या कर्मांपासून प्राप्त होणाऱ्या फलाच्या योगानें बद्ध होतो म्हणजे बंधन पावतो.

एकोवशी सर्व भूतान्तरात्मा ।
एकं रूपं बहुधा यः करोति ।
तमात्मस्थं येऽनुपश्यंति धीराः ।
तेषां सुखं शाश्वतं नेतरेषाम् ॥ कठोपनिषत् ॥

**अर्थ**—सर्व जगतावर सत्ता चालविणारा आणि सर्व भूतमात्राचा जो अंतरात्मा असून अनेक रूपांनीं प्रगट होतो, त्याच्या साक्षात्काराचा जे हृदयामध्यें अनुभव घेतात तेच खरें सुख पावतात. इतरांना हें सुख प्राप्त होत नाहीं.

### अभंग.

बीज भाजुनि केली लाही । आम्हां जन्म-मरण नाहीं ॥
आकारासी कैंचा ठाव । देह प्रत्यक्ष जाला देव ॥
साकरेचा नव्हे ऊंस । आम्हां कैंचा गर्भवास ॥
तुका म्हणे अवघा जग । सर्वां घटीं पांडुरंग ॥ १ ॥

---

## ॥ गीत ८ ॥

बं.–आर आमाय आमि निजेर शिरे वईब ना ( इ. ९ )

आपुलिया स्कंदीं मज न नेईन। भिक्षा न मागेन माझ्या द्वारीं ॥
सर्व भार माझा घालोनी त्वच्चरणीं। हिंडेन भुवनीं लीनपणें ॥
कोणी न गणील मजला दीनासी। मी हि कवणाशीं न बोलेन ॥
माझ्या वासनांचें वारें लागतांचि। लोपते दीपाची ज्योति तुझ्या ॥
पतित वासना तयांचा स्वीकार। नको करूं कर पसरोनी ॥
जयामाजी नसे प्रेम तुझें पूर्ण। तें मी न अर्पीन तुजलागीं ॥

भावार्थ—काय हा मनुष्याचा मूर्खपणा! तो स्वतःस स्वतःच्या खांद्यावर उचलून घेऊन नेऊं पाहतो आणि आपल्याच दाराशीं भिक्षा मागण्यास येतो! ज्याला भार उचलतां येईल आणि ज्याच्या हातीं भिक्षा घालण्याचें सामर्थ्य आहे त्या ईश्वरावर भार घालून निश्चितपणें संसारांत वावरावें हेंच योग्य आहे. जगास मजबद्दल कदाचित् आदर वाटणार नाहीं. मी देखील जगाशीं उदासीनच राहीन. माझ्या वासना अपवित्र असल्यामुळें दैविक ज्योतीस त्यांचें वारें लागतांच ती विझून जाते. तेव्हां या अशुद्ध वासनांच्या द्वारानें आपली मनीषा पूर्ण करून घेण्याचा यत्न करणें हें अयोग्य आहे. ज्यामध्यें ईश्वरी प्रेम नाहीं तें ईश्वरास अर्पण करतां येत नाहीं. आणि ज्याच्या ठायीं त्याचें प्रेम व्यक्त होतें त्याचाच स्वीकार करावा.

रहस्य—प्रपंचांत आम्ही अनेक गोष्टींविषयीं विनाकारण आपल्या मनाला त्रास करून घेतों. अशा रीतीनें वागल्यामुळें आमचे इच्छित हेतु तडीस तर जात नाहींत. उलट दगदग वाढते आणि रात्रंदिवस मन असंतुष्ट व अस्वस्थ राहतें. त्यामुळें स्वकर्तव्यकर्मतत्पर होऊन पुढें पाऊल टाकण्याची आपणामध्यें हिंमत राहात नाहीं. बऱ्या वाईट संगतीमुळें सुखदुःखाच्या कल्पनांमध्यें अनेक तरंग उद्भवतात आणि वासनांचा पगडा मनावर बसून त्या पुरवून घेण्यासाठीं आम्ही स्वतःच्या जीवास विश्रांति देत नाहीं. आम्हांस वाटतें कीं आमच्या इच्छा सफल करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे आणि स्वसामर्थ्यांच्या योगानें सर्व कांहीं प्राप्त करून घेतां येईल. परंतु अनुभवांतीं आपला अहंभाव गळून पडतो. यासाठीं अत्युत्तम आणि निरुपाधिक मार्ग म्हटला म्हणजे ईश्वरेच्छेवर सर्व भार टाकून

आपण निश्चितपणें कार्य करीत जावें. कर्मविरहित होऊन जीवित घालविणें शक्य नाहीं आणि योग्यही नाहीं. परंतु अमुक कर्मापासून अमुकच फळ खात्रीनें मिळेल असें समजून कर्माचरण करणें धोक्याचें आहे. कारण आमच्या इच्छेप्रमाणेंच फलप्राप्ति होते असें सांगतां येत नाहीं. कर्म करणें आपल्या हातीं आहे. त्या कर्माचें फल देण्याचा अधिकार ईश्वराचा आहे. अर्थात् हें फल कोणत्या पद्धतीचें व केव्हां मिळावें हें ठरविण्याचा अधिकार मनुष्यास नाहीं. मनास स्वास्थ्य पाहिजे असेल तर मानसिक व्यथा उत्पन्न होतील असें कृत्य करूं नये. वासना उत्पन्न करणें म्हणजेच मानसिक व्यथा वाढविणें आहे. म्हणून मन सर्वदा आनंदी, संतुष्ट आणि शांत राहण्यास ज्या पद्धतीनें वागावयाचें ती पद्धति ही कीं—

**खावें ल्यावें द्यावें । जंमाखर्च तुझ्या नांवें ।**
**आतां चुकली खटपट । झाड्या पाड्याचा बोभाट ॥**
**आहे नाहीं त्याचें । आम्हां काय सांगायाचें ॥**
**तुका म्हणे चिंता । भार वाही त्याचे माथां ॥**

अशा प्रकारची उच्चतम भावना आपल्या ठायीं नसते म्हणून आम्ही रात्रंदिवस जीवास त्रास करून घेतों. ही स्थिति सुधारणें इतर कोणाच्या हातीं नसून आपल्याच हातीं आहे ही भावना दृढ झाली पाहिजे. आणि ईश्वरावर दृष्टि ठेऊन सर्व कार्य ईश्वरकार्य आहे म्हणून अंतःकरणपूर्वक समजलें पाहिजे.

---

## ॥ गीत ९ ॥

बं.—कोथाय आलो, कोथाय ओरे आलो ( इ. २७ )

**कोठें तो प्रकाश कोणीकडे ज्योति । वेगें पेटवी ती विरहाग्नीनें ॥**
**असे मंद दीप परि नसे ज्वाला । लेख का लिहिला भाळीं ऐसा ॥**
**व्यर्थ हें जीवित प्रकाशावांचोनी । मरण त्याहूनि उत्तम रे ॥**
**वासनेची पूर्ण होळी पेटवोनी । घेवोनी हा अग्नी ज्योति लावीं ॥**
**दुःख वेदनांचे दूत माझ्या कानीं । सांगती तें ध्यानीं आणीं वेगें ॥**
**दूत वदे प्राणा तुजसाठीं नित्य । भगवंत सत्य जागतसे ॥**
**रात्रीच्या अंधारीं तुला तो पाचारी । प्रेम-अभिसारीं रंगावया ॥**
**होय तुज दुःख तव तुझा मान । रक्षी भगवान जागोनीयां ॥**

मेघांनीं संपूर्ण गगन भरलें । नभ वर्षी जलें अखंडित ॥
घोर या रात्रीच्या वेळीं माझा प्राण । जागे या कारण काय असे ॥
स्फुरण कासया आलें या प्राणासी । नभ जल वर्षी अखंडित ॥
चंचल प्रकाश पाडी विद्युल्लता । वाढे निबिडता अंधाराची ॥
नकळे कोठोनी दुरूनी ये सूर । गानाचा गंभीर हर्षदायी ॥
तया मार्गें जाया स्फुरतसे प्राण । करावें प्रयाण परि कैसें ॥
कोठें आहे दीप पेटवी वेगानें । प्रदीप्त अग्नीनें वासनांच्या ॥
गर्जताति मेघ वायु मारी हांका । समय हा फुका जाऊं न दे ॥
किती ही भेसूर निशा काळोखीं या । दीपावांचोनीयां नको राहूं ॥
अर्पी प्राण परि पेटवीं प्रेमाची । ज्योति सुप्रभेची अंधःकारीं ॥

**भावार्थ**—प्रकाश ! हा प्रकाश उपजविण्यास अंतर्यामींची ज्योति पेटविली पाहिजे. या संसारांत अनेक गोष्टींचा विरह झाल्यामुळें जो विरहदुःखाग्नि प्रदीप्त होतो त्या अग्नीनेंच ही ज्योत पेटवावयाची आहे. निस्तेज दीप पेटत असून ज्वाला नसतां प्रकाशाची प्राप्ति होत नाहीं. हेंच तुझ्या नशिबीं लिहिलें आहे का ? ( अर्थात् अंतःकरण प्रकाशित होण्यास योग्य असून अप्रकाशित राहणें हें दुर्दैव नाहीं काय ? ) या तमोमय स्थितीपेक्षां मरण बरें. मानवा ! दुःखें तुला वारंवार गांजतात. त्या वेळीं हीं दुःखेंच तुला सांगतात कीं ( तुझें कल्याण करणारा ) भगवान् जागा असून अशा या रात्रींच्या निबिड अंधःकारांत ( म्हणजे दुःखानें व्याप्त असलेल्या स्थितींत ) प्रेमानें आपल्यापाशीं येण्यास तो सांगत आहे. तुझा मान राखण्यास तो सदा टपत असतो. आकाश ढगांनीं व्याप्त असून एकसारखा पाऊस पडत आहे आणि वीज चमकतांच डोळ्यांवर अंधाराचें जास्तच दडपण पडतें, म्हणजे दुखानें अंतःकरण संपूर्ण भरून गेल्यावेळीं किंचित् आशेचीं किरणें दृष्टीस पडावीं आणि नाहींशीं होऊन निराशेचा फटका अधिकच बसावा अशी स्थिति प्राप्त झाल्या वेळीं दुरून येणारा मधुर स्वर अंतःकरणांत स्फुर्ति उत्पन्न करीत आहे. अशा अत्यंत दुःखानें व्याप्त झालेल्या परिस्थितींत भगवत्कृपेची उत्साहदायक वाणी उत्साह देत आहे. अशा वेळीं वासनांचा अग्नि पेटवून त्या अग्नीनें अंतर्यामींची भगवत्प्रेमाची ज्योति पेटवावी. ही वेळ फार महत्वाची आहे. ती जाऊं देऊं नको.

**रहस्य**—मनुष्याच्या अंतःकरणांत भगवत्प्रेमाचा दीप असून त्या दिव्याची ज्वाला प्रज्ज्वलित केल्याशिवाय प्रकाश पडणें शक्य नाहीं. आणि हा प्रकाश पडल्या-

वांचून दुःखाचा भार कसा कमी होईल ? सुखसमाधानांत व ऐषआरामांत असतांना भगवंताचें स्मरण होत नसतें. परंतु संकटकाल प्राप्त होतांच त्याची आठवण होते. तेव्हां दुःखें हीं मनुष्यांतील ईश्वरविषयक प्रेम जागृत करण्यासाठींच येतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र ही प्रेमजागृति राखण्याचा यत्न केला पाहिजे. दुःखाचें निरसन झालें म्हणजे पुनः वासनांच्या रूढ मार्गांत भटकत राहण्याचा क्रम सोडून दिला पाहिजे. ईश्वराच्या ठायीं संपूर्ण भक्ति ठेवून कितीहि सुखदुःखांचें दडपण पडलें तरी या भक्तींत अंतर पडणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. असें न केल्यास ईश्वरी कृपेचा आणि प्रेमाचा लाभ होणें शक्य नाहीं. भगवत्प्रेमाचा लाभ सर्वस्वीं वासनेच्या त्यागावर अवलंबून आहे.

**वासनेच्या मुखीं आदळूनि भीतें । निर्वाहापुरतें कारण तें ॥**
**या नांव अंतरा आला नारायण । चित्तसमाधान खूण त्याची ॥**
**सर्व काळ हाचि करणें विचार । विवेकीं सादर आतमत्वाचे ॥**
**तुका म्हणे जों जों भजनासी वळे । अंग तों तों कळे सन्निधता ॥१॥**

खरें पाहतां आपला योगक्षेम चालावा ही एकच इच्छा मनुष्याच्या अंतर्यामीं असणें स्वाभाविक आहे. परंतु या इच्छेला अनेक वासनांचा पाठिंबा मिळालेला असतो. ही एकच गोष्ट भयोत्पादक आहे. यामुळेंच भगवंताचें दर्शन घडत नाहीं. चित्तास शांतता प्राप्त झाली म्हणजे भगवत्कृपा लाभली असें समजावें. हा विचार सदोदित केला पाहिजे. त्यायोगें ईश्वरी सान्निद्ध्य प्राप्त होईल.

---

## ॥ गीत १० ॥

बं—जडाये आछे बाधा छाडाते जे ते चाइ ( इ. २८ )

**शृंखलेनें पूर्ण गेलों जखडोनी । व्यथा होय मनीं तोडायासी ॥**
**जीव माझा वांछी बंधविमोचन । परि लाजे मन इच्छाया तें ॥**
**माझ्या जीवनाचें तूंचि श्रेयतम । नसे तुजसम धन दुजें ॥**
**जाणें मी अंतरीं परि माझ्या गृहीं । सांचली बेगड ही टाकूं केवीं ॥**
**धीर नसे मज द्यावया लोटोनी । निरर्थक नाणीं संग्रहींचीं ॥**
**माझें हें कवच असे मृत्तिकेचें । खाजें हें मृत्यूचें जाणतों मी ॥**
**असे तिरस्कार तयाचा अंतरीं । आलिंगीतों परि प्रेमें तया ॥**

मेघांनीं संपूर्ण गगन भरलें। नभ वर्षी जलें अखंडित ॥
घोर या रात्रीच्या वेळीं माझा प्राण। जागे या कारण काय असे ॥
स्फुरण कासया आलें या प्राणासी। नभ जल वर्षी अखंडित ॥
चंचल प्रकाश पाडी विद्युल्लता। वाढे निबिडता अंधाराची ॥
नकळे कोठोनी दुरूनी ये सूर। गानाचा गंभीर हर्षदायी ॥
तया मार्गें जाया स्फुरतसे प्राण। करावें प्रयाण परि कैसें ॥
कोठें आहे दीप पेटवी वेगानें। प्रदीप्त अग्नीनें वासनांच्या ॥
गर्जताति मेघ वायु मारी हांका। समय हा फुका जाऊं न दे ॥
किती ही भेसूर निशा काळोखीं या। दीपावांचोनीयां नको राहूं ॥
अर्पी प्राण परि पेटवीं प्रेमाची। ज्योति सुप्रभेची अंधःकारीं ॥

**भावार्थ**—प्रकाश! हा प्रकाश उपजविण्यास अंतर्यामींची ज्योति पेटविली पाहिजे. या संसारांत अनेक गोष्टींचा विरह झाल्यामुळें जो विरहदुःखाग्नि प्रदीप्त होतो त्या अग्नीनेंच ही ज्योत पेटवावयाची आहे. निस्तेज दीप पेटत असून ज्वाला नसतां प्रकाशाची प्राप्ति होत नाहीं. हेंच तुझ्या नशिबीं लिहिलें आहे का? (अर्थात् अंतःकरण प्रकाशित होण्यास योग्य असून अप्रकाशित राहणें हें दुर्दैव नाहीं काय?) या तमोमय स्थितीपेक्षां मरण बरें. मानवा! दुःखें तुला वारंवार गांजतात. त्या वेळीं हीं दुःखेंच तुला सांगतात कीं (तुझें कल्याण करणारा) भगवान् जागा असून अशा या रात्रींच्या निबिड अंधःकारांत (म्हणजे दुःखानें व्याप्त असलेल्या स्थितींत) प्रेमानें आपल्यापाशीं येण्यास तो सांगत आहे. तुझा मान राखण्यास तो सदा टपत असतो. आकाश ढगांनीं व्याप्त असून एकसारखा पाऊस पडत आहे आणि वीज चमकतांच डोळ्यांवर अंधाराचें जास्तच दडपण पडतें, म्हणजे दुखानें अंतःकरण संपूर्ण भरून गेल्यावेळीं किंचित् आशेचीं किरणें दृष्टीस पडावीं आणि नाहींशीं होऊन निराशेचा फटका अधिकच बसावा अशी स्थिति प्राप्त झाल्या वेळीं दुरून येणारा मधुर स्वर अंतःकरणांत स्फुर्ति उत्पन्न करीत आहे. अशा अत्यंत दुःखानें व्याप्त झालेल्या परिस्थितींत भगवत्कृपेची उत्साहदायक वाणी उत्साह देत आहे. अशा वेळीं वासनांचा अग्नि पेटवून त्या अग्नीनें अंतर्यामींची भगवत्प्रेमाची ज्योति पेटवावी. ही वेळ फार महत्वाची आहे. ती जाऊं देऊं नको.

**रहस्य**—मनुष्याच्या अंतःकरणांत भगवत्प्रेमाचा दीप असून त्या दिव्याची ज्वाला प्रज्ज्वलित केल्याशिवाय प्रकाश पडणें शक्य नाहीं. आणि हा प्रकाश पडल्या-

वांचून दुःखाचा भार कसा कमी होईल ? सुखसमाधानांत व ऐषआरामांत असतांना भगवंताचें स्मरण होत नसतें. *परंतु संकटकाल प्राप्त होतांच त्याची आठवण* होते. तेव्हां दुःखें हीं मनुष्यांतील ईश्वरविषयक प्रेम जागृत करण्यासाठींच येतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र ही प्रेमजागृति राखण्याचा यत्न केला पाहिजे. दुःखाचें निरसन झालें म्हणजे पुनः वासनांच्या रूढ मार्गांत भटकत राहण्याचा क्रम सोडून दिला पाहिजे. ईश्वराच्या ठायीं संपूर्ण भक्ति ठेवून कितीहि सुखदुःखांचें दडपण पडलें तरी या भक्तींत अंतर पडणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. असें न केल्यास ईश्वरी कृपेचा आणि प्रेमाचा लाभ होणें शक्य नाहीं. भगवत्प्रेमाचा लाभ सर्वस्वीं वासनेच्या त्यागावर अवलंबून आहे.

**वासनेच्या मुखीं आदळूनि भीतें । निर्वाहापुरतें कारण तें ॥**
**या नांव अंतरा आला नारायण । चित्तसमाधान खूण त्याची ॥**
**सर्व काळ हाचि करणें विचार । विवेकीं सादर आत्मत्वाचे ॥**
**तुका म्हणे जों जों भजनासी वळे । अंग तों तों कळे सन्निधता ॥१॥**

खरें पाहतां आपला योगक्षेम चालावा ही एकच इच्छा मनुष्याच्या अंतर्यामीं असणें स्वाभाविक आहे. परंतु या इच्छेला अनेक वासनांचा पाठिंबा मिळालेला असतो. ही एकच गोष्ट भयोत्पादक आहे. यामुळेंच भगवंताचें दर्शन घडत नाहीं. चित्तास शांतता प्राप्त झाली म्हणजे भगवत्कृपा लाभली असें समजावें. हा विचार सदोदित केला पाहिजे. त्यायोगें ईश्वरी सान्निध्य प्राप्त होईल.

---

## ॥ गीत १० ॥

बं—जडाये आछे बाधा छाडाते जे ते चाइ ( इ. २८ )

**श्रृंखलेनें पूर्ण गेलों जखडोनी । व्यथा होय मनीं तोडायासी ॥**
**जीव माझा वांछी बंधविमोचन । परि लाजे मन इच्छाया तें ॥**
**माझ्या जीवनाचें तूंचि श्रेयतम । नसे तुजसम धन दुजें ॥**
**जाणें मी अंतरीं परि माझ्या गृहीं । सांचली बेगड ही टाकूं केवीं ॥**
**धीर नसे मज द्यावया लोटोनी । निरर्थक नाणीं संग्रहींचीं ॥**
**माझें हें कवच असे मृत्तिकेचें । खाजें हें मृत्यूचें जाणतों मी ॥**
**असे तिरस्कार तयाचा अंतरीं । आलिंगीतों परि प्रेमें तया ॥**

**ऋण माझें मोठें अपराध घोर । गुप्त लज्जाभार शिरावरी ॥**
**विफल जीवित जाहालें म्हणोनी । तुझीया चरणीं नम्र व्हाया ॥**
**भय वाटे मज माझा अंगिकार । करितां मिथ्याचार चुकतील ॥ १ ॥**

**भावार्थ**—प्रापंचिक पाशांनीं मी पूर्णपणें जखडून गेलों आहें. तथापि ते तोडून टाकून मुक्त व्हावयाला मन राजी नाहीं. माझ्या जीवाला स्वातंत्र्याची तळमळ लागली आहे. परंतु त्याची इच्छा करायला देखील मन लाजतें. मला माहीत आहे कीं या जीविताचें अत्यंत श्रेष्ठ प्रकारचें साधनीय श्रेय तूंच आहेस. तुझ्याहून श्रेष्ठ व मौल्यवान दुसरें धन नाहीं. हें जरी मला समजतें तरी माझ्या घरांतील खोटी बेगड आणि निरुपयोगी नाणीं टाकून देण्यास तयार नसतां त्यांच्या राशी मी बाळगून आहें. माझें ( आत्म्याचें ) कवच अर्थात् हें शरीर मृत्तिकेपासून बनविलें असून तें केव्हां तरी मृत्युमुखीं पडल्यावांचून राहणार नाहीं. यासाठीं या देहाविषयीं माझ्या मनांत तिटकारा आहे. तथापि मी प्रेमानें त्याला आलिंगन देऊन बसलों आहें. मी ऋणी व घोर अपराधी आहें. गुप्तपणें केलेल्या दुष्कृत्यांची आठवण होऊन लज्जा वाटते. या लज्जेचा भार माझ्या शिरावर आहे. अशा रीतीनें हें जीवित व्यर्थ होत आहे म्हणून तुझ्या चरणापुढें माझें मस्तक नम्र करायलाही भीति वाटते. कारण कदाचित् तुंवा माझा अंगिकार केला तर माझे मिथ्याचार नाहींसे होतील, आणि ममत्व बुद्धीनें जवळ केलेल्या कित्येक गोष्टींचा त्याग करावा लागेल.

**रहस्य**—स्वातंत्र्य बरें का बंधन बरें असा प्रश्न विचारल्यास कोणीही सांगेल कीं स्वातंत्र्य बरें आहे. परंतु आम्ही संसारबंधनांत पडल्यापासून या बंधनाचा आम्हांस इतका मोह लागला आहे कीं तें तोडणें जीवावर येतें. आम्हीं प्रेमानें जवळ केलेल्या किती तरी गोष्टी अनावश्यक इतकेंच नव्हे तर आमच्या खऱ्या सुखाला विघातक आहेत हें देखील आम्हांस समजतें. परंतु या क्षणभंगुर मिथ्या-सुख देणाऱ्या पदार्थांवर आमचें प्रेम बसल्यामुळें त्यांचा त्याग करण्याची आमच्या-मध्यें मुळींच शक्ति राहिलेली नसते. आम्हांस अवगत आहे कीं या देहाच्या मोहानें त्याचें नश्वरत्व देखील आम्ही विसरून गेलों आहों. आणि जणूं तें शाश्वत आहे अशा भावनेनें तें सजविण्यांत आणि त्याचें रक्षण करण्यांत आमचें अमूल्य आयुष्य खर्च होत आहे. आम्ही देह हाच आत्मा या भावनेस बळी पडलों आहों. तथापि कधींकधीं उपरति होते आणि वाटतें कीं—

बंधनाचा तोडूं फांसा । देऊं आशा टाकोनी ।
नाहीं तेंच घेतां शिरीं । होइल दूरी निजपंथ ।
नाथिलेंची माझें तुझें । कोण ओझें वागवी ।
तुका म्हणे अंतराय । देवीं, काय जिणें तें ॥ १ ॥

परंतु या प्रकारें उपरति होतांच आम्ही पूर्णपणें परमेश्वरचरणीं आपलें तनु-मन-धन अर्पण करीत नाहीं. अनेक प्रकारच्या अपराधांच्या राशी आमच्या मस्तकावर घेऊन मिथ्याचारांस कवटाळून बसतों. यासाठीं उपरति होऊनही तिचा आपल्या जीवितावर कांहींच परिणाम होत नाहीं. तेव्हां भगवंतास शरण जावें आणि त्याची करुणा भाकावी कीं ' हे भगवंता—

पापाचा मी राशी । सेवाचोर पायांपाशीं ॥ '
करा दंड नारायणा । माझ्या मानाची खंडणा ॥
देव ना संसार । तुका दोहींकडे चोर ॥ १ ॥

---

## ॥ गीत ११ ॥

बं.—आमार ना मटा दिये ढेके राखि जारे. ( इं. २९ )

**जया माझें नाम कोंडुनी मरे तो । काल घालवीतो कारागारीं ॥**
**रात्रं दिन सारें विसरोनि गेलों । केवळ गुंतलों एका कार्यी ॥**
**तया भोंवतीं म्यां भित्ति उभारिल्या । आकाशा भिडल्या हळूहळू ।**
**जया माझें नाम अंधारीं तो पडे । सत्यरूप दडे दृष्टि आड ॥**
**भोंवतीं अजस्र दुर्ग हा वाढला । धुळीनें लिंपिला ठायीं ठायीं ॥**
**छिद्रें या भित्तींचीं बुजविलीं सारीं । चित्तीं गर्व भारी मत्कृतीचा ॥**
**उद्योगीं अखंड गुंतोनीयां गेलों । विराम पावलों नाहीं कधीं ॥**
**मिथ्या या उपायें करितां जतन । निज आत्मधन हरपलें ॥**

**भावार्थ**—ज्या जीवाला किंवा जीवात्म्याला माझ्या नांवानें संबोधीत असतात तो बिचारा या शरीररूपी कारागृहांत कोंडलेला आहे. रात्रंदिवस माझा अहंभाव त्या आत्म्याभोंवतीं अजस्र तट उभारण्यांत गुंतलेला आहे. अनेक प्रकारच्या (वासनांच्या) भिंती वर चढवितां चढवितां हा आत्मा दिसेनासा झाला आहे. त्याचें रूप अंधःकारांत लपून गेलें असून त्याचा लाभ होणें अशक्य झालें आहे. असा हा आत्मघातकी उद्योग करून उलट मी गर्व वाहतों. रात्रंदिवस

विश्रांति नसतां या आत्म्याचें अजस्र तटाच्या आंत रक्षण करण्याच्या खटाटोपास लागून शेवटीं हें आत्मधनच मी गमावून बसलों आहें.

**रहस्य**—विचारांतीं आम्हास कळून येईल कीं ज्या नांवानें आम्हाला ओळखतात तें नांव आमच्या देहाचें नसून देहांत वास करणाऱ्या आत्म्याचें आहे. आत्मा गेल्यावर देहाला प्रेत ही संज्ञा प्राप्त होते. असा हा आत्मा या देहरूपी कारागृहांत कोंडलेला असून त्याला कोंडून ठेवण्यामध्येंच आमच्या अहंभावनेला इतिकर्तव्यता वाटत आहे. याप्रमाणें या आत्म्याची दुर्गति केल्यामुळें त्याचें सत्यस्वरूप प्रगट होत नाहीं. या अहंभावनेच्या योगानें देहाचा बडेजाव वाढविण्यांत आमचें आयुष्य खर्च होत आहे. या आत्म्याभोंवतीं दुर्वासनेच्या भयानक भिंती चढवून सर्व द्वारें बंद केल्यामुळें त्याला विश्वात्म्याशीं ऐक्य पावतां येत नाहीं. आत्मोद्धाराचें कार्य बंद पडतें. ज्ञानाचीं किरणें अंतर्यामीं पोहोंचत नाहींत; आणि अहंभावाची वृद्धि होतां होतां आपल्या जीवितकार्याचा विसर पडतो. शेवटीं मनाला स्वास्थ्य नसतां आपलें आयुष्य त्रासांत कंठावें लागतें.

**चित्त गुंतलें प्रपंचें । जालें वेडें ममतेचें ॥**
**आतां सोडवीं पांडुरंगा । आलें निवारीं तें अंगा ॥**
**गुंतली चावटी । नामीं रूपीं झाली तुटी ॥**
**तुका म्हणे चाली । पुढें वाट खोळंबली ॥**

याप्रमाणें प्रपंचांत मन पूर्णपणें गुंतून स्वकर्तव्य कर्मांचा विसर पडल्यामुळें ईश्वराचा अंतराय घडतो. पुढची वाटच खोळंबल्याप्रमाणें होते. या साठीं प्रपंच-कार्य करीत असतां वासनेच्या तटाच्या आंत आत्मा दडून जाणार नाहीं आणि प्रत्येक कार्यांत तो व्यक्त होईल अशी खबरदारी घेतली पाहिजे.

---

## ॥ गीत १२ ॥

बं.—एकल आमि बाहिर हलेम ( इं. ३० )

**तुज भेटायासी निघालें एकटी । कोणी न सांगाती घेतला मी ॥**
**कोण संगें येई शांत या अंधारीं । करी बरोबरी चालताना ॥**
**नाना परि त्यासी चुकवूं पहात्यें । मार्ग चुकवितें तदा जाई ॥**
**मज वाटे गेली आपदा ही आतां । फिरोनी पहातां उभा मागें ॥**

**वेगें हा चालतां कांपते धरणी । चंचल वर्तनी असे मोठा ॥**
**बोलूं जातां कांहीं मधें हा बोलतो । महति वर्णितो आपुलाली ॥**
**होवोनी बैसला स्वामी हा केवल । लज्जेतें सकल त्यागोनीयां ॥**
**त्याच्या संगें याया तुझ्या द्वारीं नाथा । वाटे लाज चित्ता येऊं कैशी ॥ १ ॥**

भावार्थ—परमेश्वरा, तुझ्या स्थानाप्रत येण्यासाठीं मी एकटीच निघालें. माझ्याबरोबर सोबती म्हणून कोणासही घेतला नाहीं. परंतु मज नकळत हा कोण बरें माझ्या मागोमाग येत आहे ? अनेक परीनें त्याला चुकविण्याचा यत्न करतें, परंतु तो साधत नाहीं. वर्तनानें चंचल, मी बोलूं लागतांच मधेंच गोंधळ घालणारा आणि उद्दामपणानें चालणारा हा निर्लज्ज माझी पाठ सोडीत नाहीं. अशा या अधमाला बरोबर घेऊन तुझ्या द्वाराशीं यायला मला लाज वाटते.

रहस्य—मनुष्याला प्रथमतः जें ज्ञान होतें तें अहंभावनाविषयक आहे. त्याला आपल्या जवळच्या आप्तेष्टांची व पदार्थमात्राची ममता वाटूं लागते. ही ममता किंवा " माझें " म्हणण्याची बुद्धि एकदां उद्भवली म्हणजे अहंभाव, अभिमान, भेदबुद्धि, स्वार्थ इत्यादिकांचा प्रादुर्भाव होतो. अंतर्यामींच्या आत्म्याला हा अहंभाव वाईट आहे हें समजतें. शक्य तितक्या उपायांनीं ह्या अहंभावाचा त्याग करावा म्हणून तो यत्नही करतो. परंतु याचा अम्मल इतका बसलेला असतो कीं, त्याला दूर लोटणें अशक्य होतें. अहंभावनेनें आपल्या जीवितावर स्वामित्व मिळविल्यावर आपलें आत्मीय बल नष्ट होतें. ज्याप्रमाणें मनुष्याबरोबर त्याची छाया असते त्याप्रमाणें अहंभाव त्याच्या सान्निध्यांत राहून सर्व कायात ढवळाढवळ करूं पहातो. सदसद्विवेक बुद्धीचा अधिकार चालूं देत नाहीं. यामुळें या देहीं वास करणाऱ्या जीवाला परमात्म्याची भेट होत नाहीं. जोंपर्यंत अभिमान किंवा अहंपणा सर्व कृत्यांना चालन देत आहे तोंपर्यंत आत्मोद्धार होणें शक्य नाहीं. म्हणून साधुसंतांनीं ह्याला शत्रु समजून त्याला दूर लोटून देण्याचा यत्न केला आहेः

**अभिमानाचें तोंड काळें । दावी बळें अंधार ॥**
**लाभ न्यावा हातोहातीं । तोंडीं माती पाडोनी ॥**
**लागलीसे पाठी लाज । झालें काज नासाया ॥**
**तुका म्हणे कुश्चळ मनीं । विटंबनीं पडिलीं तीं ॥ १ ॥**

---

## ॥ गीत १३ ॥

बं.—वन्दी तोरे के बेंधेछे ( इं. ३१ )

बंदिवाना तुज बद्ध केलें कोणीं । कठिण पाशांनीं सांग मज ॥
म्हणे बंदिवान धन्यानें मजला । बांधुनी ठेविला क्रूर पाशीं ॥
मजसी वाटलें सकलां जगतीं । टाकीन मागुती सामर्थ्यानें ॥
स्वामीचें मी धन माझ्या कोशागारीं । सांठविलें भारी अन्यायानें ॥
निद्रावश होतां अंतःपुरामाजी । पहुडलों शेजीं स्वामीचीया ॥
जागा झालों तंव माझ्या कोशागारीं । बंदिवानापरि गति झाली ॥
वज्रपाश ऐसे कठिण अभंग । घडविले सांग कोणी तुझे ॥
अत्यंत प्रयत्नें श्रृंखला ही म्यांची । घडविली याची माझ्या हातें ॥
माझीया प्रतापें अखिल जगाला । जिंकीन मनाला ऐसें वाटे ॥
एकटा मी जगीं स्वतंत्र राहीन । सकलां करीन दास माझे ॥
रात्रंदिन मोठा अग्नि पेटवोनी । ठेवोनी ऐरणीं श्रृंखलेसी ॥
कठोर कठिण घणांचे आघात । घालितां अमित कष्टलों मी ॥
शेवटीं घडली ऐशी ही श्रृंखला । असे भंगण्याला अशक्य जी ॥
सांपडलों आतां तिच्या बंधनांत । कंठीतों बंदींत काळ आतां ॥ १ ॥

**भावार्थ**—बंदिवानाला म्यां प्रश्न केला कीं—बाबा तुला हा बंदिवास कां व कसा घडला ? तुझ्या हातांपायांत हे खडतर पाश घातले आहेत. या लोहाच्या बेड्या कोणी तयार केल्या ? बंदिवानानें उत्तर दिलें—मला माझ्या स्वामीनें बंदींत टाकिलें. त्यानेंच हे पाश माझ्या हातांपायांत जखडले आहेत. ही शिक्षा प्राप्त व्हावयाला कारण हेंच कीं, मी गर्वानें सर्व जग तुच्छ मानूं लागलों. माझ्या धन्यास मी विसरलों. त्याचा मी अपमान केला. त्याचें धन माझेंच आहे असें समजून स्वार्थानें त्याचा संग्रह केला. शेवटीं धन्यानें मला कारागारीं टाकिलें. माझ्याच हातानें माझ्या या बेड्या बनविल्या. त्या तोडतां येत नाहींत.

**रहस्य**—मनुष्य जन्मीं करावयाचीं सर्व कार्यें ईश्वराप्रीत्यर्थ आहेत हें सत्य आपल्या अंतःकरणांत जाग्रत रहात नाहीं. अहंभावाला बळी पडल्यामुळें सर्व कार्यांत ईश्वराचें विस्मरण होतें. दुर्वासनांच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें परार्थ हाच स्वार्थ आहे हें न उमगतां दुराशेनें सर्वच आपल्या सुखासाठीं आहे असें समजून सर्व जगाला पीडा देण्यासही मनुष्य धजतो. याचा परिणाम असा होतो कीं सुख-

दुःखाचे धनि आम्ही होऊन मनाप्रमाणें कार्य सुफलित न झाल्यामुळें रात्रंदिवस आम्हाला कष्टांत काल घालवावा लागतो. भगवंतांनीं गीतेंत सांगितलें आहे कीं—

**आत्मैव हि आत्मनः बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः ।**

आपणच आपला मित्र आणि आपणच शत्रु; खरें आहे. मनुष्य जन्मास आल्यानंतर संसाराचें कृत्य तर केलें पाहिजे.

**परी कर्मफळीं आस न करावी । आणि अकर्मीं संगति न व्हावी ।**
**हे सत्क्रियाचि आचरावी । हेतुविण ॥**
**देखें जेतुलालें कर्म निपजे । तेतुलें आदिपुरुषीं समर्पिजे ।**
**तरी परिपूर्ण सहजें । जाहलें जाणें ॥** ( ज्ञानेश्वर )

आपणच आपल्या हातानें शृंखला बनवून त्या आपल्या हातांपायांत घातल्यावर दुसऱ्यास दोष कां द्यावा ? आमचा जन्म श्रेष्ठतम आहे, असें आम्ही समजतों. मग आपलें वर्तनदेखील श्रेष्ठ प्रकारचें असलें पाहिजे.

**भूतानां प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः ।**
**बुद्धिमत्सु नराः श्रेष्ठा नरेषु ब्राह्मणाः स्मृताः ॥**
**ब्राह्मणेषु च विद्वांसः विद्वत्सु कृतबुद्धयः ।**
**कृतबुद्धिषु कर्तारः कर्तृषु ब्रह्मवादिनः ॥**

या विश्वांतील स्थिरचर सृष्टीमध्यें प्राणि श्रेष्ठ होत. प्राण्यामध्येंहि बुद्धीच्या योगानें जीवन करणारे श्रेष्ठ असून त्यांपैकीं बुद्धिमत्तेंत वरच्या पायरीवर असलेला मनुष्यप्राणि श्रेष्ठ आहे. मनुष्यांमध्यें ज्ञानाच्या व शुद्ध आणि सात्विक वर्तनाच्या योगानें चरितार्थ व व्यवहार चालविणारा श्रेष्ठ आहे. अशा प्रकारच्या नरांस ब्राह्मण ही अन्वर्थक संज्ञा देण्यांत आली आहे. (यांत जातिवाचक अर्थ नाहीं.) ब्राह्मणांत विद्वान् लोक, विद्वान् लोकांमध्यें कार्य उत्पन्न करून त्याला दिशा लावण्याचें सामर्थ्य असलेले मानव आणि अशा प्रकारच्या कृतबुद्ध लोकांत प्रत्यक्ष कृति करून दाखविणारे श्रेष्ठ होत. त्यांतही कर्तारांमध्यें जे फलेच्छारहित कर्म करून सर्व कर्म ईश्वरचरणीं समर्पण करतात ते ब्रह्मवादि अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे होत. याप्रमाणें ज्यांना निरिच्छ राहून कार्य करतां येत नाहीं ते इहपरलोकीं बंधन पावतात.

**बांधे सोडी हें तों धन्याचिये हातीं । हेंकडें गोविती आपणां बळें ॥**
**भुललियासि नाहीं देहाचा आठव । धोतऱ्यानें भाव पालटिला ॥**
**घरांत रिघावें दाराचिये सोई । भिंतीसवें डोई घेउनि फोडी ॥**
**तुका म्हणे देवा गेलीं विसरोन । आतां वर्म कोण दावी यासी ॥**

---

## ॥ गीत १४ ॥

बं.—तारा दिनेर वेला एसेछिल (इ. ३३)

**दिन उगवला तंव घरीं आले । जागा द्या म्हणाले नम्रपणें ।**
**म्हणाले ते आम्ही राहूं पार्श्वभागीं । देवसेवेलागीं साह्य करूं ॥**
**पूजा सांग होतां थाल जो प्रसाद । तयाचा सुस्वाद घेऊं राहूं ॥**
**विनवोनि ऐसें दरिद्री मलीन । अंगें क्षीण दीन राहिले ते ॥**
**संकोचित कोनीं एकटे बैसले । प्रबल उठले रात्र होतां ॥**
**माझ्या देवागारीं प्रवेशले खळ । लुटति सकल पूजा-बलि ॥**

**भावार्थ**—दिवस उगवतांच ( पांथस्थाप्रमाणें ) ते माझ्या घरीं आले आणि नम्रपणानें राहण्यासाठीं घरांत जागा मागूं लागले. आम्ही एका कोपऱ्यांत पडून राहूं, तुमच्या देवसेवेच्या कार्याला मदत करूं आणि देवास अर्पिलेल्या नैवेद्यां-तील थाल तेवढा प्रसाद सेवन करून स्वस्थपणें तुमच्या आश्रयास राहूं असें त्यांनीं विनयपूर्वक सांगितलें. ( मी विनंति मान्य केली ) परंतु दीन मलीन आणि क्षीण दिसणारे गृहागत लोक रात्रीचा समय प्राप्त होतांच प्रबल होऊन उठले. देवगृहांत प्रवेश करून त्यांनीं देवास अर्पिलेल्या वस्तु लुटून नेल्या.

**रहस्य**—बालकाला सृष्टींतील पदार्थमात्राची ओळख पटूं लागल्या वेळे-पासून त्याचे पाठीराखे होऊन त्याला सन्मार्गास लावण्यासाठीं मातापितर, विद्या-लयांतील गुरू, धर्मशास्त्रकार, साधुसंत व कवी आणि लेखक या सर्वांनीं यत्न चालविलेला असतो. नीति व अनीति, न्याय व अन्याय, बरें आणि वाईट या प्रकारच्या द्वंद्वांतील ग्राह्य किंवा सुखावह भाग कोणता आणि दुःखजन्य म्हणून त्याज्य भाग कोणता हें प्रत्येकाला बुद्धि व ज्ञान यांची वाढ होतां होतां समजूं लागतें. बाल्यावस्था मागें पडून तारुण्याचा उदय झाला म्हणजे मनुष्याला अनेक व्यवहारांत भाग घेण्याचा प्रसंग येतो. अशा वेळीं फार जपावें लागतें. कारण मिथ्यासुखाच्या कल्पनांमुळें आम्हाला कित्येक गोष्टी आदरणीय व ग्राह्य वाटतात. प्रेयमार्ग श्रेयमार्गाहून सोपा, विशेष फलदायक आणि आनंद देणारा आहे असें समजून आम्ही कार्य चालवितों. कामक्रोधादिक दुर्विकारांचा परिणाम वाईट आहे हें जरी विचारांतीं आम्हांस पटतें तथापि योग्य रीतीनें आणि योग्य काळीं या विकारांचा उपयोग केल्यास आपणास व्यवहारांत विशेष यश येईल, आपल्या संसारकार्यांस मदत होईल इतकेंच नव्हे, त्यायोगें परोपकार व देवसेवा

करण्याची आपल्या अंगीं विशेष पात्रता येईल असें वाटूं लागतें. अर्थात् सज्ञान व जाग्रत स्थितींत असतांना या राजसिक व तामसिक गुणांचा आम्ही अंगिकार करतों. त्यांच्या मदतीनें आमचें संसाराचें गाडें सुरळीत चालून आमच्या सुखांत भर पडते असें दिसतांच सर्वस्वीं या गुणांचे आम्ही ताबेदार होतों. त्यांच्या कचाट्यांतून सुटतां येत नाहीं. आमच्यांत काम, क्रोध, लोभ, दंभ, मोह आणि अहंकार यांचें कायमचें ठाणें बसतें. तमोमय स्थितींत आमचे व्यवहार चालतात आणि दैविक संपत्तीला आपण मुकतों. याप्रमाणें ज्या आसुरी भावनांस आम्ही जवळ करूं नये त्यांस जवळ केल्यामुळें आत्मवंचना होते.

**मुक्त होता परि बळें झाला बद्ध । घेवोनियां छंद माझें माझें ॥**
**पापपुण्य अंगीं घेतलें जडून । वर्म नेणें कोण करिता तो ॥**
**तुका म्हणे वायां गेलें वायांवीण । मृग पावे शीण मृगजळीं ॥**

कठोपनिषदांत सांगितलें आहे कीं

**उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ॥**

म्हणजे ऊठ, जागा हो, श्रेष्ठ अशा आचार्यांकडे जाऊन आत्मज्ञान प्राप्त करून घे. आचार्यांनीं सांगावयाचें हेंच कीं

**अन्यत् श्रेयः अन्यत् उतैव प्रेयः उभे**
**नानार्थे पुरुषं सिनीतः ॥**
**श्रेयो हि धीरोऽभिप्रेयसो वृणीते**
**प्रेयो मन्दो योगक्षेमाद्वृणीते ॥**

श्रेय वेगळें आणि प्रेय वेगळें. हे दोन भिन्न अर्थ प्राप्त करून देणारे मार्ग आहेत. या दोन प्रकारांनीं मनुष्य बद्ध आहे. श्रेय मार्गाचा ज्ञानी लोक स्वीकार करतात आणि अज्ञानी लोक योगक्षेमाच्या लोभानें प्रेय मार्गाचा स्वीकार करतात. परंतु **श्रेय आददानस्य साधुर्भवति** म्हणजे श्रेय मार्गाचा अवलंब करणाराचें कल्याण होतें. इतर मार्गानें जाणाराचें खरें कल्याण होत नाहीं.

## ॥ गीत १५ ॥

बं.–तोमाय आमार प्रभुकरे राखि ( इं. ३४ )

सर्वस्व तूं माझें ऐसें म्यां मानावें । अल्प हें उरावें मजपाशीं ॥
सर्व दिशांमाजीं व्हावा तुझा भास । असावी ही आस एक मज ॥
अंतर्यामीं तुझें प्रेम रात्रंदिन । जाग्रत ठेवीन आस हीची ॥
मजपाशीं देवा इतुकें उरावें । जेणें न लपावें रूप तुझें ॥
तुझी लीला माझ्या संपूर्ण जीवनीं । प्रगटो म्हणोनी हा संसार ॥
तुझ्या बाहुपाशें बंधन घडावें । बंधन असावें हेंचि एक ॥

**भावार्थ**—तूंच तेवढा माझ्याकडे असावा. अर्थात् तुझ्या व्यतिरिक्त माझी दुसरी मालमत्ता नसावी. सर्वत्र तुझें रूप मला दिसावें. अंतर्यामीं तुझें प्रेम सदैव असावें आणि कोणत्याहि स्थितींत तुझें रूप माझ्या दृष्टिआड होऊं नये. माझा हा संसार केवल तुझ्या लीलेसाठीं असावा. आणि तुजवांचून मला दुसरें बंधन नसावें हीच माझी इच्छा आहे.

**रहस्य**—ज्यांनीं पूर्णपणें आपलें जीवित परमेश्वर चरणीं अर्पिलें आहे त्यांचें सर्वस्व म्हणजे एक परमेश्वर आहे. साधुसंतांनीं याप्रमाणें आपलें जीवित भगवंतास अर्पण करून त्याजपाशीं याचना केली कीं—

जे जे कांहीं मज होईल वासना । ते ते नारायणा व्हावें तुम्हीं ॥
काय भाव एक निवडूं निराळा । जाणसी तूं कळा अंतरींची ॥
तुजविण मज कोण आहे सखा । जें सांगों आणिकां जीवभाव ॥
अवघें पिशुन झालें असें जन । आपपर कोण नाठवे हें ॥
तुका म्हणे तूंचि जीवांचें जीवन । माझें समाधान तुझे हातीं ॥

याप्रकारची वृत्ति झाल्यावर भगवंतापाशीं दुसरें काय मागणार ?

माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करीं कांहीं ।
धरोनीयां बाहीं । भव हा तारीं दातारा ॥ १ ॥
पाहे गुंतलों नेणतां । तुज असे माझी चिंता ।
तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ॥ २ ॥

अशारीतीनें ईश्वरावर सर्वप्रकारें विसंबून राहणारे या ऐहिक सुखसोहळ्यांच्या मोहांत सांपडले नाहींत यांत आश्चर्य कोणतें ? पंढरीनाथास विश्वाचा धनी मानून

आणि त्याच्यावर पूर्ण प्रेम, श्रद्धा व भक्ति ठेऊन ज्यानें आपला उद्धार करून घेतला तो तुकोबा म्हणतो—

**इतुलें करीं देवा ऐकें हें वचन । समूळ अभिमान जाळीं माझा ॥**
**इतुलें करीं देवा ऐके हे गोष्टी । सर्व समदृष्टि तुज देखे ॥**
**इतुलें करीं देवा विनवितों तुज । संतचरण रज वंदी माथां ॥**
**इतुलें करीं देवा ऐकें हे मात । हृदयीं पंढरीनाथ दिवस रात्री ॥**
**भलतिया भावें तारीं पंढरिनाथा । तुका म्हणे आतां शरण आलों ॥**

पृथ्वीतलावर जे धर्म प्रचलित आहेत त्यांचा उद्देश मनुष्यप्राणी आणि परमेश्वर यांचा संबंध दर्शविणें हा आहे. द्वैत, अद्वैत इत्यादि शब्दांनीं सूचित होणारे पंथ किंवा अनेक धर्मसंस्थापकांच्या नांवावर प्रचलित झालेले संप्रदाय या सर्वांच्या बुडाशीं जी भावना आहे तिचे तीन विभाग पाडतां येतील. ईश्वराविषयीं मनुष्य आपलें नातें सांगतो तें असें—

**१ तस्यैवाहम्** म्हणजे **मी त्याचा आहे.**
**२ तवैवाहम्** म्हणजे **मी तुझाच आहें.**
**३ त्वमेवाहम्** म्हणजे **मी तूंच आहें.**

मी ईश्वराचा आहें असें समजणारे ईश्वर हा मनुष्यापासून निराळा व दूरचा आहें असें समजतात, आणि "भगवंता, मी तुझाच आहें" असें म्हणणारे व मानणारे त्याचें निकट सान्निध्य कल्पून त्याच्याशीं विशेष परिचयानें, सलगीनें व प्रेमानें भाषण करतात. दृढ भाव, एकांतिन् व अव्यभिचारिणी भक्ति, विश्वास, प्रेम आणि सर्वसमर्पण यांच्या योगानें ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन घडेल असें ते समजतात. हा भक्तिमार्ग आहे. तुकारामादिक साधुसंतांनीं या मार्गाचा अवलंब केला. कालेंकरून या भक्तीमुळें भेदबुद्धि नाहींशी झाली आणि भक्त व ईश्वर यांचें ऐक्य झालें. "**तुका झाला पांडूरंग**" या विचारांतील रहस्य "**त्वमेवाहम्**" या वचनांत व्यक्त होतें. मी आणि तूं एक; तूंच माझ्या ठायीं आहेस. ही भावना अद्वैतमार्गाचा पाया आहे. या देहांतील देही म्हणजेच परमेश्वर आहे असें समजून ईश्वराशीं ऐक्य मानणारे आत्मज्ञानाच्या उच्चतम पायरीवरून ईश्वराकडे पाहतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें सर्व स्थिरचर सृष्टीचा आत्मा परमेश्वर आहे असें अंतःकरणपूर्वक समजणारांस त्याचा लाभ म्हणजे सर्वस्वाचा लाभ आहे असें वाटणें साहजिक आहे. "सर्वत्र वासुदेव भरलेला आहे" असें समजून वागणें यांतच मनुष्याचें कल्याण आहे.

---

## ॥ तृतीय खंड ॥

# ईश्वराचा शोध.

एको देवः सर्व भूतेषु गूढः ।
सर्वव्यापी सर्व भूतांतरात्मा ॥
कर्माध्यक्षः सर्व भूताधिवासः ।
साक्षी चेता केवलो निर्गुणश्च ॥ श्वेताश्वतर उपनिषत् ॥

**अर्थ**—एकच देव सर्व भूतमात्रामध्यें गुप्त रीतीनें वास करीत आहे. तो सर्व-व्यापी असून सर्व भूतांचा अंतरात्मा आहे. कर्मांचा अधिष्ठाता तोच आणि भूतांमध्यें वास करणारा तो असून सर्वसाक्षी व निर्गुण असा आहे.

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानम् बीजमव्ययम् ॥ गीता ॥

**अर्थ**—सर्व विश्वाचा चालक, पोषक, प्रभु, साक्षी, रक्षक, निवासस्थान असून अव्यय अशा प्रकारचें बीजहि तोच परमात्मा आहे.

अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ गीता ॥

**अर्थ**—जे अनन्यभावानें परमेश्वराची उपासना करतात त्या नित्यअभियुक्त भक्तांचा परमेश्वर योगक्षेम चालवीत असतो.

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥ गीता ॥

**अर्थ**—ईश्वराच्या सच्चिदानंदस्वरूपीं चित्त राखावें. ईश्वराचा भक्त व्हावें. त्याचेंच यजन करावें. त्याला नमस्कार करावा. आणि ईश्वरपरायण होऊन आपलें चित्त योगयुक्त करावें. असें केलें म्हणजे आत्मसाक्षात्कार होतो व भगवत्प्राप्ति होते.

देव आमचा देव आमचा । जीव सकळ जीवांचा ॥
देव आहे देव आहे । जवळीं आम्हां अंतरबाहे ॥
देव गोड देव गोड । पुरवी कोडाचेंहि कोड ॥
देव आम्हां राखे राखे । घाली कळिकाळासी काखे ॥
देव दयाळ देव दयाळ । करी तुक्याचा सांभाळ ॥

## ॥ गीत १६ ॥

बं.—अनेक कालेर जात्रा आमार ( इं. १२ )

यात्रेसी निघोनी बहु काल झाला । मार्ग म्यां क्रमीला दुरींचा तो ॥
प्रथम-प्रकाश-किरणांचा पथ । आक्रमीत रथ आला येथें ॥
ग्रह तारांवरि हिंडत हिंडत । आलों मी ठेवीत चिन्ह पथीं ॥
नाना लोकांमाजीं काननीं पर्वतीं । केली म्यां वसति प्रवासांत ॥
निकट सन्निध तेंचि अति दूर । सहज गोड सूर कष्टसाध्य ॥
अनुभव ऐसा मजलागीं आला । व्याकुळ जाहला जीव माझा ॥
परक्याचे द्वारीं हिंडत प्रवासी । येई स्वगृहासी शेवटीं तो ॥
बाहेरी देऊळें हिंडोनियां सारीं । स्वगृहाभीतुरी देव लाभे ॥
दृष्टि ही वळली दिशांठायीं किती । असंख्यात पथीं चाललों मी ॥
मिटतां नयन निघाला उद्गार । नाहींस तूं दूर येथ उभा ॥
कोठें तूं कोठें तूं ऐसें आक्रंदितां । सांगसी अनंता 'येथें हा मी' ॥
आश्वासीतां ऐसें गळे नेत्रजल । विश्व हें सकल बुडे जलीं ॥ १ ॥

**भावार्थ**—मी केव्हांपासून प्रवासाला निघालों आहें. तो अद्यापि संपत नाहीं. प्रथम तेज उत्पन्न झालें त्यावेळीं माझा जन्म. ग्रह, तारा, पर्वत, दरी, अरण्यें आणि अनेक देश यांत जन्म घेत घेत मी सध्यां येथें येऊन पोहोंचलों आहे. ज्याप्रमाणें गोड मधुर स्वर सहजरीतीनें कंठांतून निघण्याजोगा असून तो निघत नाहीं तद्वत सहजरीतीनें दर्शन घडण्याजोग्या सन्निध असलेल्या प्रिय वस्तूचें दर्शन घडत नाहीं. याप्रमाणें, भगवंता तूं अगदीं जवळ असूनहि तुझें दर्शन घडत नाहीं, यामुळें माझा जीव व्याकुळ झाला आहे. प्रवाशाला स्वतःचें घर ओळखीचें नसतां अनेक परक्यांच्या दारावर जाऊन चौकशी करावी लागते किंवा गांवांतील मंदिरांत देवदर्शन घेऊन परत आल्यावर स्वगृहींच्या देव्हाऱ्यांतच खरें देवदर्शन घडतें. तद्वत् अनेक ठिकाणीं हिंडून, हजारों मार्ग आक्रमून या मृत्युभूमीवर मनुष्य जन्म घेतला तेव्हां तुझें स्मरण झालें. सर्व विषयांपासून नेत्र फिरविले आणि अंतर्दृष्टीनें तुजकडे पाहिलें. देवा तूं कोठें आहेस असे उद्गार निघतांच नेत्रावाटे अश्रुपूर वाहूं लागला. या अश्रूंमध्यें सर्व जग बुडून गेलें, आणि **" मी येथें आहें, हा मी येथें आहें "** अशा अर्थाचे तुझे उल्हासदायक शब्द माझ्या कानीं पडले.

**रहस्य**—मनुष्यप्राण्याचा जन्म प्रथमतः केव्हां झाला हें कोणी सांगावें ? विश्वाचा संसार कोट्यवधि वर्षांपासून चालला आहे. उत्क्रांतितत्वानुसार सर्व प्राण्यांची उत्पत्ति झाली आणि उत्क्रांतीमुळें सध्यांचें शरीर हजारों युगांनंतर प्राप्त झालें आहे असें शास्त्रीय शोधक सांगतात. वेदप्रणीत धर्माचा सिद्धांत असा आहे कीं या जगांत तेज उत्पन्न झालें त्याच वेळीं प्राणिमात्राच्या जननास आरंभ झाला. अव्यक्तस्थितींतून व्यक्त स्थिति केव्हां झाली किंवा मनुष्याचा प्रथम जन्म केव्हां झाला हें सांगणें अशक्य आहे. पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारांस असें वाटतें कीं अनेक योनी घेत घेत कर्मानुसार जीवास मनुष्य योनी प्राप्त होते. याप्रमाणें लक्षावधि वर्षांपासून अनंत व अगणित योनींत जन्म घेत घेत येणाऱ्या मनुष्यप्राण्याला या त्याच्या शेवटच्या योनींत मात्र ईश्वराचें स्मरण होतें. ज्या स्थानापासून आपण निघालों तें स्थान समजून घ्यावें आणि तेथें फिरून जावें असा त्याला ध्यास लागलेला असतो. या मनुष्यजन्मांत निजधामाची आणि निजात्मरूपाची ओळख करून घेण्याची इच्छा बळावत गेल्यामुळें ही ओळख पटल्यावांचून जीवास शांतता मिळत नाहीं. भगवंताचें मनश्चक्षूनें दर्शन घडतांच जीवाला आनंद प्राप्त होतो. संतांनीं मार्ग दाखविल्यामुळें त्यांच्याविषयींहि आदर वाटतो.

**जन्मा आलों त्याचें । आजि फळ जालें साचें ॥**
**तुम्हीं सांभाळिलें संतीं । भय निरसली खंती ॥**
**कृतकृत्य झालों । इच्छा केली तें पावलों ॥**
**तुका म्हणे काळ । आतां करूं न शके बळ ॥**

ईश्वरदर्शन घडणें हें महद्भाग्य आहे. " तूं कोठें आहेस " या करुणापर हांकेला " मी येथें आहें " असें आश्वासन मिळणें यासारखें अन्य सुख नाहीं. म्हणून संतांनीं उद्गार काढले आहेत कीं—

**जन्मोजन्मींचें संचित । भेटी जाली अकस्मात ॥**
**आतां सोडितां सुटेना । तंतु प्रीतीचा तुटेना ॥**
**माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडली पंढरीराया ॥**
**तुका म्हणे अंतीं । तुझी माझी एक गति ॥ १ ॥**

---

## ॥ गीत १७ ॥

बं.—हे था जे गान गाईते आसा आमार—( इं० १३ )

**गीत गायासाठीं आलों परि गान । नाहीं मी अजून गाइलें तें ॥**
**सूर जुळवितां दिन गत झाले । हृदय भरलें गानेच्छेनें ॥**
**सूर न लागला जुळली न कथा । आली व्याकुळता प्राणामाजी ॥**
**पुष्प न फुललें पाहुनी कलिका । निःश्वास हा फुका वायु टाकी ॥**
**देखिलें न रूप तुझें म्यां अजूनि । ऐकिली न वाणी गोड तुझी ॥**
**द्वाराच्या सन्मुख नित्य तूं जाताना । ध्वनि पडे काना पाउलांचा ॥**
**आसन मांडितां दिन सर्व गेला । दीप पेटवीला नाहीं घरीं ॥**
**केवीं तुज मग गृहीं मी पाचारूं । केवीं मी सत्कारूं भेटूं कैसा ॥**
**तुझ्या दर्शनाची वसे आस मनीं । जरी न अजुनी लाभ तुझा ॥ १ ॥**

**भावार्थ**—गीत गावें म्हणून आलों खरा, परंतु कांहीं केल्या सूर जुळत नाहीं. काय गावें हेंदेखील समजत नाहीं. मन तर प्रबल गानेच्छेनें व्याकुळ झालें आहे. ज्याप्रमाणें झाडावर पुष्पकलिका असावी परंतु ती न फुलल्यामुळें तिचें सौंदर्य आणि तिचा सुवास प्राप्त न होतां मनाला दुःख व्हावें तशी ही स्थिति आहे. ( मनस्सुमनच मुळीं प्रफुल्लित होत नाहीं अशी ही स्थिति आहे.) भगवंता, अद्यापि कांहीं तुझें दर्शन घडत नाहीं. तुझा प्रेमळ शब्द कानीं पडत नाहीं. तुझ्या सान्निध्याचा मला भास होतो. परंतु तुला घरीं बोलावून आणण्याची माझी तयारी नाहीं. घरीं दिवा नाहीं. आसनही मांडलेलें नाहीं. मग तुझें स्वागत कसें करूं ?

**रहस्य**—प्रपंचांत असलेल्या मनुष्याला त्याचा कर्तबगारीचा काल मागें पडल्यावर गत कालांत आपण काय केलें याबद्दल तो विचार करूं लागतो. संसाराचा भार शिरावर घेतला. रात्रंदिवस काबाडकष्ट करण्यांत आनंद मानला. अनेक प्रकारचीं ओझीं डोईवरून वाहून नेलीं. धनदौलत मिळविली आणि खर्च केली. अनेक लोकांस जवळ केलें किंवा दूर लोटलें आणि हा सर्व खटाटोप करून शेवटीं स्वतःसाठीं असें निराळें कांहीं मिळविलें नाहीं. आत्मोन्नतीप्रीत्यर्थ क्षणाचाहि उपयोग केला नाहीं. वृद्धापकालीं जें सौख्य व समाधान जीवाला पाहिजे आहे तें मिळविण्यासाठीं पूर्वींपासून यत्न केला नाहीं. ज्यानें जन्मास घातलें त्याचें घटकाभर प्रपंचाचा खटाटोप पूर्णपणें विसरून चिंतन केलें नाहीं. अर्थात् धन, दारा, पुत्र, सगेसोहिरे, वैभव, मानमरातब आणि शारीरिक सेवा यांच्यामध्यें

चूर होऊन रात्रंदिवस श्रम केले परंतु परमेश्वराप्रीत्यर्थ कांहीं एक केलें नाहीं. मधून मधून त्याची आठवण होत असे. परंतु अंतःकरणपूर्वक ईश्वरचिंतन करण्यास मन तयार केलें नाहीं.

वायां ऐसा जन्म गेला । हें विठ्ठला दुःख वाटे ॥
नाहीं सरता जालों पायीं । तुम्ही जंई न पुसा ॥
कां मी जीतों संवसारीं । अद्यापवरि भूमिभार ॥
तुका म्हणे पंढरिनाथा । सबळ व्यथा भवरोग ॥

अर्थात् ईश्वर सेवा करण्यासाठींच योग्य असा मानवदेह प्राप्त झाल्यावर शेवटपर्यंत ती सेवा करण्याची तयारीहि करूनये, आणि ईश्वराची कीर्ति गाण्यास किंवा त्याला आपल्या हृदयांत आणून बसविण्यास अवधि मिळूं नये हें दुर्भाग्य आहे. ज्ञानाची ज्योत अंतःकरणांत पेटविल्याशिवाय त्या ठिकाणीं ईश्वराचें स्वागत तरी कसें करतां येईल? अशा रीतीनें परमेश्वराच्या स्वागताची पूर्व तयारी ज्यांनीं केली नाहीं त्यांस कायिक निर्बलतेमुळें सर्व व्यवहार बंद पडल्यावर मनाला पश्चात्ताप झाल्यावांचून रहात नाहीं.

वायां जातों देवा । नेणें भक्ति करूं सेवा ।
आतां जोडोनीयां हात । उभा राहिलों निवांत ।
करावें तें काय । न कळे अवलोकितों पाय ।
तुका म्हणे दान । दिलें पदरीं घेईन ॥ १ ॥

या प्रकारचे उद्गार शेवटच्या आयुष्याच्या काळीं विचारवंतांच्या मुखावाटे बाहेर पडतात.

---

## ॥ गीत १८ ॥

बं.–आमि बहु वासनाय प्राणपणे चाई ( इं. १४ )

असंख्य वासना प्रिय प्राणाहुनी । पूर्ण न करोनी वांचवीसि ॥
कठोर ही दया संपूर्ण जीवनीं । मज रात्रंदिनीं रक्षीतसे ॥
याचनेवाचोनी दिधले जे वर । भोगूं त्वां पामर योग्य केला ॥
आकाश प्रकाश तनु मन प्राण । तुझें महा दान बहु मोल ॥
मज अतिलोभ–संकटातूनियां । सदा रक्षोनीयां कृपा केली ॥
वाटेनें चालतां कधीं पडे भूल । कधीं हें पाऊल धांवे वेगें ॥

**परि तुझ्या पथीं लक्ष्य हें विंधीलें । तुंवा फिरविलें निजरूप ॥**
**सन्मुख होतासी दृष्टिआड आतां । झालासी अनंता निष्ठुर तूं ॥**
**वाट दावायाच्या मिषें येवोनीयां । फिरविसी वायां मज भोंतीं ॥**
**जाणें मी कृपा ही तुझी नारायणा । सत्त्व परीक्षणा लावितोसी ॥**
**पूर्ण न करोनी वासनेच्या हौसी । मज तूं करीसी कृपायोग्य ॥**
**तुजसी येवोनी मिळावें म्हणोनी । वासनांहातोनी वांचवीसी ॥ १ ॥**

**भावार्थ**—माझ्या अंतःकरणामध्यें माझ्या प्राणाहून प्रिय अशा किती तरी वासना उद्भवतात. त्या पूर्ण करण्यासाठीं तुझ्यापाशीं अगदीं केविलवाण्या शब्दांनीं मी प्रार्थना करतों. परंतु तूं क्रूरपणानें माझ्या याचनेचा बिलकूल विचार देखील न करतां माझें पतन होऊं देत नाहींस. अशा रीतीनें दयेनें तूं माझें रक्षण करतोस. नाहीं तर अतिलोभाच्या संकटांत मी बुडून गेलों असतों. आकाश, प्रकाश, देह आणि मन या ज्या उत्तम देणग्या मी मागितल्यावांचून मला तूं दिल्या आहेस त्याच मी बहुमोल समजतों. कधीं कधीं या संसारांत मार्गक्रमण करीत असतां माझें पाऊल विशेष जोरानें चालतें. कधीं खरा मार्गच दिसत नाहीं. तुझ्यावर दृष्टि ठेवून जातां जातां अकस्मात् तुझें रूप दृष्टिआड होतें आणि मी तुला शोधण्यासाठीं एकसारखा घिरट्या घालीत असतों. याप्रमाणें तूं माझें सत्त्वपरिक्षण करतोस. माझ्या वासना पूर्ण न करतां तुझ्या कृपेला मी पात्र व्हावें असें तूं करतोस. वासनांच्या तडाक्यांत सांपडून मी पतित होऊं नये यासाठीं त्यांच्या हातून तूं मला चुकवितोस ही तुझी थोर कृपा आहे.

**रहस्य**—परमेश्वराची सेवा करणारांमध्यें अनेक प्रकारचे लोक असतात. धनदौलत मिळावी म्हणून कोणी, कोणी संततीसाठीं, कोणी रोग परिहार व्हावा व कायिक स्वास्थ्य प्राप्त व्हावें म्हणून, अशा प्रकारें अनेक हेतु मनांत धरून लोक ईश्वरसेवा करतात. निःस्वार्थ बुद्धीनें निष्काम सेवा करणारे विरळा. पारलौकिक सद्गति मागणारांपेक्षां ऐहिक सुखसंपत्ति मागणारे अधिक असतात. त्याचप्रमाणें मानवी सुखास कारणीभूत होणाऱ्या अनेक गोष्टी ईश्वरानें न मागतां दिल्या असल्या तरी त्यांचें आम्हांस महत्व वाटत नाहीं. आणि आमच्या वेड्या मनाला आवडणाऱ्या क्षणिक सुखोत्पादक देणग्या देण्याविषयीं आम्हीं ईश्वराची आराधना करतों. दुसऱ्याचीं घरें दारें लुटून व नीतिमत्तेवर घाला घालून स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्या नीचांपासून तो तहत सुविचारी व धर्मभीरू जनांपर्यंत सर्वच लोक

ईश्वरापाशीं आपआपल्या मनकामना पूर्ण करण्यासाठीं प्रार्थना करतात. तुकोबांनीं म्हटल्याप्रमाणें देव जणूं काय दिवाळखोर आहे अशा रीतीनें सर्व लोक त्याजकडे धनकोप्रमाणें अनेक प्रकारची संपत्ति मागण्यासाठीं आपला हात पुढें करतात—

दिवाळखोर नारायण । त्यावरी बहुतांचें ऋण ।
उठतांचि उभे द्वारीं । अवघे दे दे म्हणती हरि ॥
माजघरीं दडे हरि । माया तडकी आड करी ॥
युगायुगींचें हें ऋण । ह्मणवुनि धरिलेसें मौन ॥

याप्रमाणें आपल्या सर्व वासना पूर्ण झाल्या तर आम्हीं उन्मत्त होऊं. त्या पूर्ण होत नाहींत म्हणून आमच्या अतिलोभाला आळा पडतो. मनुष्यास देह मन बुद्धि वगैरे अमोलिक ज्या देणग्या ईश्वरानें दिल्या आहेत त्यांचा सदुपयोग करून या संसारांत वागल्यास विषारी वासनांची आठवणहि होणार नाहीं. मन प्रसन्न आणि ईश्वराविषयीं कृतज्ञ राहील. क्षणिक काल उपरति होऊन ईश्वराविषयींचें प्रेम अंतः-करणांत उद्भवतें. इतक्यांत पुनः भ्रम उत्पन्न होतो आणि आम्ही भलतीकडे भटकूं लागतों. हें बरें नाहीं. ईश्वराचा अंतराय होण्यास आमच्या वासना कारण होतात. त्यांचा उच्छेद करावा असें शास्त्रकार, तत्त्वज्ञानी व साधुसंत सांगत आले आहेत. संसारकृत्यें केवळ कर्तव्यकर्म म्हणून आचारावीं. अतिलोभाच्या संकटांत पडूं नये. जीवित साफल्याचा हाच उत्तम उपाय आहे.

कायेंकरुनी करीं धंदा । चित्त गोविंदा तुझे पायीं ॥
पेशा संकल्पाची संधि । माझे बुद्धि धीर देवा ॥
कुटुंबाचा तुम्हां भार । मज व्यवहार निमित्य ॥
तुका म्हणे करितां काम । हृदयीं नाम धरीन ॥ १ ॥

---

## ॥ गीत १९ ॥

बं.—प्रेमेर हाते धरा देब—( ई. १७ )

प्रेमाहातीं माझें अर्पाया जीवित । वाट मी पहात बैसलोंसे ॥
विधिविधानांच्या बंधनें बांधाया । आले जन तयां चुकविलें ॥
योग्य असे मज यासाठीं शासन । संतोषें सहन करीन मी ॥ प्रेमा०

**लोक माझी निंदा करितीं बैसोन । शिरीं मी वाहीन सर्व निंदा ॥**
**वेळ गेली आतां उठला बाजार । देव घेव फार केली जनीं ॥**
**मज बोलवाया आले जे घरूनी । न येतां कोपोनी परतले ॥ प्रेमा० ॥**

**भावार्थ**—संपूर्णपणें परमेश्वराच्या प्रेमास पात्र होऊन त्याच्या चरणीं आत्मार्पण करण्याची मी वाट पहात बसलों आहें. अनेक विधिविधांनाच्या योगानें ईश्वर प्राप्तीकरून घेतां येईल असें सांगण्यासाठीं कित्येक जन मजकडे येतात. परंतु त्यांना मी टाळतों याबद्दल मला शासन झालें तरी पतकरलें. मला दिलेली शिक्षा मी संतोषानें सहन करायाला तयार आहें. कारण केवळ भक्ति–प्रेमाच्या योगानें ईशचरणाची कृपा मिळवावी म्हणून मी स्वस्थ बसलों आहें. लोक निंदा करितात. मी निंदाहि सहन करून स्वस्थ आहें. उत्सवाचे आणि उद्योगधंद्याचे दिवस संपले. लोकांनीं देवघेव फार केली. मला या उत्सवांत दाखल होण्यासाठीं बोलावण्यास जे आले ते मी येत नाहीं असें पाहून संतापून गेले. मी परमेश्वराच्या प्रेमाच्या प्राप्तीची वाट पहात बसलों आहें.

**रहस्य**—ज्या परिस्थितींत आपला जन्म झाला त्या परिस्थितीचा परिणाम आपल्या विचारांवर व्हावयाचा यांत आश्चर्य नाहीं. जें आम्ही नित्यशः ऐकतों, जे नियम समाजबंधनानुसार पाळतों, आणि ज्या भावना, आनुवंशिक संस्कार, शिक्षण आणि सहवास यांच्यामुळें प्राप्त होतात, तें श्रवण, किंवा ते समाजनियम, भावना आणि संस्कार सर्वथैव उत्तम असतात असें नाहीं. कधीं कधीं ज्ञानाचा प्रकाश पडून दृष्टींत अंतर पडूं लागलें म्हणजे आपला रूढ मार्ग चुकीचा असून त्यांत योग्य बदल करणें इष्ट आहे असें अंतःकरणपूर्वक वाटतें. रूढिदेवता आणि मनोदेवता यांच्यांत वैमनस्य उत्पन्न होऊन रात्रंदिवस झगडा चालतो. लोकसंग्रहार्थ म्हणून आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध देखील जाणें कित्येकदां पसंत न पडतां लोकदृष्ट्या दोष पतकरण्यास तयार व्हावें लागतें. भगवंताची कृपा मिळविण्याचा खरा मार्ग अमुक आहे म्हणून मन सांगतें. परंतु त्या मार्गानें जातांच लोकनिंदेला प्रारंभ होतो. परंतु

**नाना मतांतरें शब्दांची वित्पत्ति । पाठांतरें होती वाचाळ ते ॥**
**माझ्या विठोबाचें वर्म आहे दुरी । कैंची तेथें उरी देहभावा ॥**
**यज्ञ याग जप तप अनुष्ठान । राहे ध्येय ध्यान अलीकडे ॥**
**तुका म्हणे होय उपरति चित्ता । अंगीं सप्रेमता येणें लागे ॥**

ही सप्रेमता यावी म्हणून तर सारी खटपट आहे. ज्याच्या ठायीं प्रेमाचा उमाळा नाहीं त्यास या प्रेमाची ओळख पटणार नाहीं. परंतु ज्यांस खरें तत्व समजलें ते त्या तत्वाच्या शोधांत निमग्न राहून त्यांतच आनंद मानतात.

प्रेम जडलें तुझे पायीं । आणिक न सुचे मजला कांहीं ।
रात्री दिवस तुझें ध्यान । तेंचि माझें अनुष्ठान ॥
तुका म्हणे अंतकाळीं । आम्हां सोडवीं तात्काळीं ॥ १ ॥

या प्रकारचे उद्गार प्रेमी भक्ताच्या मुखावाटे निघावयाचे. त्याला निंदा, स्तुति, विधिविधानें यांची पर्वा कोठून असणार ?

---

## ॥ गीत २० ॥

बं०–जे दिन फुटलो कमल किछुइ जानिनाइ ( ई. २० )

ज्या दिनीं कमल प्रफुल्लित झालें । तेव्हां न जाणिलें, भ्रमे मन ॥
सुममंजुषेंत पुष्पें न घातलीं । रिक्त ती राहिली निरर्थक ॥
मधूनी मधूनी हृदय जाहालें । व्याकुळ न कळे कासया तें ॥
स्वप्नांतूनि जागा झालों अकस्मात । भयें घाबरत उठलों मी ॥
दक्षिण समीर शांत मंद आला । त्यासवें सेविला परिमल ॥
किती देशोदेशीं विश्रांतीवांचोनी । सुगंधामागोनी हिंडलों मी ॥
वाटलें मजसी नूतन वसंत । निश्वास टाकीत येत आहे ॥
अंतीं जाणिलें म्यां दूर न कमळ । असे तें जवळ अंतर्यामीं ॥
हृदयोपवनीं फुललें कमल । माधुरी विमल खुले त्याची ॥ १ ॥

**भावार्थ**—ज्या दिवशीं कमल फुललें त्या दिवशीं माझें मन ठिकाणावर नसल्यामुळें मला समजलेंच नाहीं. परडींत कमल न घातल्यामुळें ती रिकामी राहिली. उगीच मधूनमधून अंतःकरण व्याकुळ होई. स्वप्नांतून उठल्याप्रमाणें मी घाबरत आणि भीतियुक्त चहूंकडे पाहूं लागलों. इतक्यांत जणूं वसंतागम होत आहे अशा रीतीनें मलयगिरीकडील सुगंधित वारा आला. हा सुगंध कोठून येत आहे हें पाहण्यासाठीं अनेक देशांत मी हिंडलों. शेवटीं कळून आलें कीं हा सुगंध विकसित झालेल्या कमलाचा आहे. हें कमलपुष्प दूर नसून माझ्याच हृदयरूपी उपवनामध्यें फुललें आहे, आणि त्याचा सुवास चहूंकडे पसरत आहे.

**रहस्य**—कधीं कधीं आपल्या अंतःकरणांत कारणावांचून ईश्वरविषयक प्रेम उत्पन्न होतें. आधिभौतिक सुखांत मग्न असतांही मनास शांतता व समाधान नसतें. आणि आपलें कोठें तरी चुकतें आहे असें वाटूं लागतें. ही जीवाची तळमळ वर्णन करणें शक्य नाहीं. परंतु याप्रमाणें अचानक हृत्पुष्प विकसित झाल्यावेळीं तें ईश्वरास अर्पण करण्याची आपली तयारी नसल्यामुळें तें कोमेजून जाण्याचा संभव असतो. सुखाचे प्रसंगीं दुःखाचा आगंतुक प्रवेश झाल्यामुळें आध्यात्मिक विचारांचा उदय होतो. हा प्रसंग आणीबाणीचा आहे. या प्रसंगीं आपला जीवनक्रम योग्य मार्गी न वळविल्यास आत्मोद्धार होण्याची आशा नाहीं. या हृत्कमलाचा सुवास आल्याप्रमाणें होऊन त्या परिमलाच्या मागें मन भ्रमत असतें. अर्थात् पारमार्थिक उन्नति व्हावी आणि मनाला शांतता मिळावी म्हणून मनुष्यें अनेक प्रकारचे उपाय करूं लागतात. व्रतोपोषणें, तीर्थयात्रा, कीर्तन पुराण, पठण व श्रवण इत्यादि उपायांनीं ईश्वराचा साक्षात्कार प्राप्त करून घेण्याचा यत्न चाललेला असतो. कधीं कधीं या उपायांनीं देखील मनाला स्वास्थ्य न मिळाल्यामुळें भिन्न धर्म आणि मतमतांतरें यांच्या मागें लागून मनुष्य भ्रमिष्टाप्रमाणें वर्तू लागतो. निरनिराळ्या धर्मांतील सांप्रदायिक पद्धति वगळल्या तर मूळांत धर्म-सत्य एकच आहे. हें सत्य जाणल्यावर कोणत्याही धर्मांत राहून त्या सत्याचें रहस्य जाणतां येईल. सर्व धर्मांचा उगम ईश्वरभक्तीच्या प्रेमापासून झाला आहे. कोणत्याहि कारणानें असो, ज्या दिवशीं आपल्या अंतःकरणांत ईश्वरविषयक भावना जागृत होते त्याच दिवशीं व तत्क्षणीं ती भावना चेतवून तिचा परिपोष केला पाहिजे. साधुसंत हेंच सांगत आले आहेतः—

देहीं असोनीयां देव । वृथा फिरतो निदैंव ॥
देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥
नाभीं मृगाचे कस्तूरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥
साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे ॥
दुधीं असतां नवनीत । नेणें तयाचें मथित ॥
तुका सांगे मूढ जना । देहीं देव का पहाना ॥

## ॥ गीत २१ ॥

बं०–सेजेपाशे एसे बसे छिल ( इं. २६ )

**येवोनी बैसला तो माझ्या जवळीं । नाहीं मी त्या वेळीं जागा झालों ॥**
**किति हतभागी निद्रा मज आली । भाग्यवेळ गेली निघोनियां ॥**
**शांत निशाकाळीं आला माझ्या घरीं । वीणा तया करीं होती तदा ॥**
**गंभीर रागिणी वीणेंतूनि आली । स्वप्नीं मिसळली निद्रेमाजी ॥**
**जाहलों जागृत तंव अंधःकारीं । परिमल भारी सेवीयेला ॥**
**एवीं सर्व निशा व्यर्थ कां त्या जाती । कां न दृष्टि पडति पाय त्याचे ॥**

**भावार्थ**—तो येऊन अगदीं माझ्या जवळ बसला. परंतु मी जागा झालों नाहीं. किती दुष्ट ही झोंप ! माझी भाग्याची वेळ अशा रीतीनें म्यां गमावली. रात्रीची वेळ प्रशांत होती त्यावेळीं तो वीणा वाजवीत माझ्या घरीं आला. मी स्वप्नांत या विणेंतून निघणाऱ्या रागरागिण्याचा सुस्वर अनुभविला. अशा या अंधारांत मी जागा होतांच चहूंकडे सुगंध आढळून आला. परंतु त्याचे चरण माझ्या दृष्टीला पडले नाहींत. अशा रीतीनें माझ्या आयुष्यांतील सर्व रात्री त्याच्या दर्शनावांचून व्यर्थ जात आहेत. असें कां बरें होतें ?

**रहस्य**—प्रापंचिक व्यवहारांत चूर असतां जीवाला स्वस्थपणें विचार करण्यास सवड मिळत नसते. रात्रंदिवस काबाडकष्ट करावे आणि विश्रांतीवांचून राबत असावें यांतच एका प्रकारें आनंद वाटतो. परंतु जेव्हां मनांमध्यें सुविचारांचा उदय होतो तेव्हां आपण अशा रीतीनें या प्रपंचास सर्वस्व वाहिल्याबद्दल दुःख वाटतें. आपण आत्मोद्धाराविषयीं विचारदेखील मनांत न आणतां केवळ भारवाहकाप्रमाणें जीवित घालविल्याबद्दल पश्चात्ताप होतो. परंतु ही मानसिक स्थिति फार वेळ टिकत नाहीं. प्रवृत्तिपर व्यवसायांतच सर्व आयुष्याचा व्यय झाला असल्यामुळें ईश्वरसेवेकडे मन वळत नाहीं. निद्रासुख किंवा स्वप्नसुख अनुभवण्याचें टाकून देऊन जाग्रतावस्थेंत येणें ज्याप्रमाणें आळशी मनुष्याला दुःखद असतें त्याचप्रमाणें संसारांत गढून गेलेल्या प्राण्याला पारमार्थिक मार्गांत पाऊल टाकण्यास फार जड वाटतें. हा प्रपंच कष्टमय असला तरी त्याच्यांतील मोहिनी फार विलक्षण आहे. त्यामुळें तो प्रिय आणि गोड वाटतो. क्वचित्प्रसंगीं शारीरिक, मानसिक किंवा इतर कष्ट असह्य होऊन ईश्वराचें स्मरण होतें. पारमा-

र्थिक विचार अंतःकरणाच्या ठायीं उद्भवतात. अनेक प्रकारचे व्यवसाय करीत असतां ईश्वरसान्निध्याचा भास होतो. म्हणजे वातावरण सुविचारांनीं पवित्र आणि परिमलयुक्त झाल्याचा भास होतो. परंतु या उपरतीचा योग्य परिपोष न केल्यास आत्मोद्धार होणें शक्य नाहीं. पारमार्थिक जीवनाची एकसारखी तळमळ लागल्याशिवाय तें जीवन प्राप्त होणें शक्य नाहीं. जवळच द्रव्यनिधि असून तो प्राप्त न झाल्यामुळें ज्याप्रमाणें कृपणाला किंवा दरिद्री मनुष्याला दुःख होतें, त्याचप्रमाणें ईश्वर जवळ असून तो प्राप्त होत नाहीं म्हणून जीवाला त्रास झाला पाहिजे. याप्रमाणें भगवंताचें मनश्चक्षूला दर्शन न घडल्यामुळें जें साधुसंतांना दुःख होतें तें दुःख प्रापंचिकाला झालें पाहिजे. तेव्हांच ईशकृपेबद्दल त्याच्या जीवाला तळमळ लागली आहे असें म्हणतां येईल.

**कां रे माझा तुज न ये कळवळा । असोनि जवळी हृदयस्था ।**
**कां हें चित्त नाहीं पावलें विश्रांति । इंद्रियांची गति कुंठेची ना ।**
**तुका म्हणे कां रे धरियेला कोप । सरलें नेणों पाप पांडुरंगा ।**

ईश्वराचा शोध करून त्याला प्राप्त करून घ्यावें असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं निद्रावश न होतां अर्थात् अज्ञानावस्थेंत स्वतःस गुरफटून न घेतां जागृत राहिलें पाहिजे. ज्ञानाच्या योगानें शाश्वत आणि नश्वर यांतील अंतर जाणलें पाहिजे. नेहमींच्या व्यवसायांत गुंतून राहून ईश्वराची विस्मृति होणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. वासना ज्याप्रमाणें व्यक्तींचा त्याचप्रमाणें राष्ट्रांचा व जनांगांचा नाश होण्यास कारणीभूत झाल्या आहेत. अंतर्राष्ट्रीय प्रेमसंबंध बिघडण्यास या दुर्वासना कारणीभूत होतात. या वासनांचा नाश होणें किंवा विषयांचा विसर पडणें यांतच जगताचें कल्याण आहे.

**विषयीं विसर पडला निःशेष । अंगीं ब्रह्मरस उठावला ॥**
**माझी मज आली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ॥**
**लाभाचिया सोसें पुढें चाले मना । धनाचा कृपणा लोभ जैसा ॥**
**तुका म्हणे गंगा सागर संगमीं । अवघ्या जाल्या ऊर्मि एकमय ॥**

## ॥ गीत २२ ॥

बं.-कोथा छायार कोणे दांडिये तुमि किसेर प्रतीक्षाय ( इं. ४१ )

सर्वांमागें कोठें सांग लपलासी । मार्ग प्रतीक्षिसी कोणाचा तूं ॥
गणोनी न तूतें धूलीच्या पायांनीं । तुजसी लोटोनी जाती लोक ॥
पूजापात्रीं माझ्या कुसुमें घालोनी । बैसलें येवोनी तरुमूलीं ॥
जातां येतां माझीं पुष्पें नेति जन । झालें पुष्पहीन पूजापात्र ॥
गेला प्रातःकाल माध्यान्ह हि गेला । आतां प्राप्त झाला संध्याकाल ॥
अंधार पडतां नेत्र मिटतील । मजसी येईल घोर निद्रा ॥
जन सारे घरा जातां परतोनि । मजला पाहोनी हंसतील ॥
वाटे लज्जा मुख पल्लवें झांकोनी । जैसी भिकारिणी बैसलेंसे ॥
काय तूं वांछिसी विचारिति जन । तयांसी कथन काय करूं ॥
निरुत्तर येथें बैसलें श्रमित । नेत्र अवनत करूनीयां ॥
कैसें सांगूं जनां तुज मी वांछितें । मार्ग प्रतीक्षितें तुझा ऐसें ॥
लागलासे ध्यास तुझा रात्रंदिनीं । मज तूं येवोनी भेटशील ॥
राजैश्वर्य तुझें परि माझें दैन्य । करीन अर्पण तुझ्या पायीं ॥
सांगूं कैसें जनां अंतरींचें गुह्य । वियोग असह्य झाला मज ॥
तुझीया प्रेमाचा अभिमान मनीं । सदा अभागिनी वागवीन ॥
तृणासनीं येथें बैसोनी गगनीं । न्याहाळीतां मनीं भास झाला ॥
स्वप्नभास झाला, मजकडे येसी । प्रेमें भेटायासी ऐसा प्रभो ॥
यापरि विपूल सिद्धता करोनी । येसी कां धांवोनी अकस्मात ॥
तुझें सर्व तेज प्रदीप्त जाहालें । रथावरि हाले स्वर्णध्वज ॥
ऐकूं येती गोड आलाप वेणूचे । गोड संगीताचे तुझ्या संगें ॥
तुझीया प्रतापें वसुंधरा हाले । आनंदानें डोले प्राण माझा ॥
तुज पाहोनीयां चकित जहाले । तटस्थ राहिले जन पथीं ॥
आलासी तूं माझ्या सन्निध दो हातीं । उचलोनी रथीं घेसी मज ।
धूलींतुनी मज भूषणविहीना । कंगाल मलीना उचलीलें ॥
बैसाविलें वामभागीं तूं कृपाळा । मज भिक्षुकीला रथावरी ॥
गर्व सुख लज्जा यायोगें कंपित । झालें मी बहुत लतेपरि ॥
सकल विश्वाशीं तादात्म्य पावलें । आनंदें रंगलें पूर्ण चित्त ॥

**काल जात आहे परि न अजूनि । रथचक्रध्वनि ऐकूं येई ॥
असंख्यात लोक नित्य जाति थाटें । अंबरहि फाटे गर्जनेनें ॥
वैभवानें युक्त प्रचंड हे मेळे । किति तरि गेले आजवरि ॥
परि छायेमाजि सर्वांच्या मागून । उभा कां तूं मौन धरूनीयां ॥
भिक्षुकीचि लज्जा प्रक्षालाया येथें । नयन जलातें गाळावें का ॥
ठेविशील ऐसा का हा लज्जावेष । व्यर्थ का सायास तुझ्यासाठीं ॥१॥**

**भावार्थ**—माझ्या प्रियकरा ! तूं सर्वांमागें कोठें लपून बसला आहेस ? कोणाची वाट पाहतोस ? तुझी पर्वा न धरतां हे पहा लोक चालले आहेत. जातां जातां तुला आपल्या पायांनीं लोटूनहि देतात. मी तुझी पूजा करण्यासाठीं माझ्या पूजापात्रांत फुलें घेऊन वाट पहात बसलें आहें. येतां जातां लोकांनीं या पात्रांतून फुलें उचलून नेल्यामुळें तें रिकामें होत आलें आहे. हां हां म्हणतां सकाळची वेळ गेली. दोनप्रहरहि गेला आणि आतां संध्याकाळ प्राप्त झाला असून लवकरच माझे डोळे मिटतील आणि मी घोर निद्रेच्या ताब्यांत जाईन. लोक परत जातांना पाहून मला हांसतील. मी केवळ भिकारिणीप्रमाणें लज्जेनें माझें मुख झांकून बसलें आहें. लोक मला विचारतात, तूं मनांत कोणती इच्छा धरून येथें बसली आहेस ? मी त्यांनां काय सांगूं ? मी तुझी इच्छा धरून बसलें आहें आणि तुझी मार्ग-प्रतीक्षा करीत आहें असें कसें सांगूं ? मला रात्रंदिवस तुझा ध्यास लागला आहे. तुझी भेट होईलच होईल असें माझ्या मनाला खास वाटतें. तूं जरी अत्यंत वैभवयुक्त आहेस तरी माझें दैन्य मी तुला अर्पण करीन. हें अंतर्यामीचें गुह्य लोकांना सागूं तरी कसें ? तुझें माझ्यावर प्रेम आहे हा अभिमान मी बाळगीन.

या तृणावर बसून आकाशाकडे न्याहाळून पहातांच मला विलक्षण भास झाला. तूं मला भेटायाला येत आहेस असें मला दृश्य दिसत आहे. याप्रमाणें अकस्मात् सर्व प्रकारच्या सिद्धतेनें मजकडे तूं घाईघाईनें येत आहेस. तुझें सर्व तेज प्रदीप्त झालें आहे. तुझ्या रथावर सुवर्णाचीं निशाणें फडकत आहेत. तुझ्या संगें मधुर संगीताचे आलाप ऐकूं येत आहेत. आणि तुझ्या रथाच्या आगमनानें सर्व पृथ्वी डोलूं लागली आहे. हें सर्व पाहून माझा प्राण आनंदानें डोलत आहे. तुला पाहून सर्व लोक चकित झाले आहेत. मी चकित होऊन राहिल्या ठिकाणीं येऊन मला दोन्ही हातांनीं तुंवा उचलून घेतलें आणि कंगाल, मलीन अशा मला तुझ्या वाम-भागीं बसवून घेतलें. याप्रमाणें भूषणविहीन असतां मला भिकारिणीला तुंवा रथावर बसवून घेतल्यामुळें गर्व, सुख आणि लज्जा यांच्या योगानें मी लतेप्रमाणें थरथर

कांपूं लागलें. सर्व विश्वाशीं माझी तादात्मता झाली. आणि मी आनंदांत संपूर्ण बुडून गेलें. याप्रमाणें हा स्वप्नाभास झाला.

वेळ चाललीच आहे. परंतु अद्यापि तुझ्या रथाचा ध्वनि कानीं पडत नाहीं. असंख्य लोक तुझ्या नामाचा घोष करीत चालले आहेत. त्यायोगें आकाश दणाणून जात आहे. वैभवयुक्त असे अनेक मेळे चालले आहेत. परंतु तुझी कांहींकेल्या त्यांना किंवा मला भेट होत नाहीं. कोठें तरी छायेंत सर्वांच्या मागें तूं मौन धरून उभा राहिला आहेस. तुझी भेट होत नाहीं म्हणून येथें अश्रु गाळीत मी उभी राहूं का? तुझ्यासाठीं कितीहि मी सायास केले तरी व्यर्थ काय? हा माझा भिक्षुकीचा वेष आणि लज्जामय स्थिति अशीच राहणार आहे काय?

**रहस्य**--ज्याला परमेश्वराचा ध्यास लागला आहे, त्याचे भक्तीचे प्रकार आणि सामान्य जनांचे भक्तीचे प्रकार यांत महदंतर आहे. जपतप, पूजा, ध्यानधारणा, किंवा तीर्थाटण इत्यादि रूढ भक्तीच्या उपायांपासून त्यांच्या मनाला शांतता प्राप्त होणें शक्य नाहीं. नाम्यानें देवास सांगितलें कीं—

**तुझे पायीं माझ्या मनें दिली बुडी। इंद्रियें बापुडीं वेडावलीं॥**
**इंद्रियें विषय जाणावे कवणें। जाणोनि भोगणें कवणें स्वामी॥**
**देह सहजस्थिति पाहिलें निष्काम। हृदयीं सप्रेम वोसंडत॥**
**नामा म्हणे भक्तजनवत्सला। क्षण जीवावेगळा न करी मज॥**

याप्रमाणें ज्यांच्या मनाची वृत्ति ईश्वरमय झाली आहे त्यांना कधीं देवदर्शन घडल्याचा आणि कधीं तें चुकल्याचा भास होतो. कधीं आनंद, कधीं दुःख अशा प्रकारच्या स्थितींत दिवस कंठणारा भक्त सामान्य जनांच्या दृष्टीनें वेडा आणि ईशकृपेस अनधिकारी ठरतो. परंतु अशा अनन्य भावानें परमेश्वरचरणीं सर्व-समर्पण करून दरिद्री व मलीन वेषांत आयुष्य घालविणाऱ्या भक्ताच्या मुखावाटे अहर्निश उद्गार निघत असतात ते असेः—

**माझी गति कोण सांगे पंढरिनाथा। तारिसी अनाथा कीं बुडविसी॥**
**मनापासोनियां सांग मजप्रति। पुसें काकुलति जीवाचिया॥**
**कोणासी सांकडें घालावें हें सांग। नको करूं राग दीनावरि॥**
**बाळकासी जैसी एकलीच माय। तैसे तुझे पाय आम्हांलागीं॥**
**नामा म्हणे देवा अनाथाच्या नाथा। कृपाळुवा कांता रखुमाईच्या॥**

याप्रमाणें ज्यानें सर्व भार परमेश्वरावर घातला त्याला योगक्षेमाची काळजी को

असावी ? ईश्वरचरणाच्या लोभापुढें इतर लोभ तुच्छ मानणारा भक्त जगाच्या निंदास्तुतीची पर्वा धरीत नाहीं. यांत आश्चर्य कोणतें ?

परमात्मा आणि जीवात्मा यांचा संबंध प्रेमी स्त्री व पुरुष यांच्या प्रेमसंबंधाप्रमाणें मानिला आहे. श्रीकृष्ण आणि राधा यांच्याविषयींच्या काव्यांत हा प्रेमसंबंध ऐहिक दृष्ट्या परिणत स्थितींत वर्णिलेला आहे. जीवात्मा हा भक्त परमात्म्याशीं आपलें प्रेम जोडून आणि प्रेमाच्या योगानें त्याला वश करून घेण्यासाठीं आणि शेवटीं समरस होण्यासाठीं रात्रंदिवस यत्न करीत असतो. ध्यानीं मनीं भोजनीं शयनीं ईश्वरचिंतन चाललें असल्यामुळें स्वप्नांतदेखील त्याच्या आगमनाचा भास होऊन त्याच्या मुद्रेवर आनंदाचें हास्य विकसित होतें. हाच आनंद कायम टिकावा म्हणून तर त्याची खटपट असते.

सामान्य जनांस भक्ताच्या अंतःकरणांतील तळमळ समजत नाहीं म्हणून ते हंसत असतात. भक्ताची स्थिति प्रेमी स्त्रीच्या शब्दांत संतांनीं वर्णिलेली आहेः—

हरिनें माझें हरिलें चित्त । भार वित्त विसरलें ॥
आतां कैशी जाऊं घरा । नव्हे बरा लौकिक ॥
पारखी यांसी सांगतां गोष्टी । घरची कुटी खातील ॥
तुका म्हणे निवांत राहीं । पाहिलें पाहीं परतोनी ॥

व्यवहारदक्ष लोकांची देवसेवापद्धति व आस्था काम्य प्रकारची म्हणजे देव-घेवीच्या पद्धतीची असते. देवालयांची स्थापना, त्यांतील पूजाअर्चा व उत्सव वगैरे करणारे खऱ्या भक्तांहून श्रेष्ठ आहेत असें नाहीं. भक्तापाशीं दैन्य हेंच भांडवल असतें म्हणून ते म्हणतात—

भेटीची आवडी उतावीळ मन । लागलेसें ध्यान जीवीं जीवा ॥
नेत्र उन्मळित राहिले ताटस्त । गंगा अश्रुपात वहावली ॥

तुकोबासारखे भक्त देवापाशीं मागतात ती एकच गोष्ट म्हणजे त्याची भेट, त्याचें दर्शन आणि त्याची कृपा. यांची प्राप्ति झाली म्हणजे सर्व कांहीं मिळालें.

मी तंव बैसलों धरूनियां ध्यास । न करीं उदास पांडुरंगा ॥
नको मज आतां दवडूं श्रीहरि । मागाया भिकारी जालों दास ॥
भुकेलों कृपेच्या वचनाकारणें । आशा नारायणें पुरवावी ॥
तुका म्हणे येऊनीयां देईं भेटी । कुरवाळुनी पोटीं धरीं मज ॥१॥

## ॥ गीत २३ ॥

बं—राजेंद्र राव हाते काल अंतहीन ( इं. ८२ )

देवा तुझ्या हातीं अंतहीन काल । गणना करील कोण त्याची ॥
दिन रात्री वर्षें युग मन्वंतरें । पुष्पांपरि भरें येती जाती ॥
विलंब न तुज नाहीं तुज त्वरा । प्रतीक्षा तूं पूरा करूं जाणें ॥
शतावधि वर्षें पुष्पकलिकेतें । आणूं पूर्णत्वातें, धीर तुज ॥
परि धीर आम्हां नसे नाहीं काल । सदा धांवपळ चाललीसे ॥
लाभेल तो काल साधायासि आम्हीं । करितों नेहेमीं घडपड ॥
अशक्य आम्हांसी विलंब कराया । वेळ दवडाया नाहीं हातीं ॥
सहवास ज्यांचा घडतो मजला । तयांच्या सेवेला काल जाई ॥
सारा जन्म ऐसा निरर्थक जाई । पूजापात्रीं नाहीं पूजाद्रव्य ॥
नाहीं केली सेवा केलें न चिंतन । आत्मसमर्पण नाहीं केलें ॥
अकालीं निघालों तुझ्या दर्शनासी । आलों मी द्वाराशीं भीत भीत ॥
उघडें का द्वार असेल या वेळीं । संशय हा पोळी अंतर्यामीं ॥
परि दैवें आहे अजूनी समय । तुझे दिव्य पाय सेवावया ॥

**भावार्थ**—परमेश्वरा, तुझ्या स्वाधीन अनंत काल आहे. ज्याप्रमाणें फुलें विकसित होतात आणि कोमेजून जातात त्याप्रमाणें असंख्य दिवस व रात्री, वर्षें व युगें येतात आणि जातात. तरी तुला कांहीं घाई करण्याचें कारण नाहीं. तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं व्यवस्थित आणि सावकाश चाललें आहे. शेंकडों वर्षांचा काल एकादें फूल पूर्णत्वास आणण्यासाठीं तूं घालविशील. याप्रमाणें स्वस्थपणें सावकाश काम करायाला आम्हाला धीर नाहीं म्हणून आमची एकसारखी धांव-पळ चालली आहे. आधीं माझें आयुष्य थोडें. त्यांतहि या प्रपंचांत ज्यांचा मी सहवास करून राहिलों आहें त्यांची सेवा करण्यांत सर्व काल जातो. याप्रमाणें सर्व जन्म व्यर्थ जात असून तुझी सेवा करायाला वेळ मिळत नाहीं. तुझ्या चरणांवर मजला अद्यापि वाहून घेतलें नाहीं. याप्रमाणें मजकडून प्रमाद घडल्या-मुळें तुझ्या दर्शनाला मी फार उशीरां निघालों आहें. संध्याकाळ झाल्यामुळें तुझ्या मंदिराचा दरवाजा बंद होईल कीं काय या भीतीनें मी भीत भीत तुझ्या द्वाराशीं येत आहें. परंतु ( भिण्याचें कारण दिसत नाहीं ) कारण मी तुझ्या

द्वाराशीं उशिरां आलों आहें तथापि तें खुलें असून तुझी भेट घेण्यास अद्यापि अवकाश आहे.

**रहस्य**—विश्वाचा संसार आणि मानवी संसार यांत कालाच्या मापानें मोजल्यास किती तरी अंतर आहे असें दिसून येईल. विश्वाचा संसार अनादि कालापासून चालला आहे. तो अनंत कालापर्यंत चालणार आहे. त्या संसाराचीं सूत्रें चालविणारा परमेश्वर अतर्क्य रीतीनें कारभार चालवीत असतो. युगांवर युगें लोटलीं, तथापि या जगत्संसारांतील कार्य अव्याहत चालू आहे. आणि तें अशाच रीतीनें या पुढेंहि चालू राहील. परंतु अल्पायुषी मानवाचा संसार क्षणभंगुर आहे. असें असूनहि त्यांत तो इतका गुंतलेला असतो कीं त्याला आत्मोद्धार करण्यास आठवण होत नाहीं. ऐहिक व्यवहारांत आपल्या आप्तेष्टांसाठीं चूर होऊन राबणाऱ्या मानवाला तारुण्यावस्था जाऊन आयुष्याचा संध्याकाल म्हणजे वृद्धावस्था प्राप्त होईपर्यंत प्रभूची आठवण होत नाहीं. तो जाणत नाहीं कीं—

**क्षणक्षणां देहीं आयुष्य हें काटे । वासना हे वाटे नित्य नवी ।**
**माझें मी म्हणतां गेले नेणों किति । रंक चक्रवर्ति असंख्यात ॥**
**देह जाय तोवरि अभिमान । न करी अज्ञान आत्महित ॥**

तुकोबांनीं नामदेवाप्रमाणें याच आशयाचे उद्गार काढले आहेतः—

**क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥**
**नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ।**
**संत समागमीं धरोनी आवडी । करावी तांतडी परमार्थी ॥**
**तुका म्हणे इहलोकींच्या वेव्हारें । नये डोळे धुरे भरूनि राहों ॥**

वृद्धावस्थेंत सर्व गात्रें शिथिल होऊन व्यवहार बंद पडल्यावर तरी ईश्वरचिंतन करण्यासाठीं अनन्य भक्तीनें परमेश्वरास शरण जाणारा त्याच्या कृपेस पात्र होतो. त्याच्या द्वारीं जाण्यास त्याला मोकळीक असते. तेव्हां देवसेवेचा काल निघून गेला असें मानण्याचें कारण नाहीं. केव्हांहि त्याच्या कृपेची याचना करण्यास हरकत नाहीं. विश्वनाथाच्या ( विश्व- )मंदिराचें द्वार सदोदित उघडें आहे.

---

## ॥ गीत २४॥

बं.—रूप सागरे डुब दियेछि—( इं. १०० )

अरूप रत्नाची आशा धरूनीयां । रूपसागरीं या बुडतों मी ॥
जीर्ण झाली नौका पुरे नौकायान । स्थानाहूनि स्थान यान नको ॥
तरंगाचे ठायीं नाव नाचायाचे । दिवस मजेचे गेले आतां ॥
उत्सुक सांप्रत अमृतोदधींत । अमरत्वा आंत मरण्याला ॥
नित्य जेथ चाले स्वरहीन गान । तळीं सभास्थान गांठीन तें ॥
अंत्य गायनाचे सगद्गद स्वर । निघतां मधुर वीणेतूनी ॥
निःशब्दाचे पायीं मूक वीणावाद्य । ठेवीन हें साध्य जीविताचें ॥

**भावार्थ**—रूपसमुद्राच्या तळीं मी बुड्या घेत असतों. मला त्या वेळीं वाटतें कीं अरूप असें अत्यंत उज्ज्वल रत्न माझ्या हातीं लागेल. आतां ही माझी नौका जीर्ण झाली. हिच्यांतून बंदरोबंदरीं प्रवास करणें शक्य नाहीं. महासागरावरील लाटांवर मजेनें नाचावयाचे दिवस आतां गेले. आतां अमृताच्याठायीं मृत होण्याची मला हौस वाटत आहे. या अमृतोदधीच्या बुडाशीं जें भगवतांचें सभास्थान आहे तेथें जाऊन सद्गदित अंतःकरणानें तेथें चालणाऱ्या निःशब्द गानांत माझ्या गानाच्या ताना मिळवीन. हेंच माझें जीविताचें साध्य आहे.

**रहस्य**—ज्ञानमार्गी होऊन निर्गुणोपासना करणें संसारी जनांस फार कठीण वाटतें. म्हणून सगुणोपासनेच्या द्वारानें ईश्वरभक्तीचें सौख्य अनुभवण्यास या जगांतील बहुजन समाज झटत असतो. परंतु जगांतील प्रचलित धर्मीयांचे भक्तिप्रकार पाहिले म्हणजे बहुधा काम्य आहेत असेंच दिसून येतें. त्यांतहि सगुणोपासनेच्या मार्गानें ईश्वरसेवा करणारे निर्गुणोपासनेचें अत्युच्च ध्येय साध्य करून घेण्यास क्वचित् समर्थ होतात. परमेश्वराचें विश्वमयरूप व विश्वव्यापित्व मूर्तीच्या आकारांत समाविष्ट केल्यामुळें उपासनेचें स्वरूप देखील बदलून जाऊन उपासकाची दृष्टि संकुचित क्षेत्रांत वावरूं लागते. सगुणोपासक देवदर्शनासाठीं अनेक तीर्थांच्या व क्षेत्रांच्या स्थानीं जाऊन उपास्य दैवतापुढें आपलें मस्तक नमवितात. परंतु या प्रकारच्या भक्तीच्या प्रकारामुळें ईश्वरावरील श्रद्धा किंचित् दृढ होत असली तरी मानवीबुद्धीच्या अंतिम ध्येयाहून हा भक्तीचा प्रकार केव्हांहि खालच्या दर्जाचा आहे असें कबूल करावें लागेल. निष्काम प्रेम, निरिच्छ ईश्वरी सेवा आणि ईश्वराचें विश्वव्यापित्व यांचा साक्षात्कार होण्याला

ज्ञानयुक्त निर्गुणोपासना आचरली पाहिजे. आराध्य देवतांच्या मूर्तीच्या पलीकडे आणि विश्वाच्याहि पलीकडे जी अवर्णनीय आणि वाणीनें वर्णन करण्याचा प्रयत्न केला असतां जेथें शब्द निःशब्दता पावतात ती मूर्ति मनानें आकलन करण्याचा शक्य तो यत्न केला पाहिजे.

ही कायानौका बळकट असेपर्यंत जेथें तेथें जाऊन भगवंत मानलेल्या मूर्तींचें दर्शन घेणें शक्य आहे. परंतु काया जीर्ण झाली म्हणजे एका स्थानाहून दुसऱ्या स्थानीं प्रवास करीत राहणें शक्य नाहीं. अशा वेळीं ज्ञानमार्गानें जाऊन ब्रह्मस्वरूपाची ओळख करून घेणें हा उत्कृष्ट मार्ग आहे. याप्रमाणें ब्रह्मस्वरूपाची ओळख पटल्यावर सगुणोपासनेंतील सगुण मूर्तीच्या पलीकडे दृष्टि पोंहचून मनास अत्यानंद प्राप्त होतो. विठोबाचे उपासक तुकोबा यांचा अनुभव तसा आहे.

अंतरींची ज्योती प्रकाशली दीप्ति । मुळींचीं जे होती आच्छादिली ॥
तेथींचा आनंद ब्रह्मांडीं न माये । उपमेशीं काये देऊं सुखा ।
भावाचें मथिलें निर्गुण संचलें । तें हें उभें केलें विटेवरि ।
तुका म्हणे आम्हा ब्रह्मांड पंढरी । प्रेमाची जे थोरी सांठवण ॥१॥

या प्रकारची मनःस्थिति होतांच

चिंतनें अचिंत राहिलों निश्चळ । तेचि किती काल वाढवावे ॥
अबोल्याचा काल आतां ऐशावरी । वचनाची उरी उरली नाहीं ॥
करूं आला तो तो केला लवलाहो । उरोच संदेहो दिला नाहीं ॥
तुका म्हणे मोह परतेचिना मागें । म्हणुउनि त्यागें त्याग केला ॥

---

## ॥ गीत २५ ॥

बं.–गान दिये हे तोमाय खुंजि बाहिर मने ( इं. १०१ )

गानाच्या योगानें आलों मी चालत । तुजला शोधीत जन्मोजन्मीं ॥
हिंडलों मी गान गात घरोघरीं । द्वाराहुनी द्वारीं बहुकाल ॥
गान रूपि हातें स्पर्शिलें भुवन । केलें संशोधन गानद्वारें ॥
ज्ञान आजवरी मज जें लाभलें । पथ जे देखीले गूढ ऐसे ॥
हृद्य-गगनीं तारे जे उदेले । प्रगट जाहाले गानें सर्व ॥
सुखदुःख याचें रहस्य जाणिलें । गानें आकळीलें गूढ त्यांचें ॥

**झाली संध्यावेळ प्रवास संपला । कवण्या द्वाराला आलों गात ॥**
**तुझीया कंठींची रम्य पुष्पमाला । माझ्या हृदयाला स्पर्शोना का ? ॥**

**भावार्थ**—माझे अनेक जन्म झाले. या जन्मांमध्यें केवल तुझें गीत गात आणि तुला शोधीत मी हिंडत आहें. अनेक गृहांमध्यें आणि द्वारांत मी प्रवेश करीत आलों. त्यावेळींही मी गीत गातच हिंडलों आहें. गानाच्या योगानें विश्वाशीं माझा स्पर्श घडला. माझें अंतर्बाह्य शोधन त्यायोगें झालें. मला ज्ञानप्राप्ति होऊन, जगाचें गूढ कळून यायाला हें गानच कारण झालें आहे. हृदयाकाशांत तेजःपुंज ताऱ्यांचा प्रकाश पडण्याला किंवा सुखदुःखाचें रहस्य समजण्याला या गानाचा उपयोग झाला. या प्रमाणें गीत गात गात माझा प्रवास चालला असून तो बंद पडण्याचा समय आला आहे. संध्याकाल झाला. अहा ! मी फिरत फिरत आणि गीत गात कोणत्या (राजमंदिराच्या) द्वाराशीं येऊन पोहोंचलों बरें ! प्रभो ! तूं प्रेमालिंगन देऊन माझा स्वीकार करशील काय ?

**रहस्य**—सर्व धर्मांचे अनुयायी ईशस्तवन गीताच्या द्वारें करतात. परमेश्वराच्या विश्वरचनेंत गीत, ताल व सुस्वर यांची नियमबद्धता सर्वत्र दृष्टीस पडते. ही जाणण्यास या विश्वाचें रहस्य जाणलें पाहिजे. अत्यंत प्राचीन काळीं मनुष्य प्राण्यानें प्रथमतः ईशस्तवन केलें तें वेदांतील गीतांनीं. त्यानंतर अनेक धर्म संस्थापक व साधुसंत ईश्वराचा शोध करीत हिंडले. त्यांनीं देखील गीताच्या मदतीनें ईश्वरीप्रेमाचें आकलन करण्याचा यत्न केला. याचें कारण संतांनींच निवेदलें आहे तें असें—

**गायनाचे रंगीं । शक्ति अद्भुत हे अंगीं ।**
**हें तों देणें तुमचें देवा । घ्यावी अखंडित सेवा ।**
**अंगीं प्रेमाचें भरतें । नाहीं उतार चढतें ॥**
**तुका म्हणे वाणी । परम अमृताची खाणी ॥**

दुसऱ्या दृष्टीनें पाहिलें तरी आमचें जीवित म्हणजेच एक गीत आहे. तें सुसंगीत झाल्यास हें जीवित सुखावह होऊन अंत कालीं कलेवर टाकतांना ईश्वरस्मरण होईल आणि जीवाचा उद्धार होईल. या गानांतील स्वर बेताल व बेसूर झाल्यास सुखाच्या ऐवजीं दुःख भोगणें प्राप्त होईल. ही स्थिति सर्वस्वीं सुधारणें, सुख तेवढें प्राप्त करून घेणें आणि दुःखाचा प्रसंग संपूर्ण टाळणें जरी सर्वस्वीं आपल्या हातीं नाहीं तथापि या गीताचें ( म्हणजे जीविताचें ) महत्व जाणून

शक्य तितकें तें तालसुरांत गाइल्यास आनंदाचा अंश विशेषें करून प्राप्त होईल. काबाडकष्ट करणारा मजूर गीतांच्या द्वारानें आपले श्रम विसरूं शकतो. दारोदार हिंडून निर्वाहापुरतें अन्न मिळविणारा दीन दरिद्री मनुष्य गीताच्या द्वारानें स्वतःचें दैन्य विसरूं शकतो. व्यथेनें विव्हल झालेला बालक मातेच्या प्रेमळ गीतांच्या योगानें व्यथा विसरतो. याप्रमाणें ईश्वराच्या ठायीं पूर्ण दृष्टि ठेऊन सर्व कार्यें करीत असतां गीत गात राबणाऱ्या मजूराप्रमाणें किंवा ईश्वरस्तुति करीत हिंडणाऱ्या भिकाऱ्याप्रमाणें आपलें अंतःकरण आनंदित ठेविल्यास संसारांतील दैन्य, कष्ट व दुःखें हीं आनंददायक वाटतील. निदान त्यांचें शल्य टोंचणार नाहीं. दुःखरूपी अंधःकारानें व्यापलेल्या हृदयामध्यें तारांचा उदय होऊन शांतिसौख्याचा प्रकाश उपजेल. विश्वाचें रहस्य कळून येईल आणि जीवितसाफल्य होईल. या साफल्याची खूण म्हटली म्हणजे अंतकाळीं ईश्वरस्मरण होणें आणि त्याच्या सन्मुख राहिल्याचा भास होऊन मन आनंदित होणें ही आहे. अशी स्थिति प्राप्त झाल्यावर

धवळलें जगदाकार । आंधार तो निरसला ॥
लपों जातां नाहीं ठाव । प्रगट पाहें पसारा ॥
खरियाचा दिवस आला । वाढी बोला न पुरे ॥

तुकाराम.

# ॥ चतुर्थ खंड ॥

# ईश्वरी साक्षात्कार.

यतः प्रसूता जगतः प्रसूती तोयेन जीवान्
व्यच संर्ज्य भूम्याम् । यदोषधीभिः पुरुषान् पशूंश्च
विवेश भूतानि चराचराणि ॥
अतः परं नान्यदणीय संहि परात्परंयन्महतो महत्तम् ।
यदेकमव्यक्तमनंतरूपं विश्वं पुराणं तमसः परस्तात् ॥

॥ तैत्तिरीयारण्यक ॥

**अर्थ**—ज्याच्या योगें जगताची उत्पत्ति झाली आहे, ज्यानें जलचर, वनस्पति, मनुष्य व पश्वादिक यांस निर्मिलें आणि चराचार भूतांमध्यें जो व्यापक आहे त्याहून श्रेष्ठ, महतांमध्यें महत्, एक, अव्यक्त, अनंत, विश्वरूप, अनादि आणि अज्ञानांधःकाराच्या पलीकडचा तो आहे.

तमीश्वराणां परमं महेश्वरं तं देवतानां परमं च दैवतम् ॥
पतिं पतीनां परमं परस्ताद् विदाम देवं भुवनेशमीड्यम् ॥
यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै ॥
तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥

श्वेताश्वतर उपनिषद् ॥

**अर्थ**—जो ईश्वराचाहि महेश्वर आहे, देवतांचाहि जो परम दैवत, स्वामींचाहि स्वामी, मायेच्या पलीकडचा, जगन्नियंता, आणि स्तुति करण्याला योग्य अशा परमेश्वराला जाणलें पाहिजे.

ज्यानें जगदुत्पत्ति करणाऱ्या ब्रह्मालाहि निर्मिलें, ज्याच्याकडून त्याला ज्ञानाची प्रेरणा झाली, त्या जीवांच्या बुद्धीला प्रेरणा करणाऱ्या ईश्वराला मुमुक्षूनें शरण जावें.

अभंग—

आर्त भूताप्रति । उत्तम योजाव्या त्या शक्ति ॥
फळ आणि समाधान । तेथें उत्तम कारण ॥
अल्पें तो संतोषी । स्थळीं सांपडे उद्देसीं ॥
सहज संगम । तुका म्हणे तो उत्तम ॥

## ॥ गीत २६ ॥

बं.—तखन करिनि नाथ कोनो आयोजन ( इं ४३ )

नव्हतों मी सिद्ध स्वागत कराया । त्या दिनीं तूं राया पातलासी ॥
केलासी अंतरीं प्रवेश अज्ञात । संतोषें हंसत शुभदिनीं ॥
आलासी सामान्य जनाचीये परि । राजमुद्रा करीं धरोनियां ॥
माझ्या जीविताचे अनेक प्रसंग । मुद्रांकित चांग केलेसी तूं ॥
क्षणिक प्रसंगां दिधली शाश्वती । थोर तुझी शक्ति विश्वराजा ॥
दैवयोगें आजी गवसला लेख । त्यावरी सुरेख सही शिक्का ॥
स्मृतिबाह्य तुच्छ माझ्या जीविताचे । आनंद दुःखाचे जे प्रसंग ॥
धुळींत तयांची स्मृति मिसळली । सनद लाभली तेथ तुझी ॥
नाथा नको जाऊं अवज्ञा करोनी । जा माझें पाहोनी क्रीडागृह ॥
क्रीडागृह असे संपूर्ण धूळीचें । स्तूपहि तयाचे धूळीमय ॥
कधीं खेळामाजी तुझा चरणध्वनि । आला माझ्या कानीं नृपनाथा ॥
तोचि ध्वनि मज ऐकूं येत आजी । चंद्रसूर्यांमाजी तारकांत ॥
चरण वाजती वाजे तयांसवें । संगित बरवें जगताचें ॥

**भावार्थ**—ज्या दिवशीं तूं माझ्या येथें आलास त्या दिवशीं तुझें स्वागत करण्याची माझी तयारी नव्हती. तथापि मला नकळत माझ्या अंतर्यामीं तूं प्रवेश केलास. माझ्या आयुष्यक्रमांत अनेक प्रकारचे बरे वाईट प्रसंग आल्यावेळीं तुझ्या कृपेचा लाभ मला मिळाला. यामुळें क्षणिक आणि क्षुल्लक अशा प्रसंगांची मला उत्तम आठवण राहिली आहे. ज्या गोष्टी मी विसरून गेलों होतों त्यांची मला आज आठवण होऊन त्या वेळीं तुझ्या कृपेच्या योगानें मी पार पडल्याचें माझ्या लक्षांत येतें. माझा खेळ या मृत्तिकेच्या गृहांत ( देहांत ) चालला आहे. हा खेळ खेळत असतां कधीं कधीं तुझ्या चरणाचा ध्वनि कानीं पडे. तोच ध्वनि आज या विश्वांतील आकाशांगणीं तुझें गमन होत असतां ऐकूं येत आहे. आणि या विश्वाचें सुसंगीत जीवन तुझ्या सर्वत्र संचारामुळेंच चाललें आहे. तरी कृपा करून माझ्या अंतःकरणाच्या ठायीं प्रवेश कर. माझी निराशा करूं नको.

**रहस्य**—प्रापंचिक व्यवहार चालल्यावेळीं अनेकदां इतके बिकट प्रसंग प्राप्त होतात कीं त्यांतून पार पडणें फार दुर्घट दिसतें. अशावेळीं आपल्या कल्पने-

बाहेर या प्रसंगांतून बाहेर पडण्यास मार्ग तयार होतो आणि कष्टाचें निरसन होतें. संकट प्राप्त झाल्यावेळची मनाची उद्विग्नता आणि त्याचें निरसन झाल्यावेळचा विजयानंद यांत आम्हाला संकट कां आलें आणि कां गेलें याचा विचार करण्यालाहि अवधि नसतो. परंतु अशा प्रकारचे सुखदुःखाचे प्रसंग आपल्या जीवनक्रमांत वारंवार आले म्हणजे त्यांच्याविषयीं आपल्या मनांत कुतूहल उत्पन्न होऊन या प्रसंगांतून आपण कसे पार पडलों याचें नवल वाटतें. आणि स्वतःच्या शक्तीविषयींचा दुरभिमान गळून जाऊन जेव्हां नेत्रांवरील धुंदी उतरते तेव्हां ईश्वरकृपेमुळेंच आपण सर्व दुःखमय प्रसंगांतून निभावलों हें सत्य मनास पटतें. स्वतःच्या सामर्थ्याबद्दल गुप्त अभिमान अंतर्यामीं असल्यामुळें आपणास प्राप्त झालेलें यश स्वतःच्या कर्तबगारीचें फल आहे असें वाटून ईशकृपेची विस्मृति पडते. परंतु कालेंकरून बुद्धि पक्क झाली आणि गत कालाविषयीं विचार केला तर कित्येक प्रसंग आणि त्यांचें अनुकूल पर्यवसान यांचें खरें कारण सांगतां येत नाहीं. परमेश्वरकृपेनें आपण सर्व संकटांतून पार पडलों असें वाटून ईश्वराविषयींची भक्ति आणि कृतज्ञता यांची वाढ होते. सर्वत्र त्याचेंच कार्य चाललें आहे याचा प्रत्यय येतो. ईश्वराचें अस्तित्व सर्वत्र भासतें. आपण या देहाचा दुरभिमान व लोभ धरून त्याच्या सेवेंतच काल घालविला याबद्दल मनास वाईट वाटतें. प्रारंभापासून ईश्वराविषयीं प्रेम, श्रद्धा आणि दृढनिष्ठा ठेवणारांस त्याच्या कृपेचा अनुभव पावलोपावलीं येतो.

देव सखा जरी । जग अवघें कृपा करी ॥
ऐसा असोनी अनुभव । कासावीस होतो जीव ॥

याप्रमाणें ईश्वराचा साक्षात्कार सर्व स्थिरचर सृष्टींत होतांच मनाला शांति आणि सुख यांचा लाभ होतो.

जेथें जेथें जासी । तेथें मजचि तूं पाहसी ।
ऐसा पसरीन भाव । रिता नाहीं कोणी ठाव ।
चित्त जडलें पायीं । पाळती हें ठायीं ठायीं ।
तुका म्हणे पोटीं । देव घालोनि सांगे गोष्टी ॥

## ॥ गीत २७ ॥

बं.—आमार एई पथ चावातेई आनन्द ( इं० ४४ )

प्रकाशाच्या मार्गें छाया धांवे जेथ । पर्जन्य धांवत ग्रीष्मापाठीं ॥
तेथ मार्गीं एका ठायींच बैसोनी । पाहतों नयनीं कौतुक मी ॥
ऐशापरि खेळ पहात बैसतां । आनंद मच्चित्ता वाटतसे ॥
अविज्ञात नभप्रदेशींचे दूत । सांगती अद्भुत वर्तमान ॥
मजसी वदोनी वेगें ते जातांना । पाहुनी तयांना तोष होय ॥
शीतल वायूच्या श्वासाचा सुगंध । देतसे आल्हाद मना मोठा ॥
प्रभातापासोनी संध्याकालवरी । बैसोनीयां द्वारीं पाहें वाट ॥
अकस्मात माझ्या दृष्टीसी पडेल । सुयोग येईल जाणतों मी ॥
तोंवरी या ठायीं एकटा बैसोनी । हांसोनी गाऊनी आहें सुखी ॥
माझी इच्छा पूर्ण व्हायाचें लक्षण । दावी वायु खूण सुगंधाची ॥

**भावार्थ**—या विश्वाच्या ठिकाणीं दिवसामागें रात्र, ग्रीष्मकालाच्या मागें पावसाळा असा हा क्रम चालूच आहे. मी स्वस्थ बसून हें कौतुक पहात आहें. त्यायोगें मनाला आनंद होतो. अशा स्थितींत जणूं स्वर्गावरील दूतांनीं येऊन वर्तमान सांगावें त्याप्रमाणें अनेक विचारतरंग मनांत उत्पन्न होऊन मन आनंदित होतें. शीतल व सुगंधित वायूमुळें मनास आल्हाद प्राप्त होतो आणि माझ्या अंतःकरणाची तळमळ तृप्त होईल अशी आशा दिसते. ( ही आशा म्हटली म्हणजे परमात्म्याचें दर्शन घडून मी आनंदसागरीं बुडून जाणें हें आहे ) म्हणून मी अशा ठिकाणीं गात आणि हांसत खेळत काल कंठीत आहें. सर्व वातावरण जणूं सुगंधित झालें आहे असा मला भास होत आहे. हें शुभ चिन्ह होय.

**रहस्य**—दिवस रात्र, ऋतूंचें आगमन व गमन, इत्यादि या विश्वांत चालणाऱ्या सृष्टिक्रिया पाहून त्यांचें रहस्य जाणल्यानें मनाला आनंद होतो. हें दृश्यच असें आहे कीं त्यापासून आल्हाद उत्पन्न झाल्याविना रहात नाहीं. सर्व सौंदर्य, सर्व प्रेम, सर्व प्रकारचा आनंद यांस अधिष्ठान असलेलें परमेश्वराचें रूप या सृष्टींतील प्रचंड घडामोडींच्या अंतर्यामीं दृग्गोचर होत असून या रूपाचें आकलन करण्याविषयीं जसजसा यत्न करावा तसतसा अधिकाधिक आनंद होतो. रूप, रस, गंध, गान यांचा प्रेमसंयोग या सृष्टिरचनेंत झाला असून त्यांचा योग्य प्रकारें लाभ घेणें आणि त्यांयोगें ईश्वराचें प्रेम जाणणें हा भक्तीचा खरा प्रकार

आहे. या भक्तीच्या मार्गांत जे शिरले त्यांस ईशदर्शन घडल्यावांचून रहात नाहीं. म्हणून संतांनीं सांगितलें आहे कीं—

**आनंदाचा कंद गाइयेला गीतीं । पाहियेला चित्तीं देवराव ॥**
**देवराव तोही आहे निश्चयेसी । अखंड नामासी बोलवितो ॥**
**बोलवितो मज कृपा तो करूनी । तुका म्हणे मनीं बरा भाव ॥**

याप्रमाणें ज्यांचें आयुष्य जातें त्यांनीं या जगांत येऊन काय सार्थक केलें हा प्रश्न उपस्थित होतो.

या प्रश्नाचा उलगडा करण्यापूर्वी जन्मसाफल्य म्हणजे काय याचाच उलगडा करावा लागेल. ज्याप्रमाणें योद्धा, कवि, लेखक, कलापटु, तत्त्वज्ञानी, शास्त्रीय शोधक, वगैरे निरनिराळ्या प्रकारचीं मानवी उन्नतीस कारणीभूत होण्याजोगीं कार्यें करणारांची या जगाला आवश्यकता आहे तशीच धर्मनिष्ठ लोकांचीहि गरज आहे. कित्येक धर्मविचारक व धार्मिक वृत्तीचे लोक प्रत्यक्षतः लोकसमाजांत मिळून मिसळून वागतात आणि त्यांच्या सद्वर्तनाचा परिणाम जनतेच्या आचरणावर होतो. आधिभौतिक सुधारणा कळसास गेली तरी तिची पूर्णता होऊन तिला उज्ज्वलता प्राप्त होण्यास आध्यात्मिक व नैतिक तेजाची झिलई पाहिजे आहे. ही झिलई अशा धर्मात्म्यांच्या जीवितचारित्र्यामुळें प्राप्त होते आणि समाज समतोल वृत्तीनें वागून प्रगतीच्या मार्गांत क्रमण करतो. अशा प्रकारें आध्यात्मिक मार्गानें जाऊन जन्मसाफल्य करणारांचा देखील सामान्य जनतेशीं संबंध येतो तो असाः—

**धर्माचें पाळण । करणें पाखांड खंडण ।**
**हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥**
**तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेउनि बाण फिरें ॥**
**नाहीं भीड भार । तुका म्हणे साना थोर ॥**

---

## ॥ गीत २८ ॥

बं.—तोरा शुनिस् नि कि शुनिस् नि तार पायेर ध्वनि ( ई. ४५ )

**तुझा चरणध्वनि नित्य ये कानासी । येसी तूं मजसी येसी सत्य ॥**
**घटि पल दिन रात्री युगें जाती । पाउलें वाजती तुझीं नित्य ॥**
**मन माने तैसें गातां गानांतूनि । निघे एक ध्वनि येसी येसी ॥**

**फाल्गुनीं वनाच्या मार्गें तूं मजसी । देवराया येसी सत्य सत्य ॥**
**कधीं मेघरथीं बैसोनीयां येसी । वेगें श्रावणमासीं अंधःकारीं ॥**
**दुःखांवरि घोर दुःखें आपटति । पाउलें वाजती तदा तुझीं ॥**
**हृदयाशीं होता तुझा पादस्पर्श । लोहासी परीस तैसें होई ॥**
**येतोसी तूं देवा सत्त्य नित्य येसी । प्रेमें तूं मजसीं सर्व काळ ॥ १ ॥**

**भावार्थ**—परमेश्वरा, तुझ्या पावलांची चाहूल नित्य माझ्या कानीं पडत आहे. तूं माझ्यापाशीं खचित येत आहेस. सदैव तूं मजकडे येतच आहेस असें माझ्या मनाला खात्रीपूर्वक वाटतें. प्रत्येक क्षणीं, प्रत्येक दिवशीं आणि रात्री इतकेंच नव्हे तर प्रत्येक युगीं तूं मजपाशीं येत असल्याचा मला भास होतो. वर्षाकालीं आणि वर्षाकालानंतरहि तुझें आगमन होतच आहे. अर्थात् फाल्गुनोत्सवाच्या आनंदाच्या कालीं आणि अंधःकार, मेघगर्जना व पाऊस यांच्यामुळें अत्यंत भयानक झालेल्या श्रावणमासांतील रात्रींच्या समयीं तुझी कृपा आणि तुझी भेट मला लाभते. दुःखाचें दडपण पडून जीव व्याकुळ होतो त्यावेळीं तुझ्या आगमनाचा शब्द कानीं पडतांच अंतःकरणांत आशा उद्भवते. तुझा चरणस्पर्श होतांच अंतःकरणाचा मळ जाऊन तें उज्ज्वल होतें. याप्रमाणें हजारों युगें मी जन्म घेत आहें. या सर्व जन्मांच्या अवस्थांमध्यें तुझा वरद हस्त मजवर असून मजला तुझ्या कृपेचा अनुभव प्राप्त होत आहे.

**रहस्य**—भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें कीं

**अनन्यश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥**

जे अनन्य भावानें परमेश्वराची उपासना करतात आणि जे भगवंताशीं नित्य अभियुक्त आहेत म्हणजे ज्यांचीं सर्व कार्यें ईश्वराप्रीत्यर्थ होत असून ज्यांचें चित्त भगवताशीं संलग्न आहे त्यांचा योगक्षेम चालविण्याचा भार परमेश्वरावरच आहे. अशा प्रकारें कार्य चालविणारा प्रापंचिक असला तरी त्याचा प्रपंचच देवकार्याप्रमाणें पवित्र होतो.

**करी धंदा परि आवडति पाय । प्रीती सांगों काय नेणों देवा ॥**
**रूप डोळां देखें सदा सर्व काळ । संपादितों आळ प्रपंचाचा ॥**
**नेमून ठेविली काया हे कारणीं । आमुचिये वाणी गुण वदे ॥**

उसंतितों पंथ वेठीचिया परि । जीवनसूत्र दोरीपाशीं ओढ ॥
तुका म्हणे ऐसें करितों निर्वाण । जीव तुम्हां भिन्न नाहीं माझा ॥

याप्रमाणें सर्व प्रपंचकार्य करीत असतां ज्याचें चित्त ईशचरणीं रत असतें त्यास प्रत्येक क्षणीं परमेश्वर आपणाकडे येत आहे असें वाटल्यास नवल नाहीं. सर्व संकटांचें निरसन करून योगक्षेम चालविणारा भगवंत आपला पाठीराखा आहे ही भावना ज्यांच्यांत जागृत आहे त्यांस भगवंताच्या दर्शनाबद्दल उत्सुकता असते. परंतु मनीषा सफल होत नाहीं म्हणून दुःखहि वाटतें.

तुम्ही तों सदैव । अधीरपणें माझी हांव ।
जळो आशेचें तें जिणें । टोंकतसों दीनपणें ।
येथून सोडवा । आतां अनुभवेंसी देवा ॥
तुका म्हणे जालें । एक मग हें निमालें ॥

एकंदर जगताचा खटाटोप लक्षांत घेतला तरी असेंच दिसून येतें कीं, मनुष्य-प्राण्याचा प्रयत्न ईश्वराचें सान्निध्य प्राप्त करून घेण्यासाठीं आहे. आपल्या बुद्धि-सामर्थ्यानें अनेक शोध लावून सृष्टींतील पंचमहाभूतें जिंकावीं आणि अध्यात्मिक ज्ञानाच्या बलावर विश्वव्यापी महत्‌शक्तीचें रहस्य व ज्ञान मिळवावें म्हणून मनुष्य-प्राण्याचा यत्न चालला आहे, आणि परमेश्वर आपल्या सन्निध पोहोंचला आहे असेंहि त्यास गर्वानें वाटूं लागलें आहे. अर्थात् अनेक युगांपासून पूर्णावस्थेस जाण्यासाठीं आणि ईश्वर–शक्तीची ओळख करून घेण्यासाठीं चाललेली मनुष्याची धडपड यशस्वी झाल्यावांचून राहणार नाहीं.

---

## ॥ गीत २९ ॥

बं.—आमार मिलन लागि तुमि ( इं. ४६ )

न जाणें कितीक झालीं युगांतरें । भेटायासि हरे येसी मज ॥
माझ्या दृष्टिआड कराया तुजसी । शशि सूर्य यांसी न सामर्थ्य ॥
प्रातःसंध्याकाळीं किति वेळ कानीं । तव चरणध्वनि येत असे ॥
तुझा दूत माझ्या हृदयीं येवोनी । गुप्तपणें कानीं म्हणे येईं ॥

न कळे आजी कां आलें हें स्फुरण । झाला सर्व प्राण हर्षयुक्त ॥
माझ्या अंतर्यामीं आनंदाचा भास । होतसे उल्हास अनावर ॥
वाटे मज आतां काल हा पातला । कार्य समाप्तीला लागावें म्यां ॥
तुझ्या सान्निध्याचा मधुर सुवास । वायु शरीरास माखीतसे ॥

**भावार्थ**—भगवंता, तूं अनेक युगांपासून मला भेटण्यासाठीं येत आहेस. सकाळ संध्याकाळ तुझ्या आगमनाचा मला भास होतो. तुझें परंधाम गांठावें म्हणून अनेकदां माझ्या अंतःकरणाच्या ठायीं इच्छा उद्भवते. जणूं काय तुझाच दूत मला आमंत्रण देत आहे असें मला वाटतें. आज तर माझ्या अंगीं स्फुरण आल्याप्रमाणें झालें आहे. आनंद आणि उल्हास यांहीं अंतःकरण भरून आलें असून तूं अगदींच माझ्या सान्निध्यांत येऊन पोहोंचला आहेस असें मला वाटूं लागलें आहे. आतां सर्व कार्य आटपून बसावें असेंच वाटतें.

**रहस्य**—भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें कीं

बहुनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥

अनेक जन्माच्या ठिकाणीं ज्ञान प्राप्त करून घेत घेत शेवटीं जेव्हां संपूर्ण आत्मज्ञान होतें तेव्हांच मनुष्याला हें सर्व विश्व म्हणजे परमेश्वराचें स्वरूप आहे असें कळूं लागतें. याप्रमाणें विश्वाच्या ठायीं विश्वात्म्याचें स्वरूप पहाणारा महात्मा क्वचितच सांपडतो. अर्थात् ईश्वराचें दर्शन होण्याला आत्मज्ञानाचें संपूर्ण आकलन झालें पाहिजे. अनेक जन्मजन्मांतरींची आवड आणि अभ्यास यांच्या पूर्व संचितामुळें ज्ञानाचा लाभ होतो. याप्रमाणें जेव्हां ज्ञानप्राप्ति होते तेव्हां ईश्वराचा साक्षात्कार झाल्याचा क्षणोक्षणीं भास होतो. अंतःकरणाच्या ठायीं आनंद उल्हास वगैरे विकारांचा उमाळा येतो. या वृत्तीचें वर्णन तुकोबांनीं केलें आहे तें अनुभवसिद्ध व यथार्थ आहे.

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण । अंतरींची खूण पावूनीयां ॥
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मिलित । कंठ सद्गदित रोमांच आले ॥
चित्त चाकाटलें स्वरूपामाझारी । न निघे बाहेरी सुखावलों ॥
सुनीळ प्रकाश उदेजला दिन । अमृताचें पान जीवनकळा ॥
शशिसूर्या जाली जीवें ओंवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ॥
तुका म्हणे सुखें प्रेमेसीं डुलत । विरालों निश्चित निश्चितेनें ॥

ही ईश्वराशीं योगयुक्त होण्याची स्थिति सामान्य जनांस साधणार नाहीं. ज्यांनीं आपलें मन ईश्वरास अर्पण केलें आहे, ज्यांचे सर्व व्यवहार ईश्वराप्रीत्यर्थ चालतात त्यांसच ईश्वरी साक्षात्काराचा अनुभव येतो; आणि ईश्वराची प्रत्यक्ष भेट झाल्याचा आनंद त्यांस प्राप्त होतो.

**बहुतां दिसांची आजी झाली भेटी । जालि होती तुटी काळगति ॥**
**बहुदिस होता सांडिला मारग । क्लेशाचा हा त्याग आजि झाला ॥**
**तुका म्हणे जेथें जालें अवसान । परमानंदीं मन विसावलें ॥**

याप्रमाणें परमानंदांत मन रमल्यावर इहलोकीं करण्याजोगें कार्य शिल्लक न राहतां त्याची समाप्ति झाली असें वाटल्यास आश्चर्य नाहीं.

---

## ॥ गीत ३० ॥

बं.—पथ चेये काटल निशि. ( इं. ४७ )

**वाट मी पहातां सारी रात्र गेली । नाहीं परि झाली भेट त्याची ॥**
**येईल प्रभातीं असतां निद्रित । द्वारीं अकस्मात भय वाटे ॥**
**वन छायेमाजी गृह माझें असे । हें तो जाणतसे प्रभु माझा ॥**
**सुहृदांनो ठेवा उघडोनि द्वार । तया प्रतिकार नका करूं ॥**
**त्याच्या चरणांचा ध्वनि मी ऐकोनी । जरि निद्रेंतूनि न उठलों ॥**
**तरि निद्राभंग नका करूं ऐसें । तुम्हा प्रार्थितसें आण माझी ॥**
**विहंगमशब्दें जागा निद्रेंतूनि । व्हावें ऐसें मनीं नाहीं माझ्या ॥**
**किंवा प्रातःकालीं प्रभामहोत्सवीं । निद्रा माझी जावी नसे इच्छा ॥**
**जागृत न व्हावें वायुगर्जनेनें । किंवा सुवासानें बकुळीच्या ॥**
**जरी निकेतनीं माझा स्वामी आला । घेऊं दे मजला निद्रासुख ॥**
**माझी ही गभीर अचेतना सारी । जाईल सत्वरीं त्याच्या स्पर्शें ॥**
**निद्रेच्या आवेश जातां मन्नयन । तयाचें दर्शन घेतील कीं ॥**
**सन्मुख तो माझ्या रहातां येवोनी । पूर्ण सुखस्वप्नीं पहुडेन ॥**
**सकौतुक हास्य माझ्या मुखावरी । पडेल तो द्वारीं नाथ येतां ॥**
**सकल प्रभेच्या आधीं तत्प्रकाश । माझ्या नयनास चेतवील ॥**
**प्रभातीं तयाचें रूप अप्रतिम । मजसी प्रथम जागवील ॥**

त्याचीया प्रथम स्पर्शे माझें चित्त । जडेल खचित रूपीं त्याच्या ॥
तयाच्या चेतनाभरें माझें चित्त । होईल कंपित हर्षयोगें ॥
जाग्रत मी होतां माझ्या अंतरांत । व्हावा तो जाग्रत तत्कालचि ॥

**भावार्थ**—माझ्या आयुष्याच्या रात्रीच्या कालीं ( म्हणजे अज्ञानावस्थेंत असतांना ) तुझी वाट पहातां पहातां आयुष्य संपत आलें. परंतु भेट कांहीं झाली नाहीं. आतां रात्र जाऊन प्रभात होण्याचा समय आला. ( अर्थात् ज्ञान-किरणांचा प्रकाश अंतःकरणाच्या ठायीं पडण्याच्या वेळीं ) तो अकस्मात् माझ्या द्वाराशीं येऊन उभा राहील आणि माझी निद्रा न संपल्यामुळें ( अज्ञानाची धुंदी न उतरल्यामुळें ) त्याचें दर्शन घडणार नाहीं म्हणून मला भीति वाटते. परंतु मित्रांनों, जरी माझी त्याची गांठ पडली नाहीं तरी हरकत नाहीं. तुम्ही त्याच्या-साठीं द्वार उघडून ठेवा आणि त्याला येऊं द्या. माझा निद्राभंगहि करूं नका. मला निद्रासुख पूर्णपणें भोगूं द्या. माझी निद्रा त्याच्याच स्पर्शानें दूर व्हावी हें उत्तम. आणि या निद्रेचा भ्रम गेल्यावर सहजच मला त्याचें दर्शन घडेल. तो माझ्या सन्मुख येतांच सुखस्वप्नांतील आनंद मला प्राप्त होईल. त्याच्या सुहा-स्याची प्रभा माझ्या मुखावर पडून माझे नेत्र खुलतील. त्याचें अप्रतिम रूप प्रथमतः माझ्या दृष्टीस पडेल आणि त्याचा स्पर्श होतांच माझें चित्त त्याच्या स्वरूपीं जडून हर्षानें माझे रोमांच उभे राहतील. मी जागा होणें म्हणजे तो माझ्या अंतर्यामीं जागृत होणें अर्थात् माझी जाग्रति म्हणजे अंतर्यामीं आत्मजा-ग्रति असें होवो. किंवा मी जागा होतांच त्याच्यांत लीन व्हावें हीच माझी इच्छा आहे.

**रहस्य**—जोंपर्यंत आपल्या अंगीं अज्ञान आहे तोंपर्यंत ईश्वराचा साक्षात्कार होणें शक्य नाहीं. परंतु कधीं कधीं असें वाटतें कीं, अज्ञान पतकरलें परंतु विप-रीत ज्ञान नको. ईश्वरी साक्षात्कार म्हणजे या चर्मचक्षूंनीं अपाणिपाद् अशा परब्रह्म-स्वरूपास पाहणें नव्हे. हें दृश्य आजवर कोणासहि प्राप्त झालें नाहीं. साक्षात्कार याचा अर्थ परमेश्वराचें अस्तित्व, कार्य आणि शक्ति अखिल विश्वामध्यें पाहणें आणि जाणणें आहे. जगांत अनेक धर्म आणि प्रत्येक धर्मांत अनेक पंथ प्रचलित होऊन त्यांचे अनुयायी कांहीं ठरीव मार्गानें ईश्वरप्राप्ति करून घेण्याचा यत्न करतात. हा मार्ग सांप्रदायिक असतो. ज्यांची वृत्ति संप्रदायाच्या पलीकडची आहे आणि ज्यांस प्रचलित मार्गांपासून मनाला स्वास्थ्य मिळत नाहीं ते श्रद्धा-

पूर्वक ईश्वरकृपेची वाट पहात बसतात. ही कृपा प्राप्त झाली म्हणजे आपोआप अज्ञानाचा नाश होईल, ज्ञानाच्या प्रकाशानें अंतःकरण तेजःपुंज होऊन आत्म-जाग्रति झाल्यावांचून राहणार नाहीं असें त्यांस वाटतें. याप्रमाणें जीवात्म्यास परमात्मस्वरूपाची ओळख झाल्यावर

**लवण मेळवितां झालें । काय उरलें निराळें ॥**
**तैसा समरस जालें । तुजमाजी हरपलें ॥**
**अग्नि कर्पुराचे मेळीं । काय उरली काजळी ॥**
**तुका म्हणे होती । तुझी माझी एक जोति ॥**

याप्रमाणें मनाची वृत्ति झाली म्हणजे असाच अनुभव येईल कीं—

**तुज मज नाहीं भेद । केला सहज विनोद ।**
**तूं माझा आकार । मीं तो तूंच निर्धार ।**
**मी तुजमाजी देवा । घेसी माझ्या अंगें सेवा ।**
**मी तुजमाजी अचल । मजमाजी तूं सबळ ।**
**तूं बोलसी माझ्या मुखें । मी तों तुजमाजी सुखें ।**
**तुका म्हणे देवा । विपरीत ठायीं नांवा ॥**

ईश्वराचा साक्षात्कार होण्यासाठीं जी मनाची स्थिति असावी लागते ती प्राप्त करून घेणें हेंच महत्वाचें आहे.

**देहभाव प्राण जाय । तेव्हां हें धैर्य सुख होय ।**
**तया निद्रे जे निजले । भावजाग्रति नाहीं आले ।**
**ऐशी विश्रांति लाधली । आनंद कळा संचारली ।**
**तेथें सर्वांग सुखी झालें । लिंग देह विसरलें ।**
**त्या एकीं एक होतां । दासी जनी नाहीं आतां ॥**

तेव्हां ईश्वरापाशीं मागावयाचें तें हेंच कीं—

**करीं ऐसें जागें । वेळोवेळा पायां लागें ॥**
**प्रेम झोंबे कंठीं । देह धरणीये लोटी ॥**
**राहे लोकाचार । पडे अवघा विसर ।**
**तुका म्हणे ध्यावें । तुज व्यभिचार भावें ॥**

## ॥ गीत ३१ ॥

वं.—तखन आकाशतले ढेउ तुले छे ( इं. ४८ )

उठती प्रभातीं पक्षिगानलहरी । शांतीच्या सागरीं नभातळीं ॥
मार्गीं दोहींकडे असे पुष्पभार । नयनमनोहर अतिरम्य ॥
मेघपंक्तिठायीं होते नानावर्ण । हेमप्रभापूर्ण विलसत ॥
सुंदर हें दृश्य नाहीं म्यां लेखीलें । चित्त लीन झालें कार्यामाजी ॥
सुखें बैसोनीयां गान न गाईलें । खेळ न खेळले आजवरि ॥
कार्यावरि पूर्ण दृष्टि ठेवियेली । नाहीं वळविली कोणीकडे ॥
व्यवहारासाठीं पेठेंत न गेलों । न कधीं हांसलों बोललों ही ॥
अमित वेगानें मार्ग आक्रमीला । थारा न पाउलां जाई काल ॥
माध्याह्नीं पातला रवि पेकूं येत । कपोतकूजित छायेमाजी ॥
तप्त वायुमाजी भ्रमण करोनि । शुष्कपर्णें उडुनी पडताति ॥
वटवृक्षातळीं गोपालक बाल । झाले निद्राकुल तये वेळीं ॥
नदीकाठीं श्याम तृणासनावरि । बैसलों दुपारीं श्रमित मी ॥
तिरस्कारें माझे सोंगडी हांसती । गर्वें चालताति पुढें पुढें ॥
मागें न पाहातां विश्रांतीवांचोनी । गेले हे चालोनी मार्ग पुढें ॥
जाहाले अदृश्य पथ आक्रमीतां । गेले तरुलतांमागें दूर ॥
असंख्य कुरणें नग ओलांडोनी । दूर देशांतूनी जाती वेगें ॥
ऐसे कष्ट दुःख सहन करीत । मार्ग हे क्रमीत जाती वेगें ॥
धन्य धन्य तुम्ही दुःखाचे प्रवासी । तुम्हां सकलांसी धन्य असो ॥
लज्जा वाटे मज पाहोनी तयांतें । परि उठायातें नसे मन ॥
विहंगमगान मुरलीचा ध्वनि । पडतां श्रवणीं हर्ष झाला ॥
कंपित तरूंच्या पल्लवांचा शब्द । देत मना मोद अतिशय ॥
यापरि आनंदीं जाहालों मी मग्न । गौरवविहीन जरि झालों ॥
वसुंधरेवरि तनु पसरिली । वंशवृक्षातळीं सावलींत ॥
छाया या तरूंची नेत्रमुखावरि । सुनर्तन करी कौतुकानें ॥
मधुमक्षिकांचा चाले गुंजारव । प्याया आम्रासव उत्सुक त्या ॥
तप्तकालीं जीवा मिळाली विश्रांति । कैसा आलों पथीं विसरलों ॥
छाया गंध गान यांयोगें चेतना । प्राप्त झाली प्राणा आनंदलों ॥

**शेवटीं मी घोर निद्रेमाजी दोन्ही । नेत्र उघडोनी देखीयेलें ॥**
**माझी अचेतना झांकोनी हास्यानें । उभा तूं प्रेमानें शिरोभागीं ॥**
**तदा मज वाटे पथ न उरला । प्रवास सरला सर्व आतां ॥**
**सदा सर्वकाळ असावें जाग्रत । यापरी वाटत होतें पूर्वी ॥**
**संध्याकालाआधीं नदी ओलांडोनी । न जातां जन्मोनी व्यर्थ सारें ॥**
**ऐसें म्यां भावीलें वाटे मना भीति । सेवाया विश्रांति जन्मवरि ॥**
**परि तुझी भेट होता हा प्रवास । आला पूर्णत्वास अवचित ॥**

**भावार्थ**—मी कांहीं सोबत्यांबरोबर प्रवासास निघालों. प्रवासास आरंभ करतेवेळीं प्रातःकाल होता. पक्षी गात होते. जिकडे तिकडे फुलें विकसित झालीं होतीं. परंतु या गोष्टींकडे आमचें बिलकूल लक्ष नव्हतें. गीत गाणें, खेळ खेळणें किंवा ग्रामांतील लोकांशीं व्यवहार उद्योग करणें या गोष्टी आम्ही केल्या नाहींत. हंसणें किंवा इतर परीनें आनंदानें काल घालविणें यांकडे लक्ष न देतां आम्ही एकसारखा आमचा प्रवास चालविला.

माध्यान्हकाल आला. पारवे छायेंत बसून घुमूं लागले. उष्ण वाऱ्याच्या लकेरीबरोबर पिकलींवाळलीं पानें जिकडे तिकडे उडूं लागलीं. गुराख्यांचीं पोरें श्रमामुळें वडाच्या झाडाच्या सावलींत झोपीं जाऊन स्वप्नसृष्टींत मग्न झालीं. मलाहि अति श्रम झाल्यामुळें माझा प्रवास मी बंद केला आणि झऱ्याच्या कांठीं पडलों. तेथें गवतावर मी माझे हात पाय पसरले.

माझी ही स्थिति पाहून माझे सोबती हंसूं लागले. त्यांनीं आपला प्रवास चालू ठेवला. विश्रांतीशिवाय रानांवनांतून ते पुढें गेले. अनेक देशांतून त्यांचा हा प्रवास एकसारखा चालू राहिला. ते दृष्टिआड झाले. खरोखर हे प्रवासी धन्य खरे. त्यांनीं माझी निंदा केली. माझा उपहास केला. यामुळें माझ्या अंतःकरणांत चेव उत्पन्न झाला. मला वाटलें कीं आतां उठावें आणि प्रवास चालू करावा; ( किंबहुना त्यांना मागें टाकावें ) परंतु माझ्यानें उठवेना. मी खजील झालों. माझें जिणें व्यर्थ आहे असें मला वाटून मी लज्जित होऊन पडून राहिलों.

या स्थितींत असतां माझ्या मनाला भोंवतालच्या पक्षांच्या गानाच्या योगानें, व छायामय देखाव्यामुळें आनंद झाला. माझ्या श्रमाचा परिहार होऊन या ठिकाणीं मी कसा व कां आलों, एवढा प्रवास तरी कां केला हेंच विसरलों. माझें भान हरपलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सरतेशेवटीं मी झोपेंत असतांनाच माझे डोळे उघडून पाहतों तर, परमेश्वरा, तूंच माझ्या शिरोभागीं उभा असून माझी निद्रा दूर करीत आहेस आणि आपल्या मधुर हास्यानें माझी अचेतना दूर दवडीत आहेस असें दिसलें. संध्याकाल होण्या-पूर्वी नदी ओलांडून जाऊं कसा अशी मला काळजी लागली होती. तुझी भेट न घेतां गेलों तर सारा जन्मच व्यर्थ गेल्याप्रमाणें होईल अशी मला भीति वाटत होती. परंतु तुझी कृपा झाली. तुझी भेट झाली. आतां माझा प्रवास राहिला नाहीं. त्याची पूर्णता आणि सांगता झाली.

**रहस्य**—कैक युगांपासून मनुष्याचा प्रवास ईश्वरशोधार्थ चालला असून तो नवीन किंवा रुळलेल्या मार्गानें त्याजकडे जाण्याचा यत्न करीत आहे. पृथ्वीच्या तलावर भिन्नभिन्न धर्मांचे व भावनांचे लोक ईश्वरप्राप्तीची मनीषा धरून रात्रं-दिवस धर्मपथानें प्रवास करतात. ईश्वरप्राप्तीचा खरा धर्ममार्ग सर्वांस समजत नाहीं. तो सोपा व सरळ आहे असेंहि त्यांस वाटत नाहीं.

**चणे खावे लोखंडाचे । तई ब्रह्मपदीं नाचे ॥**

या उक्तीप्रमाणें ब्रह्माचें स्थान गांठणें बहुतेक अशक्य आहे असें साधुसंतांनीं देखील सांगितलें आहे. परंतु त्याच वेळीं एकांतिन् भक्ति, विश्वप्रेम, भूतदया इत्यादि उपायांनीं ईश्वराची कृपा संपादितां येते असें साधुजनांनीं स्वोदाहरणानें सिद्ध केलें आहे, त्याकडे लक्ष देणें अत्यावश्यक आहे.

सार्वलौकिक, सर्व कालीं अनुकूल आणि सर्वांगपरिपूर्ण असून जात, धर्मपंथ किंवा देश यांच्या भिन्नत्वामुळें सत्स्वरूपापासून न ढळणारा जो खरा आणि श्रेष्ठतम धर्म तो आज प्रचलित नाहीं. जे वैयक्तिक ओजस्वितेमुळें अनेक धर्म-पंथ, विधि आणि संस्कार अस्तित्वांत आले ते कांहीं व्यक्तींबद्दल समाजांत असलेल्या आदरबुद्धीमुळें टिकून राहिले आहेत. याचा परिणाम असा झाला आहे कीं ईश्वरचिंतनाच्या, सेवेच्या आणि ईश्वराला जाणण्याच्या प्रकारांसंबंधानें मतभेद दृष्टीस पडतो. या मतभेदाचा परिणाम, कलह, रक्तपात, निंदा, उपहास आणि शत्रुत्व अशा परीनें व्यक्त होतो. धर्म आणि परमेश्वर या अत्यंत पवित्र बाबींत अशा प्रकारचा अनर्थकारक परिणाम घडण्यास कारण तरी काय ?

**मार्ग चुकले विदेशीं एकले । तयावरि झाले दिशाभुली ॥**

अशा प्रकारें अपरिचित देशांमध्यें मार्ग चुकणारांची जी गति होते तीच या धर्मांच्या नांवाखालीं अधर्मानें वागणारांची आहे. विधिनियमांच्या जाळ्यांत

सांपडून, तीर्थयात्रा, व्रतोपोषणें यांच्या योगानें ईश्वरी कृपा प्राप्त करून घेणारांची शेवटीं निराशा होते आणि त्यांवर थकून भागून पडून राहण्याची पाळी येते.

**जेथें देखे तेथें उभा । अवघ्या गगनाचा गाभा ।**
**डोळां बैसलें बैसलें । ध्यान राहोनी संचलें ॥**
**सरसावलें मन । केले सोज्ज्वल लोचन ।**
**तुका म्हणे सवें । आतां असिजेत देवें ॥**

या प्रकारच्या मनाच्या शांत वृत्तीनें विश्वास व्यापून असलेल्या ईश्वरास जाणण्याचा प्रयत्न केल्यास तो आपल्या जवळच उभा आहे असा अनुभव येईल.

**देव कैंचा तया दुरी । भाकी बरी करुणा ।**
**आळविल्या नलगे धीर । माय जाणें रे भातुकें ।**
**नावेवरी ज्याचा भार । पैल पार जवळीं त्या ॥**
**आतां परदेशी तुका । जाला लोकांवेगळा ॥**

याप्रमाणें लोकांवेगळा होऊन, ईश्वराची अंतःकरणपूर्वक करुणा भाकणारा एकांतिन् भक्त त्याच्या कृपेस पात्र होतो. विलंब नसतां मातेप्रमाणें भातुकें देणारा भगवंत सदा तत्पर आहे. तोच नावेवर बसवून भवसागराच्या परतीरास सुरक्षित रीतीनें नेणारा सुकर्णधार आहे.

---

## ॥ गीत ३२ ॥

बं.—जे थाय थाके सबार अधम दीनेर (इं. १०)

**वसति ज्या ठायीं दीनार्त पतित । विराजति तेथ चरण तुझे ॥**
**सर्वांमागें सर्वांतळीं तूं असती । सदैव वससी दीनांमाजी ॥**
**तुझीया चरणीं प्रणाम करीतां । तुज भगवंता न पावे तो ॥**
**अवमानितांच्या तळीं तुझे पाय । नच शिर होय नम्र तेथें ॥**
**भूषणविहीन वेष हा घेऊन । दीन नारायण हिंडसी तूं ॥**
**नम्र नच होई तंव माझें शिर । घोर अहंकार आड येई ॥**
**नसे ज्या सौंगडी इष्ट मित्र नसे । तयां लाभतसे संग तुझा ॥**

**भावार्थ**—ज्या ठिकाणीं दीन दरिद्री व कष्टानें गांजलेले लोक असतात तेथेंच तूं उभा आहेस. सर्वांच्या मागें आणि सर्वांच्या खालीं तुझा वास आहे. या

जगामध्यें ज्यांना कोणी विचारीत नाहीं आणि ज्यांचा सदैव अपमान होतो अशांच्या सान्निध्यांत तूं उभा असल्यामुळें त्या ठिकाणीं अहंकारामुळें आमचें शिर नम्र होत नाहीं. अर्थात् आमचा नमस्कार तुला पोहोंचणें शक्य नाहीं. भूषणावांचून दीन दरिद्री जनांच्या वेषांत, हे नारायणा, तूं सदैव हिंडत आहेस. ज्यांना सोबती नाहीं त्यांना तूं सोबती होतोस.

**रहस्य**—परमेश्वर दयाळू आणि दीनदुबळ्यांचा कैवारी आहे असें सर्व धर्म सांगत आले आहेत. परमेश्वराप्रीत्यर्थ अज्ञानामुळें होणारे कित्येक विधि क्रूरपणाचे असतात; तथापि देवास निर्दय आहे असें हे विधि पाळणारेहि मानीत नाहींत. भक्तानीं भगवंतास " अनाथांचा नाथ" या शब्दांनीं आळविलें आहे.

**अनाथ परदेशी हीन दीन भोळे । उगलेंचि लोळे तुझे रंगीं ॥**
**आपुलें म्हणावें मज नुपेक्षावें । प्रेमसुख द्यावें मायबापा ॥** तुका ॥

याप्रमाणें परमेश्वराला मायबाप समजून त्याच्या कृपेवर विसंबून राहणाऱ्या दीन, हीन, अनाथ परदेशी लोकांमध्यें त्याचें अधिष्ठान आहे. त्या अर्थी परमेश्वर चरणीं वंदन करणें म्हणजे दीनदुबळ्यांत त्यांच्या बरोबरीचा होऊन राबणाऱ्या भगवंताच्या चरणीं शिर वांकविणें आहे. दुरभिमानामुळें हें शिर इतकें नम्र होत नाहीं.

**अहंकार तो नासी भेद । जगीं निंद्य ओंवळा ।**
**करवितो आत्महत्त्या । नेदी सत्त्या आतळों ॥** तुका ॥

हा अहंभाव नसता तर स्पृश्यास्पृश्याचें पिशाच्च समाजांत वावरलें नसतें. सामाजिक, आर्थिक व धार्मिक सत्तेखालीं आपल्या बांधवांस चिरडून टाकण्याची बुद्धि उत्पन्न होण्यास हा अहंभावच कारणीभूत आहे. त्याच प्रमाणें एक जनांग दुसऱ्या जनांगावर सर्व प्रकारची सत्ता चालवून पराजितांच्या वांट्यास दैन्य आणि आपल्या वांट्यास वैभव प्राप्त करून घेण्याचा यत्न करतें यास कारण अहंपणाच आहे.

**जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥**

या तुकोबाच्या उक्तींत सांगितल्याप्रमाणें दीनदुबळ्या व हीन लोकांमध्यें राबणाऱ्यास देवाचें दर्शन घडतें. तेथेंच देवाचें वासस्थान आहे.

## ॥ गीत ३३ ॥

बं.—भजन पूजन साधन आराधना ( इं. ११ )

पुरे आराधना भजन पूजन । पुरे हें साधन सोडीं सारें ॥
एकांतीं बैसोनी येथें अंधकारीं । काय देवागारीं करिसी तूं ॥
मन या अंधारीं लपवूनि कोणा । पूजिसी शहाण्या गुप्तपणें ॥
नेत्र उघडोनी सन्मुख तूं पाहीं । देव येथ नाहीं मंदिरीं या ॥
जेथ दीन जन मृत्तिका भरती । भूमि नांगरिती कृषिवल ॥
फोडोनी दगड रचितसे पथ । कामगार जेथ वर्षभरी ॥
तेथ वृष्टीकालीं प्रखर उन्हांत । भिजत तापत देव राबे ॥
हात पाय वस्त्रें धुलीनें भरलीं । तयापरि धूलीमाजी जा तूं ॥
शुचिर्भूत तुझीं वसनें टाकोनी । येई दीन जनीं देवासाठीं ॥
मुक्ति मुक्ति ऐसें काय गर्जितोसी । कोठें पहातोसी मुक्ति दावीं ॥
स्वामीनें आमुच्या सृष्टीचें बंधन । स्वयें स्वीकारोन विश्व केलें ॥
ध्यान दे सोडोनी पुष्पकरंडक । फेंकीं हो सेवक दीनासम ॥
प्रावणें मलीन जीर्ण अंगीं लेई । दीनांसवें होई एकजीव ॥
श्रमित त्यांसंगें करीं भवकर्म । वाहूं दे कीं घाम अंगांतूनि ॥

**भावार्थ**—या देवालयाच्या एका अंधःकारमय कोपऱ्यांत बसून तूं काय करीत आहेस ? तुझी गुप्तपणें कोणाची पूजा चालली आहे ? डोळे उघडून पहा. तुझ्या समोर देव तरी आहे का ? पुरे कर तुझें भजन पूजन, ध्यान-धारणा, आणि आराधना. देव कोठें आहे हें तुला सांगतों ऐक. ज्या ठिकाणीं दीन दुबळे लोक पोटासाठीं मजूरीचीं कामें करतात, जेथें ते माती भरतात, दगड फोडून रस्ते तयार करतात आणि पावसांत आणि उन्हांत काबाडकष्ट करतात तेथें देवहि त्यांच्याबरोबर राबत आहे. मजूरांप्रमाणें त्याचेहि कपडे धूलीनें मलीन झाले आहेत. तेथें तूं जा. तुझ्या ( अहंभाव—द्योतक ह्या ) भपकेदार पोषाखाचा त्याग करून दीन लोकांत जा. तेथें तुला देवाचें दर्शन घडेल. “देवा मला मुक्ति दे ” अशी तूं रात्रंदिवस करुणा भाकीत आहेस. मोक्षासाठीं तुझी धडपड चालली आहे. परंतु मी तुला विचारतों मुक्ति कोठें आहे दाखव. ज्याच्या पाशीं तूं मुक्ति मागतोस त्या परमेश्वरानेंच या सृष्टीचा संसार रचला असून तो रात्रंदिवस या

संसारांत गढून गेला आहे. तेव्हां तुला सांगतों, ही पूजा पुरे कर. ध्यानधारणेचा उपद्यापाद्दि सोडून दे आणि दीन हीन जनांशीं एकजीव होऊन त्यांच्या संगें काबाडकष्ट करीत जा म्हणजे तुला परमेश्वराची प्राप्ति होईल.

**रहस्य**—या जगांत देवालयांची स्थापना होण्यास परमेश्वरभक्ति कारणीभूत झाली. या देवालयांतील उपासना मूर्तींच्या द्वारें चालो किंवा इतर साधनांच्या योगानें चालो. या उपासनेच्या द्वारें ईश्वरकृपा प्राप्त करून घ्यावी, जन्म मरणाची बाधा चुकवून मोक्षस्थान गांठावें असें भाविकास वाटतें. म्हणून जप तप ध्यान धारणादिक उपाय कमी अधिक प्रमाणानें सर्व धर्मांच्या लोकांत प्रचलित असून देवाचें वसतिस्थान म्हटलें म्हणजे देवालय, देवखोली किंवा देव्हारा आहे अशी सामान्यपणें बहुजन समाजाची चुकीची समजूत आहे. नेत्र मिटून ध्यानाच्या योगानें ईशप्राप्ति करून घेण्याचा मार्ग खरा नसून या विश्वाकडे पूर्णपणें पाहून त्यांतील रहस्य, सौंदर्य, नियमबद्धता, दयाळुत्व आणि स्नेहाकर्षण समजून घेतल्यानेंच विश्वनाथाची ओळख पटणार आहे.

**विश्वीं विश्वंभर । बोले वेदांतींचा सार ॥**
**जगीं जगदीश । शास्त्रें वदति सावकाश ॥**
**व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जति पुराणें ॥**
**जनीं जनार्दन । संत बोलति वचन ॥**
**सूर्याचिया परि । तुका लोकीं क्रीडा करी ॥**

याप्रमाणें विश्वात्म्यास विश्वांतच हुडकलें पाहिजे. कृमिकीटकांदिकांपासून एकंदर स्थिरचर सृष्टीचें पालनपोषण करणारा परमेश्वर दीनांचा कैवारी आहे असें सर्व धर्म, सर्व साधुसंत व सज्जन सांगत आले आहेत. तुकोबांनीं सांतगिलें आहे कीं—

**देव मजूर देव मजूर । नाहीं उजूर सेवेपुढें ॥**
**देव गांवढळ देव गांवढळ । देखोनियां बळ लपतसे ॥**
**देव तर काई देव तर काई । तुका म्हणे राई तरि मोठी ॥**

अर्थात् देव मजूर आहे. तो गांवढळाप्रमाणें दीन पद्धतीनें राहणारा आणि राई इतका लहान म्हणजे क्षुद्रतम लोकांमध्यें वागणारा, त्यांच्या संगें मोलमजूरी करणारा, निर्बल ( म्हणून घातपातादि मार्ग ज्याला मान्य नाहींत असा ) आहे. याप्रकारच्या दरिद्र-नारायणामध्यें श्रीनारायणाचा सदैव वास आहे.

मुक्तीच्या वेड्या कल्पना डोक्यांत घेऊन कर्मत्याग करूं नये. प्रापंचिक कर्तव्य कर्म व्यवस्थित रीतीनें केल्यानें ईश्वराचेंच कार्य केल्याप्रमाणें होतें. कारण हा जगाचा संसार त्याचाच असून आपला संसार या महत्संसाराचा एक भाग आहे. मुक्तीची खरी व्याख्या पुढीलप्रमाणें समजावी.

**मुक्त तो आशंका नाहीं जया अंगीं । बद्ध मोहोसंगीं लज्जा चिंता ॥**
**सुख पावे शांति धरूनि एकांत । दुःखी तो लोकांत दंभ करी ॥**
**तुका म्हणे लागे थोडाच विचार । परि हे प्रकार नागविती ॥**

---

## ॥ गीत ३४ ॥

बं.—तुमि तबे एस नाथ बस शुभ क्षणे—

**शुभ क्षणिं प्रेमें नाथा तूं आलासी । आणि बैसलासी सिंहासनीं ॥**
**विश्वाकार मोठें दिव्य सिंहासन । देह आणि मन यांहीं केलें ॥**
**अखिल जगता तुंवां व्यापियेलें । शून्य न राहिलें कोठें स्थान ॥**
**पुष्पवाटिकेंत सागरीं काननीं । देहीं अंतःकरणीं वास तुझा ॥**
**जनांमाजि तेवीं निर्जन प्रदेशीं । सदैव वससि स्वामीराया ॥**
**ज्योत्स्नामय शांतियुक्त निशाकालीं । मूर्ति विराजलि तुझी दिव्य ॥**
**आनंदीं विषादीं सर्व स्थित्यंतरीं । तुजविण हरि नसे कोणी ॥**
**अश्रुजलामाजी देई शांति जीवा । अन्य न विसांवा तुजवीण ॥**
**योगवियोगाची स्मृति जी अंतरीं । फिरवीं तीवरि कृपाहस्त ॥**
**येई वा जवळीं अत्यंत कृपेनें । मंगल रूपानें हास्ययुक्त ॥**
**संसारबंधनीं बंधनविहीन । करीं रात्रंदिन मुक्त मज ॥**

**भावार्थ**—अचेतन अशा प्रकृतीला किंवा देहाला मनाची जोड देऊन जें एक आसन बनविलें त्याच्या ठायीं जीवात्म्याच्या रूपानें परमेश्वर बसला आहे. परमेश्वरा, हें देह विराट आहे अर्थात् अखिल विश्व हेंच देह असून त्यांत तूं अधिष्ठित असल्यामुळें तूं विराटस्वरूपी भगवान् अखिल विश्वाला व्यापून राहिलेला आहेस. तुझ्या व्यतिरिक्त असें एकहि स्थान दिसत नाहीं. समुद्र, अरण्यें, उद्यानें, निर्जन प्रदेश आणि जनांनीं गजबजलेले प्रदेश या सर्व ठिकाणीं तुझा वास आहे. सर्व प्राणिमात्राच्या देहामध्यें आणि जीवांच्या अंत:करणाच्या ठायीं तूं राह-

तोस. शांत रात्रीच्या वेळीं चंद्रमाचा शीतल प्रकाश सर्व पृथ्वीप्रदेशास ज्योत्स्नामय करतो त्या वेळीं तुझी दिव्य मूर्ति सर्वत्र विराजत असते. आनंददुःखाचे प्रसंग, संयोग आणि वियोगाचे प्रसंग, हर्ष आणि दुःख यांच्यायोगें अश्रुजलाचे ओघ वाहण्याचे प्रसंग असे अनेक प्रकारचे बरे वाईट प्रसंग आल्यावेळीं तुझा कृपाहस्त माझ्या शिरावर असो हीच तुझ्यापाशीं माझी प्रार्थना आहे. या संसाराच्या बंधनांत असतांहि तुझ्या कृपेनें मी मोकळा असावें आणि तुझ्या सुहास्य वदनाचें मला दर्शन घडावें हीच माझी इच्छा.

**रहस्य**—अखिल विश्वाचा धनी परमेश्वर आहे अर्थात् सर्व स्थिरचर काष्ठ पाषाणादिक सजीव व निर्जीव पदार्थमात्रावर सत्ता चालविणारा परमेश्वर आहे, प्रकृतीस चेतना देणारा आणि तिच्या ठायीं मन उत्पन्न करून फार व्यवस्थित रीतीनें विश्वाचा कारभार अव्याहत चालविणारा तोच विश्वनाथ समर्थ आहे, ही भावना अंतःकरणांत दृढ झाल्यास या जगांतील अहंभाव, मत्सर, सामर्थ्यवृद्धीसाठीं धडपड, आणि जीवनार्थ कलहाची चढाओढ खचित कमी झाली असती. परंतु ही भावना मनुष्याच्या हृदयांत बीज रूपानें असली तरी तिचा वृक्षविस्तार होत नाहीं हें दुर्भाग्य आहे. ज्यांस ईश्वराचें सर्वव्यापित्व व विराट सामर्थ्य पटलें आहे त्यांस सर्वत्र त्याचा वास, त्याचा कारभार आणि त्याचा अधिकार यांचा प्रत्यय येतो. त्यांची वृत्ति सदा शांत आणि निश्चल असते. सुखदुःखादि प्रसंग भवसमुद्रावरील तरंगांप्रमाणें वर खालीं होणारे विकारकल्लोळ आहेत असें मानून ते त्यांची पर्वा बाळगीत नाहींत. या हर्षदुःखाच्या अवस्था देखील ईश्वरी योजनेनें होतात असें मानल्यावर त्यांविषयींचा भार परमेश्वरावर घालून स्वस्थ राहणें हा एकच मार्ग योग्य ठरतो. अशा वृत्तीच्या लोकांस—

**जग अवघें देव । मुख्य उपदेशाची ठेव ॥**
**आधीं आपणयां नासी । तरि उतरे ये कसीं ॥**
**ब्रह्मज्ञानाचें कोठार । ते हें निश्चयें उत्तर ॥**
**तुका म्हणे ते उन्मनीं । नाश कराया कारणीं ॥**

ज्यांनीं याप्रमाणें ईश्वरतत्त्वाशीं ऐक्य प्राप्त करून घेतलें त्यांची स्थिति तुकोबांनीं अत्यंत रसाळ वाणीनें वर्णिली आहे ती अशी—

**भोगावरि आम्हीं घातला पाषाण । मरणा मरण आणियेलें ॥**
**विश्व तूं व्यापक काय मी निराळा । कशासाठीं बळा येऊं आतां ॥**

काय सारूनीया काढावें बाहेरीं । आणूनी भीतरी काय ठेवूं ॥
केला तरि उरे शीणचि कोरडा । बळें घ्यावी पीडा स्वपनींची ॥
अवघेंचि वाण आलें तुम्हां घरा । मजुरी मजुरा रोजकीर्दी ॥
तुका म्हणे कांहीं नेणें लाभ हानि । असेल तो धनी राखो वाडा ॥

---

## ॥ गीत ३५ ॥

बं.—माध्यान्हे नगरमाझे पथ हते पथे—

माध्यान्हीं नगरीं वाहे अखंडित । कर्मनदिस्रोत महावेगें ॥
शतावधि शाखा कर्माच्या वाहाती । कोठें न विश्रांति दृष्टि पडे ॥
नाडी नगराची उडे अति वेगें । झाली कर्मयोगें बहु तप्त ॥
घरोघरीं कर्म नित्य चाललेंसे । लोक नाना वेषें रत कर्मीं ॥
चहूंकडे जन सवेग चालती । धूलि उडविती रथचक्रें ॥
महा जनारण्य दृष्टिपुढें दिसे । त्यामाजी विलसे तुझें स्थान ॥
परि जनांमधें तुझें सिंहासन । अनंत निर्जन दिसतसे ॥
कोलाहलामाजी निःशब्द तूं शांत । सेविसी एकांत सर्व काल ॥
सुख दुःख चिंता चित्त यां अंतरीं । कार्यीं घरोघरीं असती तूं ॥
जोंवरी दृष्टीचें गमन तोंवरी । असे दूरवरी वास तुझा ॥
परि तूं असती संगतिविहीन । सन्निध न जन येती तुझ्या ॥

भावार्थ—माध्यान्ह समयीं शहरांत चालणाऱ्या प्रचंड व्यवहाराकडे पाहिलें असतां जणूं कर्माची नदी मोठ्या जोरानें वहात आहे असें दिसतें. कर्माच्या शतावधि शाखा एकसारख्या वहात आहेत आणि लोक नाना प्रकारच्या उद्योगधंद्यांत चूर आहेत. लोकांस शांतपणें जाण्यायेण्यास देखील अवकाश नसतां ते एकसारखे गाड्यांतून जिकडे तिकडे धांवत सुटल्याप्रमाणें दिसत असून रथचक्रांची धूली चहूंकडे उडत आहे. रस्त्यांतून हिंडणारा जनसमुदाय अरण्यवत् भासतो. या समुदायामध्येंच जरी तुझें अधिष्ठान आहे तरी तुझ्या पीठापाशीं कोणीहि दिसत नाहीं. चहूंकडे एक सारखी आरडाओरड चालली आहे त्यांत तूं शांत आणि मुका होऊन बसला आहेस. याप्रकारें एकांतवासाची गति तुला प्राप्त झालेली दिसते. सर्वत्र तुझा वास, सर्वांच्या सुखदुःखाचा तूं सांगाती, सर्वांचें चित्त आणि सर्वांची

चिंता तुझ्या आधीन असें असूनहि तुझ्याजवळ कोणी येत नाहीं. कर्म—ज्वरानें ज्यांची नाडी तप्त झाली आहे असे लोक तुझी पर्वा न करतां व्यवहारांत गुंतले आहेत. ( हें पाहून आश्चर्य वाटतें. )

**रहस्य**—मानवी बुद्धीच्या शक्तीची वाढ इतक्या झपाट्यानें होत आहे कीं, मनुष्य आपल्या पराक्रमाच्या अभिमानाच्या भरांत आपल्या बुद्धिदात्यालाहि विसरत चालला आहे. प्रचंड प्रमाणावर सर्व शहरांमध्यें चालणारा व्यवहार पाहिला म्हणजे एका क्षणाचीहि शांतता दृष्टीस पडत नाहीं. विश्रांतीवांचून कर्म करीत राहणें आणि या कर्मांचीं बरीं वाईट फळें एकत्र करून त्यांचें सेवन करणें यांतच शहरवासी जनांच्या आयुष्याचा व्यय होत आहे. शहरांतील प्रचंड व्यवहार, तेथील जनांचें शील, चढाओढ, अस्वास्थ्य, वैभव आणि दैन्य, प्रत्येकाच्या घरीं दिसून येणारा आशा निराशा आणि मोह यांचा झगडा या सर्वांच्या बुडाशीं हल्लींच्या सुधारणेच्या बुडाशीं असलेलें उपाधियुक्त कर्म आहे. या कर्मांची धुंदी इतकी अपायकारक आहे कीं तिजमुळें मनुष्यास आपल्या खऱ्या कर्तव्यकर्मासंबंधानें मोह उत्पन्न होतो. खरें खोटें पाहण्यास किंवा निवडण्यास त्याला अवकाश नाहीं आणि इच्छाही नाहीं. ईश्वरास प्रिय असलेले गुण म्हटले म्हणजे सत्य, क्षमा, भूतदया, यांचा उपयोग करण्याकडे व्यवहारी जनांचें लक्ष नसून इतर परीनें ऐहिक वैभव प्राप्त करून घेण्यासाठीं त्यांची एकसाररखी धडपड चाललेली असते. अंतर्देशीय किंवा अंतर्राष्ट्रीय संबंध घ्या किंवा सामाजिक, राजकीय, औद्योगिक व आर्थिक व्यवहार घ्या. सर्वत्र एकानें दुसऱ्यावर मात कशी करावी याकडे शक्तीचा आणि बुद्धीचा व्यय होत आहे.

**लटिकें हांसें लटिकें रडें । लटिकें उडे लटिक्या पें ॥**
**लटिकें माझें लटिकें तुझें । लटिकें ओझें लटिक्याचें ॥**
**लटिकें गायें लटिकें ध्यायें । लटिकें जायें लटिक्या पें ॥**
**लटिका भोगी लटिका त्यागी । लटिका जोगी जगमाया ॥**
**लटिका तुका लटिका भावें । लटिकें बोलें लटिक्यासवें ॥**

अशाच पद्धतीवर सर्व व्यवहार चालला आहे. आत्म्याचा आत्म्याशीं व्यवहार असावा तसा हा व्यवहार नाहीं. मग परमात्म्याची कोठून आठवण होणार ? सर्व व्यवहारामध्यें न्याय सत्य क्षमा दयादिक ईश्वरी गुणांचें प्राधान्य असतें तर असंतोष, दारिद्र्य, निष्ठुरपणा आणि सामर्थ्याचें प्रदर्शन यांचें उच्चाटन झालें असतें.

हिंसात्मक वृत्ति गेली असती. आसुरी आकांक्षांस आळा पडला असता. लोक देवास विसरले. त्याची संगती सोडली. त्यानें मौन धरिलें म्हणूनच सर्व ठिकाणीं लोकांना ही अधोगति प्राप्त झाली आहे.

---

## ॥ गीत ३६ ॥

बं.—जीवने आमार जत आनंद.

**जीवनीं सेवितों आनंदसंपदा । स्मरतों मी तदा तुज देवा ॥**
**ज्या दिनीं तुझें हें विश्व निरखीलें । अंग हर्षें झालें पुलकित ॥**
**तुझा दृष्टिपात झाला मन्नयनीं । प्रभो, तये दिनीं विश्वयोगें ॥**
**सकल आनंदामाझारी तुजला । जीवननाथाला स्मरतों मी ॥**
**स्वादगंधगानयोगें पुनः पुन्हा । तुज नारायणा स्पर्शीतसें ॥**
**पिता माता भ्राता जाया कन्या पुत्र । परिवार मित्र माझे जगीं ॥**
**यांच्या अंतःकरणीं प्रेमें तूं शिरोनी । राहासी येवोनी माझ्यासंगें ॥**
**म्हणोनी तुजला आनंदीं असतां । नित्य विश्वनाथा स्मरतों मी ॥**

**भावार्थ**—ज्या ज्या वेळीं माझ्या जीवाला आनंद होतो त्या त्या वेळीं मला तुझें स्मरण होतें. या विश्वाकडे पाहतांच माझे रोमांच उभे राहिले इतका मला परमावधीचा आनंद झाला. या विश्वाच्या योगानें तुझी आणि माझी दृष्टिभेट झाली. या विश्वांतील मधुर व रसाळ पदार्थांचें सेवन, सुवासिक फुलें व इतर परिमल द्रव्यें यांचा सुवास अनुभवणें आणि बुद्धीस, मनाला व हृदयाला संतोषित करणारे शब्द व गान ऐकणें या प्रकारें स्वाद, गंध गानादिकांनीं जो आनंद होतो त्याच्याच योगानें मी तुझ्या चरणाला स्पर्श करूं शकतों. अर्थात् माझ्या पंचेंद्रियांस या सृष्टीमध्यें जें सुख लाभतें त्या सुखाचा अनुभव घेत असतां मी तुझ्या निकट सान्निध्यांत असल्याचा आनंद प्राप्त होतो. माझ्या प्रापंचिक व्यवहारांत माझा अनेकाशीं संबंध घडून येतो. माझा पिता, माझी माता, बंधु, भगिनी, पत्नी, कन्या, पुत्र नोकरचाकर आणि इष्टमित्र यांचें प्रेम मजवर असून त्यायोगें माझें जीवित सुखावह होतें. मला वाटतें कीं या सर्वांच्या अंतर्यामीं शिरून तूंच त्यांच्या करवीं मजवर प्रेम करीत आहेस. यासाठीं ज्या ज्या वेळीं मला आनंद होतो त्या त्या वेळीं तुझी आठवण होते.

**रहस्य**—संसाराच्या तापानें गांजलेल्या जनांस पुनः पुनः ईश्वराची आठवण होत असून संकटाचें निरसन करण्यासाठीं ते त्याची करुणा भाकतात. दुःख जावें आणि सुख मिळावें या हेतूनें ईश्वरस्मरण करणारे जिकडे तिकडे दृष्टीस पडतात. परंतु संकटाच्या वेळीं आपला पाठीराखा होऊन कष्टांतून सोडविण्यासाठीं परमेश्वरास आळविणारे आनंदाच्या वेळीं त्याची आठवण करीत नाहींत. आनंदांत असतां ज्यांस क्षणोक्षणीं ईशकृपेची कृतज्ञतापूर्वक आठवण होते त्यांस सर्व ठिकाणीं ईश्वरीप्रेमाचा अनुभव येतो.

**प्रेम अमृतें रसना ओलावली । मनाची राहिली वृत्ति पायीं ॥**
**सकलहि तेथें वोळली मंगळें । वृष्टि केली जळें आनंदाच्या ॥**
**सकळ इंद्रियें झालीं ब्रह्मरूप । ओतलें स्वरूप माजीतया ॥**
**तुका म्हणे जेथें वसे भक्तराव । तेथें नांदे देव संदेह नाहीं ॥**

याप्रमाणें मनाची वृत्ति झाल्यावर सर्वत्र आनंदी आनंद दृष्टीस पडल्यावांचून राहणार नाहीं. आत्यंतिक, अखंड आणि सर्वांगपूर्ण असें सुख कोणाही मानवी प्राण्याला प्राप्त होणें शक्य नाहीं. कायिक व मानसिक त्रासांच्या जाळ्यांत आपण सांपडलों आहों असें सदैव समजणारांस या त्रासांतच खितपत पडावें लागेल. जे या त्रासांच्या वेदना सहन करून आपणास सहजगत्या प्राप्त होणाऱ्या अल्पानंदाबद्दल ईश्वराचे उपकार मानतात त्यांची वृत्ति हळूहळू उपाधीपासून दुसरीकडे वळून आनंदमय होते असा अनुभव आहे. आपणापेक्षां विशेष कष्टी, विशेष दुःखी आणि विशेष त्रस्त लोक या जगांत आहेत हें जाणून त्यांच्यापेक्षां रतिभर तरी आपण विशेष सुखी आहों असें मानणारा, जाणणारा आणि स्मरणांत ठेवणारा सुखीच होतो. रूप, रस, गंध गानादिकांच्या योगानें भगवंतास जाणणारे सुखीच झाले.

**दाता नारायण । स्वयें भोगीता आपण ।**
**आतां काय उरलें वाचे । पुढें शब्द बोलायाचे ॥**
**देखतीं जे डोळे । रूप आपुलें तें खेळे ।**
**तुका म्हणे नाद । अवघा झाला गोविंद ॥**

तेव्हां सदोदित कष्टी होऊन आयुष्याचा सदुपयोग न करतां भूभार होऊन राहणारे सुखास अंतरतात यांत आश्चर्य नाहीं. सुख सुखानें, आनंद आनंदानें आणि प्रेम प्रेमानें वाढवावें.

सुख सुखा विरजण झालें । तें मथलें नवनीत ।
हाले डोले हरुषे काया । निवति बाह्या नयन ।
प्रबल तो नारायण । गुणें गुण वाढला ।
तुका म्हणे भरली सींग । वरी मग वोसंडे ॥

---

## ॥ गीत ३७ ॥

बं.—तोहारा देखीया छेन–विश्व चराचर.

आनंदाचा झरा वहातो निर्झर । विश्वीं चराचर वस्तूंतूनि ॥
तुझ्या भयें अग्निज्वालाही प्रखर । कंप थर थर पावताति ॥
तुझीया प्रतापें वायु अहर्निश । घेई श्वासोच्छ्वास ब्रह्मांडीं या ॥
रात्रंदिन हिंडे मृत्यु जगावरि । सर्व चराचरीं गर्जत जो ॥
आज्ञांकित तुझा पाळी तो आदेश । तयाचा आवेश तुजमुळें ॥
इच्छा तुझी तंव पृथ्वींतुनी वरी । उठे वेगें गिरी प्रचंड तो ॥
चहूं दिशांमाजी वहाती सरिता । तुझीया संगीता वाजविती ॥
अनंत या प्राणें व्यापिलें ब्रह्मांड । त्यायोगें प्रचंड चाले खेळ ॥
शून्याकाशीं चंद्र सूर्य ग्रह तारा । यांसीहि दरारा तुझा मोठा ॥
विश्वालयीं आम्हां रक्षी देई जय । तुझेंचि अभय, भय तैसें ॥
विश्व सर्व चाले शासनें तुझीया । आज्ञा उल्लंघाया धजे कोण ॥
तुझीये सन्मुख दीप्त तृप्त मुखें । हस्तबद्ध मुके राहूं आम्ही ॥
ऋषिजनीं दिव्य दृष्टीनें देखीलें । मनें अनुभविलें रूप ऐसें ॥

**भावार्थ**—या विश्वांतील वृक्षलतादि स्थिर सृष्टि आणि प्राणिमात्र चरसृष्टि यांचें अवलोकन केलें तर सर्वत्र आनंदाचा झरा वहात आहे असें दिसतें.—( हा आनंद आहे म्हणून या सृष्टींतील संसारांतील स्नेहसंबंध चालला असून एक दुसऱ्याला जवळ करून असतो. ) परमेश्वरा, तुझ्या पराक्रमामुळेंच अग्नि वायु वगैरे महाभूतांना सामर्थ्य प्राप्त झालें आहे. जगांतील सृष्ट्युत्पत्तीला जसा तूं कारणीभूत आहेस तसा तिच्या नाशालाहि तूंच कारणीभूत होतोस. तुझी चेतना-शक्ति जीवरूपानें अखिल ब्रह्मांडाला चेतवीत आहे. म्हणून हा विश्वसंसाराचा खेळ चालला आहे. चंद्र सूर्य ग्रह तारादिकांवर आणि नद्या पर्वतादिकांवर सत्ता

चालविणारा तूं थोर असून तुझ्या सत्तेच्या आड कोणीहि जाऊं धजत नाहीं. तुझ्या सन्मुख हात जोडून मुक्यांप्रमाणें राहणें एवढाच आमचा अधिकार आहे. अशा वेळीं आमचें मुख तुझ्या तेजामुळें सतेज होईल आणि आमच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्याप्रमाणें होऊन तृप्त स्थितींत तुझ्या स्वरूपाचें दर्शन घडेल. प्राचीन कालीं ऋषिजनांस या तुझ्या दिव्य स्वरूपाचें दर्शन घडलें. तें दर्शन मनश्चक्षूनें मी अनुभवीत आहें.

**रहस्य**—मनुष्याच्या बुद्धिमत्तेचा दिवसें दिवस विकास होत आहे. या बुद्धिबलाच्या योगानें अनेक विलक्षण शोध निघाले असून मनुष्यास आपली शक्ति अत्यद्भुत आहे असा गर्व झाला आहे. बुद्धिबलाच्या योगानें बाष्प, विद्युत्, वायु, अग्नि, जल इत्यादिकांकडून शक्ति उत्पन्न करून मनुष्य अखिल स्थिरचर सृष्टीवर सत्ता गाजविण्यांत गुंतला आहे. हें जरी खरें आहे तरी अत्यंत प्राचीन कालीं ऋषिजनांनीं या विश्वाविषयीं आणि तें उत्पन्न करणाऱ्याविषयीं जे उद्गार काढले त्यांतील रहस्य कायम आहे. विश्वांतील समता, शिस्त, नियमबद्धता, उत्पत्ति, स्थिति आणि लय या अवस्था, यांकडे पाहिलें म्हणजे मनुष्याची शक्ति अत्यल्प दिसते. ही समता नाहींशी होऊन प्रचंड महाभूतें क्षुब्ध स्थितींत जेव्हां आघात करतात तेव्हां मनुष्याचा इलाज चालत नाहीं. निमिषार्धांत मनुष्यनिर्मित सर्व महत्कार्यें नामशेष होतात. भूकंप, ज्वालामुखींचे स्फोट, विद्युदाघात, मेघांचा वर्षाव, झंझावात यांच्यामुळें शहरांचा आणि मानवादि प्राण्यांचा एका क्षणांत संपूर्ण नाश होतो. गांव तेथें समुद्र आणि समुद्र तेथें पर्वत, पर्वताच्या ठिकाणीं दऱ्या अशा रीतीनें पृथ्वीतलाचें स्वरूप बदलून जातें. मानवी सामर्थ्य तुच्छ ठरतें. भगवंतांनीं अर्जुनास दिव्य चक्षूंच्या योगानें अखिल विश्व न्याहाळून पाहण्यास सांगितलें आणि मानवी सामर्थ्याचा गर्व निराधार व व्यर्थ आहे हें सिद्ध करून दिलें. या दृष्टीनें या विश्वाकडे पाहिलें तर दिसून येईल कीं:—

**तुजविण सत्ता । नाहीं वाचा वदविता ।**
**ऐसें आम्ही जाणों दास । म्हणोनी झालों उदास ।**
**तुम्ही दिला धीर । तेणें मन झालें स्थिर ।**
**तुका म्हणे आड । केलों मी हें तुझें कोड ॥**

## ॥ पंचम खंड ॥

# ईश्वराशीं सख्य.

तवैवाहम् ॥

**अर्थ**—मी तुझाच आहें.

पितासि लोकस्य चराचरस्य ।
त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ॥
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो ।
लोकत्रयेऽप्यप्रतिम प्रभावः ॥
तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायम् ।
प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः ।
प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥ गीता.

**अर्थ**—या जगाचा आणि चराचराचा पिता तूंच आहेस. श्रेष्ठ गुरुहि तूंच आहेस. तुझ्या इतका श्रेष्ठ किंवा तुजहून श्रेष्ठ दुसरा कोणी नाहीं. लोकत्रयामध्यें तुझा प्रभाव अप्रतिम आहे. यासाठीं हें शरीर तुझ्या चरणावर विलिन करतों. ज्याप्रमाणें पिता पुत्राला किंवा पति प्रियेला, मित्र मित्राला क्षमा करतो त्याप्रमाणें तूं क्षमा कर.

### अभंग—

देवा बोलें आतां बोला । त्वां कां धरिला अबोला ॥
भेऊं नको देईं भेटी । तूं कां पडिलासी संकटीं ॥
तुझ्या जीवीचें मी जाणें । म्हणसी मुक्ति आम्हा देणें ॥
तुका म्हणे नलगे कांहीं । चित्त राहो तुझे पायीं ॥

## ॥ गीत ३८ ॥

बं.—तोमारी नाम बोल्बो नाना छले—

निमित्तावांचोनी कारण नसतां । तुझें नाम गातां सुख वाटे ॥
मनवृक्षछायेतळीं बैसोनीयां । नाम तुझें घ्याया गोड वाटे ॥
भाषा ज्ञान अर्थ विचार नसतां । घेतों मी अनंता तुझें नाम ॥
कधीं हास्यद्वारा कधीं अश्रुपातें । तुझीया नामातें जपतों मी ॥
नसे प्रयोजन तरी तुझें नाम । घेतों तें विश्राम देई मज ॥
माझ्या हांकेसी तूं धावोनीयां येसी । नित्य पुरवीसि मनीषांतें ॥
जेंवी अकारण शिशु मारी हांका । अनुभवी सुखा मातृनामें ॥

**भावार्थ**—हे भगवंता कांहीं एक कारण नसतांहि मी तुझें नांव घेतों. या नामाचा उच्चार करायालाच मला आनंद होतो. मी आनंदानें हंसत असतां किंवा दुःखोद्वेगानें रडत असतांहि तुझ्या नामाचा जप करतों. कारणावांचून ज्याप्रमाणें बालक "आई आई" अशी दिवसभर हाक मारीत असतें आणि तेणेंकरून त्याला आनंद होतो त्याप्रमाणें तुझें नामस्मरण करण्यापासून मला आनंद प्राप्त होतो. हें नाम घेतांना मला तुझ्या स्वरूपाचें ज्ञान आहे किंवा मी जें कांहीं म्हणतों त्यांतील अर्थ-रहस्य किंवा भाषा-रहस्य मला समजतें असें नाहीं. तुझें नाम घ्यावें इतकेंच मला ठाऊक आहे.

**रहस्य**—जपतप ध्यानधारणा योग इत्यादि मन निश्चल करण्याच्या खडतर उपायांपेक्षां सुलभ व निरुपाधिक मार्ग म्हटला म्हणजे नामसंकीर्तन आहे असें भागवत धर्माचें निशाण उभारलेल्या साधुसंतांनीं सांगितलें आहे—

नाम घेतां कंठ शीतळ शरीर । इंद्रियां व्यापार नाठवती ॥
गोड गोमटें हें अमृतासी वाड । केला कईवाड माझ्या चित्तें ॥
प्रेम रसें जाली पुष्ट अंगकांति । विविध सांडीति ताप अंगें ॥
तुका म्हणे तेथें विकाराची मात । बोलों नये हित सकळांचें ॥

भगवन्नामोच्चार याचा अर्थ सर्व कार्यांच्या वेळीं ईश्वरस्मरण असा आहे. या स्मरणामुळें इंद्रियांना दुर्व्यापार आठवणार नाहींत. नामोच्चाराबरोबर अर्थात् ईश्वरस्मरणाबरोबर प्रेमरसाची वाढ झाली पाहिजे. म्हणजेच तापत्रयांतून सुटका होईल. नामस्मरणाचा विषय वाद किंवा तर्क यांच्याद्वारें सिद्ध करण्याचा नसून तो

संतांच्या अनुभवानेंच सिद्ध झाला आहे. नामस्मरणास सात्त्विक व निर्मळ वृत्तीची व अंतःकरणाची जोड दिली पाहिजे. ईश्वरचिंतन आणि ईश्वरसेवा जनीं जनार्दन ओळखून करावी हा श्रेष्ठ मार्ग आहे. याप्रमाणें सोपें साधन नामसंकीर्तन आहे असें श्रद्धेनें सांगणारे साधुसंत या साधनांचा अवलंब करून सद्गति पावले. त्यांचें जीवित सफल झालें. आणि इहलोकाचा त्यांनीं त्याग केला तरी ते आदर्शवत् होऊन राहिले. अशा संतांनीं आपला जीवनक्रम आंखला तो असा—

**क्रिया कर्मधर्म तूंचि होसी माझें । राखण मी तुझें द्वारसेवा ॥**
**मज पाळिसि तैसें पाळी दीनानाथा । न सोडीं सर्वथा नाम तुझें ॥**
**गाइन तुझें नाम हृदयीं धरोनि प्रेम । हाची नित्य धर्म सर्व माझा ॥**
**नामा म्हणे विठो कृपेच्या सागरा । तूं आम्हां सोईरा आदिअंतीं ॥**

त्रिकाळ ईश्वरस्मरणपूर्वक कर्तव्य कर्म करीत असतां प्राप्त झालेल्या संकटांना तोंड देऊन **अवघा संसार करीन सुखाचा** या निर्धारानें नामस्मरणाच्या भरांत कायिक व मानसिक व्यथा विसरणारे हरिभक्त आजवर अनेक झाले. अंतर्बाह्य वृत्ति ईश्वरमय होण्यास आणि सर्व प्रकारच्या मानसिक व्यथांचें शल्य बोंथट करण्यास एकच उपाय आहे. तो म्हटला म्हणजे " ईशचिंतन " हा आहे. म्हणून संत सांगतात कीं—

**नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळही ॥**
**रसना येरां रसां विटे । घेतां घोट अधिक हें ॥**
**आणिका रसें मरण गांठीं । येणें तुटी संसार ॥**
**तुका म्हणे आहार झाला । हा विठ्ठल आम्हांसी ॥**

---

## ॥ गीत ३९ ॥

बं.—तुमि जखन गान गाइते बोलो ( इं. २ )

**आज्ञापिसि मज गीत गा म्हणोनी । गर्वानें फुगोनी जातों तदा ॥**
**न्याहाळितां मुख तुझें प्रेमभावें । नेत्रांवाटे धांवे अश्रुपूर ॥**
**कठिण कटु जे प्रसंग जीवनीं । सुधामय गानीं लोपताति ॥**
**उडाली संपूर्ण माझी आराधना । आणिक साधना पक्षापरि ॥**

**गीतगानें माझ्या तुजसी आनंद । लागलासे छंद तुज माझा ॥**
**गानाच्या निमित्तें तुज ओळखीलें । आसन मांडिलें त्वत्सन्मुख ॥**
**गानाच्या पंखांनीं तव चरणातें । स्पर्शावया मातें धीर आला ॥**
**गानभरें पूर्ण बेहोश जाहलों । प्रभूसी भुललों म्हणे बंधु ॥**

**भावार्थ**—देवा, ज्या ज्या वेळीं तुझे गुणानुवाद गावे अशी मनांत स्फूर्ति उत्पन्न होते त्या त्या वेळीं ( मी तुझा दास आणि तूं माझा धनी आहेस म्हणून ) मला मोठा अभिमान वाटतो. तुझ्या स्वरूपीं माझी दृष्टि लागतांच नेत्रांतून आनंदाश्रु वाहतात. संसारांतील सर्व दुःखें नाहींशीं होतात. मी प्रेमपूर्ण चित्तानें तुझी कीर्ति गाऊं लागलों म्हणजे माझे आराधनादिक पूजेचे प्रकार नाहींसे होतात. देवा, मला असें वाटतें कीं तुला माझा छंद लागला असून माझ्या गानाच्या योगानें तुला आनंदहि होत असावा. याप्रमाणें तुझा महिमा गातां गातां तुझी मला ओळख झाली. मी तुझ्या सन्मुख येऊन पोहोंचल्याप्रमाणें झालें. तुझ्याशीं सलगीनें वागण्यास मला धीर आला, आणि या गानाच्या भरांत तुझा स्वामीपणा विसरून मी तुला माझा बंधु आहेस असें मानूं लागलों आहें.

**रहस्य**—प्रपंचाच्या दगदगींतून घटकाभर मन काढून ईश्वरस्मरण करण्या-साठीं जेव्हां आपण गानद्वारा त्याचें भजन करतों तेव्हां आमच्या संसारांतील कष्टांची व दुःखांची आठवण होत नाहीं. श्रमाचा व संकटाचा परिहार झाल्या-प्रमाणें मनाला विसांवा प्राप्त होतो.

**गाऊं नेणें परि मी कांहीं गाईन ।**
**शरण जाईन पांडुरंगा ॥**

या भावनेनें ईश्वरस्मरण केल्यास त्रिविध तापांची बाधा होणार नाहीं. हा अनुभव संतांनीं घेतला आहे.

**गाऊं वाहूं टाळी रंगीं नाचों उदास ।**
**सांडोनी भय लज्जा शंका आस निरास ॥**
**बळियाचा बळी तो कैवारी आमुचा ।**
**भक्ति मुक्तिदाता सकळांही सिद्धींचा ॥**
**मारूं शब्दशस्त्र बाण निःशंक अनिवार ।**
**कंटकांचा चूर फोडूं काळाचें शिर ॥**

म्हणे तुकयाबंधु नाहीं जीवाची चाड ।
आपुलिया तेथें काय आणिकांची भीड ॥

अशा प्रकारच्या निर्धारानें ज्यांनीं स्वतःस ईश्वरचरणीं वाहून घेतलें ते ईश्वरमय झाले. सेव्यसेवकभाव नाहींसा झाला आणि बंधुत्वाचा संबंध उत्पन्न होऊन एक दुसऱ्यास प्रेमपाशांनीं बांधला गेला. सर्व जगाची पर्वा न करतां ईश्वरावर पूर्ण विश्वास ठेवून आणि त्याच्याच प्रेमाची ढाल बरोबर घेऊन जे सज्जन या जगांत कर्मनिष्ठ झाले त्यांस संसारदुःखांची बाधा झाली नाहीं. त्यांच्या योगक्षेमाची काळजी परमेश्वरानेंच वाहिली. त्यांची कीर्ति अजरामर झाली.

---

## ॥ गीत ४० ॥

बं.—तुमि केमन करे गान कर हे गुणी ( इं. ३ )

कैसें गासी गीत मंजुळ मधुर । केवल हे स्वर ऐकावे म्यां ॥
गीताचें या तेज भुवना दीपवी । व्यापी सर्व ऊर्वी गुणवंता ॥
गीताचा या प्राण-वायु अवकाशीं । खेळे अहर्निशी अखंडित ॥
व्याकुल वेगानें गीतगंगा वाहे । पाषाण न राहे ओघापुढें ॥
तुझ्यासंगें गीत गावें मना वाटे । परि न शब्द फुटे कंठांतूनि ॥
यत्नें गाऊं जातां उमटेना गीत । कंठ सद्गदित होतो माझा ॥
विश्वीं पसरलें तुझें गान-जाल । प्राण हा व्याकुळ सांपडला ॥

**भावार्थ**—हे परमेश्वरा, तुझें मंजुळ आणि मधुर गीत सदैव कानीं पडतें. परंतु हा स्वर ऐकण्यापलीकडे मला कांहीं करतां येत नाहीं. तुझ्या गीतगानामुळें अखिल जगाला तेज प्राप्त झालें आहे. सर्व जगामध्यें या गानाचा शब्द घुमत आहे. या गीतांतून निघणारा प्राणवायु सर्वत्र भरलेला असून त्यामुळें सर्व सृष्टीला चैतन्य प्राप्त होत आहे. तुझ्या गीतांचा ओघ इतक्या जोरानें चालला आहे कीं पाषाण देखील वाहून जात आहेत. ( अर्थात् पाषाणहृदयी लोकांच्या अंतःकरणांत सुद्धां प्रेमाचा पाझर फुटत आहे. ) तुझ्यासंगें मलाही गीत गावें असें वाटतें. ( अर्थात् तुझ्या स्वरांत माझा स्वर मिळवावा, आत्मार्पण करून मला मी विसरून जावें असें वाटतें. ) परंतु कंठांतून शब्द निघत नाहीं. सद्गदित स्थितींत मला

गातांच येत नाहीं, असें झालें आहे. या विश्वामध्यें तुझें जें गानजाल पसरलें आहे. त्यांत माझा प्राण सांपडला असून तो व्याकुळ झाला आहे.

**रहस्य**—परमेश्वराचें गीतगान या विश्वाच्या ठायीं अव्याहत चाललें आहे. हा विश्वाचा संसार म्हणजे ईश्वराचें गीत होय. याचा विचार करूं लागलों तर आम्हांला थांग लागत नाहीं. आपण स्वस्थपणें नम्रचित्त होऊन विश्वांतील चमत्कार पहावे आणि भगवंताला शरण जावें याशिवाय अन्य उपाय दिसत नाहीं. या विश्वांतील संसाराच्या कार्यांत भाग घेण्याचें सामर्थ्य नसतां हार खावी लागते. परमेश्वरा! तुझें वैभव, तुझी कीर्ति आणि तुझी शक्ति पाहून माझें मन थक होतें. तुंवा उत्पन्न केलेल्या कर्मपाशांमध्यें मी सांपडलों असून यांतून पार पडणें अशक्य आहे. तेव्हां माझें अंतःकरण पूर्णपणें तुला अर्पण करावें आणि तुझा महिमा गावा हा एकच उपाय मला योग्य दिसतो. तुझ्या सुरांत माझा सूर मिळणें कठीण आहे. कारण तुझ्यांतील माधुर्य, प्रेमळपणा आणि तालबद्ध गानपद्धति माझ्यामध्यें नाहीं. मी तुझ्या सामर्थ्याचें चिंतन करीत कालक्रमण करावें हाच माझा अधिकार. तुझें कार्य तुंवा करावें आणि मी नम्रपणें त्याचा आनंद सेवन करावा हेंच योग्य आहे. याप्रमाणें ईश्वराच्याठायीं संपूर्ण चित्त स्थिरावल्यावर

**रूपीं जडलें लोचन। पायीं स्थिरावलें मन॥**
**देहभाव हरपला। तुज पाहातां विठ्ठला॥**
**कळों नेदी सुख दुःख। तान हरपली भूक॥**
**तुका म्हणे नव्हे परती। तुझ्या दर्शनें मागुती॥**

या प्रकारचा अनुभव आल्यावांचून राहणार नाहीं.

---

## ॥ गीत ४१ ॥

बं.—तुमि एकटु केवल बसते दियो काछे—( इं. ५ )

**बैसूं देईं मज पायांपाशीं तुझ्या। क्षणभरि माझ्या जीवलगा॥**
**अपुरें जें कार्य राहिलें अजूनी। सांग मागाहूनी करीन तें॥**
**नसतां सन्मुख रूप तुझें देवा। न मिळे विसांवा हृदयातें॥**
**कष्टमय वाटे कर्म या संसारीं। संकष्टसागरीं कष्टे जीव॥**

**डोकावे वसंत वातायनीं श्वास । टांकी ये सुवास चोहींकडे ॥
करिती भ्रमर कुंजांच्या प्रांगणीं । कुसुमीं बैसोनी गुंजारव ॥
आजी विश्रांतीचा पातला सुदिन । पहात बैसेन रूप तुझें ॥
आत्मसमर्पण-गीत मी गाईन । सन्मुख बैसेन स्वस्थ चित्तें ॥**

**भावार्थ**—माझ्या जिवलगा ! तुझ्या चरणापाशीं मला क्षणभर बसूं दे. अद्यापि जें कार्य अपुरें राहिलें असेल तें मी मागाहून करीन. तुझें रूप दृष्टिआड झालें म्हणजे माझ्या मनाला विश्रांति मिळत नाहीं आणि हा संसार सारा कष्टमय वाटून मी संकटांत बुडून जातों. चोहींकडचें वातावरण जणूं काय वसंतकालाचें आगमन होत आहे अशा रीतीनें परिमलयुक्त भासूं लागलें आहे. अशा वेळीं माझा प्राण तुला समर्पण करून तुझें रूप पहात बसावें आणि आनंदयुक्त होऊन विश्रांति घ्यावी असें वाटतें.

**रहस्य**—या विश्वाच्या संसारांत जन्मास आलेल्या मनुष्यप्राण्याला रात्रंदिवस कर्म करीत राहणें प्राप्त आहे हें खरें. तथापि या ऐहिक कर्मांच्या मागें लागून कितीहि दीर्घकालापर्यंत हीं कर्में पार पाडण्यासाठीं धडपड केली तरी तीं अपुरींच राहणार. कारण प्रत्येक दिवस येतो तो प्रपंचविषयक नवीन विचार व त्याबरोबर नवीन कर्म उत्पन्न करतो. या संसारांत आपला संबंध ज्यांच्यांशीं जडला आहे त्यांच्यामुळें अनेक कर्मांचें आचरण, आपली स्वतःची इच्छा नसतांहि, करावें लागतें. अशा रीतीनें आमची शक्ति, चित्त आणि इच्छा प्रापंचिक मोहामुळें पराधीन होऊन आत्मोद्धाराचा विचार करण्यास देखील आपणास सवड मिळत नाहीं. कधीं कधीं भगवत्कृपेनेंच हा विचार जागृत होतो. त्यावेळीं असें वाटतें कीं, पुरे ही दगदग, यापुढें प्रापंचिक कार्यांच्या खटपटींत आयुष्य न घालवितां ईश्वरचिंतनांत निमग्न व्हावें. कोणत्याहि प्रकारचें कार्य करण्याची शक्ति अंगीं राहणार नाहीं अशा वेळीं ईश्वरस्मरणांत काल घालवीन असें म्हणणारे शेवटपर्यंत प्रापंचिक कार्यांत खितपत पडतात. यासाठीं प्रत्येकानें ज्या वेळीं आपलीं सर्व इंद्रियें तरतरीत असून शरीरामध्यें शक्ति आहे त्या समयीं भगवच्चिंतनासाठीं कांहीं काल खर्च करण्याचा निश्चय केला पाहिजे. वृद्धावस्थेंत गात्रें शिथिल झाल्यावर व्याधींच्या माऱ्यामुळें जीवास अस्वास्थ्य प्राप्त झाल्यावेळीं ईश्वरचिंतनास तरी स्वास्थ्य कोठून मिळेल ? ईश्वरचिंतन करणें म्हणजे जपमाळा घेऊन डोळे मिटून बसणें नव्हे. ईश्वराच्या सान्निध्यांत राहून त्याचें कार्य करणें आहे. या सान्निध्यांत जो आनंद प्राप्त होतो

तो अवर्णनीय असून अनुभवानेंच जाणला पाहिजे. ईश्वराची सेवा याचा अर्थ षोडषोपचार पूजा नसून जनीं जनार्दन ओळखून परोपकारादि उपायांनीं दुःखितांचें दुःख कमी करणें आहे. ईश्वरसान्निध्याचा ध्यास ज्या साधुसंतांस लागला त्यांचें चित्त, त्यांचा प्राण आणि त्यांचें सर्व कार्य ईश्वरार्पण झालें. त्यांचा आणि ईश्वराचा संयोग झाला.

**वियोग न घडे सन्निध वसलें । अखंड राहिलें होय चित्तीं ॥**
**विसर न पडे विकला न घडे । आलें तें आवडे तया पंथें ॥**
**कामाचा विसर नाठवे शरीर । रसना मधुर नेणें फिकें ॥**
**निरोपासी काज असो अनामिक । निवडितां एक न ये मज ॥**
**तुका म्हणे हित चित्तें ओढीयेलें । जेथें तें उगलें जावें येणें ॥**

माझी गति, माझा पोषणकर्ता, माझा धनी, माझा साक्षी, माझ्या निवाऱ्याचें व आरामाचें स्थान, माझा अखेरचा आधार व विसावा, माझा सखा व कैवारी, म्हणून लेकराप्रमाणें मी ज्याचें प्रेमानें व लडिवाळपणानें आकलन करूं शकेन, असा सत्यसंकल्प, सकलैश्वर्यसंपन्न, दयासागर, भक्तवत्सल, परमपवित्र, परमोदार, परमकारुणिक, परमपूज्य, सर्वसुंदर, आणि सकलगुणनिधान अशा परमेश्वराचें दर्शन घडावें असें ( परमात्म्यापासून वियोग पावल्यामुळें कष्टी झालेल्या ) जीवात्म्याला कधीं कधीं वाटतें. अशी मनोभावना उदित झाली म्हणजे भक्तीचा उदय झाला असें म्हणतां येईल.

---

## ॥ गीत ४२ ॥

बं.—छिन्न करे लओ हे मोरे ( इं. ६ )

**न लावूं विलंब पुष्प घे तोडोनी । धूलींत पडोनी जाईल तें ॥**
**वायां तें नासेल भीति मज वाटे । खुडूनी त्या हातें घेईं वेगें ॥**
**तुझ्या मालेमाजि ठाव या पुष्पासि । मिळेल कां मसीं न ठाऊक ॥**
**पुष्पा हा आघात परि त्याचें भाग्य । प्रभुकंठीं योग्य विलसेल ॥**
**दिन गत होतां अंधार पडेल । पूजनाचा काल संपेल बा ॥**
**सुसमय आतां सेवा करायासि । अर्पाया प्रभूसि पुष्प ऐसें ॥**
**वर्णशोभाहीन नसे परिमल । तरी तूं हें फूल खुडोनी घे ॥**

**भावार्थ**—विलंब न लावतां हें फूल तोडून घे. नाहींतर तें धुळींत पडून व्यर्थ जाईल. या पुष्पाचा उपयोग ईश्वरास वाहण्याच्या मालेमध्येंच व्हावा हें योग्य आहे. परंतु मालेमध्यें हें ग्रंथिलें जाईल किंवा नाहीं हें मला सांगतां येत नाहीं. फूल तोडणें म्हणजे या ( मृदुल ) कुसुमाला क्रूरपणें देठापासून आघात करून काढणें आहे. हें कृत्य वाईट असलें तरी प्रभूच्या कंठीं त्याला स्थान मिळणार असल्यामुळें त्याचें भाग्य समजलें पाहिजे. उशीर लावूं नकोस. रात्र पडल्यावर पूजेचा समय निघून जाईल. या साठीं घाई कर. हें फूल इतकें सुंदर नाहीं. त्याला सुगंधहि नाहीं तथापि तें खुडून घे.

**रहस्य**—ज्याप्रमाणें योग्य कालीं न तोडलेलें फूल झाडावरच कोमेजून व सुकून शेवटीं गळून पडतें आणि धूळींत त्याचा मागमूसहि रहात नाहीं त्याप्रमाणें योग्य समयीं ईश्वरास न वाहिलेलें हृत्पुष्प जागच्या जागीं निरुपयोगी होतें. फुलाचा देंठ झाडास चिकटलेला असतो. तो तोडतांना झाडाला व फुलाला बाधा होते. त्याचप्रमाणें या संसारवृक्षाला चिकटलेलें हें हृत्पुष्प खुडून काढणें फार दुःखकारक वाटतें. परंतु पुढील सुपरिणामावर लक्ष देऊन तें योग्य वेळीं तोडलेंच पाहिजे. असें करणें निष्ठुरपणाचें नसून हितावह आहे. प्रेयसाधनाहून श्रेयसाधन केव्हांहि बरें. या कामीं विलंब करणें घातुक आहे.

**देह मृत्याचें भातुकें । कळों आलें कवतुकें ॥**
**काय मानियलें सार । हेंचि वाटतें आश्चर्य ॥**
**नाना भोगांचीं संचितें । करूनि ठेविलें आइतें ॥**
**तुका म्हणे कोडीं । उगवूं न सकतीं बापुडीं ॥**

मृत्युमुखीं देह पडल्यावर या हृत्पुष्पाचा उपयोग काय ? तेव्हां वेळींच तें खुडून ईश्वरार्पण करावें म्हणजे त्याचें सार्थक होईल.

**तेणें चित्ताची राहेल तळमळ । होतील शीतळ सर्व गात्रें ॥**
**तुका म्हणे शांति करील प्रवेश । मग नव्हे नाश अखंड तो ॥**

साधुसंत आणि सामान्य प्रापंचिक लोक यांच्यामध्यें अंतर हेंच कीं संत सर्व व्यवहार करणारे असले तरी ते आपलें अंतःकरण ईश्वराच्या ठायीं ठेवतात. परंतु प्रापंचिकांस संसारांतून क्षणभरहि चित्त बाहेर काढण्यास दुःख होतें. संतांचा निर्धार वाखाणण्याजोगा आहे:—

सर्वविशीं आम्हीं हेचि गोडी केली । स्वामीची साधिली चरणसेवा ॥
पाहिलेंचि नाहीं मागें परतोनी । जिंकिला तो क्षणीं क्षण काळ ॥
नाहीं पडों दिला विचाराचा गोवा । नाहीं पोटीं हेवा येऊं दिला ॥
केली लागवेगीं अवघीचि तांतडी । भावना ते कुडी दुराविली ॥
कोठें मग ऐसें होतें सावकास । जळो तया आस वेव्हाराची ॥
तुका म्हणे लाभ घेतला पालवीं । आतां नाहीं गोवीं काशाचीहि ॥

याप्रमाणें तांतडी करून योग्य कालीं मनुष्यजन्माचा लाभ घेण्यांतच शहाणपणा आहे.

यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत् ।

म्हणजे ज्या दिवशीं बुद्धि विरक्त होते त्या दिवशींच संन्यास घ्यावा असें श्रुति वाक्य आहे. याचा अर्थ असा कीं स्वार्थामुळें मनुष्याच्या अंतःकरणांत बहुधा त्याग बुद्धि उत्पन्न होत नसते. तेव्हां अशी बुद्धि कोणत्याही कारणामुळें उत्पन्न होतांच ती संधि साधून तत्काल त्याग करावा. अर्थात् आत्मवत् इतरत्र पाहण्याची भावना जागृत होतांच परोपकाराचें कार्य पार पाडावें. पुनः विचाराच्या कचाट्यांत सांपडून काल हरण केल्यास संधि हातची जाईल. विरक्ति प्राप्त होतांच हृत्कमल तोडून भगवत्पदीं अर्पण करावें हाच आत्मोद्धाराचा उपाय आहे.

---

## ॥ गीत ४३ ॥

बं.—आमार ए गान छेडे छे तार ( ई. ७ )

गीतें त्यागियेले सर्व अलंकार । आणि अहंकार तुझेठायीं ॥
अलंकारांमाजी लपतां हें गान । तुझ्याशीं मीलन असाध्य तें ॥
झणत्कारें त्यांच्या तुझी कथा रम्य । मजसी अगम्य होईल ती ॥
त्वन्मुख पहातां कवित्वाचा गर्व । वितळेल सर्व क्षणामाजी ॥
कवींचा तूं कवि तुझ्या पायांपाशीं । मज रहायासी स्थान देईं ॥
माझ्या जीविताची मुरली सरळ । सुंदर मंजुळ बनवीन ॥
वेणूच्या या छिद्रीं तुझे रम्य स्वर । भरोत सत्वर कविराया ॥

भावार्थ—परमेश्वरा ! तूं कवींचा कवि आहेस. तुझ्यापुढें मी कवित्वाचा गर्व वाहून कसें चालेल ? माझ्या गीतांमध्यें छंदःशास्त्रांतील अलंकार नाहीं आणि

शब्दलालित्य नाहीं. मी रचलेलीं गीतें प्रासादिक आहेत असाहि मला गर्व वाटत नाहीं. मी या शास्त्रांतील नियमाच्या भरीस पडून गीत रचूं लागलों तर माझें सर्व चित्त माझी कृति अलंकृत करण्याकडे जाऊन त्या कृतींत तुझा प्रेमा वठणार नाहीं. ताल, सूर आणि यमकें यांच्यांत गढून गेल्यावर तुझ्या गुणानुवादाचा रम्य ध्वनि या काव्यांतून उमटणार नाहीं. तुझा महिमा लक्षांत आणिला आणि तुझें स्वरूप या मनश्चक्षूनें पाहिलें म्हणजे माझ्या कवित्वशक्तीचा सर्व गर्व एका क्षणांत नाहींसा होतो. तूं कवींचा कवि आहेस. तुझ्या चरणापाशीं मी रहावें हीच माझी इच्छा. हें माझें जीवित मुरलीप्रमाणें सरळ व्हावें, मुरलींतून ज्याप्रमाणें रम्य स्वर निघतात त्याप्रमाणें माझ्या हस्तें सर्वांस संतोषदायक अशीं सत्कृत्यें घडावीं, आणि तुंवा या जीवितरूपी मुरलीमध्यें कर्णमधुर व मनास आल्हाद देणारे सूर भरावे हीच माझी प्रार्थना आहे.

**रहस्य**—ज्यांत प्रसाद नाहीं तें काव्य नव्हे. प्रसाद म्हणजे ईश्वराचा प्रेमा, ईश्वराची कृपा आणि ईश्वराची भक्ति. प्राचीनकालचीं सर्व काव्यें ईश्वरविषयक व प्रासादिक आहेत. त्यांत नियमबद्धता, ताल, शब्द–लालित्य वगैरे गुणांचा अभाव असला तरी प्रेम, माधुर्य, भक्ति व निर्मलत्व असल्यामुळें या काव्यांतून प्रसाद उत्पन्न होतो. साधुसंतांस देखील कवित्वाचा गर्व वाहणारांबद्दल तिटकारा आहे.

**कवीश्वरांचा तो आम्हांसी विटाळ । प्रसाद वोंगळ चिवडिती ॥**
**सोन्या शेजारीं ते लाखेची जतन । संतत ते गुण जैसे तैसे ॥**
**सेव्य सेवकता न पडतां ठावी । तुका म्हणे गोवी पावती हीं ॥**

म्हणजे ईश्वराचे गुणानुवाद गायाला किंवा त्याचें चिंतन करायाला शास्त्रविहित मंत्रतंत्राची किंवा प्रार्थनापर सूक्तांची आवश्यकता नाहीं. सरळ अंतःकरणानें ईश्वराला शरण जाऊन त्याचा महिमा वेड्या वांकड्या शब्दांनीं गाणारा त्याला प्रिय होतो.

**वेडें वांकडें गाईन । परि मी तुझाची म्हणवीन ॥**

अशा भावनेनें भगवंतास शरण जाणारा हा भवसागर तरून जातो. दंभयुक्त आचरणानें परमेश्वराची कृपा प्राप्त होणार नाहीं. परोपकारबुद्धि, सर्व भूतमात्राच्या ठायीं प्रेम, दीन आर्त व पतित जनांस पोटाशीं धरून त्यांचें दुःखाचें ओझें शक्त्यनुसार कमी करणें हा एकच धर्ममार्ग ईश्वरास प्रिय आहे. या मार्गानें जाणाऱ्यांच्या जीविताचें सार्थक होतें. प्रसाद नसलेलें काव्य कवीश्वरास रुचणें शक्य

नाहीं. सुसंस्कृत मधुर शब्द, कर्णमधुर स्वर आणि अलंकारिक भाषा यांच्या योगें ईश्वरास आळविला पाहिजे असें नाहीं.

**नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥**
**नाहीं तयेविण भुकेला विठ्ठल । येइल तैसा बोल रामकृष्ण ॥**
**देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंसीं प्रीति भावबळें ॥**
**तुका म्हणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥**

याप्रमाणें ज्यांनीं आपल्या अंतःकरणाच्या ठायीं ईशभक्तीला कायमचें ठाणें दिलें त्यांचें जीवनचारित्र्य ( मुरलीप्रमाणें ) सरळ आणि आल्हाददायक झाल्यावांचून राहणार नाहीं. ज्याप्रमाणें मुरलींतून मधुर व प्रसन्नतादायक सूर निघतात त्याप्रमाणें अशा भक्तांच्या हस्तें प्रेमळ व सुखकारक कर्में घडतात. भगवंतांनीं अर्जुनास कर्मांची व्याख्या अशी सांगितली कीं

**भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥**

म्हणजे चराचराची उत्पत्ति आणि वृद्धि करणारें जें आचरण तें कर्म होय. अशा प्रकारें शुभसंवर्धक कर्माचरण करून प्रपंचांत परमार्थप्राप्ति करून घेणें हेंच परम ध्येय आहे. भक्ति, ज्ञान, वैराग्य आणि आत्मोन्नतीसाठीं तळमळ यांच्या योगानें हें ध्येय गांठणें शक्य व सुलभ आहे.

---

## ॥ गीत ४४ ॥

बं.—आमि हे थाय थाकी शुधू—( इं. १५ )

**तुझें गीत गाया आलों येथ आजी । जगत्सभेमाजी स्थान देई ॥**
**तुझ्या या ब्रह्मांडीं मज स्थान नसे । निरर्थक असे जन्म माझा ॥**
**गाया तुझें गीत आलों मी जन्मासी । लावीन प्राणासी याचि काजा ॥**
**निशाकालीं शांत मंदिरीं प्रभूजी । आराधना तुझी करायातें ॥**
**देई तूं आदेश गीत तुझें गाया । मज नृपराया दयानिधे ॥**
**होतां आकाशांत प्रभात संचार । सुवर्णाचे सूर निघतील ॥**
**घेवोनीयां वीणा करीन मी गान । देई मज मान त्वत्सेवेचा ॥**

**भावार्थ**—या जगत्सभेमध्यें तुझें गीत गाण्याच्या हेतूनें मी आलों आहें. या ब्रम्हांडांत माझ्या हातून महत्वाची कामगिरी होणें शक्य नाहीं. त्या अर्थी माझा

जन्म निरर्थक आहे. तेव्हां याचा कांहीं तरी उपयोग व्हावयाचा असेल तर एकच मार्ग आहे. तो म्हटला म्हणजे तुझें गीत गाणें आणि तुझी सेवा करणें हा होय. आपल्या आयुष्यांतील निशाकालीं म्हणजे संकटाच्या समयीं तुझें चिंतन करण्याविषयीं तुझी आज्ञा होऊं दे. रात्र जाऊन प्रभातसंचार झाला किंवा तुझ्या कृपेमुळें संकटाचें निरसन होऊन आशेचीं किरणें पडूं लागलीं म्हणजे माझ्या कंठांतून आनंदाचे सूर निघतील. तुझें गीत गाण्याचा बहुमान या जगत्सभेंत प्राप्त व्हावा हीच तुझ्या चरणापाशीं माझी प्रार्थना आहे.

**रहस्य**—प्राणिशास्त्राचा अभ्यास करून अनेक शोधांअंतीं शास्त्रज्ञांनीं असा सिद्धांत प्रस्थापित केला आहे कीं लक्षोगणति वर्षें क्रमाक्रमानें प्राण्यांची उत्क्रांति होऊन शेवटीं हा मनुष्यप्राणि उत्पन्न झाला आहे. लक्षावधि योनींतून जन्म घेत घेत शेवटीं जीवाला उत्तम असा नरदेह प्राप्त होतो असें प्राचीन उपनिषत्कार सांगतात. कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी नरदेह सर्वांमध्यें श्रेष्ठ आहे असें मानलें असून या देहाच्या योगानें जन्माचा उद्धार करून घेतां येतो असें जगांतील तत्त्वज्ञान्यांचें मत आहे. हा उद्धार करून घेण्याचा मार्ग म्हटला म्हणजे ईश्वरभक्तीचा मार्ग आहे असें या जन्माचें रहस्य जाणणारे सांगतात. प्राणिकोटींत फक्त मनुष्यप्राण्याला मात्र ईश्वरविषयक भावना आहे. प्रापंचिक व्यवहार करण्यामध्यें सर्व प्राणिमात्र गढून गेलें आहे. अर्थात् मुंगीपासून मनुष्यापर्यंत सर्वांस आहार निद्रादि चतुर्विध कार्यें करावीं लागतात. या कार्यांस नीतीचें, दयाळुत्वाचें व दैविक स्वरूप प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य फक्त मनुष्य प्राण्यामध्यें आहे. यासाठीं प्रपंचास ईश्वरी गुण व ईश्वरी इच्छा यांची जोड देणें म्हणजे इतर प्राण्यांहून भिन्न तऱ्हेनें वागून या जन्माचें सार्थक करून घेणें आहे. याप्रमाणें वर्तन करणें आणि सामर्थ्यानुसार कार्यभाग उरकणें यालाच ईश्वराचें गीत गाणें असें म्हणतां येईल. याप्रमाणें गीत गाण्यास प्रत्येक मनुष्यानें यत्न केला पाहिजे. यांतच त्याचें कल्याण आहे. जशी अंतःकरणपूर्वक भगवद्भक्ति करणाऱ्या भक्ताची मनोवृत्ति असते तशी ईश्वराप्रीत्यर्थ कार्य करणाऱ्या प्रापंचिकाची वृत्ति झाली पाहिजे.

**गातों नाचतों आनंदें । टाळ घागरियांच्या छंदें ॥**
**तुझी तुजपुढें देवा । नेणों भाव कैसी सेवा ॥**
**नेणों ताळ घात मात । भलते सवां पाय हात ॥**
**लाज नाहीं शंका । प्रेम घाला म्हणे तुका ॥**

प्रेमास भुकेलेला भक्त ज्याप्रमाणें लाजलज्जा सोडून ईश्वरापाशीं प्रेम मागतो त्याच प्रमाणें ईश्वराचें कार्य करण्यासाठीं निघालेल्या मनुष्यानें स्वतःविषयींचा विचार बाजूस सारून भगवत्सेवेसाठीं खपलें पाहिजे. ही सेवा केल्याशिवाय या जगत्सभेंतून निघून गेल्यास त्याचा जन्म व्यर्थ होईल.

शरणागत झालों । तेणें मीपणा मुकलों ।
आतां दिल्याचीच वाट । पाहों नाहीं खटपट ॥
नलगे उचित । कांहीं पहावें संचित ॥
तुका म्हणे सेवा । माने तैसी करूं देवा ॥

---

## ॥ गीत ४५ ॥

बं.—जगते आनंद यज्ञे आमार निमंत्रण ( ई. १६ )

आनंद यज्ञासी आलें निमंत्रण । मानवजीवन धन्य झालें ॥
माझे नेत्र तुझ्या स्वरूपीं गुंतले । पूर्णपणें धाले दर्शनानें ॥
गानालापीं मग्न झाले हे श्रवण । आनंदांत पूर्ण रंगलों मी ॥
यज्ञकार्यीं मज वेणू वाजवाया । तुंवा प्रभुराया आज्ञापिलें ॥
माझ्या जीविताचें हास्य सुखदुःख । गुंफोनी सुरेख गीत केलें ॥
करीं निवेदन समय का झाला । अंतरीं जायाला दर्शनासी ॥
तुझ्या दरुशनें पावन होवोनी । प्रेमें जयध्वनि ऐकेन मी ॥

**भावार्थ**—मला आनंद यज्ञाला येण्यासाठीं प्रभूचें निमंत्रण आलें असून मनुष्य जन्मास आल्याबद्दल धन्यता वाटूं लागली आहे. प्रभूच्या स्वरूपामध्यें माझें चित्त पूर्णपणें गुंतलें आहे आणि हें दर्शन घडल्यामुळें माझ्या मनाला फार आनंद झाला आहे. जिकडे तिकडे गानाचा सुस्वर कानीं पडतो, त्यामुळें मला फार हर्ष होतो. माझ्या जीवनक्रमांत सुखदुःखाचे जे अनेक प्रसंग आले ते एकत्र करून ही माझी गीतमाला मी तयार केली आहे. प्रभूच्या आज्ञेप्रमाणें मी वेणू वाजवीत आहें. आतां माझें कार्य संपलें. शेवटचें प्रभूचें दर्शन घेऊन त्याच्या नामाचा जयघोष करावा असें मला वाटतें. तरी मी प्रभूच्या दर्शनाला जाऊं काय ?

**रहस्य**—या विश्वाच्याठायीं आपणांस मनुष्यजन्म प्राप्त होणें म्हणजे येथें चालणाऱ्या उत्सवास हजर राहण्यासाठीं निमंत्रण आहे. या उत्सवांत चहूंकडे चाललेल्या आनंदाचे आम्ही भोक्ते होतों. ईश्वराच्या विश्वरचनेंतील कौशल्याकडे डोळे लागले म्हणजे तेथून दृष्टि हालत नाहीं. इतकी ही रचना आनंद देणारी व उत्साहदायक आहे. अशा उत्सवांत निमंत्रितांस भाग घेण्याचा मान मिळाल्यावर स्वसामर्थ्यानुसार त्यांनीं प्रभूची सेवा बजाविली पाहिजे. स्वामीच्या कार्यांत तनुमनधनेंकरून गुंतणें हा सेवकाचा धर्म आहे. तो केला पाहिजे. उत्सवाची परिसमाप्ती झाली म्हणजे निघून जाण्यापूर्वी प्रभूजींचा निरोप घेणें आणि त्यांच्या नामाचा जयघोष करणें अगत्याचें आहे. यांतच जन्माचें सार्थक आहे. भगवंताच्या दरबारीं हजर राहण्याचा मान मनुष्यास मात्र मिळतो. भगवत्सेवा करण्याचा अधिकार त्यालाच प्राप्त झालेला आहे. त्या अर्थी ईश्वरसेवेविषयीं आळस न करितां सद्वर्तनाच्या योगानें त्याच्या सन्मुख उभें राहण्याची पात्रता प्रत्येकानें आपल्या अंगीं आणून घेतली पाहिजे.

**धन्य दिवस आजि डोळीयां लाधला । आनंद देखीला धरणीवरि ॥**
**धन्य झालें मुख निवाली रसना । नाम नारायणा घोष करूं ॥**
**धन्य हें मस्तक सर्वांग शोभलें । संतांचीं पाउलें लागताति ॥**
**धन्य आजि पंथें चालती पाउलें । टाळिया शोभले धन्य कर ॥**
**धन्य तुका म्हणे आम्हासी फावलें । पावलों पाउलें विठोबाचीं ॥**

याप्रमाणें संसारांतील सर्व कार्यें शक्त्यनुसार करून शेवटीं जातांना ईश्वराचें ध्यान करीत देह ठेवणें यासारखें उत्तम या जन्माचें दुसरें साध्य व सार्थक नाहीं.

---

## ॥ गीत ४६ ॥

बं.—संसारे ते आर जाहारा-( इं. ३२ )

**पूर्ण जे संसारीं प्रेम दर्शवीति । ते मज बांधीति घोर पाशीं ॥**
**त्यांच्या प्रेमाहुनि तुझें प्रेम मोठें । बंधन वोखटें परि नाहीं ॥**
**बंधनावांचोनीं मज राहूं देसी । आड तूं लपसी मोकळा मी ॥**
**विसरेन तयां म्हणोनी मजला । न देति राह्याला एकटाचि ॥**
**दिनांवरि दिन निघोनियां जाती । परि तुझी मूर्ति दिसेना ती ॥**

**नाहीं आळविलें तुज न चिंतिलें । तरी आलिंगिलें प्रेमें तुंवा ॥**
**माझ्या प्रेमाशेनें तुझें प्रेम वसे । वाट पहातसे मत्प्रेमाची ॥**

**भावार्थ**—ईश्वर मनुष्यावर प्रेम करतो, परंतु या प्रेमामुळें मनुष्याचें स्वातंत्र्य नष्ट होत नाहीं. मनुष्यें मनुष्यांवर प्रेम करितात त्यामुळें त्यांना बंधन प्राप्त होतें. संसारी जन एकमेकांवर प्रेम करतात आणि या प्रेमाच्या पाशांमुळें त्यांना एकमेकांस सोडून राहतां येत नाहीं. परंतु परमेश्वराचें प्रेम मानवी प्रेमाहून अधिक असलें तरी मनुष्याला बंधनावांचून राहतां येतें. ईश्वराचें चिंतन केलें नाहीं तरी जें सुख द्यावयाचें तें तो देतच असतो. यावरून असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं देव प्रेमाचा भुकेला असून त्या प्रेमाची प्राप्ति आपणास होईल म्हणून तो वाट पहात असतो आणि या अवधींत आपलें प्रेम कमी करीत नाहीं.

**रहस्य**--संसारांत आप्त, इष्ट, मित्र, सगेसोयरे हे सर्व प्रेमपाशांनीं एकत्र बांधले जातात. त्यांना वियोगापासून व्यथा होते, आणि सहवासामुळें आनंद होतो. हें प्रीतीचें बंधन विलक्षण आहे. तें तोडणें जीवावर येतें. परंतु कितीहि प्रयत्न केला तरी ही वियोगावस्था चुकविणें शक्य नाहीं. सृष्टिनियमानुसार संयोग व वियोग यांचा कालानुसार संबंध घडतो. यास कारण अहंभाव, अहंकार किंवा ममता आहे. मी आणि माझें, या शब्दांत व्यक्त होणारी ममत्वबुद्धि या जीवात्म्याची अनेक पदार्थमात्र व भूतमात्र यांशीं गांठ घालते. हें बंधन फार प्रिय होऊन बसतें. ममत्व–भावनेमुळें जे आपलेसे वाटतात त्यांचा सदैव सहवास घडावा, त्यांजपासून मनास शांतता प्राप्त व्हावी आणि जीवास सुख प्राप्त व्हावें असें आपणास वाटतें. याज्ञवल्क्यानें आपली पत्नी मैत्रेयी हिला सांगितलें कीं—

**न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवत्यात्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति । न वा अरे जायायै कामाय जाया प्रिया भवत्यात्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति । न वा अरे पुत्राणां कामाय पुत्राः प्रिया भवन्त्यात्मनस्तु कामाय पुत्राः प्रिया भवन्ति । न वा अरे वित्तस्य कामाय वित्तं प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय वित्तं प्रियं भवति ॥**

( बृहदारण्यकोपनिषत् २–४ )

**अर्थ**—पतीच्या कार्याकरितां भार्येला पति प्रिय होत नसतो. आपल्याच कार्याकरितां पति प्रिय होतो. भार्येच्या कार्याकरितां भार्या प्रिय होत नसते.

आपल्या कार्याकरितां भार्या प्रिय होते. पुत्रांच्या कार्याकरितां पुत्र प्रिय होत नसतात. आपल्याच कार्याकरितां पुत्र प्रिय होतात. वित्ताच्या कार्याकरितां वित्त प्रिय होत नसतें. आपल्याच कार्याकरितां वित्त प्रिय होतें.

अर्थात् अन्योन्य प्रेमाला प्रत्येकाच्या अंतःकरणांतील सुखाच्या वासना कारणीभूत होतात आणि या वासनांची अपूर्तता हेंच दुःखाला कारण होतें. वासनांची परिपूर्णता व्हावी म्हणून एक दुसऱ्यास चिकटून राहतो आणि प्रेमाचे पाश अनेकपरीनें बळकट करीत जातो. या सर्व प्रीतिव्यवहाराच्या बुडाशीं एक प्रकारचा स्वार्थ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु भगवंतास हा स्वार्थ नाहीं. त्याचें प्रेम केवळ प्रेमासाठींच आहे. म्हणून मनुष्य भगवंतास विसरला तरी भगवत्कृपेचा वर्षाव अखंड चालू असतो. वायु आप तेज वगैरे त्याच्या देणग्या अव्याहत चालूच असतात.

> **कृपावंत किती । दीनें बहु आवडति ॥**
> **त्यांचा भार वाहे माथा । करी योगक्षेम चिंता ॥**
> **भुलों नेदी वाट । करीं धरूनी दावी नीट ॥**
> **तुका म्हणे जीवें । अनुसरतां एक भावें ॥**

---

## ॥ गीत ४७ ॥

बं.—तव सिंहासनेर आसन हते ( इं. ४९ )

**रत्नसिंहासन त्यजोनी आलासी । माझ्या पर्णकुटिशीं धांव घेत ॥**
**कोनाकोपऱ्यांत बैसोनीयां गीत । सुखें होतों गात मनामाजी ॥**
**गानाचा आलाप गेला तुझ्या कानीं । आलासी धांवोनी माझ्या द्वारीं ॥**
**राजगृहीं तुझ्या असति अनेक । कुशल गायक गुणी थोर ॥**
**जरी गुणहीन अकुशल गानीं । प्रेमगानपानीं रमलासी ॥**
**विश्वतानेमाजी प्रेमळ मधुर । माझा करुणस्वर मिसळला ॥**
**आलासी घेवोनी सुममाला भेट । मज द्यावया थेट उभा द्वारीं ॥**

**भावार्थ**—परमेश्वरा, मी एका कोपऱ्यांत बसून मनामध्यें तुझ्या विषयींचें प्रेमगीत गात होतों. या गानाचा सूर तुला ऐकूं येऊन तूं तुझें रत्नसिंहासन सोडून माझ्या या झोंपड्याच्या द्वाराशीं येऊन थडकलास. तुझ्या दरबारीं किती तरी

कुशल गाणारे आहेत. मला गातां येत नाहीं. परंतु माझ्या प्रेमाचा शब्द तुला प्रिय होऊन तूं या गानाला भुलून आलास हें खरें आहे. माझी करुणापर वाणी या विश्वांत अखंड चालणाऱ्या तुझ्या स्तोत्रांत मिसळून जातांच मला भेट देण्यासाठीं ही पुष्पमाला घेऊन तूं आलास आणि माझ्या द्वारीं उभा राहिलास.

**रहस्य**—दीन, पंगु आणि प्रपंचांतील तापामुळें त्रस्त झालेला ईश्वरभक्त केवळ आपल्या प्रेमानेंच ईश्वराची कृपा प्राप्त करून घेऊं शकतो. ईश्वरास गानाच्या आलापांनीं वश करून घेण्याची शक्ति मनुष्यांमध्यें नाहीं. हें दर्शविण्यास संतांनीं ईश–दरबारांतील गायकांचें वर्णन पुढील शब्दांत केलें आहेः—

**गणेश शारजा करिती गायना । आणि देवांगना रंभे पेशा ॥**
**तेथें आम्ही मानवांहीं विनवावें तें काय । सुरवर पाय वंदिति जेथें ॥**
**ज्याच्या गायनासी तटस्थ शंकर । त्याही पार न कळे तुझा ॥**
**तुका म्हणे आम्ही किंकर ते किती । इंद्राचीहि मति नागविसी ॥**

परंतु अशी जरी स्थिति आहे तरी भक्ताच्या अंतःकरणांत प्रेमलहरी उसळूं लागतांच भगवत्कृपेचा लाभ होतो. त्याचें चित्त व ईश्वराचें चित्त एक झाल्याप्रमाणें होऊन देही देहभान विसरतो. भक्तिपूर्वक ईश्वर भजन करणारा शब्द, ताल, स्वर यांकडे पहात नसतो. हें भजन योग्य प्रकारें करण्याचा भार देखील तो ईश्वरावर घालतो.

**रंगीं रंगें नारायणा । उभा करितों कितेना ॥**
**हातीं घेवोनीयां वीणा । कंठीं राहें नारायणा ॥**
**देखिलीसे मूर्ति । माझ्या ह्रदयाची विश्रांति ॥**
**तुका म्हणे देवा । देई कीर्तनाचा हेवा ॥**

अशा रीतीनें ईश्वरास आळविणाऱ्या भक्ताच्या वाणींत प्रसाद, कंठाचे ठायीं माधुर्य आणि स्वरामध्यें प्रेम आणि श्रद्धा यांचा रस आपोआप उत्पन्न होतो. आणि या रसाचा जो भोक्ता नारायण तो अवचित उडी घालून भक्ताची मनीषा पूर्ण करतो. भक्तिसाफल्य तें हेंच होय.

---

## ॥ गीत ४८ ॥

बं.—ताइ तोमार आनंद आमार पर. ( इं. ५६ )

**याचसाठीं तुझा पूर्ण प्रेमानंद । प्रगटे अखंड माझेठायीं ॥**
**याच कारणें तूं अवतरलासी । प्रेमें गांठलासी मज दीना ॥**
**त्रिभुवननाथा मजवांचोनीयां । स्थान त्वत्प्रेमा या सांग कैंचें ॥**
**तुझे चित्तीं माझें चित्त हें मिनलें । अंतर्यामीं खेळे प्रेमरस ॥**
**माझ्या जीविताच्या सर्व कार्यांतरीं । तरंगते हरी तुझी इच्छा ॥**
**विचित्र रूपें तूं धारण करिसी । हृदय विंधिसी नृपनाथा ॥**
**मनोहर वेषें जगतीं फिरसी । नित्य जागतोसी प्रभुराया ॥**
**याचसाठीं तुझें प्रेम गुप्त होई । शुद्ध प्रेमाठायीं भक्ताचीया ॥**
**भक्तामाजी तुझें सम्मीलन होतें । तदा प्रकाशते मूर्ति तुझी ॥ १ ॥**

**भावार्थ**—परमेश्वरा, माझ्यावांचून तुझ्या प्रेमाला जागा तरी कोठें आहे? म्हणूनच तूं माझ्यामध्यें प्रगट होऊन प्रेमानंद दर्शवितोस. माझ्यामुळें तुला आनंदाचा अनुभव घेतां येतो; म्हणूनच तूं तुझ्या स्थानाचा त्याग करून नाना रूपांनीं या मृत्युलोकांत अवतरतोस. माझ्या आणि तुझ्या चित्ताचें पूर्णपणें मीलन झालें असून तुझी इच्छा माझ्या सर्व कार्यांमध्यें प्रगट होत आहे. बहुविध रूपांनीं या जगत्संसारामध्यें तूं वावरत आहेस. तेणें करून माझें मन आकर्षून घेतोस. माझ्या दृष्टीला तूं अनेक रूपांनीं व्यक्त होत आहेस. आणि विश्वाच्या संसारामध्यें सर्व ठिकाणीं तुझें अस्तित्व भासत आहे. भक्तांचें आणि तुझें चित्त एक होतें तेव्हां तुझ्या प्रेमाची ज्योत भक्ताच्या अंतःकरणीं पेटते आणि त्या वेळीं तुझी दिव्य मूर्ति प्रकाशित होते.

**रहस्य**—ईश्वराचें प्रेम मनुष्यावर आणि मनुष्याचें प्रेम ईश्वरावर अशी ही प्रेमाची रम्य कथा भक्तांनीं गाइली आहे. इतर प्राणी व मनुष्य प्राणी यांच्यांतील महत्वाचें अंतर म्हटलें म्हणजे मनुष्याच्या अंतःकरणांत ईश्वरविषयक भावनेचें बीज आहे. ही भावना प्रेम आणि आदर यांहीं युक्त असून हिच्यामुळें मनुष्याच्या ठायीं नम्रपणा, स्वार्थत्याग, सत्यप्रीति इत्यादि सात्विक व दैविक मानलेल्या गुणांचा प्रादुर्भाव झालेला आहे. हे गुण ज्या मानानें समाजाच्या, जगाच्या किंवा राष्ट्राच्या अंगीं व्यक्त होत असतील त्या मानानें त्यांच्यांत दैविक तेज व सत्त्व आहे असें म्हणतां येईल. या दैविकपणामुळें ईश्वराचें सख्य अशा समाजाशीं,

जनांगाशीं किंवा राष्ट्राशीं असतें. भज्य आणि भक्त यांच्यांतील हें सख्य कल्याण-कारक आहे असें आजवर मानवी इतिहासावरून सिद्ध होतें. संतांनीं देवाविषयीं काढलेले उद्गार प्रेमळपणाचे असून या प्रेमाचा आस्वाद घेण्यासाठींच देवाला अवतरावें लागतें असें दर्शविलें आहे.

भक्ताविण देवा । कैंचें रूप घडे सेवा ।
शोभविलें येरयेरां । सोनें एके ठायीं हिरा ।
देवाविण भक्ता । कोण देता निष्कामता ।
तुका म्हणे बाळ । माता जैसें स्नेहजाळ ॥

याप्रमाणें भक्त आणि देव यांच्यांतील हा संबंध विलक्षण खरा—

भक्त देवा घरिं सुना । देव भक्ताचा पोसणा ॥
येर येरां जडलें कैसें । जीवा अंग जैसें तैसें ॥
देव भक्तांची कृपाळू माता । भक्त देवाचा जनिता ॥
तुका म्हणे अंगें । एक एकाचिया संगें ॥

---

## ॥ गीत ४९ ॥

बं.—हे मोर देवता भरिया ए देहप्राण–( इं. ६५ )

भरला संपूर्ण माझा देह प्राण । काय सुधापान देऊं देवा ॥
माझीया नयनें तुझी सर्व सृष्टि । पहाया ही दृष्टि पुरेल का ॥
माझे कर्णाठायीं स्वस्थ बैसोनीयां । तोष का ऐकाया तुझें गान ॥
तुझी सृष्टि रची माझीया अंतरीं । विचित्र वाग्लहरी असंख्यात ॥
तुझ्या संगें देवा लाभतां स्वत्प्रीति । येतसे जाग्रति माझ्या गीतां ॥
स्वतःसि माझेठायीं अर्पोनीयां । सेविसी तुझीया माधुर्यातें ॥

**भावार्थ**—देवा माझ्या देहामध्यें आणि प्राणामध्यें संपूर्ण आनंद भरला असून तुला या वेळीं काय अमृतपान देऊं असें माझ्या मनाला झालें आहे. या सर्व सृष्टीकडे पाहण्याला तुला माझ्याच नेत्रांचा उपयोग करावा लागत असून ही माझी दृष्टि या कार्याला पुरेल काय असा मला संशय येतो. तुझेंच गान या जगतामध्यें चाललें आहे; तें तूं माझ्याच कर्णद्वारें ऐकतोस. असें केल्यानें तुला आनंद प्राप्त होतो काय ? तुझी ही सृष्टि पाहूं लागलों म्हणजे माझ्या वाणींतून

शब्दांच्या लाटा उसळतात. इतकी ही वाणी स्फुरण पावते. तुझ्या सहवासांत राहून तुझ्या प्रेमाचा वांटेकरी होतांच माझ्या गीतांना चैतन्य प्राप्त होतें. माझ्या देहामध्यें वास करून माझ्या द्वारें तुझ्या या सृष्टींतील माधुर्याचें तूं सेवन करतोस.

**रहस्य**—आपल्याठायीं जी दैविक शक्ति आहे तिच्या योगानें या जगत्संसाराचें आम्ही रहस्य जाणतों. त्यांतील माधुर्याचा आस्वाद घेण्यास याच शक्तीचा उपयोग होतो. या शक्तीची तीव्रता जितकी कमी किंवा अधिक असेल त्या मानानें या सृष्टींतील सौंदर्य, उत्साह, उज्ज्वलता, प्रेम, आणि मधुरता यांचा अनुभव कमी अधिक घेतां येतो. याप्रमाणें अनुभवाची संपत्ति ज्यांस लाभली त्यांस परमेश्वर आपल्या द्वारें सर्व कार्य करवीत आहे असें वाटतें.

**तुज मज नाहीं भेद । केला सहज विनोद ॥**
**तूं माझा आकार । मी तों तूंच निर्धार ॥**
**मीं तुजमाजी देवा । घेसी माझ्या अंगें सेवा ।**
**मी तुजमाजी अचळ । मजमाजी तूं सबळ ॥**
**तूं बोलसी माझ्या मुखें । मी तों तुजमाजी सुखें ॥**
**तुका म्हणे देवा । विपरीत ठायीं नांवा ॥**

या प्रकारें ज्यांची वृत्ति अद्वैतपर झाली त्यांस आपण केवळ ईश्वराचें कार्य करण्यासाठीं जन्म घेतला आहे असें वाटतें आणि हें कार्य ईश्वराप्रीत्यर्थ आहे असें वाटून मनाला सुखदुःखाची मुळींच बाधा होत नाहीं. नित्यशः घडणाऱ्या सर्वेन्द्रियांच्या क्रिया ईश्वराप्रीत्यर्थ आहेत, त्यांचा प्रेरक व भोक्ता तोच आहे ही अत्यंत उदात्त भावना अंतःकरणांत जाग्रत झाल्यास मानवी दुःखाचें संपूर्ण निरसन होईल यांत संदेह नाहीं.

**जें जें कांहीं करितों देवा । तें तें सेवा समर्पे ॥**
**भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज ॥**
**आम्ही दुजें नेणों कोणा । हेंचि मना मन साक्ष ॥**
**तुका म्हणे जगन्नाथा । हें अन्यथा नव्हे कीं ॥**

जें जें करशील, खाशील, हवन करशील, देशील किंवा तप करशील तें तें सर्व मला अर्पण कर म्हणजे तुला कर्मांचें बंधन लागणार नाहीं असें भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें. या उपदेशाचा अनुवाद भागवतांत पुढीलप्रमाणें केला आहे.

**कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वाऽनुसृतस्वभावात् ।**
**करोति यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥**

काया वाचा मन इंद्रियें बुद्धि अगर आत्मा यांच्या प्रवृत्तीनें किंवा स्वभावानुसार जें कांहीं आपण करितों तें सर्व परात्पर नारायणाला समर्पण करावें.

ग्रा. क्र. ३५२१

## ॥ गीत ५० ॥

बं.—तव रविकर आसे कर बारा इया. ( इं. ६८ )

**रवीचीं किरणें येती पृथ्वीवरी । द्वाराच्या बाहेरी राहताती ॥**
**सारा दिन तेथें राहोनी अंधारीं । जाती तुझ्या घरीं परतोनी ॥**
**व्याकुल उद्गार ललित गान गीत । यांयोगें वहात अश्रुपूर ॥**
**नयनींचें जल घनरूप होई । घनासी या नेई रविकर ॥**
**नव नव रूपें नाना वर्णधारी । घेसी अंगावरी मेघोत्तरी ॥**
**लघु कृष्ण वर्णी चपल कोमल । घन हा श्यामल दुःखाश्रूंचा ॥**
**आवडे तुजसी बहु घनांबर । किति करुणाकर छाया त्याची ॥**
**निरंजना तुझा उज्ज्वल प्रकाश । उत्तरीयें खास झांकितोसी ॥ १ ॥**

**भावार्थ**—या संसारामध्यें अनेक हर्षदुःखाचे प्रसंग प्राप्त होतात. त्यांयोगें नेत्रांवाटे अश्रुपूर वहातो. या जलाचे मेघ ( ढगें ) बनवून त्या मेघांना परमेश्वराच्या चरणापाशीं नेण्यासाठींच कीं काय हीं सूर्यकिरणें पृथ्वीतलावर पडतात आणि द्वारासमोर अंधार पडेपर्यंत असतात. या घनाचें उत्तरीय ( पांघरुण ) करून, देवा, तूं तुझ्या अंगावर घेतोस. या उत्तरीयाला अनेक प्रकारचे वर्ण आहेत. हे वर्ण वारंवार बदलत असतात. हें उत्तरीय खरोखर तुला प्रिय आहे. परंतु त्याच्यामुळें तुझी प्रभा मात्र झांकली जात असून तुझा उज्ज्वल आणि शुभ्र प्रकाश माझ्या दृष्टीस पडत नाहीं. (अर्थात् मनुष्याच्या अंतःकरणांतून आलेले प्रेमळ सुखदुःखाचे उद्गार आणि नेत्रांवाटे आलेले अश्रु ईश्वरचरणीं पोंहचत असून त्यांच्या योगानें मनुष्यास ईश्वराचें स्वरूप दिसावें तसें उज्ज्वल दिसत नाहीं. सुखदुःखाच्या भरांत तो देवाचें शुद्ध स्वरूप पाहूं शकत नाहीं. )

**रहस्य**—मनुष्य सुखदुःखाच्या भरांत परमेश्वरास विसरतो किंवा त्याचें उज्ज्वल स्वरूप जाणूं शकत नाहीं. सुखाचा आनंद उपभोगीत असतां ईश्वरस्मरण

करणें त्याला आवश्यक वाटत नाहीं. आपल्या सामर्थ्यानेंच आपण सकल वैभवानंदाचा भोक्ता झालों आहों, तेव्हां ईश्वराचे उपकार मानण्याजोगें तरी काय आहे, अशा भावनेनें तो अहंकारास बळी पडतो. त्यामुळें त्याला ईश्वरस्वरूपाचें दर्शन घडत नाहीं. उलटपक्षीं दुःखीजन संकटकालीं ईश्वराचा धांवा करीत असून प्रार्थनेप्रमाणें फलप्राप्ति न झाल्यास ते ईश्वरास दोष देण्यास कमी करीत नाहींत. अशी जरी स्थिति आहे, तरी सर्वांवर समान प्रेम करणारा परमेश्वर सर्व मानवांच्या सुखदुःखांचीं अभ्रें आपल्या भोंवतीं गुंडाळून घेतो. अर्थात् सर्वांच्या सुखदुःखां-विषयीं जागरूक असून त्यांचे कष्ट निवारण करण्यासाठीं सदा तत्पर असतो. ही प्रेमळ ईशकृपा खऱ्या भक्तावांचून इतरांच्या लक्षांत येत नाहीं. जे अनन्यभावानें मला भजतात त्यांच्या कल्याणाविषयीं मी सदैव टपत असतों असें गीतेंत भग-वंतांनीं आश्वासन दिलें. यांतील रहस्य जाणण्यास भक्ताचेंच अंतःकरण पाहिजे. या प्रकारचें अंतःकरण ज्या भक्ताचें आहे त्याची दृढनिष्ठा, ईश्वराच्या कृपेविषयीं विश्वास आणि प्रेमळता यांच्यायोगें दुःखाचा भार कमी होतो. आनंदाचा ओघ दुणा-वतो. अश्रद्धावान् लोकांस हा अनुभव घेण्याचा धीर नसल्यामुळें त्यांच्या अंतर्यामीं सदैव संशय, भीति, चिंता आणि असंतोष यांचें काहूर माजलेलें असतें. ज्यांची वृत्ति शुद्ध, सात्विक व निष्ठामय झाली आहे त्यांस खात्रीनें वाटतें कीं—

**सुख सुखा भेटे । मग तोडिल्या न तुटे ॥**
**तुका म्हणे चित्त । माझें पायीं अखंडित ॥**

अशा वृत्तीच्या लोकांस केव्हांहि सुख प्राप्त व्हावयाचें हें ठरलेलें आहे. व्यव-हार जर सुखाचा तर सुखप्राप्ति झाल्याशिवाय कशी राहील ?

**सुखाचे व्यवहारीं सुखलाभ झाला । आनंदें कोंदला मागें पुढें ॥**
**संगती पंगती देवासवें घडे । नित्यानित्य पडे तेंची सांचा ॥**
**समर्थाचे घरीं सकल संपदा । नाहीं तुटी कदा कासयाची ॥**
**तुका म्हणे येथें लाभाचिया कोटी । बहु वाव पोटीं समर्थाचे ॥**

## ॥ गीत ५१ ॥

बं.—प्रतिदिन आमि हे जीवन स्वामि ( इं. ७६ )

**जीवनस्वामी का उभा मी राहीन । तुजपुढें दीन सर्व काल ॥
तुझ्या सन्मुख मी कर जोडोनीयां । राहीन कां राया सांग मज ॥
तुझीया अपार गगनाच्या तळीं । विजन शांत स्थळीं राहूं कां मा ॥
विनम्र हृदयें सजल नयनें । घालूं का प्रेमानें दंडवत ॥
विचित्र या तुझ्या संसारीं अनंत । कर्म अखंडित चालताहे ॥
अखिल जगाच्या जनीं राहोनीयां । दंडवत पायां घालूं का मी ॥
माझें कार्य होतां संसारीं संपूर्ण । करूं का वंदन महाराजा ॥**

**भावार्थ**—परमेश्वरा ! तूंच माझ्या जीवनाचा स्वामी आहेस. तुझ्या सन्मुख हात जोडून उभें रहावें अशी माझ्या मनाला तळमळ लागली आहे. ह्या विश्वाच्या ठायीं चाललेल्या तुझ्या संसारामध्यें अव्याहत कर्म चाललें आहे. जें कर्म माझ्या वांट्यास आलें आहे, तें संपवितांच मी तुझ्या चरणावर माझें मस्तक ठेवूं का ? नेत्रांवाटे प्रेमाश्रु वाहत आहेत अशा स्थितींत अत्यंत नम्र होऊन, तुझ्या चरणावर माझें मस्तक ठेवावें हीच माझी इच्छा आहे. जगामध्यें वावरत असतांना देखील माझें चित्त तुझ्या ठायीं असावें ही माझी मनकामना तृप्त करशील काय ?

**रहस्य**—जप तप ध्यान धारणा इत्यादि उपायांचें अंतिम साध्य काय आहे ? या उपायांनीं ईश्वराचा साक्षात्कार होतो अशी पूर्वापार समजूत आहे. आणि ईश्वरी साक्षात्कार हेंच अंतिम साध्य आहे. परंतु ईश्वरस्वरूपामध्यें लीन होण्याचें भाग्य ज्यांची वृत्ति ईश्वरमय झाली आहे त्यांसच प्राप्त होईल. प्रपंच व परमार्थ हे दोन निरनिराळे जीवनक्रम आहेत असें मानणारांस ईश्वराचा साक्षात्कार होणें शक्य नाहीं. प्रपंच व परमार्थ यांची सांगड घालून नम्र चित्तानें या विश्वाच्या संसारामध्यें जे कर्म करतात त्यांस ईश्वराची भेट होते. समोरासमोर राहून सच्चिदानंद स्वरूपामध्यें विलीन होण्याचें सौख्य अशा परमार्थी प्रापंचिकांना लाभतें. त्यांचें देवाकडे मागावयाचें तें हेंच असतें कीं—

**सन्मुखचि तुम्ही सांगावी जी सेवा । ऐसें माझे देवा मनोरथ ॥
नेघों आम्ही कांहीं चित्त घरें । आपल्या उदारें जीवावरि ॥
बोल परस्परें वाढवावें सुख । पहावें श्रीमुख डोळेभरी ॥
तुका म्हणे सत्य बोलतों वचन । करुनी चरण साक्ष तुझे ॥**

याप्रमाणें सेवा करण्यासाठीं तत्पर झालेल्या भक्ताला ईश्वराचें दर्शन हेंच परम सौख्य वाटतें. याचें तुकोबांनीं फार मार्मिक रीतीनें वर्णन केलें आहे.

माझ्या इंद्रियांसी लागलें भांडण । म्हणती कान रसना धाली ॥
करिती तळमळ हस्त पाद भाळ । नेत्रांसी दुष्काळ पडिला थोर ॥
गुण गाय मुख आइकति कान । आमुचें कारण तैसें नव्हे ॥
दरुषणें फिटे सकळांचा पांग । जेथें ज्याचा भाग घेईल तें ॥
तुका म्हणे ऐसें करीं नारायणा । माझी ही वासना ऐसी आहे ॥

---

## ॥ गीत ५२ ॥

बं.—देवता जेने दूरे रई दॉराय ( ई. ७७ )

मानुनी तूं देव दूर मी राहातों । तुज न जाणतों माझा ऐसा ॥
गणूनीयां तुज पिता तव पायीं । वांकवितों डोई नम्रपणें ॥
परी तुज बंधु मानोनीयां कर । धरीना पामर मूर्ख किति ॥
सहज आनंदें भेट नित्य नेमें । येवोनीयां प्रेमें देसी जेथें ॥
जेथ मजसी तूं आपुला मानिसी । तेथ मी जायासी विस्मरतों ॥
चुकतों मी तुज प्रेमें आलिंगाया । गुज निवेदाया तुझ्या कानीं ॥
माझ्या बंधूंमाजीं तूं एक असती । परि इतरांसी लेखीना मी ॥
तयांसवें माझें विभागीना धन । करितों सेवन तुजसंगें ॥
सुखाचे दुःखाचे आलिया प्रसंग । करितों न संग मनुजांचा ॥
राहातों सन्मुख तुझ्या मी विश्वासें । भय चिंता नसे तुझ्या सख्या ॥
विश्रांति-विहीन प्राणसागरींया । प्राणातें अर्पाया घाबरतों ॥
अविश्रांत श्रम संसाराचे काजीं । कराया न राजी जीव माझा ॥

**भावार्थ**—तूं माझा देव आहेस ही ( आदर व भीतियुक्त ) भावना माझ्या मनांत वसत असल्यामुळें मी तुझ्यापासून दूर राहतों. तूं माझा जिवलग आहेस असें जर मला पटतें तर तुझ्याजवळ आलों असतों. तूं माझा पिता आहेस हीच भावना माझ्याठायीं असल्यामुळें मी तुला मान देऊन तुझ्याशीं नम्र भावानें वागतों. परंतु तूं माझा पाठीराखा बंधु आहेस अशी माझ्या मनाची समजूत झाली असती तर मी तुझा हात धरून या जगांत चाललों असतों. ज्या ठिकाणीं

सदैव तुझी भेट होते आणि जेथें गेलों असतां मला तूं आपला मानशील अशा ( दीन दरिद्री अंध पंगु व गांजलेले लोक राहण्याच्या ) ठिकाणीं मी जात नाहीं. तूंच माझा बंधु आहेस. इतर अनेक जे माझे भाऊबंद आहेत त्यांची पर्वा धरून त्यांच्यासाठीं माझें धन विभागण्यापेक्षां तें सर्वस्वीं तुला अर्पण करणें योग्य आहे. अनेक सुखदुःखाचे प्रसंग आले असतां ( माझ्या भोंवतालीं असणाऱ्या ) मनुष्यांवर भरंवसा ठेवून राहण्यापेक्षां सर्व विश्वास मी तुझ्यावर ठेवून राहतों. मग मला भीति आणि चिंता कोठून असणार ? या संसाराच्या प्रचंड सागरामध्यें उडी टाकून विश्रांति शिवाय रात्रंदिवस ( तरून जाण्याची ) धडपड करण्यास माझा जीव तयार नाहीं.

**रहस्य**—भक्तिसंप्रदायामध्यें नवविधा भक्तीचा प्रकार रूढ आहे. या प्रकारानें ईश्वरास शरण जाणारा शेवटीं संपूर्णपणें ईश्वरमय होतो हें अनेक साधुसंतांच्या उदाहरणावरून सिद्ध होत आहे. परंतु सामान्य प्रतीच्या प्रापंचिकाची भक्ति व सेवा गंधपुष्पादिकांच्या योगानें मूर्तिपूजा करण्यापलीकडे जात नाहीं. देवास पाठीराखा समजून सर्वस्वीं त्याच्यावर विश्वास ठेवून राहणारे किती आहेत ? त्याचप्रमाणें दीन दुबळ्यांमध्यें ईश्वर असतो अर्थात् त्यांची सेवा म्हणजे ईश्वरसेवा असे मानणारे तरी किती आहेत ? आपलें धन, आपली शक्ति आणि आपलें सुखदुःख यांचा वांटेकरी परमेश्वर आहे असें मानून त्याच्यापाशीं आपल्या अंतर्यामींचें हितगुज सांगणारे तेच खरे भक्त होत. ज्यांची वृत्ति ईश्वरमय झाली त्यांना मात्र सर्व कार्यांमध्यें भगवंताची आठवण होते. आणि कोणत्याहि प्रकारचीं संकटें प्राप्त झालीं तरी तोच तारणारा आहे अशी दृढतर भावना असते. ही भावना आमच्यांत नसते म्हणूनच आम्ही सदैव कष्टी, संशयग्रस्त व चिंतेनें व्याप्त असतों. जो ईश्वरनिष्ठ आहे आणि ज्याला ईशप्रेमाची भूक लागली आहे त्याचें चित्त संसारांत असूनहि भगवंताच्या ठायीं स्थिर असतें.

**लौकिकासाठीं या पसाऱ्याचा गोवा । कांहीं नाहीं देवा लागा येत ॥**
**ठेवावा माथा ते तुचलावा पायीं । ठायींचिये ठायीं हालों नये ॥**
**ढवळिल्या मनें वितळलें रूप । नांव ऐसें पाप उपाधीचें ॥**
**तुका म्हणे देव प्रीतीनें कवळी । ठेवील जवळी उडवूनि ॥**

अर्थात् ईश्वराला जिवलग मानावा, बंधु मानावा, त्याला हितगुज सांगावें आणि त्याच्या इच्छेवर आपलें जीवित सोंपवावें. हा खरा सुखाचा मार्ग आहे.

## ॥ गीत ५३ ॥

बं.—आमार खेला जखन छिल तोमार सने ( इं. ९७ )

जंव तुझ्यासंगें होतों मी खेळत । नव्हतों जाणत तदा तुज ॥
नव्हती मजला तदा लाज भीति । मनीं शांति तृप्ति नव्हतीही ॥
प्रभातीं मजला संवगड्यापरि । येवोनीयां घरीं जागविलें ॥
तंव तुझ्यासंगें वनोवनीं गेलों । हिंडलों खेळलों मुक्तचित्तें ॥
गाइलीं त्वां गीतें अर्थ मी तयांचा । यत्न जाणण्याचा नाहीं केला ॥
तुझ्या संगें माझा प्राण होता गात । खेळत नाचत तालावरि ॥
संपला हा खेळ काय आतां दिसे । रूप हें प्रकाशे अकस्मात ॥
मूक शशि रवि निःशब्द गगन । त्वत्पदीं विलीन दिसताति ॥
विनत होवोनी अखिल भुवन । दिव्य त्वच्चरण-सेवा करी ॥

**भावार्थ**—ज्या वेळीं तुझ्याबरोबर खेळत होतों, त्या वेळीं तुझी खरी ओळख मला नव्हती. त्या वेळीं लाजलज्जा व भीति यांचा माझ्यावर परिणाम होत नसे आणि मनांत शांति किंवा समाधान यांचें अधिष्ठान नव्हतें. सकाळीं तुंवा मला निद्रेंतून जागें करावें आणि म्यां तुझ्या संगें रानावनांतून हिंडावें, खेळावें आणि गावें नाचावें हाच माझा आयुष्यक्रम असे. तुझ्या सन्निध आणि निकट सहवासांत राहून देखील तुझ्या गीतांचा अर्थ जाणण्याचा मी यत्न केला नाहीं. आतां खेळाचे दिवस गेले. तुझ्याकडे पाहूं लागलों म्हणजे तुझें हें ( विश्वमय विराट ) स्वरूप पाहून मी थक्क होतों. जणूं काय सूर्य आणि चंद्र देखील मूक स्थितींत तुझ्या चरणारविंदीं विलीन झाल्याप्रमाणें दिसतात. इतकेंच नव्हे तर अखिल विश्व तुझ्या सेवेमध्यें गढून गेलें आहे असें दिव्य दृश्य मला दिसत आहे.

**रहस्य**—अर्जुनाला श्रीकृष्णानें आत्मज्ञानाचा उपदेश केला. उपदेशाच्या योगानें अर्जुनाच्या अंतर्यामीं प्रकाश पडतांच त्याची दृष्टि शुद्ध झाली. आणि त्याला दिव्य चक्षूंचा लाभ होऊन या चक्षूंनीं जेव्हां तो संपूर्ण ब्रह्मांडाला व्यापून असलेल्या भगवंतास पाहूं लागला तेव्हां त्याच्या मनांत भीति व लज्जा उत्पन्न झाली. आणि त्याच वेळीं त्याच्या मनांतील सर्व संशयांचें निरसन होऊन त्याला शांतीचा लाभ झाला. जीवास समाधान नव्हतें तेंहि प्राप्त झालें. आपण भगवंतास न ओळखतां त्याच्याशीं सलगीनें वागलों हा आपल्या हातून मोठा प्रमाद घडला म्हणून त्याला अत्यंत वाईट वाटलें आणि त्यानें भगवंताची क्षमा मागितली. अर्जुन म्हणाला—

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ॥
वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनंतरूप ॥
सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं ह कृष्ण हे यादव हे सखेति ॥
अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥

हे भगवंता, तूं आदिदेव, पुराण पुरुष आणि या विश्वाचें श्रेष्ठ निधान आहेस. तूच सर्वज्ञ आणि ज्ञेय, परंधाम तें तूंच. हें विश्व सारें तुझेंच अनंतरूप आहे. हें न जाणतां तुला मी कृष्ण, यादव, सखा या नांवानें संबोधिलें हा मजकडून अज्ञानानें तुझा महिमा न कळल्यामुळें प्रमाद घडला. प्रेमामुळें तुझ्याशीं मी सलगीनें वागलों. तरी क्षमा कर.

याच प्रकारें अज्ञानावस्थेंत असतांना आम्हाला ईश्वराची खरी महति आणि त्याची खरी शक्ति समजत नाहीं. आमच्या नवसांना भुलून आमच्या बऱ्या वाईट इच्छा परमेश्वर पुरवीत असतो या मूढपणाच्या समजुतीवर आपण त्याच्याशीं खेळतों. देवास स्वत:साठीं राबण्यास सांगावें आणि आमचे मनोरथ पुरवून घेण्यासाठीं देवाचा उपयोग करावा असें आम्हांस वाटतें. या प्रकारची अज्ञानावस्था असेपर्यंत भगवंताच्या विश्वस्वरूपाचें दर्शन होणें शक्य नाहीं. आणि हें दर्शन झाल्यावांचून मनास शांतता व स्वास्थ्य मिळणें शक्य नसून आपला जीव संशय, दु:ख, भीति आणि अतृप्ति या तापदायक स्थितींत सदैव खितपत राहील. ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाचें दर्शन घडल्यावर जो आनंद प्राप्त होतो तो शाश्वत व अखंड शांतिदायक आहे.

शास्त्रांचें जें सार वेदांची जो मूर्ति । तो माझा सांगाती प्राणसखा ॥
ह्मणवुनि नाहीं आणिकांचा पांग । सर्व जालें सांग नामें एका ॥
सगुण निर्गुण जयाचीं हीं अंगें । तोचि आह्मांसंगें क्रीडा करी ॥
तुका ह्मणे आह्मी विधीचे जनिते । स्वयंभू आइते केले नव्हों ॥

अशा रीतीनें ईश्वरस्वरूप जाणल्यावर

सर्वकाळ माझे चित्तीं । हेची खांति राहिली ॥
बैसलें तें रूप डोळां । वेळोवेळां आठवे ॥
वेव्हाराची सरली मात । अखंडित अनुसंधान ॥
तुका म्हणे वेध झाला । अंगा आला श्रीरंग ॥

## ॥ गीत ५४ ॥

बं.—आमि हाल छाडिले तबे ( इं. ९९ )

नौकेचें सुकाणूं सोडितां मी जाणें । होतोसी त्वरेनें कर्णधार ॥
न्हावयाचें कार्य सहज घडेल । व्यर्थ ती जाईल धडपड ॥
वेड्या मना सोडी सर्व ताणाताण । करी तूं सहन पराभव ॥
जेथ तुज दिलें स्थान तेथ तूतें । बैसाया मिळतें भाग्य मानीं ॥
घडोघडी होतां वायूचा संचार । दीप वारंवार मालवे तो ॥
पुनः पुन्हा दीप चेतवाया जातों । तंव विसरतों युक्त कर्मे ॥
या पुढें मी ऐसें कधीं न करीन । स्वस्थ पहुडेन अंधारांत ॥
अंधारीं भेटीची प्रतीक्षा करीन । मांडोनी आसन गृहीं माझ्या ॥
प्रभो तुझी इच्छा तदा तूं येवोनी । बैस या आसनीं मौनत्वानें ॥

**भावार्थ**—या भवसागरामध्यें माझी कायानौका चालवीत असतां ज्या ज्या वेळीं जीव थकल्यामुळें किंवा आपली शक्ति व अक्कल चालेनाशी होऊन सुकाणुं धरण्यास मी असमर्थ होतों तेव्हां तूं प्रगट होतोस आणि सुकर्णधाराचें काम बजावतोस. जें कार्य तुझ्या कृपेमुळें घडणारें असेल तें घडल्यावांचून कधीं राहणार नाहीं. तर मग ही धडपड तरी कशास पाहिजे ? वेड्या मना, तुला तुझ्या सामर्थ्याची घमेंड आहे ती टाकून दे आणि तुझा पंगुपणा किंवा पराभव कबूल कर. तुला ईशदयेनें जें स्थान प्राप्त झालें आहे तेंच योग्य मानून हें स्थान मिळाल्याबद्दल भाग्यवान समज. ( वासनारूपी) वायूचा संचार होतांच ( ज्ञानाचे ) दिवे विझतात. आणि सर्वत्र ( अज्ञानाचा ) अंधार होतो. पुनः पुनः मी हे दिवे पेटविण्याचा यत्न करतों परंतु व्यर्थ. माझीं युक्त कर्मे देखील घडत नाहींत. तेव्हां यापुढें दिवे पुनः पुनः पेटविण्याच्या भरीस न पडतां ( अज्ञानाच्या ) अंधःकारांत राहून तुझ्या भेटीची वाट पाहीन. जेव्हां तुला योग्य वाटेल त्या वेळीं मला भेट दे.

**रहस्य**—अहंभावामुळें मनुष्याला आपण सदा विजयी होईन असें वाटतें. भवसागरांतून जीवन-नौका चालवीत असतां कधीं कधीं महत्संकटांत सांपडून नौकेचें सुकाणूं हातांतून सुटल्याप्रमाणें होतें. आणि ही नौका वादळांत सांपडून शेवटीं ती फुटून जाईल अशी भीति वाटते. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं अकल्पित रीतीनें सहाय्य मिळून संकटाचें निरसन होतें. याप्रमाणें स्वतःच्या

कल्पनेबाहेर व शक्तीबाहेर यशःप्राप्ति झाल्यामुळें अहंभाव गळून पडतो आणि आपला कोणीतरी पाठीराखा असून त्याच्या कृपेमुळें आपण संकटांतून पार पडलों हें कबूल करावें लागतें. स्वतःचा पराभव झाला असें मान्य करावें लागतें. ही स्थिति प्राप्त झाली म्हणजे आमच्या गर्वाचें निरसन होतें. आमच्या वासना कधीं संपूर्णपणें फलद्रूप होत नाहींत. कितीहि धडपड केली तरी आमच्या व्यवहारांत आमच्या इच्छेप्रमाणें यश येत नाहीं. म्हणून ज्ञानाच्या योगानें स्वतःच्या दुर्वासना जिंकून ईश्वरास प्रसन्न करून घ्यावें, आणि शांति व समाधान मिळवावें असें वाटतें. परंतु प्रापंचिक व्यवसायांमुळें ज्ञानलाभाची लालसा कायम न टिकतां ईश्वराची कृपा प्राप्त करून घेण्यास लागणारी एकांतिन् भक्ति आमच्या अंतःकरणाच्या ठायीं प्रदीप्त होत नाहीं. तेव्हां अनिवार्य संकटांबद्दल जीवास त्रास करून न घेतां नम्रपणें ईश्वरास शरण जावें हाच उत्तम मार्ग नव्हे काय ? साधुसंतांनीं हाच सरळ व फलदायक मार्ग स्वीकारला.

आम्ही जालों बळिवंत । होऊनियां शरणागत ॥
केला घरांत रिघावा । ठायीं पडियेला ठेवा ॥
हातां चडलें धन । नेणें रचिलें कारण ॥
तुका म्हणे मिठी । पायीं देऊनी केली सुटी ॥

याप्रमाणें ज्यांनीं ईश्वरचरणीं दृढ श्रद्धा ठेविली त्यांना या प्रपंचांतील अडचणीपासून बाधा झाली नाहीं. आपण निमित्तमात्र असून कर्ता करविता परमेश्वर समर्थ आहे ही भावना सुखदायक व शांतिदायक आहे.

देवावरी भार । वृत्ति अयाचित सार ॥
देह देवाचे सांभाळी । सार योजे यथा काळीं ॥
विश्वासीं निर्धार । विस्तारील विश्वंभर ॥
तुका म्हणे व्हावें । बळ एकचि जाणावें ॥

---

## ॥ गीत ५५ ॥

बं.—तोमाय चिनि बले आमि करेछि गरब लोकेर माझे ( इं. १०२ )

लोकांमाजि भारी वाहिला मी गर्व । जाणतों मी सर्व ज्ञान तुझें ॥
साऱ्या माझ्या कृतीमाजी तव रूप । दिसे त्यां अमूप बहु विध ॥
येवोनी श्रद्धेनें मजसी हे जन । पुसति तूं कोण सांग आम्हां ॥
तुझा परिचय मज आहे कैंचा । सांगतां मी त्यांचा कोप वाढे ॥
नसे मी जाणत तव रूप ऐसें । म्हणतां ते त्वेषें देती दोष ॥
केविलवाणी ही स्थिति देखोनीयां । स्वस्थ देवराया हंससी तूं ॥
नाना गीत-योगें गातों तुझी कीर्ति । तंव मज स्फूर्ति सहज ये ॥
गीतांचें या गूढ अंतःकरणातें । भेदोनीयां येतें बाहेरी तें ॥
अर्थ काय गीता जन विचारीति । सांगाया त्यांप्रति न जाणें मी ॥
वदतां मजसि नसे अर्थज्ञान । जाति संतापून हिणवीत ॥
ऐशि माझी गति पाहोनी हंससी । विनोद करिसी ऐसा देवा ॥

**भावार्थ**—मला तुझें संपूर्ण ज्ञान आहे असा मी लोकांमध्यें गर्व वाहिला. त्यांनाहि माझ्या कृतींमध्यें तुझें बहुविध रूप दिसलें ( अर्थात् माझे लेख, माझीं व्याख्यानें आणि मी रचलेलीं गीतें यांत तुझ्याविषयीं अनेक प्रकारें म्यां केलेलें स्पष्टीकरण त्यांस रम्य वाटलें ) म्हणून ते माझ्यापाशीं येऊन तुझ्याविषयीं ज्ञान कथन करण्यास मला सांगतात. मला हें ज्ञान नाहीं असें सांगतांच त्यांना राग येतो. तुझा महिमा गातांना माझ्या अंतःकरणाला स्फूर्ति येते आणि या स्फूर्ती-मुळें अंतर्यामींचे विचार शब्दरूपानें बाहेर पडतात. या गीतांचा अर्थ विचारण्या-साठीं माझ्यापाशीं लोक आले म्हणजे मला कांहींच समजत नाहीं असें मी सांगतों. तेव्हां ते चिडतात आणि माझी थट्टा करतात. देवा! ही माझी स्थिति पाहून तूं हंसत असतोस. ( तुझ्या स्वरूपाचें किंवा तुझ्या विषयींचें ज्ञान सांगण्याचें सामर्थ्य माझ्यामध्यें नाहीं. केवळ तुझा प्रसाद म्हणून तुझ्याविषयीं मी बोलत व गात असतों. हें मर्म लोक जाणत नाहींत. )

**रहस्य—घरोघरीं झालें अवघें ब्रह्मज्ञान । परी मेळवण नाहीं तेथें ॥** या उक्तींत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगणें जितकें सोपें आहे तितकें या ज्ञानाचें आकलन करून आपल्या जीवनक्रमांत या ज्ञानाचा आदर्श दाखविणें कठीण आहे. ईश्वरकृपेमुळें केवळ स्फूर्तीनें जे विचार प्रगट

होतात त्या विचारांचा उगम व त्या विचारांचा विषय देखील स्पष्ट शब्दांत सांगणें अशक्य आहे. स्फूर्तीनें आलेलें गीत प्रासादिक असतें म्हणजे ईश्वराच्या प्रसादाचें हें फल असतें. म्हणून संत सांगतात कीं

**करितों कवित्व म्हणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥**
**माझीये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ॥**
**काय मी पामर जाणें अर्थभेद । वदवी गोविंद तेंचि वदें ॥**
**निमित्त मापासी बैसविलों आहें । मी तों कांहीं नव्हे स्वामिसत्ता ॥**
**तुका म्हणे आहें पाईकचि खरा । वागवितों मुद्रा नामाची हे ॥**

राजाच्या नामाच्या शिक्क्याच्या अधिकारावर चालविलेला कारभार ज्याप्रमाणें राजाचा आहे त्याप्रमाणें ईश्वराच्या नामें चालविलेला व्यवहार–मग तो व्याख्यान, प्रवचन, काव्य, निबंध या रूपानें असो किंवा अन्य तऱ्हेचा असो—तो ईश्वराचाच आहे. त्याबद्दल मनुष्यानें गर्व वाहण्याजोगें नाहीं. म्हणून तुकोबा सांगतात—

**नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे बोल । विनवितों कोपाल संत झणीं ॥**
**नव्हती माझे बोल, बोले पांडुरंग । असे अंगसंगें व्यापूनियां ॥**
**मज मूढा शक्ति कैंचा हा विचार । निगमादिकांपार बोलावया ॥**
**तुका म्हणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगें भार घेतला माझा ॥**

---

## ॥ गीत ५६ ॥

बं.—तव चरणेर आशा ओगो महाराज.

**सोडिना मी आशा तव चरणाची । तुझीया प्रेमाची महाराजा ॥**
**जरी दीन हीन जिणें लज्जामय । तरी तुझे पाय सोडीना मी ॥**
**तुझें इंद्रजाल कोणासी कळेना । तुझीया योजना कोण जाणें ॥**
**गुप्त तुझें कार्य दृष्टिआड चाले । कोणासी न कळे केवीं घडे ॥**
**नियोजित कालीं सुमुहूर्त येतां । असंभाव्य कथा संभवति ॥**
**सहज संभाव्य चित्तप्रतीक्षित । घडविसी हित तदा वाटे ॥**
**सर्वां–अंतर्यामीं लज्जित या देशीं । सदैव वससी दयानिधे ॥**
**सकलां हृदयीं सर्व गृहां–आंत । वससी अज्ञात रात्रंदिन ॥**
**गूढ तुझी शक्ति करी कार्य वेळीं । आशा न त्यागिली महाराजा ॥**

**भावार्थ**—भगवंता, मी दीन हीन जरी आहें तरी तुझे चरण कधीं सोडणार नाहीं. तुझे चरण आणि तुझें प्रेम मला लाभल्यावांचून राहणार नाहीं असा मला पूर्ण भरंवसा आहे. तुझ्या योजना आणि तुझीं कार्यें केव्हां, कां व कशीं घडतात हें सांगणें अशक्य आहे. ज्या गोष्टी कधींच संभवनीय वाटत नाहींत त्या तुझी इच्छा होतांच एकदम घडून येतात. हा देश जरी हीन दीन स्थितीमध्यें आहे. तरी तुझा वास प्रत्येकाच्या हृदयामध्यें आणि सर्व गृहांमध्यें असून अज्ञात स्थितींत तूं रहातोस. तथापि तुझें कार्य चाललेंच आहे. तुशी शक्ति गूढ व अतर्क्य आहे. तूं माझा उद्धार करशील अशी मला आशा आहे.

**रहस्य**—सामान्य जनांस जगांतील व्यवहार मानवी सामर्थ्यांवर चालला आहे असें वाटतें. परंतु ज्यांनीं या विश्वांतील संसाराचें रहस्य जाणलें आहे त्यांस मानवी सामर्थ्यांच्या बुडाशीं ईश्वराची शक्ति कार्य करीत आहे असें वाटत असल्यामुळें ते सर्वत्र ईश्वराचेंच कार्य पहात असतात. राष्ट्रें संकटांत पडतात. त्यांची दशा अत्यंत दीन व हीन होते. परंतु असा एक काल प्राप्त होतो कीं त्या कालीं संकटांतून रस्ता काढणारे प्रतिभाशाली पुरुष निर्माण होतात आणि त्यांच्या हस्तें राष्ट्रोद्धाराचें कार्य अकल्पित रीतीनें घडतें.

**कासयाजी ऐसा माझे माथां ठेवा । भार तुह्मी देवा संतजन ॥**
**विचित्र विदानी नानाकळा खेळे । नाचवी पुतळे नारायण ॥**
**काय वानरांची अंगींची ते शक्ति । उदका तरती वरी शिळा ॥**
**तुका ह्मणे करी निमित्यचि आड । चेष्टवूनि जड दावी पुढें ॥**

याप्रकारें अतर्क्य अशी जी परमेश्वर शक्ति आहे तिच्यावर विसंबून राहून ईश्वरी प्रेरणेप्रमाणें आत्मोद्धाराचें कार्य अव्याहत चालवावें. योग्यसमय प्राप्त होतांच परमेश्वर आपल्या इच्छेप्रमाणें कार्य घडविण्यासाठीं अवतारी विभूतींना उत्पन्न करून त्यांच्या करवीं हीनदीनांचा उद्धार करवितो हा जगाचा अनुभव आहे. जसा ऐतिहासिक तसा धार्मिक व सामाजिक बाबींतही हाच अनुभव आहे.

**देवाचिये माथां घालुनियां भार । सांडीं कळिवर ओंवाळोनी ॥**
**नाथिला हा छंद अभिमान अंगीं । निमित्याचे वेगीं सारी ओझें ॥**
**करुणा वचनीं लाहो एकसरें । नेदावें दुसरें आड येऊं ॥**
**तुका ह्मणे सांडी लटिक्याचा संग । आनंद तो मग प्रगटेल ॥**

## ॥ षष्ठ खंड ॥

# ईश-कृपा.

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ गीता. ९-२६

अर्थ—भक्तीनें ईश्वराला कोणीं पत्र, पुष्प, फल किंवा उदक अर्पण केलें तर त्या भक्तीनें दिलेल्या वस्तूंचा तो फार प्रेमानें स्वीकार करतो.

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ।
शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥
भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ गीता. ११. ५३।५४.

अर्थ—वेद, तप, दान, पूजादि उपायांनीं ईश्वराचें खरें स्वरूप पाहणें शक्य नाहीं. केवल अनन्य भक्तीच्या योगानें त्याला जाणतां येतें व त्याला पहातां येतें.

### अभंग.

कृपेचा ओलावा । दिसे वेगळाचि देवा ॥
मी हें इच्छितसें साचें । न लगे फुकटसाई काचें ॥
जेणें जाय कळसा । पाया उत्तम तो तैसा ॥
तुका म्हणे घरीं । तुझ्या अवघिया परी ॥

### अभंग.

कृपेचीं उत्तरें देवाचा प्रसाद । आनंदी आनंद वाढवावा ॥
बहुतांच्या भाग्यें लागलें जाहाज । येथें आतां काज लवलाहो ॥
अलभ्य तें आलें दारावरी फुका । येथें आतां चुका न पाहिजे ॥
तुका म्हणे जिव्हा श्रवणाच्या द्वारें । माप भरा बरें सिगेवरी ॥

---

## ॥ गीत ५७ ॥

बं.—भेवे छिलाम चेये ने बचाई नि साहस करे ( इं. ५२ )

संध्याकाळीं कंठीं घातली त्वां माला । वाटलें मजला मागावी ती ॥
याचना कराया नाहीं मी धजलें । म्हणोनी बैसलें उत्कंठित ॥
पाहिली म्यां वाट प्रभात तोंवरी । प्रभो तुझी स्वारी निघण्याची ॥
छिन्न पुष्पमाला मज शय्येवरि । लाभेल अंतरीं आशा वाटे ॥
शोधिली प्रभातीं भिक्षुकाचे परि । दलें शय्येवरी सुमनांची ॥
कुसुमाचा हार तुजशीं मागाया । साहस कराया झालें मनीं ॥
परि दैवा काय मज प्राप्त झालें । पुष्प न लाभलें नाहीं माला ॥
लाभली प्रचंड मज तलवार । ज्वलित प्रखर अग्नीपरि ॥
इंद्राचिया खड्गासम बहुभार । असे तलवार तुझी मोठी ॥
पसरलि तव शयनीं प्रभातीं । सौम्य रवि कांति तये वेळीं ॥
प्रातःकालीं पक्षी विचारिति मज । नारी काय तुज लाभ झाला ॥
नसे लाभ झाला सुमनमालेचा । सुगंधी जलाचा पुष्पांचाहि ॥
लाभली मजला अति भयंकर । तीक्ष्ण तलवार शेजेठायीं ॥
बैसोनीयां शांत विचार म्यां केला । खड्गाचा कां दिला प्रसाद हा ॥
लपवाया स्थान मजपाशीं नसे । लज्जा वाटतसे हातीं घ्याया ॥
मज शक्तिहीना भूषण का साजे । माझें मन लाजे स्वीकाराया ॥
हृदयाशीं प्रेमें खड्ग हें धरितां । अतिशय व्यथा होय प्राणा ॥
तरी हृदयाशीं खड्ग सांभाळीन । वेदनेचा मान दान तुझें ॥
खड्गयुक्त होतां मज या पुढती । किमपि जगतीं नाहीं भीति ॥
झुंजेन मी धैर्यें माझीया उद्योगीं । तुज यश जगीं येईल तें ॥
सकल भीतीचा त्याग मी करीन । यश मिळवीन खड्गयोगें ॥
माझ्यासाठीं मृत्यु सौंगडी दिधला । वरीन मी त्याला जीवें भावें ॥
तुझें हें प्रचंड खड्ग मजपाशीं । असे खंडायासी माझे पाश ॥
तुझ्यासाठीं अंगीं या पुढें शृंगार । नाहीं मी घेणार प्राणनाथा ॥
तुजसाठीं आतां वाट न पाहीन । नच आक्रंदेन या पुढती ॥
घरीं वा बाहेरीं तुझ्यासाठीं लाज । न मानितां काज करीन मी ॥
माझें मन तुझ्या खड्गें सजवीलें । शृंगार त्यजिले इतर मी ॥

**भावार्थ**—माझ्या प्राणनाथा, तुम्हीं संध्याकालच्या वेळीं कंठीं धारण केलेली सुंदर वैजयंती ( पुष्प ) माळा मला अत्यंत नयनमनोहर वाटली आणि ती तुमच्या पाशीं मागावी असेंही मनांत आलें. परंतु मागण्यास धीर होईना. तेव्हां आपण रात्रीच्या वेळीं शय्येवर निजून प्रातःकालीं निघून जाल तेव्हां ही माला तुटून शय्येवर पडलेली मला मिळेल या आशेवर मी राहिलें. सकाळीं उठून शय्येवर शोधूं लागलें तर फुलाची एक पाकळीहि सांपडली नाहीं. तुमच्या पूजेसाठीं आणलेल्या पुष्पांचा किंवा गुलाबपाणी, चंदनादिक सुगंधी द्रव्याचाहिं लाभ झाला नाहीं. हें पाहून माझ्या मनाला अत्यंत वाईट वाटलें, आणि आपल्या प्रसादाची उत्कंठा धरून बसलेल्या माझ्या जीवाला लज्जित व्हावें लागलें. आपल्या शय्येवर शोधून पाहतां मला अत्यंत तीक्ष्ण, प्रज्ज्वलित आणि भयानक अशी तलवार मिळाली. हा का प्रसाद तुम्हीं मला द्यावा ? ही तलवार घेऊन जगांत हिंडायला मला लाज वाटते. हें खड्ग जवळ केलें असतां दुखापत होते, हें जरी खरें आहे तरी आपल्या प्रेमाची ही देणगी मी माझ्या हृदयाबरोबर सांभाळीन. माझे ( भव ) पाश तोडण्यासाठीं या खड्गाचा उपयोग करीन. सर्व शृंगाराचा त्याग करून हें खड्ग त्यांच्याऐवजीं धारण करीन. मृत्युरूपी या खड्गाच्या साह्यानें मी विजयी होईन आणि तुमची कीर्ति जगांत वाढेल अशा रीतीनें वागून तुमच्या दर्शनाची देखील आशा न धरतां कर्तव्यकर्मामध्यें चूर राहीन.

**रहस्य**—परमेश्वराच्या प्राप्तीविषयीं ज्या आत्म्याला तळमळ लागली आहे त्याची स्थिति प्रेमळ स्त्रियेप्रमाणें असते. आपल्या प्रियाच्या प्रेमासाठीं व कृपेसाठीं सदैव टपून असणाऱ्या स्त्रीला या प्रेमाचा व कृपेचा निदिध्यास लागलेला असतो. त्याचप्रमाणें जीवात्म्याची तळमळ आहे. परंतु ही तळमळ शांत व्हावयाला त्याचे सर्व मोहपाश तुटावे लागतात. विषयवासना तृप्त झाल्याच्या योगानें ही तळमळ शांत होत नाहीं. खरा भक्त ( अर्थात् भज्य अशा परमेश्वरामध्यें युक्त झालेला भक्त ) सुखोपभोगादि प्रापंचिक देणग्यांची याचना कधींहि करीत नाहीं. तो म्हणतो—

**स्वामीसी संकट पडे जे गोष्टीचें । काय त्या प्रेमाचें सुख मज ॥**
**दुखविना चित्त तुझें नारायणा । कांहींच मागेना तुजपाशीं ॥**
**रिद्धि सिद्धि मोक्ष संपत्ति विलास । सोडियेली आस यांची जीवें ॥**
**तुका म्हणे एके वेळे देईं भेटी । वोरसोनि पोटीं आलिंगावें ॥**

याप्रमाणें सर्व सुखदुःखाच्या प्रापंचिक कल्पना बाजूस सारून परमात्म्याशीं कृपादान मागणाऱ्या भक्तास रात्रंदिवस याचना करावयाची असते ती हीच कीं—

आतां द्यावें अभयदान। जीवन ये कृपेचें।
उभारोनी बाहो देवा। हात ठेवा मस्तकीं।
नाभीं नाभी या उत्तरें। करुणाकरें सांतविजे।
तुका म्हणे केली आस। तो हा दिस फळाचा ॥

या प्रकारची वृत्ति ज्या आत्म्याची झाली त्याला सर्व मायापाश तोडून निर्भय होण्यासाठीं खड्ग सांपडल्याप्रमाणें होतें. अत्यंत कष्टलेल्या, गांजलेल्या आणि दुःख व दरिद्र यांच्या पायीं जीवावर देखील उदार झालेल्या आर्त जनांस अंतःकरणाच्या ठायीं परमेश्वरप्रीति उत्पन्न होतांच सर्वत्र प्रकाशमय दिसूं लागतें. भीतीचें निरसन होतें. कष्टाच्या व दुःखाच्या यातना एका परीनें सत्त्वपरीक्षणार्थ आहेत असें वाटून त्यांची महति वाटत नाहीं. असा उत्साहजन्य अनुभव ज्या भक्तांनीं घेतला ते रणांतील वीराप्रमाणें स्वतःविषयीं पर्वा न करतां कर्तव्यकर्म करण्यास पुढें सरसावले आहेत. त्यांचें देवापाशीं मागणें हेंच कीं—

रणीं निघतां शूर न पाहे माघारें। ऐशा मज धीरें राख आतां ॥
संसारा हातीं अंतरलों दुरी। आतां कृपा करी नारायणा ॥
वागवितों तुझिया नामाचें हत्यार। हाचि बडिवार मिरवितों ॥
तुका म्हणे मज फिरतां माघारें। तेथें उणें पुरें तुम्ही जाणा ॥

---

## ॥ गीत ५८ ॥

बं.—सुंदर बटे तव अंगद खानि ( ई. ५३ )

सुंदर तुझें हें बाहूचें कंकण। तारांचें कोंदण तयावरि ॥
नाना वर्णयुक्त रत्नें सुशोभित। नक्षत्र खचित कंकण हें ॥
परि तुझें खड्ग वाटे मनोहर। दिसतें सुंदर तेजयुक्त ॥
नभीं सूर्यास्तींच्या आरक्त प्रभेंत। गरुड विस्फारित पंख जैसा ॥
तैसी या खड्गाची वक्रता दिसते। विद्युत् चकाकते वक्र जैसी ॥
जीवनांत कालीं शेष जागरण। असह्य कठिण वाटे जीवा ॥
वेदनांच्या योगें कंप पावे जीव। तैसें हें अतीव खड्ग कंपे ॥
एकाची प्रखर ज्वालेनें सकल। दग्ध जी करील ऐसी ज्योती ॥
तीव्र भयंकर चेतनेची ज्वाला। तैसें या खड्गाला महा तेज ॥
सुंदर तुझें हें बाहूचें भूषण। तारांचें कोंदण तयावरि ॥
परि वज्रपाणि अत्यंत चातुर्यें। खड्ग त्वां सौंदर्यें नटवीलें ॥

**भावार्थ**—तारकांचें कोंदण केलेलें आणि अनेक रंगांनीं युक्त असलेलें तुझें बाहूचें कंकण फार सुंदर दिसतें. परंतु त्याहून तुझें खड्ग विशेष मनोहर आहे. वीज चमकते त्याप्रमाणें या खड्गाची वक्रता सुंदर दिसते. ज्याप्रमाणें अंतकालींच्या वेदनांमुळें जीव कंप पावतो, त्याप्रमाणें हें खड्ग कांपत आहे आणि तें सूर्याच्या आरक्त प्रभेंत पसरलेल्या गरुडाच्या पंखांप्रमाणें शोभायमान दिसतें. या खड्गाचें तेजही फार प्रखर आहे. अखिल जगताच्या जीवितवाला ग्रासून टाकणाऱ्या ज्वालेप्रमाणें हें खड्ग अत्यंत तेजयुक्त आहे. तें तुझ्या बाहूच्या कंकणापेक्षां सुंदर दिसतें.

**रहस्य**—परमेश्वराची विश्वमय सगुण मूर्ति कल्पून तिचें रूप नजरेसमोर आणलें असतां ज्याप्रमाणें तिच्या अंगावरील आभरणें दृष्टीस पडतील, त्याचप्रमाणें तिच्या हातांतील खड्गहि नजरेस पडल्यावांचून राहणार नाहीं. ईश्वराच्या ठायीं उत्पत्ति आणि पोषण हीं दोनच कार्यें करण्याची शक्ति आहे असें नसून संहारक शक्तिदेखील त्याच्याच अंगीं आहे. यासाठीं या संहार करणाऱ्या खड्गाची योजना कल्पिलेली असते. संहार ही अवस्था उत्पत्तीची पूर्वतयारी असल्यामुळें तिजविषयीं भीति बाळगण्याचें कारण नाहीं. उत्पत्ति, स्थिति आणि लय या तिन्ही अवस्था एकामागून एक प्रत्येक पदार्थमात्रास प्राप्त होत असून तिसऱ्या अवस्थेनंतर पुनरावृत्तीनें त्याच अवस्था भोगणें प्राप्त आहे असें ज्ञानी जन सांगत आले आहेत. म्हणून या विश्वमूर्तीच्या बाहूवरील रत्नखचित कंकणाहून नाशास कारणीभूत होणारें खड्ग विशेष सुंदर आहे असें म्हणावें लागतें.

या खड्गाचे आघात होऊन जेव्हां भक्त कसाला लावला जातो तेव्हांच त्याच्या अंतःकरणांतील प्रेम अजमावतां येतें. या खड्गाची धार बोथट करण्याची शक्ति मनुष्याच्या अंगीं असून ती "ईश्वरी प्रेम" या रूपानें प्रगट होते. अत्यंत प्रेमानें ईश्वरास शरण जाणारा भक्त ईश्वराच्या खड्गाची पर्वा करीत नाहीं. जन्ममृत्यूसहि जिंकण्याची शक्ति त्याच्या ठायीं उत्पन्न होते. म्हणून संतांनीं म्हटलें आहे कीं—

**सोसोनी विपत्ति । जोडी दिली तुझे हातीं ।**
**त्याचा हाचि उपकार । अंतीं आम्हांशीं वेव्हार ।**
**नाम रूपा केला ठाव । तुज कोण म्हणतें देव ।**
**तुका म्हणे हरी । तुज डाव दिला घरीं ॥**

याप्रमाणें ईश्वराच्या खड्गाची महति, भीति आणि शक्ति नाहींशी करण्याचें सामर्थ्य भक्तीमुळें उत्पन्न झालेल्या तेजामुळें प्राप्त होतें असा संतांच्या जीवनचरित्रावरून अनुभव येतो.

**जगा काळ खाय। आम्ही माथां दिले पाय।**

असें सांगणारे संतजन दुर्बळ आहेत असें कोण म्हणेल ?

---

## ॥ गीत ५९ ॥

बं.—तोमार काछे चाइनि किछू ( इं. ५० )

**कांहीं तुजपाशीं नाहीं मागितलें। तुज न वदलें नाम माझें ॥**
**घेतला त्वां माझा निरोप जेधवां। राहिलें मी तेव्हां मौनत्वानें ॥**
**उभी मी राहिल्यें तरुछायेखालीं। कूपाच्या जवळी एकटीची ॥**
**आपुले कलश संपूर्ण भरोनी। गृहा परतोनी गेल्या नारी ॥**
**हांका मारोनीयां सांगति मजला। फार वेळ झाला चल जाऊं ॥**
**आलस्यें मी परि बैसोनी राहिल्यें। काय मनीं आलें न कळे तें ॥**
**जंव मजपाशीं आलासी चालोनी। ऐकिला मी ध्वनि पाउलांचा ॥**
**कारुण्यदृष्टीनें पाहोनी मजसी। मंद वदलासी क्लांत कंठें ॥**
**बाई मी प्रवासी आहें तृषाक्रांत। शब्द श्रवणांत येतां ऐसे ॥**
**जेवीं स्वप्नांतूनि तत्काल उठल्यें। उदक ओतीलें अंजलींत ॥**
**तंव वृक्षपर्णें आनंदें हालती। कोकिलाही गाती दृष्टीआड ॥**
**पथपार्श्वांतूनि येत परिमल। फुलला बाभुळ दरवळे ॥**
**माझें नाम तुंवा मजसी पुसीलें। मूक मी राहिल्यें मर्यादेनें ॥**
**माझें त्वां स्मरण ठेवाया म्यां केलें। काय तुझें भलें न कळे तें ॥**
**तृषा तुझी शांत करायासि जल। दिधलें केवल काय त्यांत ॥**
**स्मृति या कृत्याची मानसीं राहील। सदा सर्वकाळ जन्मवरि ॥**
**नदीतीरिं येथें पातला मध्याह्न। उल्हास विहीन पक्षी गाती ॥**
**पर्णें हालताति निंब तरूवरि। मग्न मी विचारीं बैसलेंसे ॥**

**भावार्थ**—मी नदीतटावर असलेल्या विहिरीवर पाणी भरण्यासाठीं इतर स्त्रियांबरोबर आलें. माझ्या सोबतिणी पाणी भरून घडे घेऊन घरीं चालल्या मला येण्यासाठीं बोलवूं लागल्या. परंतु माझें चित्त कोठें भ्रमत होतें कोणास

ठाऊक! मी स्वस्थ बसून राहिलें. इतक्यांत तूं आलास. अत्यंत कारुण्यमय दृष्टीनें मजकडे पाहून अतिशय दमलेल्या स्थितींत तूं हळूच माझ्यापाशीं "मला तहान लागली आहे, बाई, मला पिण्यासाठीं पाणी द्या" असें म्हणालास. तत्काल मी स्वप्नांतून उठल्याप्रमाणें जागृत होऊन घाईघाईनें पाणी तुझ्या अंजलींत ओतलें. अशा रीतीनें पाणी ओततांच चहूंकडे झाडांचीं पानें हालूं लागलीं, कोकिलांचें गायन सुरू झालें आणि बाभळीचीं फुलें फुलून सुवास सुटला. तुझी तृषा शांत होऊन तूं परत जाऊं लागलास तेव्हां तुंवा माझें नांव विचारिलें. मी मर्यादेनें नांव सांगितलें नाहीं. तुझ्यापाशीं कांहीं मागितलेंहि नाहीं. मग माझें नांव विचारण्याइतकें मी काय केलें आहे? माझें स्मरण ठेवण्याजोगें तुझ्यावर मी का उपकार केला आहे? तूं तृषित होतास म्हणून पाणी दिलें त्यांत काय झालें? अद्यापि माझ्या मनांत हा विचार पुनः पुनः येत असून मध्यान्ह आला तरी मी येथेंच भ्रमिष्टासारखी बसून आहें. तुझी सेवा मजकडून घडली या गोष्टीची आठवण जन्मभर ठेवून मी आनंद मानीन.

**रहस्य**—ज्याप्रमाणें स्थिरचर सृष्टींतील पदार्थमात्रांत स्थूल दृष्टीनें विचार केला असतां असमानता दृष्टीस पडते, त्याचप्रमाणें मनुष्यांतील व्यवहार, दर्जा, सुखदुःखाचें मान, शारीरिक, आर्थिक व बौद्धिक स्थिति या सर्वांमध्यें असमानता दिसून येते. प्रत्येक व्यक्तीचें स्वरूप, आकार व शरीररचना भिन्न आहे आणि जगांत सर्वस्वीं समरूप अशा दोन व्यक्ति असणें शक्य नाहीं; त्याचप्रमाणें इतर परिस्थिति व भोगांसंबंधानें व्यक्तीव्यक्तींत विषमता दृष्टीस पडते. विषमता हें या सृष्टीचें जणूं काय विशिष्ट लक्षण आहे असें दिसतें. एकाच मातापितरांपासून जन्म पावलेल्या मुलांत अनेक प्रकारांनीं दृग्गोचर होणारें वैषम्य कां असावें, सुखदुःखाची वांटणी सर्व मानवी समाजांत समान कां नसावी इत्यादि प्रश्नांचें उत्तर देण्यांत तत्त्वज्ञानी प्राचीन कालापासून गढून गेले आहेत, आणि या प्रकारच्या प्रश्नांचा उलगडा करीत असतां ते पूर्व कर्म, प्राक्तन, संचित, अदृष्टभोग आणि पुनर्जन्म इत्यादि विषयांमध्यें गढून गेलेले दिसतात. यांच्यापासून उत्पन्न होणारा उद्वेग, वियोगभावना व मनस्ताप यांच्यावर विजय मिळविण्याची गुरुकिल्ली "वेदांत" या संज्ञेनें ओळखल्या जाणाऱ्या ज्ञानामध्यें सांपडते. हें ज्ञान साध्य असलें तरी तें कष्टसाध्य असून सामान्य जनांस तें प्राप्त करून घेणें शक्य नाहीं. त्यांनीं ज्या उपायानें विजय मिळवावयाचा तो मार्ग म्हटला म्हणजे भूतदया किंवा परोपकार हा आहे. परोपकार करण्यास शारीरिक किंवा आर्थिक बल विशिष्ट प्रमा-

णांत असावें लागतें असें नाहीं. तृषितास जल देणें, आंधळ्यास मार्ग दाखविणें, स्पृश्यास्पृश्य विचारांस फांटा देऊन दीन, अनाथ व सदा कष्टी असलेल्या लोकांत जाऊन त्यांस यथाशक्ति मदत करणें व त्यांचा उद्धार करण्यास झटणें, या व याच प्रकारच्या इतर किती तरी गोष्टी कोणासहि करितां येतील. या गोष्टी करीत राहिल्यानें मानसिक व शारीरिक व्यथांची आठवण करण्यास देखील कधीं कधीं अवकाश मिळत नाहीं. या भूतदयेच्या कृत्यांपासून अवर्णनीय आनंद होतो. सृष्टिदेवतेची सेवा घडल्यामुळें ती देखील प्रसन्न होते. ही सेवा ईश्वराच्या चरणीं सादर होत असून ईश्वरास अशा भक्ताची आठवण ठेवावी असें वाटतें. मात्र ही जनसेवा म्हणजे ईश्वरसेवा आहे आणि ही सेवा करण्यासाठींच आपला जन्म आहे ही भावना दृढ झाली पाहिजे.

**तुजच पासाव झालोंसे निर्माण । असावें तें भिन्न कासयानें ॥**

या भावनेनें कर्तव्यकर्म करणारास सुखदु:खाची बाधा कोठून होईल ? परंतु परोपकार सात्विक असावा. या सात्विक परोपकाराचें वर्णन गीतेंत आहे तें आपल्या वर्तनांत आणणें केव्हांही सुखदायक होईल.

**दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।**
**देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम् ॥**

जें दान केवळ द्यावयाचें म्हणूनच प्रत्युपकाराची इच्छा न करतां ( किंवा प्रत्युपकार म्हणून ) दिलें जातें आणि योग्य देशीं, योग्य समयीं व योग्य पात्रालाहि दिलें जातें तें सात्विक दान होय. हें दान किंवा हा परोपकार भगवंतास प्रिय आहे.

**जें जें जेथें पावे । तें तें समर्पावें सेवे ॥**
**सहज पूजा याचि नांवें । गळित अभिमानें व्हावें ॥**
**अवघें भोगितां गोसावी । आदीं अवसानीं जीवीं ॥**
**तुका म्हणे सीण । न धरितां नव्हे भिन्न ॥**

## ॥ गीत ६० ॥

बं.—एई जे तोमार प्रेम ओगो ( इं. ५९ )

**हृदय हरणा पूर्ण प्रेम तुझें । सदैव विराजे विश्वाठायीं ॥**
**तरुपर्णांवरि सुवर्ण प्रकाश । नाचे तद्विकास प्रेम करी ॥**
**आकाशप्रांगणीं मेघ संचरती । तयां देई गति तुझें प्रेम ॥**
**वायु वर्षे देहीं शीतल अमृत । कारण या होत तुझें प्रेम ॥**
**प्रभात समयीं माझ्या नयनांत । अंजन पडत प्रकाशाचें ॥**
**मज वाटे तुझा संदेश हा भला । मजसी लाभला प्रेमापायीं ॥**
**तुझें मुख मजवरि वांकविलें । नेत्र प्रवेशले माझ्या नेत्रीं ॥**
**अंतःकरण माझें तुझीया चरणा । स्पर्शी नारायणा धन्य झालों ॥**

**भावार्थ**—हे परमेश्वरा, या विश्वाच्या ठायीं सर्वकाल आणि सर्व ठिकाणीं तुझें प्रेम पूर्णत्वानें दिसत आहे. हा सुवर्णमय प्रकाश, हे आकाशांतील मेघ, जीवास शांति व सौख्य देणारा वायु यांचा लाभ आणि उगमहि तुझ्या प्रेमापासून आहे. प्रातःकालीं तुझा प्रकाश माझ्या नेत्रांत शिरतांच तुझा प्रेमसंदेश मला प्राप्त झाल्याप्रमाणें होतें. तुझें मुख माझ्याकडे वांकवून मजकडे दृष्टि वळतांच तुझी माझी दृष्टिभेट होते आणि माझें अंतःकरण तुझ्या चरणांस तत्काल स्पर्श करितें.

**रहस्य**—या जगांत सर्वत्र ईश्वरी प्रेम पाहाणारास सदैव सौख्य व शांति यांचा लाभ होतो. भगवत्कृपेचें दृश्य विश्वांत चहूंकडे पाहणारा सदा आनंदी आणि नम्र असतो.

**तुझे पाय माझें भाळ । एकत्रता सर्वकाळ ॥**

या भावनेनें प्रपंचांत वागणारा भाग्यशाली आहे यांत संदेह नाहीं. ज्यांना सर्वत्र ईश्वरी प्रेम दिसतें आणि जे प्रेमाचा प्रत्युपहार ईश्वरास अर्पण करून त्याला वश करून घेतात त्यांचा मानसिक समतोलपणा ढळण्याचें कारण नाहीं. त्यांचें सुखदुःख ज्याप्रमाणें प्रापंचिक लाभ-हानीवर अवलंबून नाहीं त्याप्रमाणें त्यांचें देणें घेणेंहि या जगाशीं नाहीं. जमाखर्चाचा हिशेब ईश्वरापाशीं आणि देवघेवही त्याच्याच जवळ.

भक्ति ऋण घेतलें माझें । चरण गहाण आहेत तुझे ।
प्रेमव्याज देई हरि । माझा हिशेब लवकरीं ॥
माझें मी न सोडीं धन । नित्य करितों कीर्तन ॥
तुझें नामीं आहे खत । सुखें करी पंचाईत ॥

अशा रीतीनें भगवंतापाशींच व्यवहार ठेवणारे सदैव निश्चित व सुखी असतात यांत आश्चर्य काय ?

प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातो हरि ।
मनें सहित वाचा काया । अवघें दिलें पंढरिराया ।
सत्ता सकळ तया हातीं । माझी कींव काकुलती ।
तुका म्हणे अंतीं । ठाव मागीतला संतीं ॥

---

## ॥ गीत ६१ ॥

बं.—माझे माझे कतवार भावि कर्म्महीन ( इं. ८१ )

मधूनी मधूनी मजसी वाटलें । कर्म न राहिलें या पुढती ॥
गेली वेळ सारी नष्ट झाली वेळा । दिन व्यर्थ गेला कर्मशून्य ॥
परि प्रभो नष्ट झाला नाहीं क्षण । काल–नियोजन तुझे हातीं ॥
हृदयनिवासी प्रभो माझ्या मनीं । प्रच्छन्न राहोनी वर्ततोसी ॥
कोण्या काळीं बीजा अंकुर रूपानें । हळूच प्रेमानें जागवीसी ॥
फुटोनी कलिका रम्य पुष्प होई । कोणत्या समयीं रंगवीसी ।
पुष्पांपासोनीयां फळें बनवीसी । सुमधुर रसीं भरीसी त्यां ॥
परिणत गर्भ बीजीं रचितोसि । चाललीसे ऐसी कृति तुझी ॥
शेजीं पहुडलों होऊनियां श्रांत । सकल कर्मांत झाला वाटे ॥
प्रभातीं उठोनी खोलितां नयन । दिसे उपवन अति रम्य ।
सुंदर विचित्र पुष्पें विकसलीं । समृद्धि शोभली ठायीं ठायीं ॥

**भावार्थ**—मधून मधून माझ्या मनाला असें वाटलें कीं यापुढें मी करण्याजोगें कर्मच राहिलें नाहीं. अर्थात् म्यां जन्मास येऊन करावयाचें कर्म यथासांग पार पाडलें. याप्रमाणें माझ्या मनाची समजूत झाल्यामुळें मी कांहीं एक न करतां स्वस्थ बसलों, आणि कालाचा व्यर्थ नाश झाला. परंतु विचार करतां कालाचा

व्यर्थ नाश तरी कसा होईल ? कालाचा विनियोग करण्याचें कार्य ईश्वराच्या हातीं असून त्याचा एक क्षणहि कार्यावांचून जात नाहीं. याचें प्रत्यक्ष उदाहरण सृष्टींत सांपडतें. परमेश्वरा, माझ्या अंतःकरणामध्यें गुप्तपणें राहून क्षणोक्षणीं तूं कर्म करवीतच आहेस (हें मला अज्ञान व अहंभाव यांमुळें उमगत नाहीं). बीजापासून अंकुर उत्पन्न करणें, कलिकेचें पुष्प बनविणें, पुष्पांपासून फळें तयार करून त्यांच्यांत गोड रस भरणें, बीजाच्या ठायीं परिणत गर्भाची उत्पत्ति करणें वगैरे तुझें कार्य अव्याहत चाललेंच आहे. त्यामुळें मी झोंपीं जातांना जें उपवन शोभाविहीन असतें तेंच दुसऱ्या दिवशीं जागा होऊन पहातों तर अत्यंत रम्य व सुंदर अशा पुष्पांनीं भरलेलें दिसतें. तुझ्या कर्मांचा कधीं अंत होत नाहीं; मग माझ्या कर्मांचा अंत कोठून होणार ?

**रहस्य**—मनुष्यानें आपलें कर्म संपलें असें समजणें केव्हांही चुकीचें आहे. प्रापंचिक कर्मांचा त्याग करून सन्यस्तवृत्तीनें राहण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचें देखील कर्म संपत नाहीं हें दाखविण्यासाठीं भगवंतांनीं गीतेंत अर्जुनास सांगितलें कीं—

**नहि क्षणमपि जातुम् तिष्ठत्यकर्मकृत् ।**

(कर्मत्याग केला असें म्हणणाऱ्याचा देखील) एक क्षणही कर्मावांचून जात नाहीं. अर्थात् या सृष्टीची रचना अशी आहे कीं तिच्यांतील सृष्टपदार्थांमध्यें क्षणोक्षणीं कर्म घडत आहे. ही सृष्टि सृजणारा जर या कर्मांतून सुटला नाहीं, तर मनुष्य कसा सुटेल ? हें विश्वांतील रहस्य ज्यांनीं जाणलें ते कधींहि कर्मत्यागाची इच्छा करीत नाहींत. कर्मत्याग हें आत्मार्पणाचें किंवा यज्ञाचें लक्षण नसून तें आलस्याचें व एका प्रकारें निर्बलत्वाचें द्योतक आहे, असें या विश्वांतील क्षणोक्षणीं चालणारें कार्य दाखवितें. हा कर्मनदीचा ओघ रात्रंदिवस चालला असून तिजवरून तरंगत जाणारे मानव कर्ममुक्त होणार तरी कसे ? कर्ममुक्त होण्याचा उपाय म्हटला म्हणजे कर्मांच्या फलेच्छेपासून सुटका करून घेणें हाच आहे. आणि ज्यानें ही फलेच्छा टाकून दिली त्याचें कर्मही अकर्म झालें. कर्मांमध्यें गुंतला असून ईश्वराशीं योगयुक्त असणें हेंच कर्मकौशल्य आहे असें भगवंतांनीं सांगितलें, यांतील रहस्य तरी हेंच कीं कर्म ज्या अर्थीं चुकवितां येत नाहीं त्या अर्थीं तें करूनहि बंधन न पावण्याचा यत्न करावा. प्रत्येक कार्य परमात्म्याप्रीत्यर्थ आहे या भावनेनें कर्म करणारे बंधमुक्त असतात असें संतचरित्रावरून सिद्ध होतें. तेव्हां ईश्वरानें दाखवून दिलेलें कार्य करीत राहणें आणि जेव्हां इंद्रियांचा व्यापार बंद पडेल तेव्हां या

कार्यांतून सुटून जाणें या दोन्ही गोष्टी ईश्वराधीन आहेत या भावनेनें वागावें. यांत सौख्य व समाधान आहे—

**ऐसा घेंई कांरे संन्यास । करीं संकल्पाचा न्यास ।**
**मग तूं राहे भलते ठायीं । जनीं वनीं खाटे भोई ।**
**तोडीं जाणिवेची कळा । होईं वृत्तीसी वेगळा ।**
**तुका म्हणे नभा । परता अणूचाही भागा ।**

या जगताचा संसार चालविणारा विश्वकर्मा देखील रात्रंदिवस कर्मांत गुंतला आहे. क्षणोक्षणीं त्या कर्मांचा परिणाम सर्वत्र दृग्गोचर होतो. तर मग मनुष्यानें कर्म-शून्य होऊन बसणें हें नैसर्गिक नियमांच्या विरुद्ध आहे; यासाठीं त्यानें युक्तायुक्त कर्म समजून घेऊन तें योग्य प्रकारें बजावणें हेंच योग्य आहे. कर्म टाकून देऊन पळून जाणें हें दौर्बल्याचें लक्षण आहे. अशा क्लीबांस अकीर्तिकर निःश्रेयस् आणि अधार्मिक मार्ग न धरण्याबद्दल व कर्तव्यकर्में करण्याविषयीं भगवंतांनीं गीतेच्या द्वारें जो उपदेश केला तोच सर्वलौकिक धर्म आहे.

---

## ॥ गीत ६२ ॥

बं.—तोमार सोनार थालाय साजाब आज ( इं. ८३ )

**माते सुवर्णाच्या थालीमाजि हार । अर्पीन सुंदर तुजलागीं ॥**
**अश्रुबिंदु हेची मौक्तिकें सुंदर । ग्रंथुनीयां हार करीन तो ॥**
**चंद्रसूर्य यांचीं नुपुरें चरणीं । शोभती जननी तेजःपुंज ॥**
**परी वक्षावरी शोभेल सुंदर । माझा अलंकार दुःखाश्रूंचा ॥**
**द्रव्य धान्य सारें तुझेंची हें धन । काय तें देऊन उपयोग ॥**
**द्यावें ऐसें वाटे तरी मज देईं । सकलहि नेईं जरी इच्छा ॥**
**दुःख मद्गृहींचें स्वार्जित हें धन । प्रेमें मी अर्पीन तुझे पायीं ॥**
**दुःख घेसी कृपा प्रतिफल देसी । वाहतों मानसीं गर्व हाची ॥**

**भावार्थ**—हे जगज्जननी, सुवर्णाच्या ताटांत तुला मी एक सुंदर रत्नांचा हार अर्पण करतों. त्याचा स्वीकार कर. तुला द्रव्य धान्यादिक अर्पण करून तरी काय उपयोग आहे ? कारण सर्व धन तुझ्या मालकीचें असून तुझ्या दातृत्वामुळें आम्हाला यांचा लाभ होतो. चंद्रसूर्यांचीं नुपुरें तुझ्या चरणामध्यें शोभत आहेत.

मग मी तरी कसला अलंकार देऊं ? माझ्या मालकीचें व स्वार्जित धन म्हटलें म्हणजे माझें दुःख आहे. या दुःखापायीं नेत्रावाटे जे अश्रु वाहतात त्यांच्या बिंदूंचा हा मी मौक्तिकांचा हार बनवून तुला अर्पण करतों. तो तुझ्या वक्षस्थलावर चांगला शोभेल. धनधान्यादिकांची देणगी मला दे किंवा न दे. आहे तेंहि घेऊन जा. परंतु मला ठाऊक आहे कीं तूं माझें दुःख स्वीकारून मला कृपेचें प्रतिफल देशील. अशा रीतीनें तूं मला वागवितेस ह्या गोष्टीबद्दल मी गर्व वाहतों.

**रहस्य**—जें आपणास प्रिय आहे त्याचा वियोग होणें किंवा त्याची प्राप्ति न होणें म्हणजेच दुःख आहे. या वियोगजन्य दुःखाचा विसर पडण्यास प्रापंचिक व्यवहारांतील उपाय फलद्रूप होत नाहींत. त्यांच्यामुळें कधीं कधीं वियोगव्यथा वाढते. त्यासाठीं हें दुःख कमी करण्याचा उपाय म्हटला म्हणजे तें स्वार्जित आहे असें मानून त्याचा अंगीकार करणें किंवा तें सहन करण्यासाठीं सदैव तयार असणें हा होय. आपणाप्रमाणेंच सुखदुःखाच्या प्राप्तीमुळें विकारवश होणाऱ्या इतर मनुष्यांस या दुःखाचें निवेदन करण्यापासून फायदा काय ? ज्यास कथन केलें असतां मनास स्वास्थ्य मिळेल अशा परमेश्वरास तें सांगावें हें योग्य आहे. तेणें-करून दुःखाचा भार हलका होईल. कितीहि सुख मिळालें तरी तें थोडें आणि थोडेंदुःख देखील पर्वतप्राय असतें हा नेहमींचा अनुभव आहे. याशिवाय दुसरा अनुभव असा आहे कीं—

**सुखाचे सांगाती सर्वेहि मिळती । दुःख होतां जाती पळोनियां ॥**

यासाठीं आपलें दुःख निवेदन करण्यास व अर्पण करण्यास ज्याप्रमाणें आपली माता ही एकच शांतिदायिनी आहे, त्याचप्रमाणें जगन्माता जो परमेश्वर याजपाशीं आपलें दुःख निवेदन केलें असतां आपल्या जीवाला शांती प्राप्त होईल. म्हणून संतांनीं सांगितलें कीं—

**भोग द्यावे देवा । त्याग भोगींच बरवा ॥**
**आपण व्हावें एकीकडे । देव कळेवरी जोडे ॥**
**योजे यथा काळें । उत्तम पाला कंद मुळें ॥**
**वंचकासी दोष । तुका म्हणे मिथ्या सोस ॥**

याहूनहि दुःख नाहींसें करण्याचा रामबाण उपाय म्हणजे—

भोग भोगावरी द्यावा । संचिताचा करुनी ठेवा ॥
शांति धरणें जीवासाठीं । दया उत्तम गोमटी ।
देह लेखावें असार । सत्य पर उपकार ।
तुका म्हणे हे मिरासी । बुडी द्यावी ब्रह्मरसीं ॥

---

## ॥ गीत ६३ ॥

बं.—प्रभु गृह हते आसिले जे दिन ( इं. ८५ )

**प्रभुगृहांतूनि वीर जंव आले । कोठें लपविलें बळ त्यांनीं ॥**
**अस्त्रें कोठें होतीं त्या वेळीं अंगींचें । कवचही त्यांचें होतें कोठें ॥**
**दरिद्री ते दीन असहाय त्यांतें । हाणिलें आघातें अनर्गल ॥**
**प्रभुगृहीं वीर परतोनि आले । कोठें लपवीलें बळ तेव्हां ॥**
**शर धनु खड्ग टाकोनी दिधलें । निटलीं शोभलें शांतितेज ॥**
**जीविताचें फळ मागेंचि त्यागीलें । जंव वीर आले प्रभुधामा ॥**

**भावार्थ**—ज्या वेळीं वीर आपल्या धन्याच्या गृहांतून बाहेर पडले तेव्हां त्यांनीं आपलीं शस्त्रास्त्रें आपल्या बरोबर घेतलीं नव्हतीं काय ? ते इतके बलिष्ठ असूनहि त्यांच्या बळाचा उपयोग झाला नाहीं. त्यांनीं आपलें बळ कोठें लपवून ठेविलें ? ते दीन दरीद्री आणि असहाय स्थितींत पराजित झाले. अनेक घाव त्यांच्या अंगावर बसले. त्यांचें युद्धप्रसंगीं वापरण्याचें कवच गेलें कोठें ? अशा प्रकारची दुर्गति भोगून ज्या वेळीं ते आपल्या धन्याच्या घरीं जाण्यासाठीं परत निघाले आणि तेथें पोहोंचले तेव्हां त्यांच्या मुखावर शांति दिसत होती आणि तेज झळकत होतें. सर्व शस्त्रास्त्रांचा त्यांनीं त्याग केला होता. इतकेंच नव्हे तर जें कर्म त्यांनीं केलें त्याचें फळही त्यांनीं मागें टाकून दिलें होतें. अर्थात् हे वीर जेव्हां परत आले तेव्हां त्यांच्यांत अजब सामर्थ्य होतें. तें त्यांना कां व कसें प्राप्त झालें हें समजेना.

**रहस्य**—परमात्म्यापासून जीवात्मा विभक्त होऊन या मृत्युलोकीं आल्यावर त्याच्यांतील कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुम् शक्ति नाहींशी होते. अखिल विश्वाला चेतना देणाऱ्या या शक्तीचा ऱ्हास अशा रीतीनें कां होतो ? प्रकृतीच्या संगतींत संसाराच्या उपाधींत सुख दुःख मानणाऱ्या व उपभोगणाऱ्या निर्बल झालेल्या जीवात्म्याला

अनेक प्रकारचे आघात सोसावे लागतात. त्याचें जीवित सदैव त्रस्त स्थितींत जातें. पांडव व कौरव यांच्यामधील घनघोर रणसंग्रामांत शिरण्याच्या वेळीं भगवंतांनीं अर्जुनास या संग्रामाच्या व्यथा चुकविण्याचा निष्कामकर्मांचा उपदेश करून " तस्मात् उत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः" म्हणजे ( याप्रमाणें युद्ध करणें तुझें कर्तव्यकर्म असल्यामुळें ) ऊठ आणि युद्ध कर असें सांगितलें. प्रपंचाची लढाई अशीच आहे. ती टाळतां येत नाहीं आणि टाळणेंहि योग्य नाहीं. यासाठीं ही लढाई मारतांना शस्त्रप्रहार चुकविण्यास काय उपाय आहे हें समजून घेऊन तो उपाय अमलांत आणल्यास ही लढाई जिंकण्यास अवघड होणार नाहीं. जो प्रपंचास घावरून घरादाराचा त्याग करून वसला तो शूर नव्हे.

**जिंकावा संसार । येणें नावें तरी शूर ॥**
**येरे काय तीं बापुडीं । कीर अहंकाराचीं घोडीं ॥**

या प्रकारें ज्यांनीं आपल्या प्रभूवर दृष्टि ठेवून प्रापंचिक कर्मे चालविलें त्यांस आत्मबल प्राप्त झालें.

**आम्ही रामाचे राऊत । वीर झुंजार बहुत ।**
**मन पवन तुरंग । हातीं नामाची फिरंग ।**
**वारू चालवूं चहूं खुरीं । घाला घालूं यमपुरीं ।**
**तुका म्हणे येणें । आम्हां वैकुंठासी जाणें ॥**

याप्रमाणें प्रत्यक्ष मृत्यूवर घाला घालण्याची ज्यांची तयारी त्यांना प्रापंचिक व्यथा जिंकूं शकत नाहींत. कारण

**रात्री दिवस आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥**
**जीवाही आगोज पडती आघात । येऊनियां नित्य नित्य करी ॥**
**तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचें काळें केलें तोंड ॥**

अर्थात् सर्व कर्मांचा व कर्मफलाचा त्याग करून जेव्हां जीवात्मा प्रकृतीचा त्याग करून परमात्म्याच्या ठायीं मिळून जातो तेव्हांच त्याला सर्व प्रकारची शांतता मिळते. प्रकृतीच्या संगतींत असतां नष्ट झालेलें बल त्याला पुनः प्राप्त होतें.

॥ सप्तम खंड ॥

# करुणापर प्रार्थना.

## अभंग.

काय करूं जीव होत कासावीस । कोंडलिये दिसे गमेचिना ॥
पडिलें हें दिसे ब्रह्मांडचि वोस । दाटोनी उच्छ्वास राहतसे ॥
तुका म्हणे अगा सर्व जाणतिया । विश्वंभरें काया निववावी ॥

त्वमेकं शरण्यं त्वमेकं वरेण्यं ।
त्वमेकं जगत्पालकं स्वप्रकाशम् ॥
त्वमेकं जगत्कर्तृ पातृ प्रहर्तृ ।
त्वमेकं परं निश्चलं निर्विकल्पम् ॥ गीता.

तूं एकच सर्वांना शरण जाण्यास योग्य असून सर्वांमध्यें श्रेष्ठ आहेस. तूंच जगाचा पालक, आणि स्वयंप्रकाशमान् आहेस. जगाची उत्पत्ति, पालन, आणि प्रलय करणाराहि तूंच असून ब्रह्मांडामध्यें श्रेष्ठ, निश्चल आणि निर्विकल्प असा तूंच एक आहेस.

## अभंग.

देवा माझें मन आणि तुझे चरण । एकत्र करोन दिधली गांठी ॥
होणार तें हो गा सुखें पंढरिनाथा । कासया शिणतां वायांविण ॥
माझिया अदृष्टीं ऐसेंचि पैं आहे । सेवावे तुझे पाय जन्मोजन्मीं ॥
असतां निरंतर येणें अनुसंधानें । प्रारब्ध भोगणें गोड वाटे ॥
हृदयीं तुझें रूप वदनीं तुझें नाम । बुद्धि हे निष्काम धरिली देवा ॥
नामा म्हणे तुझीं पाउलें चिंतितां । झाली कृतकृत्यता जन्मोजन्मीं ॥

## ॥ गीत ६४ ॥

बं.—मेघर परे मेघ जमे छे. ( इं. १८ )

**मेघांवरि मेघ दाटति अंधार । भयानक घोर व्यापी जगा ॥**
**द्वाराच्या बाहेरी मज एकट्यासी । वाट पहायासी लाविसी कां ॥**
**कार्य करायाचे होते जंव दिन । तंव झालों मग्न नाना कर्मीं ॥**
**नाना लोकांसवें केला व्यवहार । श्रमलों मी फार तये वेळीं ॥**
**आतां संकटाची वेळ आली खास । ठेविला विश्वास तुजवरि ॥ द्वा०**
**अवहेलना बा जरि तूं करिसी । तारिल मजसी कोण देवा ॥**
**कैसा कंठूं दीर्घ पर्जन्याचा काल । माझे पुरे हाल होतील कीं ॥**
**नभाची या मुद्रा रौद्र भयानक । पहात मी मूक उभा येथें ॥**
**वायुसंगें भ्रमे माझा आत्माराम । नसे त्या विश्राम स्फुंदतसे ॥ द्वा०**

**भावार्थ**—आकाशांत ढगांवर ढगें येत असून अंधःकारानें सर्व जग भरून गेलें आहे. अशा वेळीं मला एकट्याला द्वाराबाहेर ठेवून वाट पहावयाला कां लावतोस ? ज्यावेळीं माझ्या अंगीं कार्यभार उचलण्याची शक्ति होती त्या वेळीं ( तुला न विचारतां ) अनेक कार्यांमध्यें मी मग्न झालों. नानाप्रकारच्या लोकांबरोबर व्यवहार करण्यांत माझे दिवस निघून गेले. आतां ( व्यवहार चालविण्याची शक्ति राहिलेली नाहीं आणि ) संकटकाल प्राप्त झाला आहे. अशा वेळीं ( ज्यांच्याशीं माझा आजपर्यंत व्यवहार चालला अशा लोकांची मदत होणें शक्य नाहीं. या संकटांतून पार पाडण्यास समर्थ तूंच आहेस म्हणून ) तुझ्यावर विश्वास ठेवून राहिलों आहे. तुझा आश्रय न मिळाल्यास मला तारणारा दुसरा कोण आहे ? पर्जन्याच्या रात्रीच्या वेळीं आकाश भयानक दिसत असून सोसाट्याचा वारा सुटला आहे. अशा वेळीं द्वाराबाहेर मी राहूं तरी कसा ? ( देवा, मला दार उघडून आंत येण्याची आज्ञा दे ) माझा आत्मा भ्रमिष्टासारखा भटकत असून विश्रांति नसतां आक्रोश करीत आहे. ( त्याला तारणारा तूंच. )

**रहस्य**—जोंपर्यंत प्रापंचिक मनुष्याच्या अंगांत कायिक व इतर सामर्थ्य आहे तोंपर्यंत त्याला ईश्वराची आठवण होत नाहीं. तो सदैव आपल्या कार्यांमध्यें चूर असतो आणि या कार्यांच्या व्यवहारामध्यें त्याचा काळ निघून जातो. अशा वेळीं प्राप्त झालेल्या अडचणींतून रस्ता काढण्याची त्याच्या अंगीं शक्ति असल्यामुळें परमेश्वरसहाय्याची तो विशेष पर्वा धरीत नाहीं.

संवसार सांते आले हो आइका । तुटीचें तें नका केणें भरूं ॥
लाभाचा हा काळ अवघे विचारा । पारखी ते करा साह्य येथें ॥

या संसाराच्या पेठेंत आल्यावर खरा व खोटा व्यवहार कोणता याची पारख करून खऱ्या लाभाचा सौदा करण्यास सर्वांनीं जागरूक रहावें असें साधुसंत सांगत आले आहेत. त्याकडे पारमार्थिक दृष्टीनें पाहून आपला उद्धार करून घेण्यास आम्ही चुकतों. म्हणून वृद्धापकालीं इंद्रियांची शक्ति गलित झाल्यावर आम्हाला ईश्वरावांचून दुसरें आश्रयस्थान नाहीं असें वाटूं लागतें. सगेसोयरे आप्तेष्ट किंवा व्यवहारांत ज्यांच्याशीं संबंध जडला असे स्वार्थापायीं मित्र बनलेले लोक आम्हांस संकटांतून चुकविण्यास असमर्थ होतात. आत्म्याची तळमळ शांत करून अभयाप्रत नेणारा एक परमेश्वर आहे असेंच आपलें अंतःकरण सांगतें. म्हातारपण हाच पर्जन्याचा काल आहे. या वेळीं संकटें उद्भवलीं असतां त्यांतून पार पडण्याची अंगांत हिंमत नसते. अशा वेळीं पुढीलप्रमाणें करुणापर शब्द सहजगत्या मुखावाटे निघतातः—

कां रे माझा तुज नये कळवळा । असोनि जवळा हृदयस्था ॥
अगा नारायणा निष्ठुरा निर्गुणा । केला शोक नेणा कंठस्फोट ।
कां हें चित्त नाहीं पावलें विश्रांति । इंद्रियांचि गति कुंठेचि ना ॥
तुका म्हणे कां रे धरियेला कोप । सरलें नेणों पाप पांडुरंगा ।

ग्रीष्म ऋतूंत सांठा करून ठेविल्याशिवाय पर्जन्यकाळीं सुखानें दिवस घालविणें शक्य नाहीं. यासाठीं ऐन तारुण्याच्या भरांत असतां श्रेयसाधनाकडे लक्ष देऊन ईश्वरकृपा प्राप्त करून घेणारांचे शेवटचे दिवस सुखांत जातात. त्यांना ईश्वराचा करुणा-प्रसाद मिळाल्यामुळें गृहाबाहेर संकटांत काल कंठावा लागत नाहीं.

---

## ॥ गीत ६५ ॥

बं.—एबार भासिये दिये हबे आमार एई तरी ॥ ( इं. २१ )

वाटे मज आतां लोटावी ही नौका । काल जातो फुका तीरावरि ॥
कायरे दुर्दैवा, गेला मधुमास । बहर पुष्पांस आणूनीयां ॥
सुमकरंडकीं फुलें न घातलीं । आतां शुष्क झालीं काय करूं ॥
खळखळ शब्द करीतसे जल । तरंग धवल गर्जताती ॥
विजन प्रदेशीं जीर्ण पर्णें गळती । तरुमूलावरती अंधःकारीं ॥

**भ्रमतोसि कोणीकडे शून्य मनें । पहासी नयनें कवण ठाया ॥**
**सर्वत्र वायूंत सकल गगनीं । गेलासे भरोनी वेणूनाद ॥**
**पैल तीराहूनि येई गानध्वनि । पडेना श्रवणीं तुझ्या का रे ॥**

**भावार्थ**—आज कित्येक वर्षें मी या नदीच्या तीरावर बसून आहें. अशा रीतीनें स्वस्थ बसून उपयोग काय ? ही माझी नौका नदींत लोटून परतीर गांठावा हेंच उत्तम आहे. वसंतकाल आला आणि त्या कालीं फुलांना बहर येऊन सृष्टीमध्यें सर्वत्र सुगंध सुटला व शोभा दिसूं लागली. परंतु त्या कालीं मी आलस्यानें स्वस्थ बसून राहिल्यामुळें माझ्या पुष्पकरंडकांत फुलें घालण्यास विसरलों. त्यामुळें झाडावरच हीं फुलें कोमेजून गेलीं. आतां अंधःकार पसरला आहे. नदींतील लाटांची गर्जना व पाण्याचा खळखळ शब्द कानीं येत आहे. जीर्ण झालेलीं झाडांचीं पानें गळून पडत आहेत. अशा वेळीं शून्य मनानें पहात बसण्यांत अर्थ काय ? सर्वत्र वेणूनाद कानीं येत आहे. परतीरावरून येणारा हा ध्वनि तुझ्या कानीं पडत नाहीं काय ? मग ही नौका घेऊन स्वस्थ कां बसला आहेस ? ती लोटून परतीरास जा.

**रहस्य**—प्रत्येकाचें बालपण अज्ञानावस्थेंत जात असून त्यावेळीं प्रापंचिक काळजी किंवा जबाबदारी नसते. पुढें तारुण्यावस्थेस प्रारंभ होऊन जबाबदारीची जाणीव उत्पन्न झाल्या वेळेपासून शक्त्यनुसार कार्यांचा भार उचलण्याचा प्रसंग प्रत्येकाला प्राप्त होतो. याप्रमाणें कार्यांमध्यें चूर असतां आयुष्य कसें निघून जातें हेंदेखील कळत नाहीं. यातायातींत आणि चिंतेंत वासनांच्या लाटांवर वर खालीं आपटण्यामध्यें आणि प्रेमाची प्राप्ती करून घेण्याच्या धडपडींत काल निघून जातो. यामुळें जीवास शांतता नसते. श्रेयसाधनाकडे लक्ष नसतां कित्येक सत्कर्म करण्याचे सुप्रसंग हातांतून जातात. अर्थात् वसंतकालीं फुलांचा बहर येऊन आपल्या पूजापात्रामध्यें सुवासाचें पुष्प नसावें अशी स्थिति प्राप्त होते. पुढें तारुण्यावस्था जाऊन वृद्धावस्था प्राप्त होतांच मागील काळाकडे पहातां आपण ऐहिक सुखांच्या मागें लागून कांहींच श्रेयसाधन केलें नाहीं याबद्दल मनाला पश्चात्ताप होतो. या भवनदीच्या पलीकडे पैल तीरावर असणाऱ्या भगवंताचें स्मरण होतें. त्याच्या प्रेमाची अंतःकरणाला खूण पटते आणि ही कायारूपी नौका लोटून द्यावी अर्थात् देहविषयक मोह लोटून देऊन आत्म्याची परमात्म्याशीं गांठ पडेल असें करावें असें वाटूं लागतें. या भवनदीचा तीर भयानक आणि अंधःकारानें व्याप्त असा दिसतो. अशा या प्रदेशांतून निघून जाऊन भगवंताचें दर्शन घेण्याची तयारी

करावी हाच ध्यास जीवाला लागतो. याप्रमाणें ज्यांच्या अंतःकरणांत भगवत्प्रेम उदित झालें आहे त्यांस तारण्यासाठीं भगवंत सदा तत्पर व तयार आहे.

भवसागर तरतां । कां रे करीतसां चिंता ॥
पैल उभा दाता । कटीं कर ठेवोनिया ॥
त्याचे पायीं घाला मिठी । मोल न घे जगजेठी ॥
भावा एकासाठीं । खांदां वाहे आपुल्या ॥
सुखें करावा संसार । परि न संडावे दोन्ही वार ।
दया क्षमा घर । चोजवीत येतील ॥
भक्ति मुक्तीची चिंता । नाहीं दैन्य दरिद्रता ॥
तुका म्हणे दाता । पांडुरंग वोळगिल्या ॥

---

## ॥ गीत ६६ ॥

बं.—आजि श्रावण घन गहन गोहे । ( इं. २२ )

श्रावणाच्या घन गहन अंधारीं । गुप्तपणें फेरी करिसी तूं ॥
रात्रीच्या प्रशांत समयीं कोणाला । न कळे, सकलां चुकविसी ॥
आजि प्रातःकालें मिटले नयन । वायु निमंत्रण करी वृथा ॥
निबिड मेघांनीं नग्न नीलाकाश । व्यापिलें उदास दिसताहे ॥
कूजन पक्षांचें वनीं स्तब्ध झालें । द्वारहि झांकलें गृहीं सर्व ॥
निर्जन मार्गी तूं कोण रे प्रवासी । एकटा चालसी निशाकालीं ॥
प्रियतमा सख्या न करीं अव्हेर । माझें गृहद्वार मुक्त असे ॥
नको जाऊं मित्रा, येईं माझे घरीं । गुप्त स्वप्नापरि नको होऊं ॥

भावार्थः—श्रावण महिन्याची रात्र. ( पर्जन्यामुळें ) सर्वत्र अंधःकार पसरला आहे. सोसाट्याचा वारा वाहत आहे. अंधःकारामुळें प्रातःकालाचीं किरणें देखील दृष्टीस पडलीं नाहींत, असा हा त्रासाचा दिवस. नील आकाश कृष्णवर्णाच्या मेघांनीं व्याप्त असून उदास दिसत आहे. पक्षांचें कूजन बंद पडलें आहे आणि सर्व लोक आपल्या घराचे दरवाजे बंद करून स्वस्थ बसले आहेत. अशा या भयानक अंधःकाराच्या वेळीं तूं एकटाच प्रवास करीत आहेस. तुझें गमन लोकांच्या दृष्टिआड होत आहे. मित्रा, याप्रमाणें या निर्जन प्रदेशांतून तूं एकटाच कां जात आहेस ? माझें गृहद्वार मी उघडें ठेवलें आहे. कृपा करून आंत ये. स्वप्नाप्रमाणें गुप्त होऊन माझी निराशा करूं नकोस.

**रहस्य**—प्रपंचांत जेव्हां निराशा, भय आणि उदासीनता पसरलेली असते त्या वेळीं सर्वत्र ओसाड पडल्याप्रमाणें भासत असून या निर्जन प्रदेशांत आपणास सहाय्य करणारा कोणी राहिला नाहीं असें वाटतें. अशा संकटसमयीं दुःखितांचा कैवारी जो भगवंत त्याचें स्मरण होतें. त्याच्या कृपाप्रसादाची अंतःकरणाच्या ठायीं आवड उत्पन्न होते आणि ती कृपा प्राप्त व्हावी म्हणून आपण याचना करीत असतों.

**जोडिलें अंजुळ । असे दीन उतावीळ ।**
**पहा पहा कृपादृष्टि । आणा अनुभवा गोष्टी ।**
**तूं धनी मी सेवक । आइक्य तें एका एक ।**
**करितों विनंति । तुका सन्मुख पुढती ॥**

याप्रमाणें उतावीळ झालेल्या जीवाला भगवंताची भेट झाल्यावांचून विश्रांति प्राप्त होत नाहीं. ज्याप्रमाणें ऋतूंमध्यें श्रेष्ठ आणि आनंददायक असा वसंतकाल सदोदित रहात नाहीं आणि वर्षाकालाच्या भयंकर रात्रींच्या वेळीं निबिडांधःकारांत काल कंठण्याचा प्रसंग येतो त्याप्रमाणें प्रापंचिकाला बाल्यावस्था व यौवनावस्था मागें पडल्यावर वृद्धापकालीं ईश्वरकृपेची आवश्यकता भासूं लागते. त्या वेळीं भगवंताचें स्वागत करण्यासाठीं आपलें मन व अंतःकरण तो उघडें ठेवीत असतो. ईश्वरानें या अंतःकरणाच्या ठायीं प्रवेश करून आपणास भीति व दुःख यांतून मुक्त करावें असें त्यास वाटतें. त्याची वृत्ति पालटते. अशा वेळीं तत्वज्ञानाच्या गोष्टी ऐकून त्याला शांतता प्राप्त होत नाहीं. कर्ममार्ग पतकरून त्याच्या मनाची तळमळ शांत होत नाहीं. प्रेमाचा किंवा भक्तीचा मार्ग तेवढा त्याला श्रेष्ठ प्रकारचा दिसून त्या मार्गाच्या अनुरोधानें जाण्यांत त्याला आनंद वाटतो. म्हणून हा कष्टलेला जीव म्हणतो—

**उसंतल्या कर्मवाटा । बहु मोठा आघात ॥**
**शीघ्र यावें शीघ्र यावें । हातीं न्यावें धरूनि ॥**
**भागलों या खटपटें । घटपटें करितां ॥**
**तुका म्हणे कृपावंता । माझी चिंता खंडावी ॥**

## ॥ गीत ६७ ॥

बं.—आजि झडेर राते तोमार अभिसार ( इं. २३ )

मेघ वर्षताहे वाहे झंझावात । निशा भयक्रांत व्यापी जगा ॥
ऐशा या समयीं सख्या कोठें जासी । प्रिये भेटायासी सांग का रे ॥
जिवलगा माझ्या तूंचि प्रियतम । तुजवरि प्रेम पूर्ण माझें ॥
हताश होवोनी स्फुंदतें गगन । ताठले नयन नसे निद्रा ॥
तुझ्यासाठीं नाथा उघडिलें दार । पाह्या वारंवार आलासी का ॥
दृष्टि पुढें कांहीं मजला दिसेना । मार्ग उमगेना तुझा कोठें ॥
येसी का तूं येथ नदी ओलांडोनी । किंवा वनांतूनि सख्या येसी ॥
भयानक घोर अंधारांतूनियां । वाट काढोनीयां येसी का रे ॥
माझा जीव प्राण तूं माझा विसांवा । स्वागत कराया पाहें वाट ॥

**भावार्थ**—सोसाट्याचा वारा सुटला असून मुसळधार पाऊस पडत आहे. सर्वत्र अंधःकार पसरला असल्यामुळें भयानक दिसतें. अशावेळीं तूं कोठें जातोस ? तुझ्या प्रियेच्या भेटीसाठीं जात आहेस काय ? जिवलगा, मी तुझ्यावर पूर्ण प्रेम ठेऊन बसल्यें आहें. मला निद्रा देखील येत नाहीं. प्राणनाथा, तूं येतोस कीं काय हें पाहण्यासाठीं किती तरी वेळां मी दार उघडून बाहेर पाहिलें. परंतु सर्वत्र अंधःकार पसरल्यामुळें तुझा मार्ग मला दिसेना. तूं कोणत्या मार्गानें येत आहेस बरें ? तूं माझा प्राणविसांवा, तूंच माझा जीव–प्राण आहेस. तुझ्या स्वागतासाठीं मी वाट पहात बसल्यें आहें. पाऊस वारा न जुमानतां तूं माझ्याच भेटीला येत आहेस काय ?

**रहस्य**—संकटाचा काल प्राप्त झाला असतां किंवा प्रापंचिक आपत्तींमुळें मनास शांतता नसल्या वेळीं ईश्वराचा धांवा करावा असें वाटतें. भगवंतानें तत्काळ प्रसन्न होऊन आपणास मनोधैर्य, स्वास्थ्य व अभय द्यावें असा मनाला ध्यास लागतो. भौतिक शास्त्राच्या प्रगतीमुळें जगांत सुधारणा व शोध यांस ऊत आला असून त्यांयोगें चढाओढ, जीवनार्थ कलह आणि राष्ट्राराष्ट्रांतील गुप्त वैमनस्य यांस चालन मिळालें आहे. ब्रह्मतेजोबलापेक्षां क्षात्रतेजोबल विशेष अनुकरणीय व आदरणीय आहे असें वाटून एक दुसऱ्यावर मात करण्यासाठीं रात्रंदिवस धडपड करीत आहे आणि संधी प्राप्त होतांच शस्त्रें व मनुष्यबल यांच्यावर भिस्त ठेवून दुसऱ्याचा पाडाव करण्यासाठीं पुढें सरसावत आहे. अशा या रक्तपाताच्या बुडाशीं अहंभाव, स्वार्थ व मत्सर यांचें अधिष्ठान असलें तरी आपल्या बाजूस

यश यावें अर्थात् दुसऱ्याचा नाश व्हावा म्हणून ईश्वराची करुणा भाकण्यासाठीं देवालयांत व घरांतील देव्हाऱ्यापुढें गर्दी जमते. शस्त्रास्त्रांहूनहि प्रचंड अशी ईश्वरशक्ति आहे आणि तीच खरी तारणारी आहे म्हणून तिची अपेक्षा करण्यासाठीं सर्वच आस्तिक आणि नास्तिक पुढें सरसावतात. जी गोष्ट राष्ट्रांची तीच लहान अशा कौटुंबिकाची. त्याच्या ऐन तारुण्याच्या वेळीं त्याला सर्व गोष्टी स्वपराक्रमानें तडीस नेतां येतील असें वाटतें; परंतु शक्ति क्षीण झाली, मनाची शांतता बिघडली किंवा आप्तेष्टांकडूनहि प्रेमसुख मिळेनासें झालें म्हणजे प्रापंचिक मनुष्य ईश्वराकडे वळतो, त्याच्या प्रेमाची याचना करतो आणि हें प्रेम प्राप्त होत नाहीं म्हणून विव्हळत असतो. परंतु ईश्वरकृपा प्राप्त होण्यास या कृपेची याचना करण्यासाठीं मनुष्यानें तारुण्यांत देखील जागरूक राहिलें पाहिजे. केवळ संकटाच्या वेळीं उत्पन्न झालेलें प्रेम दीर्घकाल टिकत नाहीं.

**शांति क्षमा वसे देहीं देव पैंसे । चित्त समरसें मुक्तमेळु ॥**
**निर्गुणें उपरमु देव पुरुषोत्तमु । प्रकृति संगमु चेतनेचा ॥**
**सज्ञानीं दिवटा अज्ञानीं तो पैठा । निवृत्तीच्या तटा नेतु भक्ता ॥**
**मुक्ताई दिवस अवघा हृषीकेश । केशवेंविण वास शून्य पैंसे ॥**

याप्रमाणें ज्यांची वृत्ति ईश्वरमय झाली आहे त्यांच्या हृदयांत खरें ईश्वरप्रेम आहे असें म्हणणें योग्य होईल.

---

## ॥ गीत ६८ ॥

बं.—दिवस जदि सांग, ना जदि गाहे पाखी ( इं. २४ )

**दिन सांग होतां धरियेलें मौन । विहंगमें, गान स्तब्ध झालें ॥**
**श्रमित होवोनी वायु स्थिरावला । जगीं पसरला अंधकार ॥**
**अंधार-प्रावर्णे आच्छादीं मजला । जेवीं जगताला निद्रा व्यापी ॥**
**जैसे निशाकालीं कमलांचे दल । नयनपटल मिटताति ॥**
**तेवीं सावकाश मज दे टाकून । अति निबिड घन तिमिरांत ॥**
**प्रवासी निघाला कराया प्रयाण । मार्गे आक्रमण चाललेंसे ॥**
**संपलें पाथेय सामग्री न कांहीं । जीर्ण पात्र तेंही भंगलेंसे ॥**
**अंगावरि वस्त्रें धूळीनें भरलीं । शक्ति क्षीण झाली न चालवे ॥**

पेशा प्रवाशाचे चुकवीं तूं हाल । लज्जा दैन्य मल फेडीं त्याचा ॥
नुरवीं तयाची क्षतव्यथा देवा । त्यावरी वर्षावा कृपाघन ।
उषापानें जैसें गलित सुमन । लाभतें जीवन–तेज–कळा ॥
तैसा सुधाजळें चेतवीं तयाला । पुन्हा प्रवासाला सज्ज करीं ॥

**भावार्थ**—दिवस संपला म्हणजे पक्ष्यांचें गायन बंद होतें. वायू देखील थकून जातो आणि त्याची गति कुंठित होते. जग सर्व अंधःकारानें भरून जातें आणि सर्व हालचाल बंद पडून जग निद्रावश होतें. याप्रमाणें माझा दिवस किंवा हालचाल करण्याचा काल आतां संपल्यामुळें मलाहि अंधःकाराच्या वस्त्रानें आच्छादून टाक. रात्रीच्यावेळीं कमलाचे दल मिटतात त्याप्रमाणें माझे डोळे मिटूं देत. देवा ! अत्यंत निबिड अशा अंधःकारामध्यें मला लोटून दे.

शिधासामग्री घेऊन निघालेल्या प्रवाशाचा प्रवास चालला असतां मध्येंच अन्नाचा पुरवठा संपला म्हणजे तो बिचारा पुढें कसा जाईल ! जीर्ण वस्त्रें, फुटकें भांडें, धुळीनें भरलेला देह अशा प्रकारें ज्या प्रवाशाच्या वांट्याला दैन्य, लज्जा आणि मळ ही अमंगल स्थिति प्राप्त झाली आहे त्याचे हाल चुकविणें तुझ्या हातीं आहे. क्षतव्यथेनें व्याकुळ झालेल्या या दीनावर तुझ्या कृपेचा वर्षाव कर. उषःकालीं ज्या प्रमाणें फुलास टवटवी प्राप्त होते त्याप्रमाणें या प्रवाशावर अमृताचा वर्षाव करून त्याला पुन्हा प्रवास करण्याला सज्ज कर. (अशा प्रकारचा मी प्रवासी आहें. माझा प्रवास बंद पडण्याचा काल आला आहे. यावेळीं कृपेनें मला सहाय्य देऊन माझा प्रवास पुन्हा चालू होईल असें कर.

**रहस्य**—प्रत्येक मनुष्य या जगांत प्रवासी आहे. जन्मल्या दिवशींच त्याच्या-प्रवासाला प्रारंभ होतो. पूर्व संचित हीच शिधासामग्री बरोबर घेऊन आलेल्या मनुष्याला ती संपेपर्यंतच प्रवास करणें शक्य आहे. या प्रवासाच्या मुदतींत अनेक जनांशीं अनेक प्रकारचा संबंध घडून आल्यामुळें प्रकृतिधर्मानुसार कांहीं गोष्टीं-विषयीं प्रेम जडतें. कांहीं गोष्टी सुखदुःखास कारण होतात आणि याप्रमाणें मनुष्य-प्राणि कार्यांत गुंतून असतो म्हणूनच त्याला प्रवासाचे हाल देखील प्रिय वाटतात. तो संकटास तोंड देतो आणि प्राप्त परिस्थितींत आनंद मानण्याचा यत्न करतो. परंतु जोंपर्यंत शारीरिक बलाचा ऱ्हास झालेला नाहीं तोंपर्यंत मात्र या प्रकारें प्रवास-कार्य झटून चालविणें शक्य आहे. कर्म करण्याची हौस आणि तें पार पाडण्याचें सामर्थ्य अंगीं असेपर्यंत हें जीवन सह्य आहे. जेव्हां शक्ति क्षीण होते, कायिक

दौर्बल्याबरोबर मानसिक शक्तीची क्षीणता प्राप्त होते आणि आपण आणलेली शिधासामग्री संपली असें जेव्हां मनाला वाटूं लागतें तेव्हां या जीवनाचा अंत व्हावा अशी अंतःकरणाच्या ठायीं प्रबल इच्छा उत्पन्न होते. याप्रमाणें जीविताचा अंत होणें म्हणजे या जगांतील आपला प्रवास बंद होणें आहे. प्रवाशाचे हाल चुकविणें म्हणजे पुनः त्याच्यांत कायिक, मानसिक व इतर सामर्थ्य उत्पन्न करणें आहे. कृतकर्मानुसार प्राप्त होणारी शिधासामग्री पुनः प्रवास करण्यास उपयोगी पडण्यासारखी आहे. या सर्व अनुकूल साधनांची देणगी देऊन परमेश्वरानें प्रवासास पुनः सज्ज करणें म्हणजे पुनर्जन्म देऊन प्रपंचकार्य चालविण्यास योग्य करणें आहे. ज्या जन्मांत ईश्वराचें नामस्मरण घडतें, ईश्वराची ओळख पटते आणि ईश्वरी प्रेमाचा वांटेकरी होतां येतें तो जन्म पुनः प्राप्त व्हावा म्हणून ईश्वराकडे याचना करणें यांत वावगें कांहीं नाहीं.

मोक्षाचें आह्मांसी नाहीं अवघड । तो असे उघड गांठोळीस ॥
भक्तीचे सोहळे होतील जीवासी । नवल तेविशीं पुरवितां ॥
ज्याचें त्यासी देणें कोणतें उचित । मानूनियां हित घेतों सुखें ॥
तुका म्हणे सुखें देई संवसार । आवडीसि थार करीं माझे ॥

---

## ॥ गीत ६९ ॥

बं.—माझे माझे कभू जबे अवसाद आसि ( इं. २५ )

कधीं मज वाटे अत्यंत श्रमित । उत्साह लोपत अंतर्यामीं ।
गति मंद होई भासे निर्बलता । नसे श्रांत चित्ता कर्म-इच्छा ॥
समयीं या वाटे निद्रा घ्यावी घोर । लोटोनीयां भार तुजवरि ।
उत्साह नसतां कासया पूजन । करूं म्रियमाण शिथिल तें ॥
श्रांत निशाकालीं अर्पुनी हृदय । धुलींत निर्भय पहुडेन ॥
व्यथित चित्तानें श्रमित होवोनी । तुझीया पूजनीं न गुंतेन ॥
निरुत्साहें पूजा कधीं न करीन । श्रमित होवोन क्षीणोच्चारें ॥
संभ्रमावांचोनी तुझी पादसेवा । न करीन देवा सत्य सत्य ॥
श्रमित दिनाच्या नेत्रावरि मृदुल । रजनि-पटल झांकितोसी ।
नूतन प्रकाशें उगवावा दिन । म्हणुनी आवरण रजनीचें ॥

**भावार्थः**—कधीं कधीं माझ्या जीवाला अत्यंत श्रम झाल्याप्रमाणें वाटतें. अंतर्यामींचा उत्साह नाहींसा होतो आणि सर्व कार्यांची समाप्ती करून घोर निद्रा घ्यावी असें वाटतें. देवा! तुझा पूजारी म्हणून मी जन्मास आलों. तुझी पूजा करीत राहणें हाच माझा धर्म आहे. परंतु शक्ति क्षीण झाल्यामुळें मनांत उत्साह नसतां क्षीण मंत्रोच्चारानें तुझी पूजा करण्यामध्यें आनंद कोणता? मन व्यथित झालें आहे, योग्य संभ्रमानें तुझी पूजा करण्यासाठीं लागणारी मनाची तयारी नसतां तुझी पूजा करण्यापेक्षां मी स्वस्थ निजून राहावें हेंच योग्य आहे. रात्रीच्या आवरणामुळें नवीन उगवणाऱ्या दिवसाला ज्याप्रमाणें विशेष तेज उत्पन्न होतें त्याप्रमाणें या निद्रेंतून उठल्यावर मीदेखील उत्साहयुक्त होऊन तुझ्या पूजन-कार्यांत विशेष रमेन असें मला वाटतें. दिवसाचे श्रम निवारण करण्यास रात्र आहे; त्याप्रमाणें माझे श्रम निवारण करण्याला निद्रा हेंच साधन आहे.

**रहस्य**—ईश्वराचें संसारकार्य ब्रह्मांडांत चाललें आहे. या कार्यांत भाग घेण्यासाठीं सर्व प्राणिमात्र जन्मास येत असून ईश्वरस्मरणपूर्वक हें कार्य चालविणें हा मनुष्याचा विशेष धर्म आहे. परंतु हें कार्य चालविणें शक्य नाहीं असें जेव्हां दिसून येतें त्यावेळीं ईश्वराची करुणा भाकून हें कार्य चालविण्यासाठीं सामर्थ्याची याचना करावी लागते. असा प्रसंग विशेषतः वृद्धापकालीं येतो. तुकोबांनीं वर्णिल्याप्रमाणें—

**वृद्धपणीं आली जरा। शरीर कांपे थरथरा॥**
**दांत दाढा पडिल्या ओस। हनुवटी भेटे नाकास॥**
**हात पाय राहिले कान। नेत्रां पाझर हाले मान॥**
**अंग कांती परतली। चिरगुटा ऐसी जाली॥**
**आड पडे जिव्हा लोटे। शब्द न ये मुखावाटे॥**

अशी स्थिति प्राप्त झाल्यावर कोणतेंही कार्य करण्याचें सामर्थ्य अंगीं राहणें शक्य नाहीं. तेव्हां या कष्टमय स्थितींतून मुक्त करून पुनर्जन्म देण्याविषयीं ईश्वरास शरण जाणें हेंच योग्य होय. नव्या दमानें कार्यभार उचलतां यावा म्हणून हा नवीन जन्म पाहिजे आहे. ईश्वराचें कार्य चालविण्याची शक्ति नाहींशी होतांच त्यानेंच या संसारांतून मुक्त करून पुनः नवीन संसारांत घालावें म्हणून याचना करणारा भक्त मुक्तीची इच्छा करीत नसतो. ईश्वराचें कार्य उत्तम रीतीनें चालविण्यास समर्थ होऊन पुनः जन्मास यावें हीच त्याची इच्छा असते.

**तुका म्हणे गर्भवासीं। सुखें घालावें आम्हासी॥**

अशा रीतीनें तुकोबानें प्रार्थना करण्याचें कारण तरी हेंच कीं या संसारांत आल्यावर परमेश्वराचें कार्य थोडें बहुत करण्याचा मान प्राप्त होतो. तें कार्य चालविण्यासाठींच हा जन्म आहे. आणि हें कार्य चालविण्याची शक्ति नाहींशी होतांच या जीविताचा अंत व्हावा अशी सत्कार्यनिरत मानवांची इच्छा असते. त्यांस मृत्यु म्हणजे पुनर्जन्माचा संधिकाल आहे असें वाटतें म्हणून त्यांच्या मनाला वियोगव्यथा होत नसते.

मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥
आतां तुम्ही पाहा आमुचें नवल । नका वेंचूं बोल वायांवीण ॥
तुका म्हणे तुम्ही भयभीत नारी । कैसी सांग सरी तुम्हां आम्हां ॥

याप्रमाणें ज्यांनीं या देहीं असून संसारकार्य चालवीत असतां मृत्यूची भीति काढून टाकिली त्यांना मृत्युदेखील आनंदमय वाटावा यांत नवल नाहीं.

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा । तो जाला सोहळा अनुपम्य ॥
आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ॥
एकदेशी होतों अहंकारें आथिला । त्याच्यायोगें झाला सुकाळ हा
फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दूरी झालों ॥
नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवोनीयां भाव ठेलों पायीं ।
तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ॥

---

## ॥ गीत ७० ॥

बं.—कथा छिल एक तरीते केवळ तुमि ( इं. ४२ )

उषःकालीं प्रेमें तुवां एक कथा । निवेदिली नाथा माझ्या कानीं ॥
उभयतां आम्हीं बैसोनी नौकेंत । कोणा नकळत जाऊं वेगें ॥
अंतपार नाहीं नसे देश जेथ । तीर्थयात्रा तेथ करूं आम्हीं ॥
अपार सागरीं माझें प्रेमगीत । बैससी ऐकत मौनत्वानें ॥
तदा मृदुहास्य मुखीं विलसेल । गानही खुलेल माधुर्यानें ॥
वेळ प्रयाणाची अजुनी न कां आली । कार्यें न संपलीं अद्यापी कां ॥
पहा संध्याराग जगीं पसरला । पक्षी स्वगृहाला जाती वेगें ॥

**भावार्थः**—कधीं कधीं माझ्या जीवाला अत्यंत श्रम झाल्याप्रमाणें वाटतें. अंतर्यामींचा उत्साह नाहींसा होतो आणि सर्व कार्यांची समाप्ती करून घोर निद्रा घ्यावी असें वाटतें. देवा! तुझा पूजारी म्हणून मी जन्मास आलों. तुझी पूजा करीत राहणें हाच माझा धर्म आहे. परंतु शक्ति क्षीण झाल्यामुळें मनांत उत्साह नसतां क्षीण मंत्रोच्चारानें तुझी पूजा करण्यामध्यें आनंद कोणता? मन व्यथित झालें आहे, योग्य संभ्रमानें तुझी पूजा करण्यासाठीं लागणारी मनाची तयारी नसतां तुझी पूजा करण्यापेक्षां मी स्वस्थ निजून राहावें हेंच योग्य आहे. रात्रीच्या आवरणामुळें नवीन उगवणाऱ्या दिवसाला ज्याप्रमाणें विशेष तेज उत्पन्न होतें त्याप्रमाणें या निद्रेंतून उठल्यावर मीदेखील उत्साहयुक्त होऊन तुझ्या पूजन-कार्यांत विशेष रमेन असें मला वाटतें. दिवसाचे श्रम निवारण करण्यास रात्र आहे; त्याप्रमाणें माझे श्रम निवारण करण्याला निद्रा हेंच साधन आहे.

**रहस्य**—ईश्वराचें संसारकार्य ब्रह्मांडांत चाललें आहे. या कार्यांत भाग घेण्यासाठीं सर्व प्राणिमात्र जन्मास येत असून ईश्वरस्मरणपूर्वक हें कार्य चालविणें हा मनुष्याचा विशेष धर्म आहे. परंतु हें कार्य चालविणें शक्य नाहीं असें जेव्हां दिसून येतें त्यावेळीं ईश्वराची करुणा भाकून हें कार्य चालविण्यासाठीं सामर्थ्याची याचना करावी लागते. असा प्रसंग विशेषतः वृद्धापकालीं येतो. तुकोबांनीं वर्णिल्याप्रमाणें—

**वृद्धपणीं आली जरा। शरीर कांपे थरथरा॥**
**दांत दाढा पडिल्या ओस। हनुवटी भेटे नाकास॥**
**हात पाय राहिले कान। नेत्रां पाझर हाले मान॥**
**अंग कांती परतली। चिरगुटा ऐसी जाली॥**
**आड पडे जिव्हा लोटे। शब्द न ये मुखावाटे॥**

अशी स्थिति प्राप्त झाल्यावर कोणतेंही कार्य करण्याचें सामर्थ्य अंगीं राहणें शक्य नाहीं. तेव्हां या कष्टमय स्थितींतून मुक्त करून पुनर्जन्म देण्याविषयीं ईश्वरास शरण जाणें हेंच योग्य होय. नव्या दमानें कार्यभार उचलतां यावा म्हणून हा नवीन जन्म पाहिजे आहे. ईश्वराचें कार्य चालविण्याची शक्ति नाहींशी होतांच त्यानेंच या संसारांतून मुक्त करून पुनः नवीन संसारांत घालावें म्हणून याचना करणारा भक्त मुक्तीची इच्छा करीत नसतो. ईश्वराचें कार्य उत्तम रीतीनें चालविण्यास समर्थ होऊन पुनः जन्मास यावें हीच त्याची इच्छा असते.

**तुका म्हणे गर्भवासीं। सुखें घालावें आम्हासी॥**

अशा रीतीनें तुकोबानें प्रार्थना करण्याचें कारण तरी हेंच कीं या संसारांत आल्यावर परमेश्वराचें कार्य थोडें बहुत करण्याचा मान प्राप्त होतो. तें कार्य चालविण्यासाठींच हा जन्म आहे. आणि हें कार्य चालविण्याची शक्ति नाहींशी होतांच या जीविताचा अंत व्हावा अशी सत्कार्यनिरत मानवांची इच्छा असते. त्यांस मृत्यु म्हणजे पुनर्जन्माचा संधिकाल आहे असें वाटतें म्हणून त्यांच्या मनाला वियोगव्यथा होत नसते.

मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥
आतां तुम्ही पाहा आमुचें नवल । नका वेंचूं बोल वायांवीण ॥
तुका म्हणे तुम्ही भयभीत नारी। कैसी सांग सरी तुम्हां आम्हां ॥

याप्रमाणें ज्यांनीं या देहीं असून संसारकार्य चालवीत असतां मृत्यूची भीति काढून टाकिली त्यांना मृत्युदेखील आनंदमय वाटावा यांत नवल नाहीं.

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम्य ॥
आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ॥
एकदेशी होतों अहंकारें आथिला । त्याच्यायोगें झाला सुकाळ हा
फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दूरी झालों ॥
नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवोनीयां भाव ठेलों पायीं ।
तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ॥

---

## ॥ गीत ७० ॥

बं.—कथा छिल एक तरीते केवळ तुमि ( इं. ४२ )

उषःकालीं प्रेमें तुवां एक कथा । निवेदिली नाथा माझ्या कानीं ॥
उभयतां आम्हीं बैसोनी नौकेंत । कोणा नकळत जाऊं वेगें ॥
अंतपार नाहीं नसे देश जेथ । तीर्थयात्रा तेथ करूं आम्हीं ॥
अपार सागरीं माझें प्रेमगीत । बैससी ऐकत मौनत्वानें ॥
तदा मृदुहास्य मुखीं विलसेल । गानही खुलेल माधुर्यानें ॥
वेळ प्रयाणाची अजुनी न कां आली । कार्यें न संपलीं अद्यापी कां ॥
पहा संध्याराग जगीं पसरला । पक्षी स्वगृहाला जाती वेगें ॥

**नौकेची शृंखला कधीं ती सुटेल । प्रयाण होईल कोण्या काळीं ॥**
**सूर्यास्तींचें तेज लोपे तैशी नौका । लोपेल वेगें का अंधारांत ॥**

**भावार्थ**—माझे प्राणनाथ, तुम्हीं उषःकालीं मला प्रेमानें सांगितलें कीं आम्ही उभयतां एका नौकेंत बसून जाऊं. ज्याठिकाणीं कोणाचीहि दृष्टि पोहोंचत नाहीं अशा ठिकाणीं तीर्थयात्रेस जाण्याचा तुमचा बेत होता. नावेंतून जातांना म्यां सुस्वर गीत गात बसावें आणि तुम्ही तें आनंदित चित्तानें श्रवण करावें असेंहि ठरलें होतें. परंतु अद्यापि आपण आलां नाहीं. संध्याकाळ प्राप्त झाला तरी आपली भेट नाहीं. आपण कोठें गुंतलां बरें? ही नौका केव्हां सुटेल आणि आमच्या प्रयाणास केव्हां आरंभ होईल?

**रहस्य**—परमतत्वापासून जीवात्मा विभक्त होऊन जन्म पावतांना जीवात्म्याला वाटत असावें कीं या संसार समुद्रामध्यें काया—नौकेमध्यें बसून जातांना परमात्म्याची संगति लाभेल. त्यायोगें हा संसार आनंदमय होईल. गीत गात असतां अर्थात् सत्कर्म आचरीत असतां परमेश्वरास संतोष होईल. याप्रमाणें एक-मेकाच्या सहवासांत कालक्रमण होऊन या जीविताचें सार्थक होईल. परंतु प्रकृतीच्या स्वाधीन झालेल्या जीवात्म्याला देहाचा लोभ सुटत नाहीं. बंधन पावलेल्या कायानौकेनें प्रवास करणें असाध्य होतें. शेवटीं शारीरिक शक्ति क्षीण झाल्यावर जीवात्म्याला कळून येतें कीं आपण या प्रापंचिक मोहामध्यें पडून भगवंताला विसरून गेलों. अशा स्थितींत मनाला ईश्वरभेटीचा ध्यास लागतो आणि भगवंता, तूं मला केव्हां भेटशील असे उद्गार मुखावाटे निघतात. या देहाचा देखील मोह सुटतो आणि भगवत्कृपेची आवड उत्पन्न झाल्यामुळें ती कधीं प्राप्त होईल अशी तळमळ अंतःकरणांत उत्पन्न होते. या भवसागराच्या पलीकडे जाऊन ईश्वराचें दर्शन घ्यावें असें जीवाला वाटतें.

**उल्लंघिली लाज । तेणें साधियेलें काज ॥**
**सुखें नाचे पैल तीरीं । गेलों भवाचे सागरीं ॥**
**नामाची सांगडी । सुखें बांधिली आवडी ॥**
**तुका म्हणे लोकां । उरली वाचा मारी हांका ॥**

याप्रमाणें ज्यांनीं भगवन्नामाच्या बलावर अर्थात् ईश्वराचें स्मरण करीत कार्य चालविलें त्यांस या प्रपंचाचा त्रास बाधला नाहीं. परंतु ज्यांनीं अहंपणास बळी

पडून ममत्व बुद्धीनें सुखदुःखाच्या व्यथा उत्पन्न करून घेतल्या त्यांना ईश्वराची गांठ न पडतां शेवटीं आक्रोश करण्याची पाळी आली. ती अशीः—

काहो ऐथें काळ आला आम्हां आड। तुम्हांपाशीं नाड करावया ॥
कांहो विचाराचें पडिलें सांकडें। काय ऐसें कोडें उपजलें ॥
कांहो उपजेना द्यावी ऐशी भेटी। काय द्वैत पोटीं धरिलें देवा ॥

किंवा अत्यंत प्रेमाच्या भरांत ईश्वरास दोष देऊन असेंहि म्हणतां येईल कीं—

काय तुझें वेंचे मज भेटी देतां। वचन बोलतां एक दोन ॥
काय तुझें रूप घेतों मी चोरोनी। त्या भेणें लपोनी राहिलासी ॥
काय तुझें आम्हां करावें वैकुंठ। भेवों नको भेट आतां मज ॥
तुका म्हणे तुझी नलगे दसोडी। परि आहे आवडी दर्शनाची ॥

---

## ॥ गीत ७१ ॥

बं.—आर नाइरे वेला नामल छाया ( इं. ७४ )

दिन अस्ता गेला छाया पसरली। धरणी व्यापिली अंधःकारें ॥
वेळ झाली आतां जाया नदीतटीं। जल आणूं घटीं भरोनीयां।
अखिल गगनीं जलौघाचे स्वर। अति करुणापर ऐकूं येती ॥
वाटे मारी हांका मजसी हा ध्वनि। कलश भरोनी आणूं जातें ॥
एकांत स्थलीं या कोणी न पांथस्थ। वहातसे स्वस्थ शीत वायु।
उसळति प्रेमसरितेच्यावरि। मंजुळ लहरी उत्साहानें ॥
गृहासी जाईन का मी परतोनी। भेटेल का कोणी न कळे तें ॥
नदीपार जाया असे नौका तींत। वेणू वाजवीत आहे कोणी ॥
नदीघाटीं आल्यें कलश भराया। पसरलि छाया पृथ्वीवरि ॥

**भावार्थ**—संध्याकाळची वेळ झाली. जगांत अंधःकार पसरत चालला आहे. तेव्हां नदीतटावर जाऊन पाण्याचा कलश भरून आणण्याचा समय झाला. सर्वत्र जलाच्या ओघाचे स्वर ऐकूं येतात. हा ध्वनि जणूं मलाच हांका मारीत आहे असा भास होतो. या प्रेमरूपी सरितेवर उत्साहानें लाटा उसळत आहेत आणि नदीच्या पलीकडे जी नौका आहे तिच्या ठायीं वीणा वाजवीत कोणी बसला आहे. ( यामुळें माझें मन आकर्षित झालें असून ) या ठिकाणाहून मी परत

घरीं जाईन किंवा कसें याबद्दल मला संशय येऊं लागला आहे. ( कसेंहि असो ) घट भरून आणण्यासाठीं ही मी नदीघाटावर चालल्यें.

रहस्य—वस्त्रें जीर्ण झाल्यावर तीं टाकून देऊन नवीन वस्त्रें धारण करणें प्राप्त आहे. त्याप्रमाणें जीर्ण देहाचा त्याग करून नवीन देह धारण करणें ही सृष्टीची सहज स्थिति आहे. याच न्यायानें घटांतील उदक संपलें म्हणजे पुनः तें भरून आणावें लागतें. उदक म्हणजे जीवन या अर्थी या ब्रह्मांडांत जीवनाची नदी वहात आहे. सर्व आकाशामध्यें या उदकाच्या स्रोताचा शब्द ऐकूं येतो. अर्थात् सर्वत्र प्राण, किंवा जीवनशक्ति ओतप्रोत भरली आहे. प्रेमामुळें या जीविताला लहरी प्राप्त होतात. परंतु या जीविताच्या पलीकडे आनंददायक असा वेणूनाद ज्याच्या वेणूंतून निघतो असा परमात्मा आहे. त्याच्याकडे जाण्यासाठीं जीवाची धडपड चाललेली असते. सारांश, प्रकृतीला प्राणाची आवश्यकता आहे आणि हा प्राण महाप्राणाकडे ओढला जातो. अशी ही आत्मा व परमात्मा यांच्या मधील प्रेमाकर्षणशक्ति विश्वामध्यें वावरत आहे. हें ज्यांनीं जाणिलें त्यांना देहरूपी घट रिकामा होऊन प्राणरूपी जीवन पुनः त्यांत भरून घेणें या क्रिया साहजिक दिसतात. पुनर्जीवन प्राप्त करून घेणें हा एका प्रकारें आनंददायक प्रसंग असला तरी पुनर्जन्मावस्था प्राप्त करून देणारा मृत्यु कोणासहि भयप्रद व दुःखद वाटतो. परंतु मृत्यूच्या पलीकडे पाहणाऱ्या साधुजनांस संसारसमुद्राच्या परतीरावर असलेला परमात्मा दृष्टिगोचर होऊन आनंद होतो. विष्णूच्या म्हणजे अखिल विश्वास व्यापून असलेल्या भगवंताच्या सगुण मूर्तीचें ध्यान करणारा तुकोबा म्हणतो—

> पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ॥
> गरुड येतो फडत्कारें । नाभी नाभी म्हणे त्वरें ॥
> मुकुट कुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ॥
> मेघश्याम वर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥
> चतुर्भुज वैजयंति । गळां माळ हे रुळती ॥
> पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥
> तुका झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥

ज्या दैवताचें चिंतन करण्यांत तुकोबाचें आयुष्य गेलें तेंच दैवत शेवटच्या वेळीं त्यास दिसावें आणि हें दैवत अखिल विश्वास दिपविणारें आहे असें त्यानें पूर्णपणें जाणावें यांत आश्चर्य नाहीं. तुकोबाचे शेवटचे उद्गार देखील मननीय आहेत.

आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी। सकळां सांगावी विनंति माझी॥
वाढ वेळ झाला उभा पांडुरंग। वैकुंठा श्रीरंग बोलावितो॥
अंतकाळीं विठो आम्हांसी पावला। कुडीसहित झाला गुप्त तुका॥
हेच उद्गार खऱ्या भक्ताच्या तोंडून शेवटीं निघावयाचे.

---

## ॥ गीत ७२ ॥

बं.—आमि शरत शेषेर मेघेर मन ( इं. ८० )

शरत्काळा अंतीं क्षीण शेष मेघ। गगनीं सवेग धांवे व्यर्थ॥
तेवीं मी हिंडतों सतत भुवनीं। कारणावांचोनी निरर्थक॥
दिनकरा, तुझ्या स्पर्शानें अजूनि। नाहीं वितळोनि गेलें बाष्प॥
तुझ्या किरणांचा पडतां प्रकाश। माझाही प्रवेश त्यांत व्हावा॥
विभक्त होवोनी झाला बहु काळ। मोजितों व्याकुळ मास वर्षें॥
ऐसी तुझी इच्छा ऐसी तुझी लीला। नव्या नव्या खेळा खेळ सुखें॥
नेई माझ्यांतूनि तुच्छ रिक्ततेसि। सजवीं तियेसी नाना वर्णें॥
तुझ्या हेमवर्णीं बुडवीं घनातें। वायूवरि त्यातें तरंगूं दे॥
शून्यतेसि देईं नित्य विचित्रता। दावीं भगवंता ऐशी लीला॥
जंव तुज वाटे तंव तुझा खेळ। थोपवीं सकळ निशाकाळीं॥
घोर अंधःकारीं अश्रु वाहतील। घन वितळेल तदा पूर्ण॥
अथवा प्रभातीं शुभ्र शीताकाशीं। निर्मल प्रकाशीं वितळेल॥
जाईन मी ज्योति-सागराच्या पार। टाकोनी असार जीवितासी॥

भावार्थ—हे परमात्मन्, तुझ्यापासून विभक्त होऊन या भूतलावर मी आल्यास बरींच वर्षें झालीं. येथें मी विनाकारण भटकत आहें. माझी गति शरत्कालामध्यें इतस्ततः आकाशांत भटकणाऱ्या निर्जल मेघाप्रमाणें झाली आहे. माझ्यामध्यें तुच्छ रिक्तता किंवा अहंभाव जो भरलेला आहे त्यायोगें तुझ्यांत सम्मीलन पावण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं. अशा रीतीनें म्यां असावें अशी तुझी इच्छा असेल तर मी या स्थितींत राहण्यास तयार आहें आणि या स्थितींत अनेक प्रकारें मजला नटवून तुझी लीला प्रगट कर. परंतु माझी इच्छा अशी आहे कीं माझ्यांतील ( रिक्तता किंवा ) पोकळ अभिमान गळून जावा. तुझ्या स्पर्शानें माझ्या

बाष्पवत् वासना वितळून जाव्या आणि तुझ्या तेजामध्यें मी मिळून जावें. मला पश्चात्ताप होऊन नेत्रांवाटे अश्रु वाहूं लागतील किंवा ज्ञानरवीच्या उदयामुळें सर्वत्र प्रकाश पडून तुझें सत्स्वरूप मला दिसूं लागेल तेव्हां हें वासनारूपी बाष्प सारें वितळून जाईल आणि मी या असार जीविताला टाकून देऊन ज्योतिसागराच्या पलीकडे ( असणाऱ्या ) तुला येऊन भेटेन.

**रहस्य**—ईश्वराचा अंगभूत जीवात्मा ईश्वरापासून विभक्त झाल्यावर कर्मानुसार दीर्घ कालापर्यंत या विश्वाच्या ठिकाणीं जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत भ्रमण करीत असतो. जलरहित व शुष्क अभ्राप्रमाणें इतस्ततः भ्रमण करणाऱ्या या जीवाला शांतता कोठून प्राप्त होणार ! ईश्वराचा निकट परिचय व निकट संबंध सुटल्यामुळें जीवाला त्रास होतो. आणि देवा, मला पदरीं घे आणि माझें दैन्य व माझी दुर्बलता नाहींशी कर, या जीविताला उज्ज्वल कर आणि तुझ्या इच्छेला योग्य वाटेल त्याप्रमाणें माझा शेवट लाव असे उद्गार मुखावाटे येतात.

**अनाथ परदेशी हीन दीन भोळें । उगलेंचि लोळें तुझे रंगीं ॥**
**आपुलें म्हणावें मज नुपेक्षावें । प्रेमसुख द्यावें मायबापा ॥**
**कासवीचे परि दृष्टी पाहें मज । विज्ञानीं उमज दावूनियां ॥**
**तुका म्हणे तुझा झालों शरणांगत । काया वाचा चित्त दुजें नाहीं ॥**

याप्रमाणें ईश्वरचरणीं विनम्र होऊन या जीविताचें साफल्य व्हावें एतदर्थ त्यालाच शरण जावें हाच उत्तम मार्ग आहे. परमात्म्याच्या ज्योतीमध्यें आत्मज्योत मिळून जावी आणि ईश्वरैक्य व्हावें हेंच उच्चतम ध्येय साधुसंतांनीं दृष्टीपुढें ठेऊन तें ध्येय गांठण्यासाठीं विषयवासनांचा त्याग केला, मोहाचें जाल दूर सारून आपली काम्यकर्मांतून सुटका करून घेतली आणि विदेहीपणाचा आनंद व सौख्य मिळविलें. देहाचा त्याग केल्यावर असार जीविताचा त्याग केल्याबद्दल त्यांच्या आत्म्याला आनंद वाटणें साहजिक आहे.

## ॥ गीत ७३ ॥

बं.—जानि गो दिन जाबे ए दिन जाबे ॥

ठाऊक मजला दिन हा जाईल । दिन हा संपेल कधींतरी ॥
मंद प्रभाकर करुण हास्यानें । मजला दयेनें पाहील तो ॥
सदय नयनें मुख पाहोनीयां । निरोप निघाया देईल तो ॥
मार्गीठायीं वेणू मधुर वाजेल । धेनू चरतील नदीकाठीं ॥
बालकें अंगणीं क्रीडा करितील । सुस्वरें गातील विहंगम ॥
तथापि हा दिन राहिल न येथ । जाईल निश्चित अस्तालागीं ॥
आनंदें येथोनी प्रयाण करीन । तत्पूर्वी विलीन प्रार्थितों मी ॥
जीवितरहस्य इच्छितों जाणाया । पदीं म्हणोनीयां विनवीतों ॥
श्यामल पृथ्वीनें पाहोनी आकाशीं । येथ कां मजसी बोलवीलें ॥
माझीया श्रवणीं रात्रीची शांतता । तारकांची कथा कां सांगते ॥
दिन–ज्योतियोगें प्राणाच्या लहरी । हृदया-अंतरीं कां उठल्या ॥
रहस्य हें थोर उत्सुक ऐकाया । करीं विश्वराया निवेदन ॥
माझें पूर्ण होतां पृथ्वीचें भ्रमण । तेंवी गीतगान संपतांचि ॥
क्षण एक मज स्वस्थ राहूं देई । करंडकाठायीं भरायातें ॥
भिन्न ऋतुपुष्पें फलें करंडकीं । भरेन या लोकीं निघताना ॥
जीवनीं प्रकाश प्राप्त जो जाहला । त्यायोगें तुजला पाहूं दे रे ॥
माझीया कंठींची सुमनाची माळा । घालूं देई गळा तुझिया रे ॥
मज याचसाठीं राहूं देई क्षण । संपतां जीवन माझें देवा ॥

**भावार्थ**—मला ठाऊक आहे कीं हा माझ्या आयुष्याचा दिवस केव्हां तरी संपल्यावांचून राहणार नाहीं आणि हा दिवस अस्तास जातेवेळीं मला सूर्याकडून प्रेमाचा निरोपही मिळेल. मार्गावर वेणूचा मधुर नाद चाललेला असो, किंवा नदीकांठीं गायी चारा खात असोत किंवा बालकांचा खेळ चाललेला असो, आणि पक्षांचें गीतगान चालो. त्यांच्यासाठीं हा दिवस कांहीं थांबणार नाहीं. तो अस्तास जाईल हें खास. मला निरोप मिळतांच मी आनंदानें जाईन. तरी पण एक क्षणभर राहून एक दोन गोष्टी करावयाच्या आहेत तेवढया मला उरकून घेण्याला अवसर मिळावा हीच माझी प्रार्थना आहे. हें माझें जीवन संपत आहे अशा वेळीं मला जीवित-

रहस्य काय आहे तें कळूं दे. मला पृथ्वीनें स्वर्गावरून या लोकीं कां बोलवून आणिलें, रात्रीच्या प्रशांत वेळीं आकाशांतील तारागणाकडे पाहिलें म्हणजे माझें चित्त कां आनंदित होतें आणि दिवसाचा प्रकाश पडतांच माझ्या अंतःकरणाच्याठायीं प्राणाच्या लहरी कां उचंबळतात हें मी ऐकण्यास उत्सुक झालों आहें. भगवंता! हें जीविताचें रहस्य मला सांग. पृथ्वीवरील माझें भ्रमण पूर्ण होऊन गीतगान अर्थात् सर्व कर्माचरण बंद झाल्यावर, मला एक क्षणभर या जगांत राहूं दे. त्या मुदतींत या लोकीं प्राप्त झालेलीं भिन्न ऋतूंचीं फुलें व फळें माझ्या करंडकांत भरून घेतों. माझ्या आयुष्यांत मला जो प्रकाश प्राप्त झाला त्यायोगें तुझें रूप मला दृग्गोचर होवो. तुझें रूप मला पाहूं दे. त्याचप्रमाणें माझ्या गळ्यांतील पुष्पमाला (अर्थात् मी जीं सत्कृत्यें केलीं असतील त्यांबद्दल मला प्राप्त झालेलें यश) तुला अर्पण करण्याला मला अवधी पाहिजे आहे. म्हणून एक क्षणभर मला राहूं दे. इतक्या गोष्टी केल्याबरोबर मी या जीविताचा त्याग करून निघून येईन.

**रहस्य**—बाल्य, यौवन व वृद्ध या तिन्ही अवस्थांमध्यें होण्याजोगीं व करण्याजोगीं कार्यें शक्त्यनुसार पार पाडल्यावर शेवटीं इहलोकींची यात्रा संपूर्ण होण्याचा काल प्राप्त व्हावयाचा हें ठरलेलें आहे. जगांतील आपले अनेक व्यवसाय अद्यापि अपुरे आहेत किंवा जीवास आनंद देणाऱ्या अनेक गोष्टी चालल्याच आहेत म्हणून कांहीं आपणास सर्व काल या जगांत वास करून राहणें शक्य नाहीं. या जीविताचा अंत होणारच होणार. तरी पण ज्यांनीं या जीविताचा शक्य तितका चांगला उपयोग केला त्यांना शेवटच्या वेळीं आपल्याला कांहीं गोष्टींचें ज्ञान व्हावयाचें राहिलें म्हणून वाईट वाटेल. आपण या लोकीं कां जन्मास आलों, आलों कोठून व जातों कोठें, आपल्या हातून कोणतीं सत्कर्मे किंवा असत्कर्में घडलीं इत्यादि विचारांचें काहूर माजून क्षणभर जीवात्म्याचा प्रयाणकाळ लांबणीवर पडेल तर बरें असें मनाला वाटूं लागेल. मनुष्याचा अंत होतांना त्यानें त्याचीं कर्में बरोबर घेऊन जाणें अपरिहार्य आहे. परंतु हीं कर्में आणि त्यांबद्दल प्राप्त झालेली विजयश्रीची माला भगवच्चरणीं अर्पण करून निष्काम होणें आणि सर्वांत श्रेष्ठ असा आत्मार्पणाचा यज्ञ करणें यासारखें जीवित–साफल्याचें महत्कृत्य दुसरें नाहीं. अगदीं शेवटच्या वेळीं तरी हें आत्मार्पण होणें इष्ट आहे, याप्रमाणें अंतसमयीं आत्मार्पण करण्याचें भाग्य लाभण्यास आवश्यक असलेलें मनःस्वास्थ भगवत्कृपेशिवाय प्राप्त होणार नाहीं. तुकारामासारख्या संतांनीं व व्यवहारांत असूनहि केवळ कर्तव्यकर्म म्हणून कर्माचरणाची संवय लावून घेतलेल्या

थोर विभूतींनीं हें भाग्य ईशकृपेनें मिळविलें आणि शेवटीं जेव्हां भगवत्कृपा प्राप्त झाली तेव्हां त्यांच्या मुखावाटे उद्गार आले—

याचसाठीं केला होता आटाहास । शेवटचा दीस गोड व्हावा ॥
आतां निश्चितीनें पावलों विसांवा । खुटलिया धांवा तृष्णेचीया ॥
कवतुक वाटे जालिया वेचावें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळी मेळीं ॥

## ॥ अष्टम खंड ॥

# मृत्यु व पुनर्जन्म.

यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः ।
अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ।
यदा सर्वे प्रभिद्यन्ते हृदयस्येह ग्रंथयः ।
अथ मर्त्योऽमृतो भवति— (कठोपनिषत्)

**अर्थ**—मनुष्याच्या बुद्धीला ज्या ज्या इच्छा होत्या त्या सर्व जेव्हां नाश पावतात, तेव्हां तो मृत्युरहित होतो. याच देहीं ब्रह्म पावतो. या देहीं जेव्हां बुद्धीचीं सर्व बंधनें तुटतात तेव्हां मनुष्य मृत्युरहित होतो.

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ गीता.

**अर्थ**—जो जन्मास येतो त्याला मृत्यु आहे आणि जो मृत्यु पावतो त्याला पुनर्जन्म आहे. याप्रमाणें जी अपरिहार्य गोष्ट आहे तिच्याबद्दल दुःख करणें योग्य नाहीं.

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ गीता.

मूलस्थितीमध्यें भूतमात्र अव्यक्त स्थितींत असतें. मधल्या स्थितींत मात्र तें व्यक्त होतें. पुनः त्याचा नाश होतांच अव्यक्त होतें. मग दुःख कां करावें ?

### अभंग.

बीज भाजुनि केली लाही । आम्हां जन्म मरण नाहीं ॥
आकारासी कैंचा ठाव । देह प्रत्यक्ष जाला देव ॥
साकरेचा नव्हे ऊंस । कैंचा आम्हां गर्भवास ॥
तुका म्हणे अवघा जाग । सर्वां घटीं पांडुरंग ॥

## ॥ गीत ७४ ॥

बं.—तखन रात्रि अंधार हल ( इं. ५१ )

अंधार पडला नित्यकार्यें झालीं । द्वारें बंद केलीं ग्रामजनीं ॥
या पुढें न कोणी येईल अतिथि । ऐसें सांगताति ग्रामजन ॥
परि कोणि सांगे अद्यापि येईल । ग्रामीं या नृपाल वाट पहा ॥
हांसोनी तयांतें आश्वासीलें आम्ही । येईना या ग्रामीं महाराज ॥
होतां द्वारावरी आघात प्रबल । सांगितलें खेळ वायूचा हा ।
दीप मालवोनी सुखें शय्येवरि । पहुडलों घरीं स्वस्थ चित्तें ॥
सांगताति कोणी आला नृपदूत । बोललों हांसत नव्हे दूत ॥
मध्यरात्रीं येई घोर शब्द कानीं । वाटलें गगनीं मेघ गर्जे ॥
भूमि कंप पावे कंप ये भित्तीला । निद्राभंग झाला तये वेळीं ॥
कोणी सांगताति घोष हा चक्रांचा । रथ नृपतीचा येत आहे ॥
निद्राभ्रमीं आम्हीं तयां सांगितलें । मेघ हे गर्जले नव्हे रथ ॥
निबिडांधकारी असतां रजनी । दुंदुभीचा ध्वनि कानीं आला ॥
उठा नका करूं विलंब जागे व्हा । ऐसा शब्द तेव्हां उठे ग्रामीं ॥
भीतीनें चेपोनि वक्षावरि हात । बैसलों कांपत गृहामाजी ॥
शब्द कानीं आला पहा भूपध्वज । आला महाराज उठा वेगें ॥
उठोनी त्वरेनें गर्जलों तेधवां । विलंब न लावा क्षणाचाही ॥
आले महाराज कोठें दीप माळा । कोठें अर्पायाला पुष्पहार ॥
कोठें स्वागताची सिद्धता बसाया । सिंहासन रायासाठीं कोठें ॥
भाग्यहीन सारे वाटे लज्जा फार । नाहीं सुश्रृंगार मंडपही ॥
नाहींत तोरणें ग्रामीं उभारिलीं । स्वारी थडकली येवोनीयां ॥
उपाय कोणता या वेळीं योजावा । सांगती तेधवां कोणी ऐसें ॥
कासयासि व्यर्थ ऐसे आक्रंदतां । काय सांगा आतां उपयोग ॥
रिक्त हस्तें त्याचें करावें स्वागत । शून्य गृहा आंत आणा त्यातें ॥
द्वारें उघडोनि करा शंखनाद । अंधारीं अगाध आला भूप ॥
आपुलया अंधाऱ्या भेसूर गृहाचा । स्वामीराय साचा आला आतां ॥
गर्जना मेघांची होतसे गगनीं । कांपते रजनी विद्युद्भयें ॥
तुझें छिन्न क्षुद्र कुशासन आणीं । पसरीं अंगणीं तयासाठीं ॥
दुःख-रात्री-राजा अकस्मात आला । वाहे वायू, जला वर्षी मेघ ॥

**भावार्थ**—रात्र पडली. ग्रामवासी जनांचे प्रत्यहींचे सर्व व्यवहार संपून निद्रा घेण्याची वेळ आली. यापुढें कोणी अतिथि अभ्यागत येणार नाहींत म्हणून घराचे दरवाजेहि बंद करण्यांत आले. तेव्हां कोणी म्हणाले, इतक्यांत द्वारें बंद करूं नका. महाराजाधिराज येण्याचा संभव आहे. तरी कोणी मान्य करीना. द्वारावर आघात होऊं लागले; रथचक्रांची गर्जना ऐकूं येऊं लागली. तथापि वायूची व मेघाची गर्जना आहे असें समजून लोक दिवा मालवून झोंपीं गेले. पुढें जेव्हां दुंदुभीचा ध्वनि ऐकूं आला आणि महाराज आले असें जिकडे तिकडे बोलूं लागले, तेव्हां भयग्रस्त होऊन थरथर कांपत आम्ही शय्येवरून उठलों. परंतु महाराजांच्या स्वागताची आमची तयारी नव्हती. ध्वजातोरणें, दीप, माळा, मंडप किंवा आसन यांपैकीं एकही नसल्यामुळें आम्ही लज्जेनें मान खालीं घातली. तेव्हां कोणी म्हणाले, आतां आक्रंदून काय होणार आहे? कुशासन अंगणामध्यें टाका आणि शंखनादानें महाराजांचें स्वागत करा. तुमच्या शून्यगृहाच्या आंत त्याला बसवा. (त्याच्या स्वागताची ज्या अर्थी तुम्ही तयारी केलेली नाहीं त्या अर्थी तुम्ही तरी आतां काय करणार?)

**रहस्य**—मनुष्याचे प्रत्यहीं व्यवहार चालले असून या व्यवहारांचा केव्हां तरी अंत होणार आहे याची जाग्रति त्याच्या अंतःकरणांत नसते. अर्थात् ह्या नश्वर देहाचा एक दिवस नाश होणार आहे आणि हा प्रापंचिक व्यवहार संपूर्ण करून निश्चिंतपणें येथून प्रयाण करण्याची आपली तयारी ठेविली पाहिजे या गोष्टीची त्याला जागरूकता नसते. जणूं आपण अजरामर आहों अशा रीतीनेंच त्याचे सर्व व्यवहार चालत असून उद्यांचा दिवस आपलाच आहे या भावनेनें तो वागत असतो. परंतु जीवित क्षणभंगुर आहे यासाठीं आत्मोन्नति करून मृत्यूचेंहि स्वागत करण्याची आपली तयारी ठेविली पाहिजे, हें त्याला समजत नाहीं. किंवा समजत असलें तरी त्याचें वर्तन आत्मोन्नतीस परिपोषक असें नसतें.

**काळ जवळचि उभा नेणां । घाली झांपडी खुंटी काना ।**
**कैसा सावध हुशार राहीं । आपुला तूं आपुले ठायीं ॥**
**काळ जवळचि उभा पाहीं । नेदी कोणासी देऊं काहीं ॥**
**तुका म्हणे काळा । कर्म मिळतें तें जाळा ॥**

याप्रमाणें साधुसंतांनीं इशारा दिलेला आहे. तरी त्याची किंमत कोणी मानीत नाहीं. यामुळें मृत्यु येतांच शंखध्वनि करून कुशासनावर त्यास बसविण्यापलीकडे आपणाकडून त्याचें स्वागत होत नाहीं.

पडिली हे रूढि जगा परिचार । चालविती वेव्हार सत्य म्हूण ॥
मरणाची कां रे नाहीं आठवण । संचिताचा धन लोभ हेवा ॥
देहाचें भय तें काळाचें भातुकें । ग्रासूनि तें एकें ठेविलेंसे ॥
तुका म्हणे कांहीं उघडा रे डोळे । जाणोनी आंधळे होऊं नका ॥

अशा रीतीनें संतांनीं केलेल्या उपदेशाचें रहस्य जाणल्यास प्रत्येक मनुष्य ही जीवितयात्रा संपविण्याची केव्हांही सिद्धता ठेवील. जीवित असेपर्यंत कर्तव्यकर्मे करीत जाणें आणि तें संपण्याचा प्रसंग येतांच आनंदानें येथील व्यवहार आटपून जाणें हेंच ज्यांनीं ध्येय ठेविलें, त्यांस मृत्यूची स्वारी अकस्मात् येण्याचा संभव आहे आणि तो आला असतां केव्हांहि त्याचें आनंदानें स्वागत करण्याची तयारी ठेविली पाहिजे या दोन्ही गोष्टी पूर्णपणें पटतात. म्हणून त्यांचें वर्तन निरुपाधिक आणि त्यांचें कर्म निष्काम असतें.

---

## ॥ गीत ७५ ॥

बं.—पाठाइले आणि मृत्युर दूत-( इं. ८६ )

माझ्या गृहद्वारीं येवोनी ठाकला । तुंवा जो धाडिला मृत्युदूत ॥
परतीराहूनि आला हा घेवोन । तुझें निमंत्रण मजलागीं ॥
निबिड अंधारीं रजनीचि वेळ । हृदय व्याकुळ भयभारें ॥
तरी हातीं दीप घेवोनि गृहांत । करितों स्वागत नमूनि त्या ॥ माझ्या.
जोडोनियां कर करीन पूजन । व्याकुल नयन-जलें युक्त ॥
पूजीन दूतासी अर्पुनी चरणीं । प्राणधनखानी प्रियतम ॥
तुझ्या आदेशाचें करोनी पालन । दूत परतोन जाईल तो ॥
प्रभात मजला अंधःकारमय । वाटेल तो भय-दुःखव्याप्त ॥
शून्य गृहीं मग एकटा राहीन । त्वत्पदीं वाहीन मज दीना ॥ मा०

भावार्थ—भगवंता तुंवा जो मृत्युदूत माझ्या घरीं पाठविला तो येऊन पोहोंचला आहे. हा तुझें निमंत्रण घेऊन मजकडे या रात्रीच्या समयीं आला आहे. ( माझ्या प्रिय जनाला घेऊन जाण्यासाठीं आलेल्या ) या मृत्युदूताचें मी अश्रूंनीं भरलेल्या नयनांनीं आणि व्याकुल चित्तानें स्वागत करतों. अत्यंत प्रिय असा प्राण त्याजला अर्पण करून त्याची पूजा करतों. प्रभातकाल भय आणि दुःख

यांनीं व्याप्त होईल. माझें गृह शून्य भासेल तथापि त्यांत मी दिवस कंठीन आणि तुझ्या चरणीं विलीन होऊन राहीन.

**रहस्य**—मृत्यु या शब्दाच्या ठायीं जी वियोगाची कल्पना आहे तीच आमच्या दुःखास कारणीभूत होते. परंतु एकाद्या मित्राचें ज्याप्रमाणें आम्ही आनंदानें स्वागत करतों त्याचप्रमाणें मृत्यूचें स्वागत करण्याची आपल्या मनाची तयारी असल्यावर त्यापासून जीवास त्रास किंवा दुःख होण्याचा संभव नाहीं. जुनीं वस्त्रें टाकून देऊन नवीन वस्त्रें परिधान करणें यापासून दुःख न होतां उलट ज्याप्रमाणें मनाला आनंद वाटला पाहिजे त्याचप्रमाणें आत्म्याच्या वसाहतीला नालायक झालेल्या देहाचा त्याग करून नवीन देह धारण करणें ही स्थिति देखील आनंदमय वाटली पाहिजे. या दृष्टीनें ज्यांनीं या लोकीं मृत्यूचें रहस्य जाणिलें त्यांच्या मनाचें स्वास्थ्य कधींहि बिघडण्याचा संभव नाहीं. जगांतील यच्चयावत् वस्तूंचा ग्रास करण्यासाठीं महाकाल टपून बसला आहे. योग्य समय प्राप्त होतांच लहान मोठे, श्रीमंत गरीब, प्रिय अप्रिय किंवा सुंदर कुरूप या गोष्टींकडे लक्ष न देतां सर्वांस सारख्याच निर्दयतेनें काळ आपल्या दाढेखालीं चिरडीत असतो. अखिल चराचर सृष्टि प्रत्येक निमिषाला कालाच्या सन्निध जात आहे. अर्थात् वय वाढत आहे म्हणजे शेष आयुष्य कमी होत आहे. अशाप्रकारें मृत्यूचें रहस्य जाणल्यास या स्थित्यंतराच्या अवस्थेबद्दल कौतुकच वाटेल. संत सांगतात—

**मरण हें पेरणें जन्म हें उगवणें । हे मायेची खूण जाणीतली ॥**
**संग तुझा पुरे संग तुझा पुरे । संग तुझा पुरे नारायणा ॥**
**तूं तरी न मरे मी तरी न मरें । भक्ति हे संचरे हाचि लाभू ॥**
**विठा म्हणे मी केशवा ठाईंचा मी नेणें । गर्भवास भोगणें तुझी लाज ॥**

असें जरी आहे तरी जोंपर्यंत मनोविजय झाला नाहीं तोंपर्यंत या विरह-वेदना राहून जीवास त्रास व्हावयाचा हें ठरलेलें आहे. विरहामुळें निरुत्साह, क्लेश, दुःख आणि औदासिन्य यांचा पगडा जीवात्म्यावर बसून तो विव्हळ होतो. अशा वेळीं मृत्यु हाच आपला मित्र आहे, ज्या देहाठायीं आपण कोंडून पडलों आहों त्याचा मृत्यूनें नाश करावा आणि आपणास मुक्तता प्राप्त व्हावी असें जीवात्म्यास वाटतें. अर्थात् भयानक वाटणारा मृत्यु मित्राप्रमाणें प्रेमळ भासूं लागतो. ईश्वरसेवेंत चित्त रमावें आणि देहाच्या यातनांची व्यथा आत्म्यास होऊं नये असें वाटून दुःखित प्राणि परमेश्वर चरणांचा आश्रय धरतो. गुरूपदेशानंतर नामदेवानें काढलेले उद्गार अत्यंत मननीय आहेत.

मरण सांगा स्वामी कवणीया गुणें । संसारीं मरणें उरलें नाहीं ॥
आम्हां मरण नाहीं मेलें होतें काई । श्रीगुरूचे पायीं राहे मना ॥
मरणें हे काया मरणें हें माया । मरे हे छाया कवण्या गुणें ॥
भक्ति अमर कंदु रामनाम वंदूं । नामयासि छदूं विठोबाचा ॥
याप्रमाणें ज्यांस ईश्वराचा छंद लागला ते अमर झाले.

---

## ॥ गीत ७६ ॥

बं.—कोलाहल तो वारन हलो ( इं. ८९ )

व्यर्थ न करावा कोलाहल ऐशी । प्रभूची मजसी झाली आज्ञा ॥
माझे प्राणालाप अंतरीं काढावे । अंतर्यामीं गावें गीत गान ॥
गर्दी उसळली राजमार्गावरि । जन व्यवहारीं गोंधळती ॥
देवघेव चाले ऐके वाणीघोष । नसे अवकाश स्वस्थतेला ॥
गुंतलों वेव्हारीं मारी हाका कोण । शब्द ये कोठोन कळे ना कीं ॥
कोण बोलताहे माध्याह्नीचे वेळीं । ऐशा या अकालीं मजलागीं ॥
माझ्या उपवनीं कुसुमें अकालीं । कां न उमललीं आजवरि ॥
माध्याह्नीं मक्षिका कां न गुंजारव । करिती सदैव मधूसाठीं ॥
शुभाशुभद्वंद्वीं किति गेले दिन । व्यर्थ झाला शीण जीवासी या ॥
आलस्याच्या वेळीं खेळ जो खेळला । बाही तो मजला खेळगडी ॥
आकर्षुनि घेई माझें अंतःकरण । कारणावांचोन हांका मारी ॥
नकळे कासया बोलवी मजला । कोणत्या कार्याला अकस्मात ॥

**भावार्थ**—यापुढें म्यां सर्व प्रकारचा व्यवहार बंद करावा आणि अंतर्यामींच गीत गावें अशी भगवंताची इच्छा दिसते. चहूंकडे व्यापार, उद्योग, देवघेव वगैरे चालू असून कोलाहल कानीं येत आहे. मी देखील या व्यवहारांत गुंतलों आहें. असें असतां या भलत्याच वेळीं मला कोण बोलवीत आहे बरें ? माझ्या उपवनामध्यें अकालीं कधीं फुलें फुलत नाहींत किंवा मधुमक्षिका माध्यान्हाच्या वेळीं मधूसाठीं हिंडत नसतात. अर्थात् भलत्याच वेळीं सृष्टींतील कार्य होत नाहीं. सर्व कांहीं योग्य कालींच घडतें. मग मलाच कां या वेळीं निमंत्रण आलें आहे न कळे. बरें वाईट याचा निर्णय करण्यांत आयुष्य गेलें. रिकामा असतांना ज्याच्या बरोबर खेळलों तो आतां मला बोलवीत आहे. कोणत्या कार्यासाठीं हा अकस्मात बोलवीत असेल बरें !

**रहस्य**—संसार क्षणभंगुर आहे ही गोष्ट सर्वसंमत आहे. तथापि आम्ही या संसारांत इतके गढून गेलेले असतों कीं विश्रांतीशिवाय रात्रंदिवस धडपड करण्यामध्येंच आपणास आनंद होतो. आम्ही या ऐहिक व्यवहारांच्या पलीकडे विचार करण्यास देखील तयार नसतों. परंतु या व्यवहाराच्या ऐन गडबडींत असतां कधीं कधीं तो अपुरा टाकून जाण्याचा प्रसंग येतो. हा मृत्युलोक इतक्या तांतडीनें सोडून जाण्याचा प्रसंग केव्हां व कां येतो हें कोणी सांगूं शकत नाहीं.

**आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना ॥**

हेंच खरें आहें. ही भगवंताची आज्ञा अकस्मात होण्याचा संभव आहे म्हणूनच

**क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥**
**नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥**
**संत समागमीं धरूनि आवडी । करावी तांतडी परमार्थी ॥**
**तुका म्हणे इहलोकींच्या वेव्हारें । नये डोळे धुरे भरूनि राहों ॥**

अत्यंत प्राचीन कालीं देखील अपमृत्यूचा प्रसंग लक्षांत आणून महाभारताच्या लेखकानें ( वनपर्वांत ) सांगितलें आहे कीं—

**श्वः कार्यमद्य कुर्वीत पूर्वाण्हे चापराह्णिकं ।**
**न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वा कृतम् ॥**

उद्यांचें कार्य आज आणि सायंकाळीं करावयाचें कार्य सकाळीं उरकून टाकावें. कारण कीं कार्य झालें किंवा राहिलें याची मृत्यु वाट पहात नाहीं. अर्थात् **नित्यं संनिहितो मृत्युः** म्हणजे मृत्यु नित्यशः जवळच आहे, ही गोष्ट विसरतां नये.

---

## ॥ गीत ७७ ॥

बं.—मरण जे दिन दिनेर शेषे आसूबे तोमार द्वारे ( इं. ९० )

**ज्या दिनीं मरण येईल तव द्वारीं । काय तया करीं अर्पिशील ।**
**ठेवीन सन्मुख प्राणाची ही खाण । जाऊं न देईन शून्य हस्तें ।**
**शरत्कालीं तेवीं वसंताचे रात्रीं । जीवनाचे पात्रीं रस वर्षले ।**
**संध्याकालीं नित्य प्रभात समयीं । आलीं पात्राठायीं पुष्पें फलें ॥**
**हृदयांतरीं जीं सुखदुःखें आलीं । व्यापुनी राहिलीं जीवनातें ॥**
**आजवरि केलें संचित जें धन । येतां तो सुदिन अर्पीन मी ॥**
**रस-पुष्प-फलें सुखदुःखें सारीं । येतां मृत्यु द्वारीं अर्पीन त्या ॥**

**भावार्थ**—मृत्यु द्वारावर येतांच त्याला तूं काय काय अर्पण करणार ? त्याला मी रित्या हातानें जाऊं देणार नाहीं. माझा प्राण त्याच्या स्वाधीन करीन. माझ्या जीवनपात्रामध्यें निरनिराळ्या ऋतूंत जे रस जमा झाले ते रस, अंतःकरणांतील सुखदुःखें, आणि आजपर्यंत संग्रहित केलेलें सर्व धन (पुण्य) मृत्यूला अर्पण करीन.

**रहस्य**—अंगीं सामर्थ्य असेपर्यंत इहलोकीं कर्तव्य कर्म करीत राहणें हा एकच श्रेष्ठ मानवी धर्म आहे. या धर्माचरणास आलेले अडथळे न जुमानतां जो मनुष्य आपलें कर्म अव्याहत करीत असतो, त्याचा कर्मसमुच्चय श्रेष्ठ प्रकारचा असतो. परंतु इहलोकींच्या व्यवहारांत अनेक बरीं वाईट कृत्यें घडत असून या कृत्यांच्या फलांतून निघालेला रस आपल्या जीवनपात्रांत भरलेला असतो. हा रस, आणि योग–वियोगादिक अवस्थामुळें प्राप्त झालेलीं सुख–दुःखें आमच्या प्राणास इतकीं व्यापून असतात कीं प्राणाबरोबर यांचा संग्रह देखील मृत्यूच्या हातीं अर्पण करणें भाग आहे. हा सर्व संग्रह आत्म्याच्या पुढील जन्माचें पाथेय आहे. त्याचा उपभोग घेतल्यावांचून त्याला सुटका नाहीं. मृत्यु हाच आपल्या मूल ठिकाणाहून आलेला दूत आहे ही भावना दृढ झाल्यावर त्याच्याबरोबर निघून जाण्यास दुःख कां वाटणार ? आपला प्राण मृत्युदूतामागें आनंदानें चालला आहे आणि त्याज-बरोबर कर्माचें गांठोडेंहि जात आहे ही भावना जाग्रत ठेविली असतां मृत्यूची भीति बाळगण्याचें तरी कारण काय ?

**माहेरींचें आलें तें मज माहेर । सुखाचें उत्तर करीन त्यासी ॥**
**पायांवरि माथा आलिंगीन बाहीं । घेईन लवलाहीं पायवणी ॥**
**सुखसमाचार पुसेन सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ।**
**आपुलें जीवींचें सुखदुःख भावें । सांगेन आघवें आहे तैसें ।**
**तुका म्हणे वीट नेघें आवडीचा । बोलिलीच वाचा बोलवीन ॥**

देह टाकण्याच्या वेळीं माहेरचें बोलावणें आलें असें मानणारा विदेही ईश्वरचरणीं सर्व सुखदुःखाचा त्याग करतो यांत नवल काय ? सर्व संसाराचें जें सार तेंच भगवंतास अर्पण करणारा मृत्युभयापासून मुक्त होतो. इतकेंच नव्हे मृत्यु भयानक वाटण्याच्या ऐवजीं आपला मार्गदर्शक व भगवंताकडे नेणारा मित्र आहे असें त्याला वाटतें.

## ॥ गीत ७८ ॥

बं.—ओ गो आमार एइ जीवनेर शेष परिपूर्णता ( इं. ९१ )

परिपूर्णता तूं जीवनाचि मरणा । उत्सुक श्रवणा कथा तुझी ॥
तुझ्यासाठीं साऱ्या जन्मीं मी जागतों । मार्ग प्रतीक्षितों प्रति दिनीं ॥
तुझीया प्रीत्यर्थ सुखदुःख क्लेश । साहें अहर्निश मरणा रे
माझें हें जीवन संचित हें माझें । वासनांचें ओझें तुझ्यासाठीं ॥
गुप्तपणें माझें प्रेम स्रवतसे । तुझ्या ठायीं वसे सर्वकाल ॥
होतां मजवरि शुभ दृष्टिपात । होईल जीवित तुझें मृत्यो ॥
जीवनवधु ही वरमाला करीं । घेवोनी सुंदरी वाट पाहे ॥
हास्यमुखें कधीं तुज सजवाया । येऊं मृत्युराया सांग मज ॥
राहील न तदा भेद आप-पर । त्यजूनि माहेर येतां तूतें ॥
निर्जन रात्रीच्या कालीं पतिव्रता । आलिंगील नाथा पूर्णानंदें ॥
मृत्यो, माझ्या मृत्यो, वेगें कथीं मज । मानसींचें गुज माझ्या कानीं ॥

**भावार्थ**—हे मृत्यो ! तुझ्यामुळें या जीवनाची परिपूर्णता होते. प्रतिदिवस तूं येशील म्हणून मी टपून बसतों, आणि साऱ्या जन्मीं केवळ तुझ्या प्रीत्यर्थ ( अर्थात् मृत्यूची स्वारी प्राप्त होईल कीं काय म्हणून ) सुख, दुःख व क्लेश भोगतों. केवळ तुझ्यासाठींच मी सर्व प्रकारचा संचय करीत असून हें जीवन तुझ्या सेवेला वाहिल्याप्रमाणें आहे. ( मनुष्य अजरामर असता तर त्याला संचय तरी कशास पाहिजे ? ) या दृष्टीनें विचार केला तर केवळ तुझ्या प्रेमामुळेंच माझे व्यवहार चालले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. तुझा दृष्टिपात मजवर होतांच ही जीवनरूपी वधु तुला वरील. पतिव्रतेप्रमाणें तुला प्रेमानें आलिंगन देईल. मग मी ( आत्मा ) माहेर ( देह ) सोडून तुझ्यापाशीं आल्यावर सर्व भेद-भाव नाहींसा होऊन तुझ्यामध्येंच एकरूप व समरस होऊन जाईन. हे मृत्युदेवा, ( किंवा महाकाला ) तुझी कथा मला निवेदन कर.

**रहस्य**—प्रत्येक प्राणी क्षणोक्षणीं मृत्यूच्या जवळ जात असून या जीविताची शेवटची अवस्था म्हणजे मृत्यु प्राप्त झाल्याशिवाय त्याची पूर्णताच होत नाहीं. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

जंव जंव बाळ बळिया वाढे । तंव तंव भोजें नाचती कोडें ।
आयुष्य निमालें आंतुलियेकडे । ते ग्लानीचि नाहीं ॥
जन्मलिया दिवस दिवसें । हो लागे काळाचेयाचि ऐसें ॥
कीं वाढती करिती उल्हासें । उभविती गुढिया ॥
अगा मर हा बोल न साहती । आणि मेलिया तरी रडती ॥
परी असतें जात न गणिती । गहिंसपणें ॥

याप्रमाणें ज्यांनीं मृत्यूचें रहस्य जाणून आपल्या विकारांस पूर्णपणें जिंकिलें त्यांस जन्म आणि मृत्यु ह्या सहज स्थितींबद्दल सुखदुःखाची बाधा होणें शक्य नाहीं.

अनादि सिद्ध हें आघवें । होत जात स्वभावें ॥
तरी तुवां कां शोचावें । सांगे मज ॥

हा प्रश्न प्रत्येकानें आपल्या मनाला विचारण्या जोगा आहे. या प्रश्नाचा नीट उलगडा ज्यांनीं करून घेतला त्यांना मरणाची भीति राहिली नाहीं.

मरण माझें मरोन गेलें । मज केलें अमर ॥
ठाव पुसिलें बुड पुसिलें । वोस वोसलें देहभावा ॥
आला होता गेला पुर । धरिला धीर जीवनीं ॥
तुका म्हणे बुनादीचें । जालें साचें उजवणें ॥

ही जीवन्मुक्त स्थिति संपादणें हेंच जीवितसाफल्य आहे असें ज्या ज्ञानी जनांनीं जाणलें त्यांस मृत्यु हाच जीविताची पूर्णावस्था आहे असें वाटलें यांत आश्चर्य नाहीं. या अवस्थेला जाईपर्यंत मनुष्याची धडपड चाललेली असते; आणि ही अवस्था देहाला प्राप्त झाल्यावर विश्वचैतन्यामध्यें आत्मचैतन्याची ज्योत मिळून जाते आणि सर्व भेदभाव नष्ट होतो.

---

## ॥ गीत ७९ ॥

बं.—एक दिन एई देखा हये जाने शेष ( इं. ९२ )

एक दिनीं माझ्या नयनींची दृष्टि । लोपुनि ही सृष्टी अंतरेल ॥
अंतिम पटल नेत्रातें झांकील । मौनत्वें जाईल प्राण माझा ॥
परि निशाकालीं तारे जागतील । प्रभात खुलेल जगावरि ॥
कल-रवें जगीं संसाराचे खेळ । पूर्ववत् सकल चालतील ॥
सुखदुःखयोगें कालही जाईल । सागरीं कल्लोळ येती जैसे ॥

माझ्या जीविताची कथा ही स्मरतां । पहातों जगता कुतूहलें ॥
दृष्टिसी जें पडे कधीं नसे तुच्छ । दुर्लभ तें उच्च मज गमे ॥
दुर्लभ भुवनीं क्षुद्रतम स्थान । हीनतम प्राण दुर्लभ तो ॥
व्यर्थ मी जयांची आशा जगीं केली । प्राप्ति ज्यांची झाली विषय ते ॥
जाऊं देत सारे परि ज्यां मानिलें । तुच्छ तेंचि भलें देई मज ॥

**भावार्थ**—मला ठाऊक आहे कीं केव्हांना केव्हां माझी दृष्टि मिटून जाईल. हें सर्व विश्व केव्हांतरी मला अंतरणार आहे. माझे नेत्र मिटतील आणि अंतर्यामींचा प्राण देहाचा त्याग करून निघून जाईल. (परंतु या प्रकारें माझ्या जीविताचा अंत झाला म्हणून) जगांतील सर्व व्यवहार कांहीं बंद पडणार नाहींत. नक्षत्रें आकाशांगणीं पूर्ववत् प्रकाशित होतील, प्रातःकाल होईल, पक्षांचा कलरव आणि संसाराचे सर्व खेळ पूर्ववत् चालू राहतील. समुद्रांत ज्याप्रमाणें तरंग येतात आणि जातात त्याप्रमाणें सुखदुःखाच्या लाटा उठतील व नाहींशा होतील. अर्थात् माझ्यामागें सृष्टींतील संसार कांहीं बंद पडणार नाहीं. सर्वत्र दृष्टि फिरवून पहातां तुच्छ असें या जगांत काय आहे ? खरोखर पहातां तुच्छ असें कांहीं नाहीं. तथापि जें प्राप्त होत नाहीं तेंच उच्च आहे हें खरें. ज्यांची प्राप्ति व्हावी म्हणून रात्रंदिवस धडपड केली ते विषय आणि जें महत्वाचें स्थान प्राप्त व्हावें म्हणून कष्टलों तें स्थान देखील आतां दुर्लक्ष करण्यास योग्य आहे असें वाटूं लागलें आहे. अत्यंत क्षुद्र वाटणारें स्थान उच्च होय कारण तें दुर्लभ आहे. तेव्हां हे विषय आणि मानाचें स्थान मला नको. जें तुच्छ मानिलें किंवा ज्याकडे मीं दुर्लक्ष केलें तेंच खरोखर श्रेष्ठ असून त्याचीच देणगी मला दे.

**रहस्य**—मनुष्यानें या जीविताचें रक्षण करण्यासाठीं कितीही यत्न केला किंवा कितीहि इच्छा बाळगिली तरी त्याचा केव्हां तरी अंत व्हावयाचा हें ठरलेलें आहे. देहांतील प्राण केव्हां तरी निघून जाणार असून तो गेल्यानंतर देहाचा संपूर्ण नाश व्हावयाचा हें अनादि सिद्ध सत्य आहे. याप्रमाणें व्यक्तीचा संसार बंद पडला म्हणून विश्वाचा संसार का बंद पडणार आहे ? ज्या कुटुंबांतून मनुष्य निघून जातो त्या कुटुंबाचा संसार कांहीं बंद पडत नाहीं. ज्याप्रमाणें दिवस व रात्र, पशुपक्ष्यादिकांचा व्यवहार, इत्यादि सृष्टींतील उद्योग चालू असावयाचा त्याप्रमाणें प्रयाण करणाऱ्या प्राण्याच्या आप्तेष्टांचा व्यवहार चालू राहणें अपरिहार्य आहे. विश्वाच्या संसारांत त्यांना गुंतावेंच लागेल. जे आपल्या मृत्यूविषयीं जागरूक राहतात त्यांस दुःख किंवा भीति यांची बाधा होत नाहीं—

मरणाहातीं सुटली काया । विचारें या निश्चयें ।
नासोनीयां गेली खंती । सहज स्थिति भोगाचे ॥
न देखेसें जालें श्रम । आलें वर्म हाता हें ॥
तुका म्हणे कैंची कींव । कोठें जीव निराळा ॥

जीविताचा अंत होण्याचा समय प्राप्त होतांच या जगाकडे न्याहाळून पाहिलें तर असें दिसून येईल कीं अनेक गोष्टी माननीय व आदरणीय आहेत. तुच्छ असें कांहींच नाहीं. मानाचें स्थान प्राप्त व्हावें आणि नाना प्रकारचे विषय प्राप्त व्हावे म्हणून जन्मभर कष्ट पावल्यानें ज्या विषयांची प्राप्ति झाली ते विषय दुर्लक्ष करण्या-जोगे होते, असें अंत्य समयीं वाटेल. ज्याकडे दुर्लक्ष झालें तेंच श्रेष्ठ होतें हेंच खरें. ‘ भगवंता ! तुझ्यापाशीं मागतों कीं ज्याचा मी तिटकारा केला तें क्षुद्र स्थान मला दे, आणि ज्या विषयांसाठीं मीं धडपड केली ते मला नकोत. ’ असे उद्गार प्रयाणास निघालेल्या जीवात्म्याच्या मुखावाटे बाहेर पडणें योग्य आहे.

लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा मेवा ।
महा पुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहती ॥
ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥
तुका म्हणे जाण । व्हावें लहानाहुनि लहान ॥

---

## ॥ गीत ८० ॥

बं.—पेयेछि छुटि बिदाय देह भाइ ( इं. ९३ )

मिळाली मजसी आज्ञा यावयाला । निरोप द्या मला बांधव हो ॥
माझें दंडवत सकलांच्या पाया । प्रयाण कराया निघतों मी ॥
गृहाची या किल्ली देतों तुम्हां करीं । स्वामित्व त्यावरी सोडिलें म्यां ॥
शेवटीं याचितों प्रसादाची वाणी । मजसी प्रयाणीं सुखवील ॥
बहु काल आम्ही राहिलों शेजारीं । केली बहुपरि देव घेव ॥
अल्प तुम्हां दिलें घेतलें अधिक । ऐशी वागणूक माझी झाली ॥
रात्र गेली आतां प्रभात जाहला । दिवा मालवला घरांतील ॥
आलें आज्ञापत्र त्यजितों हें धाम । करोनी प्रणाम निघतों मी ॥

**भावार्थ**—बांधवहो, मला येण्याबद्दल आज्ञा मिळाली आहे आणि मी आतां आपला निरोप घेतों. तुम्हाला मी प्रणाम करतों. माझ्या घरावरचें स्वामित्व म्यां सोडिलें असून त्याच्या किल्ल्याही तुमच्या हातीं देतों. आज कित्येक वर्षें तुमच्या शेजारीं राहून तुमच्या कडून मला, मीं दिलें त्याहून, अधिक मिळालें आहे. आतां मला प्रेमाचा निरोप द्या म्हणजे माझा प्रवास सुखकर होईल. अंधार जाऊन उजाडलें आहे. त्यामुळें घरांतील दिवा देखील मालविला. आज्ञापत्राप्रमाणें हें घर सोडून मी जातों. नमस्कार.

**रहस्य**—या विश्वांत चालणाऱ्या प्रचंड कार्यांतील अल्प भाग उरकण्यासाठीं ईश्वरानें आपणास पाठवून दिलें. यथाशक्ति हें कार्य पार पाडल्यावर धन्याची आज्ञा होतांच येथून जाणें भाग आहे. याप्रमाणें आज्ञा झाल्यावर ममत्व बुद्धीनें रचलेलें घरदार सर्व येथेंच ठेवून घराच्या किल्ल्या दुसऱ्याच्या हवालीं करणें प्राप्त आहे. या संसारांत असतांना अनेकांनीं आपणावर उपकार केलेले असतात. अशांच्या ऋणांतून मुक्त होणें शक्य नाहीं. तेव्हां संतांच्या भाषेंत सांगावयाचें म्हटलें म्हणजे

आम्ही जातों आपुल्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ॥
तुमची आमची हेची भेटी । येथूनियां जन्म तुटी ॥
आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ॥ (तुकाराम.)

याप्रमाणें ज्यांस हा प्रयाणाचा काल सुखदायक वाटतो त्यांस अज्ञाननिशा गेल्याप्रमाणें वाटत असून प्रभात कालाचीं उज्ज्वल किरणें प्रकाशमान होतात. भगवंताकडे जाण्याचा मार्ग स्पष्ट दिसतो आणि ज्या समयीं जवळचे लोक दुःख करीत असतात त्या वेळीं यांच्या मुद्रेवर शांतता व आनंद यांची मुद्रा दिसते. ज्यानीं संसार कार्य हें ईश्वराचें कार्य आहे असें मानिलें, ज्ञानाच्या योगानें रज-तमादिगुणांस जिंकिलें आणि सर्व कालीं आपली दृढनिष्ठा व दृष्टि भगवच्चरणीं ठेविली त्यांस मात्र हें अंतकालीं शांत वृत्तीनें देहत्याग करण्याचें भाग्य प्राप्त होतें.

अनायासेन मरणम् विनादैन्येन जीवनम् ॥

आयासावांचून मरण व दैन्यावांचून जीवन प्राप्त व्हावें म्हणून रात्रंदिवस भगवंता-पाशीं मागणारा आणि आपल्या वर्तनानें देव, पितर व जन यांस संतोष देणारा केव्हांहि भाग्यवान होय. अशा नरांना अंतकाल प्राप्त होतांच जो आनंद होतो त्याचें वर्णन तुकोबानें केलें आहे तें यथार्थ होय.

आपुल्या माहेरा जाईन मी आतां । निरोप या संतांहातीं आला ॥
सुखदुःख माझें आइकलें कानीं । कळवळा मनीं करुणेचा ॥
करुनी सिद्ध मूळ साउलें भातुकें । येती दिसे एकें यावयासी ॥
त्याची पंथें माझें लागलेंसे चित्त । वाट पाहे नित्य माहेराची ॥
तुका म्हणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ॥

---

## ॥ गीत ८१ ॥

बं.—ए बार तोरा आमार जाबार वेलाते ( इं. ९४ )

समय जाहला माझ्या प्रयाणाचा । करा हो प्रेमाचा जयध्वनि ॥
उषःकालीं झालें नभ प्रकाशित । मनोहर पथ दिसे माझा ॥
काय म्यां घेतलें सागातीं जातांना । नका ऐशा प्रश्ना पुसूं तुम्ही ॥
व्याकुल हृदय संगें घेवोनीयां । निघालों जावया रिक्त हस्तें ॥
पथिकाचीं वस्त्रें अंगीं न घातलीं । हातीं म्यां धरिली वरमाला ॥
मार्गीं बाधतील अनेक विपत्ति । परि त्याची भीति नाहीं मज ॥
यात्रा पूर्ण होतां नभीं शुक्र तारा । उगवतां द्वारा पोहोंचेन ॥
करुण वेणूचा पूर्वराग स्वर । ऐकेन मधुर तये वेळीं ॥

**भावार्थ**—माझ्या प्रयाणाचा समय प्राप्त झाला. आतां आनंदाचा घोष करून मला निरोप द्या. माझा मार्ग मला स्वच्छ दिसत आहे. अंगावर मी पथिकाचीं वस्त्रें धारण केलीं नाहींत. ( मी वधूच्या वस्त्रालंकारांनीं भूषित होऊन जात आहें. ) आणि हातांत ( माझ्या प्राणनाथाला अर्पण करण्यासाठीं ) वर माला घेतली आहे. याशिवाय माझ्याजवळ दुसरी वस्तु नाहीं. परंतु अत्यंत व्याकुल झालेलें हृदय मात्र माझ्याबरोबर घेतलें आहे. ज्या स्थानाप्रत मी जात आहें तें परंधाम गांठल्यावर आनंदी आनंद होईल.

**रहस्य**—संसारांतील कार्यें पार पाडून शेवटीं शांत चित्तानें जगाचा निरोप घेण्याचें भाग्य थोड्याच लोकांच्या वांट्यास येतें. प्रेमानें व आदरानें जयध्वनि करून ज्या सत्पुरुषांस निरोप देण्यांत येतो ते नरपुंगव अगदींच थोडे असतात. आपलें इह-लोकींचें कार्य यथासांग पार पाडून जनतेकडून धन्य धन्य असें म्हणवून घेणें हेंच जीवित-साफल्य आहे. अशा व्यक्तीला शरीरसामर्थ्य क्षीण होतांच येथील यात्रा

संपवून जाण्यांतच आनंद वाटतो. जीवात्म्यानें परमात्म्यास वरणें अर्थात् आपल्या जीर्ण देहांतील प्राण विश्वाच्या महत्प्राणाच्या ठायीं समरस होणें हेंच आनंदमय ध्येय ज्यांनीं दृष्टीसमोर ठेविलें त्यांस मृत्यूची अवस्था आनंददायक वाटणें साहजिक आहे.

झाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥
रडती रात्रंदिवस कामक्रोध माया । म्हणती हायहाया यमधर्मे ॥
वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि भरभरां जीवितेंसी
फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्य जनीं बोंब झाली ॥
दिली तिळांजुळी कुळनाम रूपासी । शरीर ज्यांचें त्यांसी समर्पिलें ॥
तुका म्हणे रक्षा जाली आपींआप । उजळला दीप गुरुकृपा ॥

याप्रमाणें निष्काम झालेला जीव आपल्या सोबत काय घेऊन जाणार आहे? त्याचे विषय, त्याच्या वासना, सर्व कांहीं येथेंच राहणार आहेत. कर्मेंहि त्याच्या मागें येणार नाहीं. कारण ज्यांनीं वृत्ति निष्काम ठेविली त्यांस पुनर्जन्माची देखील भीति नाहीं.

स्वयें घरदार प्रपंच मांडिला । जोडुनियां दिला बाळाहातीं ॥
तैसें सर्वांभूतीं असावें संसारीं । प्राचीनाची दोरी साक्ष आहे ॥
वाटसरू वस्ती येऊनी राहिला । प्रातःकालीं गेला उठोनियां ॥
नामा म्हणे आम्हां नाहीं प्रापंचिक । पंढरिनायक साह्य झाला ॥

याप्रमाणें ज्यांनीं भगवंताला मदतीला घेतलें त्यांस देह ठेवतांना दुःख, भीति, क्लेश वगैरे अवस्थांची बाधा होणार नाहीं. वासनारहित होऊन सर्व कर्में ईश्वरार्पण करणारा जीवात्मा परम तत्त्वामध्यें मिळून जातो. म्हणून त्याच्या मागेंहि त्याच्या नांवानें जयजयकार होतो.

## ॥ गीत ८२ ॥

When I go from hence. ( इं. ९६ )

जीवन यात्रा ही संपूर्ण होतांना । यावे या वदना शब्द ऐसे ।
विश्वीं जें देखीलें असे निरुपम । तेंवी अप्रतिम मनोहर ॥
प्रकाश-कासारीं पद्में जीं फुललीं । सुधा म्यां चाखिली तयांतील ॥
सेवोनीयां गुप्त मधु धन्य झालों । शेवटीं वदलों ऐसें होवो ॥
असंख्य रूपांच्या नाना क्रीडास्थानीं । क्रीडा मी करोनी आनंदलों ॥
अरूपाचें येथें घडलें दर्शन । यापायीं जीवन धन्य झालें ॥
यापरी उद्गार मुखावाटे यावे । जगता त्यागावें लागे तदा ॥
प्रभु स्पर्शातीत परि स्पर्शसुख । सेविलें म्यां मुख देखीयेलें ॥
आनंदें रोमांच उभे अवयवीं । तदा म्यां त्यागावी तनु माझी ॥
हेची अंतकालीं बोल निरोपाचे । यावे माझ्या वाचे आस सदा ॥

**भावार्थ**—ज्या कालीं माझी जीवित–यात्रा संपूर्ण होणार त्या वेळीं माझ्या तोंडून असे शब्द यावे कीं, जें जें या विश्वाच्या ठिकाणीं पाहिलें तें सर्व अप्रतिम आणि अनुपमेय आहे. या विश्वाच्या ठायीं भरून असलेल्या प्रकाशांतील अमृतोपम तेजाचा मी उपभोग घेतला. ( अर्थात् या तेजापासून मला सामर्थ्य प्राप्त झालें. ) अनेक प्रकारचे खेळ मी खेळलों. किंवा अनेक व्यवहारांमध्यें आनंदानें रंगलों. आकार किंवा रूप नसलेल्या भगवंताचें विश्वाच्या योगानें दर्शन घडलें. आणि ज्याचा स्पर्श कोणास घडत नाहीं त्या प्रभूच्या स्पर्शाचें सुख मी अनुभविलें. या सर्व गोष्टी स्मरून आनंद होतो आणि त्या योगें माझे रोमांच उभे राहतात. अशा स्थितींत माझा अंत व्हावा अशी माझी इच्छा आहे.

**रहस्य**—अनेक जन्मींच्या पुण्यसंचयामुळें नरदेहाची प्राप्ती होते असें तत्वज्ञानी सांगतात. नरजन्माच्या योगानें विश्वांतील रहस्याचा, माधुर्याचा आणि प्रेमाचा उपभोग घेतां येतो. विश्वाचा धनि कोण आहे हें जाणतां येत असून त्याचा समागम देखील प्राप्त करून घेतां येतो. संसार कष्टमय आहे म्हणून त्यापासून पळून जाणारे या विश्वाचें, विश्वात्म्याचें किंवा विश्वांत चालणाऱ्या संसाराचें महत्व जाणूं शकत नाहींत. नरदेहाचा खरा उपयोगही त्यांच्या हातून होणें शक्य नाहीं.

बहुतां जन्मांअंतीं । जोडी लागली हे हातीं ॥
मनुष्य देहा ऐसा ठाव । धरीं पांडुरंगीं भाव ॥
बहु केला फेरा । येथें सांपडला थारा ॥
तुका म्हणे जाणें । ऐसें भले ते शहाणे ॥

याप्रमाणें प्राप्त झालेल्या या मानवी देहाचा आणि धृतीचा योग्य उपयोग केल्यास जगांतील महदानंदाचा उपभोग घेणें शक्य आहे.

भाग्यवंता हे परवडी । करिती गोडी जन्माची ॥
आपुलाल्या लाहों भावें । जें ज्या व्हावें तें आहे ॥
इच्छा भोजनाचा दाता । नलगे चिंता करावी ॥
तुका म्हणे आल्या थाऱ्या । वस्तु बऱ्या मोलाच्या ॥

सर्वांत महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे मनुष्यजन्मामुळें भगवंतास जाणतां येतें. त्याच्याठायीं मनोवृत्तींचा निरोध करून परमानंद सेवन करतां येतो. ज्यांची वृत्ति याप्रमाणें ईश्वराकडे वळली त्यांच्या आनंदास पारावार नाहीं. या स्थितीचें वर्णन तुकोबांनीं केलें आहे तें असें.

अनुहातीं गुंतला नेणे बाह्य रंग । वृत्ति येतां मग बळ लागे ॥
मदें माते तया नाहीं देहभाव । आपुले अवयव आवरितां ॥
आणिकांची वाणी वदे तेणें मुखें । उपचार दुःखें नाठवति ॥
तुका म्हणे बाह्य रंग ते विठ्ठले । अंतर निवालें ब्रह्मरसें ॥

---

## ॥ गीत ८३ ॥

बं.—हार माना हार पराबो तोमार गले ( इं. ९८ )

माझा पराभव मज मान्य झाला । तुझ्या कंठीं माला वहातों मी ॥
मजसी बलाचा मिथ्या गर्व फार । तोंवरि भ्यां दूर रहावें का ॥
जाणें मी गळेल माझा अभिमान । व्यथेमाजी प्राण भंगेल तो ॥
वेळूपरी शून्य हृदयांतुनी स्वर । दुःख-करुणापर निघतील ॥
करुणारवें ऐशा विव्हळतां प्राण । कठीण पाषाण द्रवतील ।
सदैव राहीना मिटोनी कमल । पूर्ण विकसेल कधीं तरी ॥
तयांतील मधु राहीना लपोनि । दलांच्या आतोनि निरंतर ॥

**तैसें माझें भाग्य उदया येईल । मुक्तता लाभेल एके दिनीं ॥**
**नीलाकाशांतुनी नयन पाहील । संकेत करील मज याया ॥**
**तये वेळीं माझें जाईल सकल । अल्पही नुरेल मजपाशीं ॥**
**लाभेल मजसी परम मरण । समर्पीन प्राण पादतळीं ॥**

**भावार्थ**—भगवंता मी माझ्या सामर्थ्याच्या योगानें सर्व इच्छित गोष्टी तडीस नेईन असा मला अहंकार झाला. परंतु माझ्या यत्नाला सिद्धी प्राप्त झाली नाहीं, आणि माझ्या गर्वाचें निरसन झालें. अर्थात् माझा पराभव मी कबूल करून तुला विजयश्रीची माला अर्पण करतों. मला ठाऊक होतें कीं हा माझा अभिमान टिकणार नाहीं. आणि व्यथेनें त्रस्त झालेल्या स्थितींत माझ्या देहांतील प्राण माझा त्याग करून जाईल. एकाद्या वेळूप्रमाणें अंतर्यामीं शून्य झालेल्या हृदयांतून करुणापर स्वर निघतील. हे स्वर ऐकून पाषाण हृदयाच्या मनुष्याच्या अंतःकरणाला पाझर फुटेल. ज्याप्रमाणें कमल केव्हां तरी प्रफुल्लित होऊन त्यांतील मधु व मकरंद प्राप्त झाल्यावांचून राहत नाहीं, त्याप्रमाणें माझें भाग्य उदयास येईल. भगवत्संकेताप्रमाणें मी या लोकाचा त्याग करून जाईन आणि माझा प्राण ईश्वरचरणीं अर्पण करीन.

**रहस्य**—मनुष्यानें आपल्या बुद्धिचातुर्याच्या योगानें अखिल विश्वाला आपल्या ताब्यांत ठेवण्याचा यत्न चालविला आहे. पंच महाभूतांपासून प्राप्त होणारी प्रचंड व गुप्त शक्ति आपल्या स्वाधीन करून घेतल्यामुळें अनेक चमत्कार करून दाखविण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त झालें आहे. मनुष्यजातीमध्यें जे बुद्धीनें, शक्तीनें व क्षात्रबलानें श्रेष्ठ आहेत, त्यांनीं इतरांस आपल्या ताब्यांत ठेवून स्वतःची ऐहिक संपत्ति वाढविण्याच्या कामांत जेत्यांच्या श्रमाचा उपयोग करून घेतला आहे. एकंदर मानवजातीचा कार्यसमुच्चय, तिची धृति, उत्साह आणि ध्येय यांचा विचार केला तर असें दिसतें कीं मनुष्य विश्वदिग्विजयार्थ निघाला असून विश्वकर्त्यांच्याही वर आपण जात आहों असें त्याला वाटूं लागलें आहे. तरी पण **कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं** समर्थ असा जो परमेश्वर त्याच्याशीं स्पर्धा करून मनुष्याचें कसें चालणार ? व्याधीस जिंकण्याचा परमावधीचा यत्न केला तरी त्याला कांहीं अजरामर होतां येणार नाहीं. अत्यंत कुशाग्रबुद्धीच्या व आपल्या सामर्थ्यानें कल्पनातीत कार्यें करून दाखविलेल्या मनुष्याला शेवटीं "मी निर्बल, मी दीन, मी मर्त्य आहें." असें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. अंतसमयीं त्याच्या मुखावाटे असे उद्गार निघतील कीं—

गळित झाली काया । हेंचि ललित पंढरिराया ॥
आलें अवसानापासीं । रूप राहिलें मानसीं ॥
वाइला कळस । तेथें स्थिरावला रस ॥
तुका म्हणे गोड झालें । नारायणीं पोट धालें ॥

शेवटीं अहंकाराचा त्याग करून जातांना ममत्व बुद्धीनें सांभाळून ठेवलेल्या सर्वस्वाचा त्याग करणें अनिवार्य आहे. अंतकालींच्या दुःखवेदना असह्य झाल्यामुळें जे करुणापर स्वर अंतःकरणांतून निघतात ते हृदयद्रावक असतात यांत आश्चर्य कोणतें! तत्पूर्वींच्या कालांत सर्व प्रकारच्या वैभवांत असतांना देखील कधीं कधीं मनःस्वास्थ्य नाहींसें होऊन ईश्वराकडे दृष्टि फिरविण्याची पाळी येते. अशा वेळीं गर्वानें ताठलेला मनुष्य दीन वाणीनें म्हणतो—

सांडियेली काया । वरी ओंवाळुनी पायां ॥
शरण शरण नारायणा । मज अंगिकारा दीना ॥
आलों लोटांगणीं । रुळे तुमचे चरणीं ॥
तुका म्हणे कंई । डोई ठेवीन हे पायीं ॥

---

## ॥ गीत ८४ ॥

Deity of the ruined temple ( ई. ८८ )

भंगलेल्या जीर्ण मंदिर-देवते । तुझीं स्तोत्रगीतें कोण गाई ॥
वीणातंतु तेही गेले तुटोनीयां । स्तुति तव गाया नसे कोणी ॥
आरतींची वार्ता कळवाया जना । शंख घोष काना ऐकूं न ये ॥
चहूंकडे तुझें दिसतें मंदिर । निःशब्द गंभीर श्री देवते ॥
जनहीन तुझ्या भवनीं वसंत—। पवन वहात गंधयुक्त ॥
नव पुष्प बहर आला हें तो वदे । पूजेसाठीं न दे पुष्प कोणी ॥
तुझीया चरणीं पूजा अर्घ्य द्याया । पुष्पें ही वहाया कोणी न ये ॥
पूजाहीन तुझा दुर्दैवी पुजारी । होवोनी भिकारी हिंडतसे ॥
तुझ्या प्रसादाची आस धरोनीयां । उदासीन वायां भटके तो ॥
साही उपवास येई संध्याकाळीं । उडतां गोधूली तुजप्रति ॥
भग्न मंदिराच्या सन्निध फिरे तो । कोणी न गणितो दीनासी या ॥

देवते, असे हे उत्सवाचे दिन। जाती पूजाहीन व्यर्थ सारे॥
तैशा रात्री व्यर्थ किती तरी जाती। नसे दीपज्योति अंधःकारीं॥
नूतन प्रतिमा संभ्रमें स्थापिती। कालवशें जाती जलामाजी॥
निर्मल कालाचे प्रवाहीं कितीक। प्रतिमा सुरेख बुडविल्या॥
परि भंगलेल्या मंदिरींची मूर्ति। भोगे अपकीर्ति उपेक्षा ही॥

**भावार्थ**—हे जीर्णमंदिरांतील देवते, तुझी पूजाअर्चा, स्तुतिस्तोत्रें, आरति, गीत, वाद्य इत्यादि सर्व सेवाप्रकार बंद पडले आहेत. तुझ्या भक्तांनीं तुझ्या दर्शनाचा नाद सोडून दिला असून तुझ्या चरणापाशीं कोणीहि येत नाहीं. वसंतामुळें जिकडे तिकडे फुलांस बहर आला आहे. परंतु तुला कोणीहि पुष्पार्पण करीत नाहीं. तुझे उत्सवाचे दिवस सुने जातात आणि अंधःकारांत दीपावांचून तुला रहावें लागत आहे. तुझा जुना पुजारी सेवावृत्ति चुकल्यामुळें इतस्ततः भटकत असतो आणि कष्टांत व हालांत दिवस कंठित आहे. आजपर्यंत अनेक सुंदर प्रतिमांचें कालाच्या ओघांत विसर्जन झालें आहे. तुझें विसर्जनही न होतां तूं अपकीर्ति मात्र भोगीत आहेस.

**रहस्य**—नरदेहाचें महत्व नाथांनीं वर्णिलें आहे तें असेंः—

मनुष्य देहीं ब्रह्मप्राप्ति। तो देहभाव नसावा चित्तीं।
विदेहत्वें परमार्थ गति। विवेक सद्युक्ति निज पुरुषार्थ॥
नरदेहा ऐसें गोमटें। शोधितां त्रैलोक्यीं न भेटे।
आणि देहा ऐसें वोखटें। अत्यंत खोटें आन नाहीं॥
वोखटें म्हणोनि त्यागावें। तरी मोक्षसुखा नागवावें।
गोमटें म्हणोनि भोगावें। तें अवश्य जावें अधःपाता॥
हें भोगवे न त्यागवे। निज पुरुषार्थ लागवें।
भगवन्मार्गी लावावें। तरिच सुख॥

याप्रकारच्या नरदेहाला देवालयाची उपमा देण्यांत आली आहे.

देहो देवालयः प्रोक्तः जीवो देवस्सनातनः॥

देह हेंच देवालय असून त्यांतील जीवात्मा हाच देव आहे. या देवालयाची योग्य प्रकारें जोपासना करून तें उत्तम स्थितींत राहील असें न केल्यास त्याच्या आंतील जीवात्मारूपी देवतेची पूजा अर्चा नीटपणें चालेल कशी? अशा रीतीनें

पतित झालेल्या देहधाऱ्यापाशीं कोण येईल ? त्यानें दुःख कष्ट व अपकीर्ति भोगीत राहणें भाग आहे आणि ही सर्व दुःस्थिति अंतर्यामींच्या जीवात्म्याच्या वांट्यास येते. वसंतागमन अर्थात् आनंदोत्सवाचे प्रसंग आले तरी अशा पतिताला कोणी विचारीत नाहीं. ज्याप्रमाणें सुंदर मूर्तीची संभ्रमानें स्थापना करावी आणि पुढें देवालयाची दुर्दशा होऊन ती मूर्ति जागच्या जागीं पूजेशिवाय पडून राहावी तद्वत् आमच्या जन्मवेळीं केलेला आनंदोत्सव या देहाचा दुरुपयोग केल्यास पुढें चालू राहणें शक्य नाहीं. म्हणून हें देहरूपी देवालय सुदृढ स्थितींत राहून तें वंदनीय व निर्मल करणें हेंच योग्य आहे.

## ॥ नवम खंड ॥

# ईशप्रार्थना.

ठाकलोंसे द्वारीं । उभा याचक भिकारी ॥
मज भीक कांहीं देवा । प्रेमभातुकें पाठवा ॥
याचकाचा भार । घेऊं नये येरझार ॥
तुका म्हणे दान । सेवा घेतल्यावांचून ॥

*　　*　　*　　*

सद्गदित कंठ दाटो । येणें फुटो हृदय ।
चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ॥
नेत्रीं जळ वाहो सदा । आनंदाचे रोमांच ॥
तुका म्हणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ॥

*　　*　　*　　*

तूं मन हें मीचि करीं । माझिया भजनीं प्रेम धरीं । सर्वत्र नमस्कारीं । मज एकातें ॥ ऐसा प्रियां आथिला होसी । तेथ माझियाचि स्वरूपा पावसी । हें अंतःकरणींचें तुजपाशीं । बोलिजत असे ॥ अगा अवघिया चोरिया आपुलें । जें सर्वस्व आम्हीं असें ठेविलें । तें पावोनि सुख संचलें । होऊनि ठासी ॥ ज्ञानेश्वर—

अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ गीता.

पैं सर्व भावेसीं उखितें । जे वोपिले मज चित्तें । जैसा गर्भगोळ उद्यमातें । कोण्याही नेणे ॥ तैसा मीवांचूनि कांहीं । आणीक गोमटेंचि नाहीं । मजचि नाम पाहीं । जिणेया ठेविलें ॥ ऐसे अनन्य गतिकें चित्तें । चिंतितसातें मातें । जे उपासिती तयांतें । मीचि सेवीं ॥ हा योगक्षेम आघवा । तयांचा मजचि पडिला पांडवा । जयाचिया सर्वभावा । आश्रय मी ॥ ज्ञानेश्वर.

## ॥ गीत ८५ ॥

बं.—तव काछे एई मोर शेष निवेदन ( इं. ३६ )

देवा मी करितों तुज निवेदन । असें शक्तिहीन दे सामर्थ्य ॥
अंतर्यामीं वसे दैन्य दरिद्रता । छेदीं भगवंता दैन्य माझें ॥
सुखाचे प्रसंगीं मन निरोधाया । शक्ति दे सेवाया सुखलेश ॥
दुःखाचे आघात होतां सर्व दुःखें । शांत स्मित मुखें भोगावीं म्यां ॥
जन सेवेमाजी कर्म हो फलित । शक्ति सदोदित देईं ऐसी ॥
स्नेहीं प्रेमाठायीं पुण्यीं सर्व कर्मै । योजाया सद्धर्मे शक्ति देईं ॥
दीन हीन क्षुद्रां क्षुद्र न मानाया । मज देवराया शक्ति देईं ॥
बलिष्ठाचरणीं भयें लोटांगण । होउनी म्यां लीन न घालावें ॥
प्रपंचाच्या तुच्छ विषयीं गुंतून । न रहाया मन शक्ति देईं ॥
अहर्निश माझीं कर्मै त्वच्चरणीं । भक्तीनें अर्पोनी द्यावीं मीं रे ॥
देईं प्रभो मज सामर्थ्य कायिक । तेवीं मानसिक युक्त कर्मीं ॥

**भावार्थ**—देवा माझ्या मनाला दुःख देणाऱ्या गोष्टी मी तुला सांगतों. मी दुबळा झालों आहें. मला सामर्थ्य दे. माझ्या अंतःकरणाचे ठायीं दैन्य व दारिद्र्य आहे, यांचें निरसन कर. अर्थात् अंतर्यामींचें दैन्य काढून टाक. सुख प्राप्त झालें असतां माझ्यांत संयमन शक्ति रहावी आणि म्यां बेहोष होऊन भलत्याच मार्गानें जाऊं नये म्हणून मला सामर्थ्य दे. दुःखाचा प्रसंग आला असतां शांतपणें हंसत दुःख भोगावें आणि अल्प जरी सुख प्राप्त झालें, तरी तें बहुमोल समजून त्यांतच आनंद मानावा यासाठीं मला सामर्थ्य दे. माझ्या कर्मांचा उपयोग जनसेवेसाठीं व्हावा आणि या कर्माचें फल जनतेस प्राप्त व्हावें. स्नेहानें वागणारे, प्रेमानें वागणारे आणि पुण्य-प्रद कर्में आचरणारे अशांच्या सेवेसाठीं माझ्या कर्मांचा विनियोग व्हावा. या सर्व गोष्टी माझ्या हातून घडाव्या म्हणून मला शक्ति दे. गरीब दीन दुबळ्यांस मी तुच्छ मानून त्यांकडे तुच्छ रीतीनें वागतों. तरी त्यांशीं प्रेमानें वागून त्यांस मी मजसमान मानावें असें मला सामर्थ्य दे. बलिष्ठाच्या पायांवर माझें शिर म्यां नमवूं नये, प्रपंचाच्या तुच्छ विषयांत गुंतून पडूं नये, आणि माझीं सर्व कर्में तुझ्या चरणीं अर्पण करावीं या प्रकारची शक्ति मला दे. युक्त कर्में करण्यास लागणारी कायिक व मानसिक शक्ति मला दे.

**रहस्य**—मनुष्य जन्माचें सार्थक व्हावें असें ज्यांस वाटतें त्यांना अनेक परीनें या जीविताचा उपयोग व्हावा म्हणून यत्न करावा लागतो. कारण यत्नावांचून हेतु तडीस जाणें शक्य नाहीं. परंतु यत्न करीत असतांहि अनेक प्रकारच्या ज्या अडचणी येतात त्यांपैकीं कित्येक अडचणी स्वतःच्या मानसिक दौर्बल्यामुळें उत्पन्न होतात. आपल्या संसारव्यवहारांतील दैन्यदारिद्र्यापेक्षां मानसिक दैन्यदारिद्र्य विशेष विघातक आहे. या मानसिक दैन्यामुळें मनुष्य खरोखर धनवान् असला तरी त्याच्या धनदौलतीचा त्यास किंवा इतरांस कोणत्याही प्रकारचा उपयोग होत नाहीं. असा मनुष्य सदैव कष्टी असतो. धनदौलत, शारीरिक बल किंवा सेवक व परिवार यांजकडून कितीहि सेवा व सामर्थ्य प्राप्त झालें तरी सुख किंवा दुःख यांचे प्रसंग प्राप्त होतांच अशा दुर्बल मनाच्या मनुष्याला समतोल वृत्तीनें त्यांतून पार पडतां येत नाहीं. म्हणून सुखाचे वेळीं बेफाम व दुःखाचे वेळीं स्वतःस व इतरांस त्रासदायक होऊन अशा मनुष्याला आयुष्य कंठावें लागतें. प्रपंचांत अनेक कार्यें करतांना शक्ति असावी लागते ती मनाची होय. सर्वांस समानतेनें वागविणें, केवळ बलाच्या जोरावर आपणास कह्यांत ठेवूं पाहणारास शिर न वांकविणें, प्रपंचाच्या तुच्छ विषयांत गुंतून पडून जीवित कार्याची हेळसांड करण्याची पाळी येऊं नये यासाठीं सदैव सत्कार्यरत असणें इत्यादि कार्यें नीट-पणें उरकण्यास मानसिक शक्ति किंवा आत्मिक बल पाहिजे आहे. हें बल प्राप्त व्हावें म्हणून सर्व सामर्थ्याचा निधि जो परमेश्वर त्यालाच शरण गेलें पाहिजे. मनोविजय हाच सर्वांत श्रेष्ठ विजय होय.

**सांगतों या मना तें माझें नाइके । घातावरि टेंके चांडाळ हें ॥**
**म्हणवूनि पाहे तर तें बुडतें । न लाहे पुरतें बळ करूं ॥**
**तुका म्हणे ऐसें बळ नाहीं अंगीं । पाहोनियां वेगीं पार टाकीं ॥**

---

## ॥ गीत ८६ ॥

बं.—चाइ गो आमि तो मारे चाइ ( इं. ३८ )

**मज तूं लाभावा माझाची तूं व्हावा । हा एक लागावा मना ध्यास ॥**
**अहर्निश मज वासना पीडिती । चंचल करिती मन माझें ॥**
**मिथ्या या वासना मिथ्या हा पसारा । तूंचि एक थारा मज लाभो ॥**
**निशा अंधःकारीं वांछिते प्रकाश । तैवीं तुझी आस अंतर्यामीं ॥**

मोहांतूनि निघे सुखावाटे धांवा । मजसी लाभावा तूंचि एक ॥
प्रभंजन करी क्रौर्यें शांतिभंग । परि इच्छी संग शांततेचा ॥
तेंवीं तुजवरि करितों आघात । परि हृदयांत आस तुझी ॥

**भावार्थ**—तुझा मला लाभ व्हावा, तुझा मी व्हावें आणि माझा तूं व्हावास ही एकच मला इच्छा आहे ती पूर्ण कर. रात्रंदिवस अनेक प्रकारच्या वासनांमुळें मनास स्वास्थ्य नाहीं. अनेक प्रकारच्या संसारांतील मोहाच्या कार्यांत मी गुंतलेला असलों तरी तुझ्या प्राप्तीविषयींची माझी इच्छा असतेच. या मोहांत असतांना न कळत तुझा मी धांवा करितों. सोसाव्याचा वारा वाहून शांतिभंग होतो. हें जरी खरें आहे तथापि या वायूलाच शांततेची जशी आवड उत्पन्न होते त्याप्रमाणें तुझ्याविषयींच्या कर्तव्य कर्मांची हेळसांड करून जरी तुझें मी मन दुखवितों तरी तुझ्याविषयींची अंतर्यामींची माझी प्रीति कमी होत नाहीं.

**रहस्य**—अनेक वासनांच्या गुंतागुंतींतून आम्हांस सुटका करून घेतां येत नाहीं. त्यामुळें आमचे प्रापंचिक व्यवहार अव्याहत चाललेले असतात. आणि अशा रीतीनें रात्रंदिवस या खटाटोपांत असण्यापासून आम्हांस आनंद प्राप्त होतो. परंतु कधीं कधीं हा खटाटोप चालला असतां व अंगीकृत कार्य सफल किंवा निष्फल झालें असतां आमची दृष्टि या मानवी जीविताच्या अंतिम ध्येया-कडे वळते आणि मनाला वाटतें कीं हा सर्व खटाटोप व्यर्थ आहे. ईश्वरप्राप्तीस हा विघातक आहे आणि ईश्वरप्राप्तीवांचून इतर कोणत्याही प्राप्तीपासून खरें शाश्वत सुख मिळणें शक्य नाहीं. सर्व ऐहिक व्यवहाराचें अंतिम ध्येय म्हटलें म्हणजे मनःस्वास्थ्य व तज्जन्य सुख हें आहे. हें मनःस्वास्थ्य जोंपर्यंत नाहीं तोंपर्यंत क्षणिक सुख आणि क्षणिक दुःख देणाऱ्या वासना असून किंवा त्या वासना फलद्रूप करण्यास यत्न करून तरी उपयोग काय ? हें लक्षांत आणून साधु संतांनीं सर्व शांतीचें, महदानंदाचें आणि शाश्वत सुखाचें निधान परमेश्वर आहे असें मानिलें आणि त्याच्याच प्राप्तीस्तव सर्व सामर्थ्य बुद्धि आणि इच्छा खर्च केली.

तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत । तूंचि माझें हित करिता देवा
तूंचि माझा देव तूंचि माझा जीव । तूंचि माझा भाव पांडुरंगा ॥
तूंचि माझा आचार तूंचि माझा विचार । तूंचि सर्व भार चालविसी
सर्वभावें मज तूं होसी प्रमाण । ऐसी तुझी आण वाहातसे ॥
तुका म्हणे तुज विकला जीवभाव । कळे तो उपाव करी आतां ॥

भगवंतानें सुख प्राप्तीची गुरुकिल्ली सांगितली ती अशीः—

**मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।**
**निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥** गीता

**अगा मानस हें एक । माझ्या स्वरूपीं सवृत्तिक । करूनि घालीं निष्टंक । बुद्धि निश्चयेंसी ॥ इयें दोनीं सरिसीं । मजमाजि प्रेमेंसी । रिगालीं तरी पावसी । मातें तूं गा ॥ जे मन बुद्धि इहीं । घर केलें माझ्या ठायीं । तरि सांगे मग काई । मी तूं उरे ॥**

---

## ॥ गीत ८७ ॥

**बं.**—जीवन जखन शुकाय जाय ( ई. ३९ )

**शुष्क जंव होई संसारीं जीवन । तंव कृपाघन-धारा वर्षीं ॥**
**होतां हें जीवित असह्य असार । गीत सुधाधार पाजीं मज ॥**
**चोहींकडे कर्म प्रबल प्रचंड । मजला उदंड घेरीतसे ॥**
**हृदयीं तेधवां शांत पाउलांनीं । प्रेमानें येवोनी बैसें शांता ॥**
**नसतां त्वत्कृपा श्रमोनी हें मन । दडे दीन हीन एकीकडे ॥**
**द्वार उघडोनि सुसंभ्रमें करीं । प्रवेश अंतरीं नृपासम ॥**
**उडे चोहींकडे वासनाची धूली । मोह जाल घाली अज्ञानाचें ॥**
**तदा ये जाग्रता पतित पावना । करीत गर्जना रुद्रापरि ॥**

**भावार्थ**—जेव्हां या जीवितांतील उत्साह आणि सौख्य नाहींसें होतें, संसार शुष्क आणि असार वाटतो त्यावेळीं तूं कृपाजलाचा वर्षाव करून मला शांत कर. चहूंकडे कर्माचा मारा होऊं लागल्यामुळें जीवास विश्रांति नसतां जीवित असह्य होऊं लागतें, अशा वेळीं प्रेमानें येऊन माझ्या हृदयांत बैस. त्याचप्रमाणें वासनेच्या आणि मोहाच्या कचाट्यांत सांपडून बुद्धिभ्रंश होतो अशा वेळीं माझ्या अंतर्यामीं प्रवेश करून माझ्या मनाला शांतता दे.

**रहस्य**—प्रापंचिकाला सर्वच दिवस सुखाचे असणें शक्य नाहीं. अकल्पित रीतीनें अनेक प्रकारच्या शारीरिक व मानसिक व्याधी उत्पन्न होतात. अशा वेळीं मनाचा त्रास चुकविण्यास अत्यंत प्रीतीचीं माणसें देखील समर्थ होत नाहींत. ही स्थिति इतकी कष्टमय असते कीं त्रासलेल्या मनुष्याला संसाराचा त्याग करून

जाणें हा उत्तम उपाय आहे असें वाटूं लागतें. परंतु असें करणें आत्मोन्नतीच्या दृष्टीनें देखील हितावह नाहीं. कर्मांवांचून राहणें हा कांहीं आत्मोद्धाराचा मार्ग नव्हे. कर्म करीत असतां प्राप्त झालेल्या संकटास वीराप्रमाणें तोंड देण्याचें सामर्थ्य प्राप्त व्हावें म्हणून ईश्वराची करुणा भाकावी हाच मार्ग श्रेष्ठ जनांनीं योग्य आहे असें आपल्या वर्तनानें सिद्ध केलें आहे. ईशप्रार्थनेच्या योगानें मनुष्याला संकट-कालीं जें सामर्थ्य प्राप्त होतें तें अन्य उपायानें होत नाहीं, असा आजवर साधु-संतांचा अनुभव आहे. मनांतील उद्विग्नता जाऊन जीवास शांतता प्राप्त होण्यास ईश्वरकृपेची आवश्यकता आहे. ती प्राप्त होण्यास अनन्य भावानें आणि अहंपणा टाकून देऊन भगवंतास शरण गेलें पाहिजे. हा संसार मुळीं असा आहे कीं, त्याला " कर्मसमुच्चय " हें नांव देतां येईल. कर्मांचा अंत जीविताच्या अंताबरोबर व्हावयाचा आणि जों जों वासनांच्या भरीस पडून कर्म करावें तों तों या कर्मांची व्याप्ति वाढत जाते. म्हणून कर्माचा बोजा न वाढविण्याबद्दल खबरदारी घेणें हें प्रत्येक शांततेनें जीवित पार पाडण्याची इच्छा असलेल्या मनुष्याचें कर्तव्य कर्म आहे. आपण काय करतों, कोणीकडे जातों, कसें वागतों आणि काय इच्छितों या गोष्टींविषयीं जागरूक राहून ईश्वरास प्रिय होतील अशीं कर्मं आचरणारा सदैव शांत आणि सुखी असतो. म्हणून ज्यांनीं ईश्वरकृपेचें महत्व जाणिलें त्यांनीं आपला भार ईश्वरावर टाकिला.

**तूं आम्हां सोयरा सज्जन सांगाती । तुज लागीं प्रीति चालो सदा ॥**
**तूं माझा जिव्हाळा जीवाचा जिवलग । होसी अंतरंग अंतरींचा ॥**
**गणगोत्र मित्र तूं माझें जीवन । अनन्य शरण तुझ्यापायीं ॥**
**तुका म्हणे सर्व गुणें तुझा दास । आवडे अभ्यास सदा तुझा ॥**

अर्थात् ईश्वराचा अभ्यास करणारांस त्याची कृपा प्राप्त होते यांत आश्चर्य नाहीं. आणि मन अस्वस्थ होतांच

**आमुची विश्रांति । तुमचे चरण कमळापति ॥**

हेच उद्गार ईश्वरभक्ताच्या मुखावाटे निघतात.

---

## ॥ गीत ८८ ॥

बं.—दीर्घ काल अनावृष्टि अति दीर्घ काल ( इं. ४० )

दीर्घ काल झाला अनावृष्टीमुळें । मन तळमळे इन्द्रराया ॥
दिसाति या दिशा भयानक शून्य । शीतल पर्जन्य चिन्ह नसे ॥
नव जल लाभ होईल म्हणोनी । न सांगत कोणी धीर द्याया ॥
देवा न सोसवे शोष हा अंतरीं । वज्राघात करीं जरी इच्छा ॥
विक्राळ दाढांच्या हिंस्र मुखें चूर्ण । करी तूं संपूर्ण विद्युद्दातें ॥
विद्युत्कर्षाघातें दिग्दिगंतर । दीपवीं प्रखर क्षणोक्षणीं ॥
प्रखर निस्तब्ध भयानक दाह । झाला हा दुःसह शांत करीं ॥
पोळी हा मजला दाह हृदयाचा । ताप निराशेचा शांत करीं ॥
पाहीं त्राहीं नाथा शोष हा चुकवीं । हृदया शांतवीं कृपाजलें ॥
पिता होई क्रुद्ध तदा माय जैसी । रक्षी बालकासी साश्रु नेत्रें ॥
तैसें प्रेमजल वर्षी हृदयांत । करीं मन शांत कृपाघना ॥

**भावार्थ**—दीर्घकाल पाऊस नसल्यामुळें सर्वत्र जलासाठीं लोक तळमळत आहेत. दश दिशा भयानक आणि रुक्ष दिसत असून पर्जन्याचें चिन्ह कांहीं दिसत नाहीं. असा हा शोष सहन करणें शक्य नाहीं. यासाठीं हे मेघाधिपति इंद्रा, तुझ्या वज्राघातानें पृथ्वी हादरून गेली तरी हरकत नाहीं, पण एकदांचा मेघाचा वर्षाव कर. वीज आणि वारा यांच्या झटक्यामुळें लोक भयग्रस्त झाले तरी चालेल, पण ही निर्जल स्थिति नको. कृपा कर आणि या शुष्क स्थितीचें निवारण कर. पर्जन्यावांचून पृथ्वीवरील प्राणिमात्र व वनस्पति यांची स्थिति जशी असह्य होते तशीच माझ्या मनाची स्थिति झाली आहे. मनाला स्वास्थ्य नाहीं. तुझ्या कृपाजलाचा वर्षाव करून मला शांत कर.

**रहस्य**—कधीं कधीं या जीवाला दीर्घ कालापर्यंत स्वास्थ्य प्राप्त होत नाहीं. ज्या दिशेनें सहानुभूति व साह्य मिळालें पाहिजे त्या दिशेनें तें प्राप्त होत नाहीं आणि निराशेमुळें विशेष दुःख होतें. चहूंकडे गैरसमज, अपमान, निंदा आणि निराशा यांचें प्राबल्य होऊन जीवित असह्य होऊं लागतें. अनावृष्टीमुळें पृथ्वीवर संकट यावें तद्वत् ही मनांतील आवर्षणाची भयप्रद दुःस्थिति आहे. अशा समयीं ईश्वरानें क्रूर आघातानें या जीविताचा शेवट तरी लावावा किंवा कृपाजलाचा वर्षाव करून मनास शांतता द्यावी, असें जीवाला वाटतें.

करावा वर्षाव । तृषाक्रांत झाला जीव ॥
पाहे आकाशाची वास । जाणता तूं जगन्निवास ।
संयोगें विस्तार । वाढी लागे अंकुर ॥ ( तुकाराम ).

याप्रमाणें ईश्वराच्या चरणापाशीं प्रार्थना करून जीवास समाधान करून घेणें हा एकच सदुपाय प्रापंचिकास हितावह आहे.

मातेविण बाळा । आणीक न माने सोहळा ॥
सारसांसी निशीं । ध्यान रवीच्या प्रकाशीं ॥
तुका म्हणे काय । तुजविण प्राण राहे ॥

अर्थात् संकटसमयीं सर्व दिशा जेव्हां ओस आणि भयप्रद दिसतात तेव्हां मनास धीर देणारा विश्वपिता, विश्वजननी आणि विश्वबंधु जो परमेश्वर परम समर्थ आहे त्याचाच धांवा करावा आणि प्राप्त संकटास तोंड द्यावें इतकाच मनुष्याचा अधिकार आहे, असें म्हणण्यास देखील हरकत नाहीं.

---

## ॥ गीत ८९ ॥

बं.—जेन शेष गाने मोर सब रागिणी पूरे ( इं ५८ )

आनंदाचे राग ताल सूर गानीं । अंतीं या जीवनीं साग व्हावे ॥
पृथ्वींतूनि फुटे तरुलतातृण । तयांसी कारण आनंद हा ॥
आनंदाच्या पायीं जीवन मरण । वेडे हे भुवन हिंडताति ॥
अंतकालीं गानीं हाची महानंद । ताल सूर छंद यांत लोपो ॥
जागवी प्राण्यांतें प्रभंजन-वेषें । जगीं अट्टाहासें जो आनंद ॥
दुःख व्यथारूपी रक्त पद्मावरि । गळे अश्रुपुरीं जो आनंद ॥
सकल वैभवा त्यागुनी धुळींत । निरिच्छ वर्तत जो आनंद ॥
अनिर्वाच्य ऐसा आनंद हा गानीं । जाऊं दे भरोनी अंतकालीं ॥

**भावार्थ**—या जीविताचा ज्या वेळीं अंत होईल त्या वेळीं अंतःकरण आनंदानें भरलेलें असावें अशी माझी इच्छा आहे. या जगांत सर्व क्रियांचा उगम आनंदापासून होतो. जन्म जसा आनंदामुळें प्राप्त होतो तद्वत् मृत्युदेखील ( पुनर्जन्माच्या ) आनंदापासून उद्भूत होतो. सर्व वनस्पति आनंदाच्या योगानेंच या पृथ्वींतून वर येत असते. असा हा आनंद दुःखाच्या भरांत देखील अंतर्भूत असून

अश्रूंच्या योगानें व्यक्त होतो. ( ज्या वैभवासाठीं रात्रंदिवस रंकापासून रावाची धडपड चाललेली असते त्या ) वैभवाला लाथाळून दैन्य व दारिद्य पतकरणारा मनुष्य आनंदाचाच अनुभव घेत असतो. हा अनिर्वाच्य आनंद अंतकालीं मजला प्राप्त होवो.

**रहस्य**—तैत्तिरीयोपनिषदांत सांगितलें आहे कीं—

**आनंदो ब्रह्मेति व्यजानात् । आनंदाध्द्येव खल्विमानि भूतानि जायन्ते ॥ आनंदेन जातानि जीवन्ति । आनंदं प्रयन्त्यभिसंविशन्ति ॥**

आनंदापासून हे सव प्राणी उत्पन्न होतात. उत्पन्न झाल्यावर आनंदाचे योगानें जगतात. मरणकालीं आनंदाप्रत जातात. आनंदामध्यें लय पावतात. यासाठीं आनंद हेंच ब्रह्म आहे हें जाणावें.

याप्रकारच्या ब्रह्मामध्यें आपली बुद्धि स्थिर होत नाहीं म्हणून आम्हांस आनंदाची प्राप्ति होत नाहीं. हा ब्रह्मानंद सेवन करण्यासाठीं घरादाराचा त्याग करावा लागतो असें नाहीं. सुख आणि दुःख या दोन्ही मनोविकारांचें ज्यांनीं मर्म जाणिलें त्यांस सदैव आनंदाचा आस्वाद घेणें शक्य आहे. सुखाच्या आणि दुःखाच्या बाधा मनुष्याच्या कल्पनेवर अवलंबून असतात. वाळवंटावर सुखानें झोंप घेणाऱ्यास प्राप्त होणारा आनंद विलासमंदिरांत पुष्पशय्येवर निद्रेशिवाय तळमळणाऱ्या चिंताग्रस्त मनुष्यास प्राप्त होणार नाहीं. जगांत सुख किंवा दुःख यांच्या विषयींचें माप किंवा प्रमाण बसविणें शक्य नाहीं. तुकाराम बुवांस शिवाजी महाराजांनीं आमंत्रण पाठविलें तेव्हां व भेटीच्या वेळीं स्पष्टपणें सांगितलें कीं—

**तुझी चाड नाहीं आम्हा छत्रपति । आम्हीं पत्रपति त्रैलोक्याचे ॥**
**चारी दिशा आम्हां भिक्षेचा अधिकार । न मिळे भाकर भक्षावया ॥**

याप्रमाणें छत्रपतीच्या वर आपली योग्यता कल्पून आनंद मानण्याची तयारी असण्यास मनाची वृत्ति आनंदमय असावी लागते.

अन्नवस्त्राची मोताद असलेले तुकोबा म्हणतात—

**तुम्हांपाशीं आम्ही येऊनियां काय । वृथा सीण आहे चालण्याचा ॥**
**मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे थार चिंध्याबिंदी ॥**
**निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ॥**
**तेथें काय करणें कवणाची आस । वांयां होय नाश आयुष्याचा ॥**

याप्रमाणें अत्यंत हीन मानलेल्या स्थितींत देखील आनंदाचें वास्तव्य आहे. हा आनंद दुःख, सुख, जन्म, मृत्यु इत्यादि सर्व स्थित्यंतरांत प्राप्त करून घेतां येण्याजोगा आहे. प्रत्येकानें लक्षांत ठेवावें कीं

आनंदाच्या कोटी । साटवल्या आम्हां पोटीं ।
प्रेम चालिला प्रवाहो । नाम ओघ लवलाहो ।
अखंड खंडेना जीवन । राम कृष्ण नारायण ।
थडी आहिक्य परत्र । तुका म्हणे सम तीर ।

याप्रमाणें ज्यांनीं आनंदाचें रहस्य समजून घेतलें त्यांचें जीवित आनंदमय होऊन अंतकालीं आनंदाच्या लहरी त्यांच्या अंतःकरणाच्या ठायीं उत्पन्न होतील यांत संदेह नाहीं.

---

## ॥ गीत ९० ॥

बं.—जदि तोमार देखा ना पाई ( इं. ७९ )

देवा, दर्शनाचा लाभ या जीवनीं । न होतां मन्मनीं आस राहो ॥
भुलूं नये कधीं वेदना जडावी । अहर्निश व्हावी आठवण ॥
आलस्यें बैसतां किंवा व्यवहारीं । स्वप्नीं शेजेवरी लागो ध्यास ॥
संसारबाजारीं जरि दिन गेले । द्रव्यानें भरले दोन्ही कर ॥
तरी मज वाटो कांहीं न लाभलें । जोंवरि देखिलें नाहीं तुज ॥
जंव मी आलस्यें होवोनी श्रमित । बैसतों कुंथत मार्गाठायीं ॥
किंवा धूलीमाजी आसन मांडोनी । बैसतों श्रमूनी एकलाची ॥
तदा मज वाटो प्रवास राहिला । मार्ग न संपला अद्यापिही ॥
जोंवरी न तुझें जाहलें दर्शन । तोंवरी हें मन तळमळो ॥
जंव माझ्या गृहीं सुहास्य विलसे । सर्व ठायीं दिसे सुश्रृंगार ॥
जंव वेणुवाद्यें आनंदा ये ऊत । तंव मज खंत वाटो मनीं ॥
नाहीं तुज माझ्या गृहीं पाचारिलें । दर्शन न झालें म्हणोनियां ॥

भावार्थ—देवा तुझ्या दर्शनाचा लाभ व्हावा ही इच्छा सदैव माझ्यांत जाग्रत असो. माझ्या जीविताच्या सर्व प्रकारच्या अवस्थांमध्यें व व्यवहारांमध्यें तुझें स्मरण व्हावें आणि तुझ्या प्राप्तीबद्दल अंतःकरणांत उत्कट इच्छा असावी. सर्व संसाराचा त्याग करून गेलों तरी तुझी भेट व्हावी ही इच्छा असो. माझे हात विपुल धनानें

भरले, घर आनंदानें संपूर्णपणें भरून गेलें, गीत वाद्यादिकांच्या योगानें सर्वत्र उत्साह व आनंद प्रगट झाला तरी या स्थितींत तुला मी विसरून जाऊं नये आणि तुझें दर्शन न झाल्यामुळें माझें मन व्यथित असावें. अशा आनंदोत्सवप्रसंगीं तुला मी माझ्या घरीं बोलवून आणिलें नाहीं म्हणून मनास व्यथा होवो.

**रहस्य**—प्रपंचाच्या अनेक व्यवहारांत गुंतून राहिल्यामुळें आम्हांला ईश्वराची क्वचित् प्रसंगीं आठवण होते. आणि हे प्रसंग म्हटले म्हणजे बहुधा संकटाचे किंवा त्रासाचे असतात. इतर वेळीं म्हणजे ज्या वेळीं आनंद आणि उत्साह यांत मन रमलेलें असतें तेव्हां भगवंताची आठवण होत नाहीं. आनंदाचे दिवस म्हटले म्हणजे लग्न-कार्य, जन्मोत्सव, मित्रदर्शन किंवा वैभवप्राप्ति या प्रकारचे असतात. अशा वेळीं गायनवादन, मिष्टान्न-भोजन, दीपोत्सव इत्यादि प्रकारांनीं आनंद व्यक्त होतो. अशा प्रसंगीं भगवंताची आठवण करणारे विरळा. दीन अनाथ पंगु व कष्टलेले दरिद्र-नारायण आपल्या भोंवतीं अनेक प्रकारच्या त्रासांत असतात त्यांची आठवण कोण करतो? अशा दीनांस मंगल प्रसंगीं जवळ येण्याचीहि मनाई असते. त्याचप्रमाणें अशा उत्सवाच्या वेळीं भगवंताचें स्मरण करून अहंभाव विसरून जाणारे आढळून येत नाहींत. ज्यांना आत्मज्ञान झालें आहे त्यांना मात्र ईश्वराच्या चिंतनापासून आनंद होतो आणि हा आनंद इतर कोणत्याही परीनें प्राप्त झालेल्या आनंदापेक्षां विशेष प्रकारचा असतो. ईश्वर प्रेमासाठीं जे भुकेलेले असतात त्यांच्या मुखावाटे उद्गार निघावयाचे ते हेच कीं—

**आणीक कांहीं नेणें । असें पायांच्या चिंतनें ।**
**माझा न व्हावा विसर । नाहीं आणिक आधार ॥**
**भांडवल सेवा । हाची ठेवियेला ठेवा ॥**
**करीं मानभावा । तुका विनंति करी देवा ॥**

अशा रीतीनें ज्यांस भगवद्दर्शनाचा ध्यास लागला आहे त्यांस त्या दर्शनापासून मात्र खरा आनंद प्राप्त होईल.

**दर्शनाचें आर्त जीवा । बहु देवा राहिलें ॥**
**आतां जाणसी तें करीं । विश्वंभरीं काय उणें ॥**
**येथें जरी उरे चिंता । कोण दाता याहूनी ॥**
**तुका म्हणे जाणवलें । आम्हा भलें एवढेंच ॥**

याप्रकारें आर्त लागली असतां सर्व व्यवहार सुखावह होईल यांत संदेह नाहीं. स्वप्नीं व जाग्रतावस्थेंत ईश्वराचें सान्निध्य ओळखून त्याच्याच अनुज्ञेनें वागणारा या संसाराच्या तापत्रयांतून मुक्त होतो. अनेक जन्माच्या अंतीं ज्ञानवान् आत्मा परमात्म्यांत लीन होतो असें तत्त्वदर्शी जन सांगतात. अर्थात् हें आत्मज्ञान प्राप्त करून घेईपर्यंत परमात्म्याचें दर्शन होणें शक्य नाहीं.

---

## ॥ गीत ९१ ॥

बं.—ए दुर्भाग्य देश हते हे मंगलमय.

दुर्भागी हा देश होवो मंगलमय । सर्व तुच्छ भय दूर करीं ॥
लोकभय राजभय मृत्युभय । करीं तूं विलय भयांचा या ॥
दुर्बल दरिद्री झालों दीन प्राण । भूभार पाषाण जेवीं जगीं ॥
रात्रंदिन यंत्रीं पिळोनी निघतों । धूलींत कंठितों दिन दैन्यें ॥
क्षणोक्षणीं होते जीवनीं दंडणा । मानाची खंडणा परोपरी ॥
अंतरीं बाहेरी रज्जू दास्यत्वाचे । दास सहस्रांचे झालों आम्हीं ॥
त्रस्त सदा मनीं शिर अवनत । मानव-जीवित-गर्व गेला ॥
लज्जाराशीखालीं गेलों चिरडोनी । सार्थक जन्मोनी नसे कांहीं ॥
चूर्ण करीं देवा चरण-आघातें । नाना आपदांतें क्लेशदायी ॥
मंगल प्रभातीं उच्च शीर्षें जन । सेवोत सन्मान मानवाचा ॥
अंधार दवडीं लोपवीं अज्ञान । बुद्धि तेज धन देईं देशा ॥

**भावार्थ**—हा दुर्भागी देश मंगलमय व्हावा हीच तुझ्या चरणापाशीं प्रार्थना आहे. आत्मबलाच्या अभावीं लोकांच्या अंतःकरणांत भीतीनें ठाणें दिलें आहे. या तुच्छ भीतीचें तूं निराकरण कर. सत्य मार्गानें जाऊं पहाणारा रूढीचें उल्लंघन केल्याच्या दोषास पात्र होण्याच्या भीतीनें असन्मार्गाचा अवलंब करीत आहे. जनपदाच्या सेवेस वाहून घेऊन त्याचा कैवार घेऊन उभा राहिल्यास राजसत्तेचा उपमर्द केल्याबद्दल शासन होईल या भीतीनें खऱ्या लोककल्याणाचा मार्ग धरण्यास मन कचरतें. मानवी कर्तव्यकर्म ओळखून संकटांस न जुमानतां जनसेवेला वाहून घेतल्यास जीवावरहि उदार होण्याचा प्रसंग येईल या भीतीनें परोपकाराचीं कार्यें करण्यास जीवाला धीर होत नाहीं. या सर्व प्रकारच्या भयापासून मला मुक्त कर.

कायिक, वाचिक व मानसिक दौर्बल्याबरोबर आर्थिक दौर्बल्य प्राप्त होऊन दीन स्थितींत दिवस कंठण्याचा आम्हांवर प्रसंग आला आहे. ज्याप्रमाणें पाषाण भूभार होऊन पडलेला असतो तद्वत् कार्यशून्य आम्ही भूभार झालों आहों. जीवनार्थ धडपडीमुळें उच्च ध्येयाविषयीं विचारही येत नाहीं. आमच्यांतील सर्व सत्त्व नाहींसें झालें आहे; त्यामुळें निर्बल होऊन अत्यंत नीच स्थितींत आमचे दिवस जात आहेत. जीवनासाठीं काबाड कष्ट करून रात्रंदिवस खपावें लागतें. अनेक परीनें आमच्या मानाची खंडणा होते. अंगीं आत्मिक बल नसल्यामुळें अपमान सहन करणें अपरिहार्य झालें आहे. सामाजिक, नैतिक व इतर अनेक प्रकारच्या गोष्टींत स्वातंत्र्याचा नाश झाला आहे म्हणून गुलामाप्रमाणें वागावें लागतें. या दास्यत्वाची बाधा घरांत व घराबाहेर, आणि स्वदेशांत व देशाबाहेर देखील भोगावी लागते. आणि ज्याला त्याला मान वांकविल्यावांचून गत्यंतर नाहीं अशा प्रकारची स्थिति प्राप्त झाल्यामुळें आम्ही लज्जेनें मान खालीं घालून सर्व जीवित-व्यवहार चालवीत असतों. मनास शांतता नाहीं. मानव जन्म म्हणजे अत्युच्च असें म्हणतात. परंतु आमच्या दुःस्थितीचा विचार केला म्हणजे हा मनुष्यदेह-धारणेचा गर्व व्यर्थ आहे असें दिसतें. परमेश्वरा! ही दुःस्थिति असह्य आहे. ती नाहींशी कर. हा अंधःकार काढून टाक आणि तुझी दिव्य प्रभा पसर. या प्रभेंत लोकांनीं उच्च शिरानें चालावें असें कर. हा प्रभातकाळ घडवून आण. हीच तुझ्या चरणापाशीं प्रार्थना आहे.

**जीवित कर्तव्य—**

“ प्रत्येक जीवात्मा हा स्वभावतः परमात्मरूप आहे. अंतर्बाह्य सृष्टीचें नियमन करून अंतस्थ परमात्मरूप व्यक्त करणें हेंच प्रत्येकाचें साध्य आहे. ”

“ कर्मयोगानें, भक्तियोगानें, राजयोगानें, ज्ञानयोगानें अथवा सर्वांच्या मद-तीनें तुम्ही मुक्त व्हा ”

“ यांत सर्व धर्म आला. मतें, आचार, ग्रंथ, देवळें इत्यादि गोष्टी गौण आहेत. मुक्ति मिळविणें हेंच मुख्य साध्य आहे. ”

“ आपलें आयुष्य क्षणभंगुर आहे पण आपला जीवात्मा अमर आहे. निश्च-यानें घडून येणारी गोष्ट म्हटली म्हणजे मृत्यु हाच होय. याकरितां मोठ्या कार्यालाच आपण आपलें सारें आयुष्य वाहूं या. हा निश्चय आजच आपण करूं या. ”

" विश्वांतील सर्व शक्ति तुमच्या ठिकाणीं गुप्त रूपानें आहे ती व्यक्तदशेला आणणें इतकेंच तुमचें कार्य आहे. "

श्री स्वामी विवेकानंद.

---

## ॥ गीत ९२ ॥

वं.—चित्त जेथा भयशून्य उच्च जेथा शिर ( इं. ३५ )

भयशून्य जेथें चित्त मानवाचें । मस्तक तयाचें उच्च जेथ ॥
जेथ ज्ञान नांदे मुक्त आणि साध्य । होवोनी आराध्य सकलिकां ॥
संसाराचे जेथ खंड न पडले । ऐक्य न बुडालें कलहानें ॥
हृदयांतुनीयां उत्साहें फुटती । शब्द सत्य प्रीति युक्त जेथ ॥
स्रवति अजस्त्र लक्षविध जेथ । शुद्ध अविरत कर्मधारा ॥
देशोदेशीं सर्व दिशांमाजी कर्मे । पूर्णत्वार्थ नेमें धांव घेती ॥
जेथ न बुझाला ओघ विचारांचा । तुच्छ आचारांच्या वाळवंटीं ॥
जेथ पौरुषातें वाव मिळे सदा । कर्तृत्व शतधा प्रगटतें ॥
सकल कर्मांची चिंता तूं वहासी । योग्य मार्गें नेसी जनां जेथ ॥
करीं निज हस्तें निर्दय आघात । चेतवीं भारत तेथ स्वर्गी ॥
स्वर्गी या उत्तम जागवीं भारता । प्रभो विश्वनाथा मायबापा ॥

**भावार्थ**—ज्या ठिकाणीं मनुष्याचें मन भयरहित आहे अर्थात् सत्यानें वागण्यास मन मुळींच भीत नाहीं आणि उच्च शिर करून लोक संसारांत आणि सर्व व्यवहारांमध्यें वागत असतात अशा ठिकाणीं स्वर्ग आहे. सर्वांस जेथें ज्ञान उपलब्ध आहे अर्थात् स्त्री पुरुष, उच्च नीच या प्रकारच्या भेदभावना ज्ञानसंपादनास किंवा ज्ञानप्रसाराला आड येत नाहींत, जेथें कुटुंबाचा किंवा देशाचा संसार प्रेम आणि ऐक्य असल्यामुळें बिघडलेला नाहीं आणि सर्व आप्तेष्ट व देशबांधव प्रेमानें एकत्र वागतात व राहतात, ज्या ठिकाणीं लोकांच्या अंतःकरणांत उत्साह आहे आणि या उत्साहानें युक्त असे सत्यत्वाचे व प्रेमाचे बोल केव्हांही ऐकूं येतात, जेथें हजारों प्रकारचें कर्म अखंड चाललें आहे आणि या कर्मांचा रोंख सत्कार्यांकडे आहे, जेथें पूर्णावस्थेस पोहोंचण्यासाठीं रात्रंदिवस धडपड चाललेली असते, जेथें विचाराची वाढ रूढिप्रणित आचारांमुळें खुंटलेली नाहीं आणि पौरुषाला वाव

असल्यामुळें शेंकडों परीनें कर्तृत्व व्यक्त होत आहे असा देश स्वर्गतुल्य आहे, अशा ठिकाणीं सर्व कर्मांची चिंता वाहणारा तूंच समर्थ आहेस. अशा स्वर्गतुल्य स्थितीला हा भरतखंड पोहोंचावा यासाठीं त्याला जागा कर, त्याच्यावर आघात करून त्याला उठव. मायबापा, तुजपाशीं हीच प्रार्थना आहे.

**रहस्य**—आमचा देश अत्यंत प्राचीन कालीं मानवी सुधारणेच्या दृष्टीनें इतर देशांहून कितीतरी पुढें आला. नीति, धर्म, आणि समाजशासन या तिन्ही शास्त्रांविषयीं विचारकरून जनतेस सुखावह मार्ग आंखून देणारे ऋषि व तत्त्वज्ञानी या देशांत होऊन गेले. त्यांनीं व त्यांच्या मागून आलेल्या साधुसंतांनीं व विचारवंत सज्जनांनीं पुनः पुनः लोकांपुढें एकच ध्येय मांडिलें आणि एकाच प्रकारचें ज्ञान संपादन करण्यास सांगितलें. हें ध्येय आणि ज्ञान भगवद्गीतेंत विशद करून सांगितलें आहे. हा गीतासंदेश सर्वांस आत्मज्ञान मिळविण्याविषयीं व आत्म्याची उन्नति साधण्याविषयीं आज्ञा करीत आहे. आत्मज्ञान ज्यास आहे, जो आत्म्याची योग्यता जाणतो, ज्याला आत्मोद्धार हेंच अंतिम ध्येय आहे ही गोष्ट मान्य असून या उद्धारासाठीं ज्याचा प्रयत्न चाललेला असतो, त्यालाच मानवजन्माची योग्यता कळली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

भरतखंडांत वेदांताचा प्रसार झाला. आत्म्याविषयीं विचार करणारे अनेक ज्ञानी निपजले. लोकव्यवहारावर व संसारावर या तत्त्वज्ञानाची छाप बसली. ही गोष्ट जरी खरी आहे तरी लोकांस निरुत्साही आणि दैववादी करण्यास हाच वेदांत कारणीभूत झाला आहे. आत्मवत् सर्वांकडे वागावें असें सांगणारे भारतीय जन हजारों जातींच्या योगानें एकमेकांशीं फटकून वागतात. कोणत्याही गोष्टीविषयीं काळजी न करतां सत्कार्य नेटानें चालवावें व प्रत्यक्ष मृत्यूचीहि पर्वा धरूं नये असें म्हणणारे आम्हीच अवनत स्थितींत आत्म्याचा घात करून जीवनाची सोय करीत आहों. उत्साहरहित कर्म, रूढिग्रस्त विचार व आचार, भित्रेपणाचे व्यवहार आणि दैन्ययुक्त वर्तन यांच्या योगानें आमचा देश अंधःकारांत सांपडल्याप्रमाणें झाला आहे. या रात्रीच्या अवस्थेमध्यें देशाला सद्गति कोठून प्राप्त होईल ? तो जागा झाला पाहिजे, सर्वांनीं आत्मस्थिति जाणली पाहिजे. ही आत्मस्थिति जाणल्याचें लक्षण असें आहे—

**नमस्कारीं भूतें विसरोनी याती । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥**
**पर उपकारीं वेंचीयेल्या शक्ति । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥**

द्वैताद्वैत भाव नाहीं जया चित्तीं । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥
जयाचिये वाचे नये निंदा स्तुति । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥
उचित अनुचित जाणे धर्मनीति । दृढ भाव भक्ति मानव तो ॥
तुकया बंधु म्हणे वरकड ते येर । संसाराचे खर भारवाही ॥

याप्रमाणें आत्मज्ञान नसल्यामुळें पशुवत् भारवाहक होऊन आयुष्य कंठणाऱ्यांचा आणि देशाच्या अधोगतीस व नीचावस्थेस कारणीभूत होणाऱ्यांचा भरणा या देशांत किती आहे बरें! मग या देशाचा उद्धार होत नाहीं यांत आश्चर्य कोणतें?

---

## ॥ गीत ९३ ॥

बं.—एकटि नमस्कारे प्रभु एकटि नमस्कारे. ( इं. १०३ )

देवा मी करितां एक नमस्कार । तुझा हा संसार लुटो देह ॥
जलभारें होती श्रावणींचे घन । तेवीं व्हावें लीन नमस्कारें ॥
नाना गीतधारा एकत्र मिळोनी । जावोत वाहोनी शांतितत्वीं ॥
मन पडो स्वस्थ तुझ्या भवनद्वारीं । एका नमस्कारीं देवराया ॥
होऊं दे समाप्ती समस्त गानाची । चरण सेवितांची नमस्कारें ॥
जैसे हंस जाती मानसकासारा । घेवो प्राण थारा मृत्युपार ॥
हंसापरि शांत स्वगृहासि जावें । करितां मी भावें नमस्कार ॥

भावार्थ—देवा, तुझ्या चरणरविंदीं मी नमस्कार करतांच तुझ्या विश्वरूपाचें दर्शन घडावें, आणि या अनंत ब्रह्मांडांमध्यें तुझा जो संसार चालला आहे, त्याच्याशीं मी संपूर्णपणें ऐक्य पावावें. श्रावण महिन्यांत जलभारामुळें मेघ ज्याप्रमाणें नम्रपणें वांकून असतात त्याप्रमाणें तुला मी नमस्कार करीत असतां माझ्यांतील अहंभाव संपूर्ण नाहींसा व्हावा आणि मी अत्यंत नम्र व्हावें. तुझ्या प्रार्थनाविषयक गीतांचें अंतिम साध्य म्हणजे मला शांति प्राप्त व्हावी हेंच असावें आणि मी नमस्कार करतांच माझें मन तुझ्या मंदिराच्या द्वारावर स्वस्थ पडून असावें. तें तेथून दुसरीकडे जाऊं नये. त्यांतील चंचलता नष्ट व्हावी, सर्व गान, सर्व कर्म, आणि सर्व व्यवहार यांची तुला नमस्कार करतांच समाप्ती व्हावी. अर्थात् तुझ्यापुढें मस्तक नमवितांच या सर्व प्रकारच्या कर्मांपासून मन संपूर्णपणें निघून यावें. हंसपक्षी ज्याप्रमाणें मानस सरोवराकडे धांव घेतात, त्याप्रमाणें नमस्काराच्या योगानें

हा प्राण मृत्यूच्या पलीकडे असणारें विश्रांति स्थान जें तूं त्या तुजकडे पोहोंचावा आणि माझ्या शेवटच्या नमस्कारानें मी माझ्या स्वगृहास पोहोंचावें. असा हा नमस्कार असो.

**वंदन** हा नवविधाभक्तींतील एक प्रकार असून याचें महत्व समर्थांनीं पुढील प्रमाणें वर्णिलें आहे:—

**नमस्कारें लीनता घडे। नमस्कारें विकल्प मोडे। नमस्कारें सख्य घडे। सत्पात्रासी॥ नमस्कारें दोष जाती। नमस्कारें अन्याय क्षमिती। नमस्कारें मोडलीं जडती। समाधानें॥ नमस्कारें कृपा उचंबळे। नमस्कारें प्रसन्नता प्रबळे। नमस्कारें गुरु देव वोळे। साधकावरी॥ निःशेष करितां नमस्कार। नासती दोषांचे गिरिवर। आणि मुख्य परमेश्वर। कृपा करी॥**

याप्रमाणें अत्यंत लीन चित्तानें बुद्ध्या किंवा नकळत केलेल्या कर्मांबद्दल पश्चात्तापपूर्वक भगवंतास शरण जाऊन त्याच्या चरणीं साष्टांग प्रणिपात केल्यानें चित्तशुद्धि होते. आणि शरणागत भक्त ईशकृपेला पात्र होतो. अशाप्रकारच्या लीनतेनें कुटुंबांतील व देशांतील दुहीचें खंडण करणें शक्य आहे. अहंभाव व स्वार्थ यांचा यज्ञकेल्याशिवाय इष्ट हेतु साध्य होणें शक्य नाहीं. योग्य समयीं योग्य पात्रास आणि योग्य कार्यासाठीं नमस्कार घालणें अत्यंत इष्ट आहे.

# ॥ दशम खंड ॥

# प्रासंगिक विचार.

## गीत ९४

बं.—आमार सकल आङ्गे तोमार परश ( इं. ४ )

**सकल माझ्या अंगीं संलग्न जाहला । स्पर्श तुझा भला अहर्निश ॥**
**स्मरोनी हें नित्य जपेन ही काया । पवित्र राखाया प्राणेश्वरा ॥**
**सदैव असशी मनीं विराजित । राहीन चिंतीत परम ज्ञाना ॥**
**ठेवीन मी यत्नें मूर्ति तुझी ध्यानीं । देईन लोटुनि मिथ्या कर्मे ॥**
**अचल आसन तुझें अंतर्यामीं । असे हें जाणें मी सर्व काल ॥**
**म्हणोनीयां द्वेष सकल कुटिल । सर्व अमंगल त्यागीन मी ॥**
**प्रेमें हें हृदय निर्मल ठेवीन । प्रस्फुट सुमन रम्य जैसें ॥**
**सकल माझ्या कर्मी देतसे चालन । शक्ती तुझी खूण पटली ही ॥**
**म्हणोनि जीं कर्मे करीं घडतील । प्रचार केवल त्वत्कर्माचा ॥**

**भावार्थ**—परमेश्वरा, माझ्या सर्व इंद्रियांच्याठायीं तुझ्या दिव्य चैतन्यशक्तीचा भास होत आहे. यासाठीं या देहाविषयीं मी शक्य ती काळजी घेईन आणि तें पवित्र राहील असें करीन. हे परम ज्ञाना, माझ्या अंतःकरणाच्या ठायीं तुझें अधिष्ठान आहे. अनेक प्रकारच्या मूर्खपणाच्या आचारांचा मी त्याग करीन आणि तुझी मूर्ति माझ्या हृदयांतर्यामीं ठेवीन. या अंतःकरणास बिघडविणारी द्वेषभावना, कुटिल नीति, आणि अमंगल आचार व विचार यांचा त्याग करून तें निर्मल व विकसित पुष्पाप्रमाणें रम्य होईल असें करीन. मी केवळ तुंवा आज्ञापिलेलीं कर्में करण्यासाठींच जन्म घेतला आहे. तूंच या कर्माचरणास शक्ति व चालन देत आहेस. मी या गोष्टीची सदैव माझ्या मनांत कृतज्ञतापूर्वक आठवण ठेवीन.

**रहस्य**—आपल्या अंगीं असलेली चेतनाशक्ति अखिल विश्वाला जिवंतपणा प्राप्त करून देणाऱ्या अतर्क्य महत्शक्तीचाच अंश आहे, हें जाणण्यास मनुष्याचें मन विश्वाच्या आत्म्याशीं तादात्म्य पावलें पाहिजे. सर्व वनस्पति, प्राणिमात्र आणि इतर दृश्य व अदृश्य सृष्टींतील घटना चैतन्यपरिप्लुत आहे. हें चैतन्य

अंशतः मनुष्याच्या सर्व कार्यांस चालन देत आहे असें जाणल्यावर मनुष्याचा अहंभाव नाहींसा होतो.

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया** ( गीता १८–६१ )

ईश्वर सर्वांच्या हृदयांत आहे आणि सर्व भूतमात्राला यंत्रावर घातल्याप्रमाणें एक सारखा फिरवीत आहे, किंवा त्यांना कर्मामध्यें गुंतवून ठेवीत आहे. असें जें भगवंतानें गीतेंत सांगितलें त्याचें रहस्य जाणल्यास हा सर्व संसार भगवंताप्रीत्यर्थ आहे ही भावना जाग्रत होईल. उपनिषत्कारांनीं देखील याच दृष्टीनें जगाकडे आणि मनुष्याच्या व्यवहाराकडे पाहिलें. त्यांचें मत असें आहे कीं—

**एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्व भूतांतरात्मा ।**
**कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्च ॥**

म्हणजे सर्व भूतमात्रामध्यें गुप्तपणें राहणारा, सर्वव्यापक, सर्व प्राणिमात्राचा अंतरात्मा, कर्मांचा अधिष्ठाता, सर्व भूतांमध्यें वास करणारा, सर्व पाहणारा, आणि सर्वांस चेतना देणारा एक देव आहे. असें जर आहे तर या मानवी देहामध्यें वास करणाऱ्याचें पावित्र्य व श्रेष्ठत्व जाणून हा देह देखील पवित्र राखणें व त्याची योग्य जोपासना करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे हें सिद्ध होतें. परंतु देह आणि देही यांच्या निकट संबंधाची भावना आमच्या अंतःकरणांत सदैव जाग्रत राहत नाहीं म्हणून आमच्या हातून अनेक प्रमाद घडतात. हे प्रमाद कायिक, वाचिक व मानसिक असतात. हें जाणून आवश्यक तें सामर्थ्य देण्याबद्दल साधुसंतांनीं देखील भगवंताची रात्रंदिवस प्रार्थना केलेली आढळतेः—

**नाहीं गुणदोष लिंपों देत अंगीं । झाडितां प्रसंगीं बरावरी ।**
**निकटवासिया आळवितों धांवा । तेथूनियां देवा सोडवूनि ॥**

गीतेंत कायिक, मानसिक व वाङ्मय तपाचें महत्व सांगितलें आहे. या तपाचें साध्य व सार्थक म्हटलें म्हणजे देहाचें सामर्थ्य वाढविणें व तें शुद्धतम करून ईश्वराच्या निवासासाठीं परम योग्य होईल असें करणें हेंच होय. ( गीता अध्याय १८ श्लोक १४।१६ ) परंतु याप्रमाणें देहाचें महत्व जाणण्यास आवश्यक असलेली गोष्ट म्हटली म्हणजे ईश्वराचा आणि आपल्या देहाचा निकट संबंध आहे, भगवंत आपला निकटवासी आहे आणि त्याचीच आज्ञा पाळण्यासाठीं आपला जन्म आहे हें जाणणें आहे. हें जाणल्याशिवाय देहाचें महत्व पूर्ण जाणलें असें म्हणतां येणार नाहीं.

## ॥ गीत ९५ ॥

बं.—भिक्षा करे फिरते छिलेम ( इं. ५० )

भिक्षेसाठीं ग्रामीं होतों मी हिंडत । ग्रामीं सर्व पथ आक्रमीले ॥
तुज म्यां देखीलें दिव्य हेम रथीं । सुसंभ्रमें पथीं चालतांना ॥
अपूर्व स्वप्नाचा भास मज झाला । वाटे नयनाला चोज मोठें ॥
विचित्र त्वत्शोभा विचित्र तव साज । कोण महाराज असेल हा ॥
वाटलें मजला आला शुभ क्षण । गेली रात्र दिन उदेयेला ॥
हिंडावें कासया आतां दारोदारीं । दैन्य सारें दूरीं पळालें तें ॥
रथ चालतांना दोहींकडे धन । धान्य तयांतून लाभे जना ॥
मुष्टीनें भरोनी धन धान्य राशी । नेईन घरासी आनंदानें ॥
हळूहळू रथ आला मजपाशीं । प्रेमें हांसलासी तदा राया ॥
प्रभो तुंवां केला तदा अकस्मात । तव दक्षिण हस्त मजपुढें ॥
काय तूं या करीं देतोसी मजला । प्रश्न ऐसा केला नृपनाथा ॥
'राजाधिराजा हें काय वदलासी । द्याया मजपाशीं काय असे ॥
नमवोनि शिर राहिलों मी स्वस्थ । मूकापरि तेथ क्षणभरी ॥
तुजपाशीं असे उणीव कशाची । काय भिक्षुकाची भिक्षा गोड ॥
कौतुकानें ऐसें केलेंसी का राया । किंवा ठकवाया पहातोसी ॥
गोंधळोनि गेलों किमपि सुचेना । झोळींतूनि दाणा काढिला मी ॥
एक धान्यकण तुजसी दिधला । त्वांही स्वीकारीला पूर्ण प्रेमें ॥
दिन गत होतां भूवरी ओतिली । भिक्षेची मी झोळी गृहामाजी ॥
चकित जाहालों पहातां भिक्षेच्या । संग्रहीं सोन्याचा दाणा एक ॥
विव्हळलों भारी केलें म्यां रोदन । भरले नयन दुःखाश्रूंनीं ॥
झोळी तुजपुढें संपूर्ण ओताया । धजलों न राया भिक्षुक मी ॥
केलें कां न तुज सर्व समर्पण । दिला एक कण अभाग्यानें ॥

**भावार्थ**—भिक्षेसाठीं गांवांत हिंडत असतां मोठ्या संभ्रमानें तुझा दैदीप्यमान रथ येत असतांना म्यां पाहिलें. रथ चालत असतां दुतर्फा नवधान्यादिकांचा वर्षाव होत होता. तेव्हां माझ्याही हातीं विपुल संपत्ति येईल या आशेनें हात पसरून राहिलों; परंतु आपला रथ येतांच आपणच माझ्या पाशीं मागण्यासाठीं

हात पुढें केला. तेव्हां मी गांगरून गेलों आणि काय व किती देऊं हें न कळतां झोळींतून एक धान्याचा कण काढून तुम्हास दिला. पुढें घरीं जाऊन पहातों तर एक सोन्याचा धान्याचा कण झोळींत सांपडला. मी जर सर्व झोळी आपल्यापुढें ओतली असती तर सर्वच सुवर्ण झालें असतें; परंतु मला अभाग्याला ही बुद्धी कुठून येणार ?

**रहस्य**—परमेश्वर हाच परम समर्थ, परम दयाळू आणि अत्यंत धनवान् आहे अशी प्रत्येक मनुष्याची भावना आहे. म्हणून तो भगवंतापाशीं धन धान्य व सर्व प्रकारच्या वैभवाची याचना करीत असतो.

**मी याचक तूं दाता। काय सत्य पाहों आतां॥**
**म्यां तो पसरिला हात। करीं आपुलें उचित॥**
**आम्ही घ्यावें नाम। तुम्हां समाधान काम॥**
**तुका म्हणे देवराजा। वाद खंडीं तुझा माझा॥**

ऐहिक संपत्ति असो किंवा पारमार्थिक संपत्ति असो, ही संपत्ति प्राप्त होण्याचें भांडागार म्हटलें म्हणजे परमेश्वर आहे असें प्रत्येक भाविक व आस्तिक्य बुद्धीचा मनुष्य समजतो. तथापि भगवंताचें याविषयींचें आश्वासन असें आहे कीं—

**ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्॥**

ज्याप्रमाणें लोक माझी संभावना करतात त्याच प्रमाणें मी त्यांचीहि संभावना करतों. अर्थात् **पेरिलें तें उगवतें। उसणें द्यावें घ्यावें लागतें॥** असा हा सृष्टीचा व सृष्टिनायकाचा नियम आहे. परमेश्वर भक्तांचें रक्षण करतो व त्यांच्या मनीषा तृप्त करतो. तुकोबा म्हणतात—

**आवडीचें दान देतो नारायण। बाहे उभारोन राहिलासे॥**

हें खरें. परंतु ईश्वराची आवड व आपली आवड एक झाली पाहिजे. या विश्वाच्या ठायीं सर्व व्यवहार प्रतिध्वनिप्रमाणें आहे. द्यावें तेंच घ्यावें, करावें तसें भरावें. उत्तम बीजापोटीं रसाळ आणि गोमटीं फळें उपजावीं हा विश्वांतील नियम सर्व व्यवहाराच्या बुडाशीं आहे. विश्वांतील भगवंताचें कार्य जाणून, जनीं जनार्दन ओळखून त्याप्रमाणें स्वार्थत्यागपूर्वक वागणाऱ्यास योग्य प्रतिफल मिळतें. "यज्ञानें यज्ञाची पूजा करण्यांत आली आणि यज्ञ हाच प्रथम धर्म आहे" असें वेदवाक्य आहे. यांतील रहस्य हेंच कीं त्याग केल्यावांचून विश्वांतील संसाराची वृद्धि होणें शक्य नाहीं. आणि याप्रमाणें वृद्धीच्या कार्याला जे मदत करतात त्यांच्या श्रमाचें चीज विश्वाचा धनि केल्याशिवाय रहात नाहीं. क्षुल्लक धान्यकणाचा मोबदला म्हणून

सोन्याचा धान्यकण प्राप्त होतो इतकें औदार्य या विश्वपतीच्याठायीं आहे, हें जाणणारा सदैव शांतचित्त व सुखी होईल. तुकोबा म्हणतातः—

सर्वस्वाची साटी । तरिच देवासवें गांठी ॥
नाहीं तरी जया तैसा । भोग भोगवील इच्छा ॥
द्यावें तेंचि घ्यावें । म्हणवुनी जीवें जावें ॥
तुका म्हणे उरी । मागें नुरवितां बरी ॥

या प्रकारचा त्याग ज्या विभूतींनीं प्राचीन काळीं केला त्या जशा मरूनही अमर राहिल्या त्याप्रमाणें या महात्म्यांस जन्म देणारीं राष्ट्रें देखील दीर्घायुष्य व वैभव भोगण्यास पात्र झालीं. तेव्हां स्वार्थत्याग हेंच स्वार्थसाधन आहे.

---

## ॥ गीत ९६ ॥

बं.—जगत् पारावारेर तीरे ( इं. ६० )

जगत्सागराच्या तीरावरि मेळा । क्रीडेसाठीं आला बालकांचा ॥
अपार निश्चल नभातळीं जल । सागरीं चंचल खळखळे ॥
सुनील जलाच्या वरि फेन दिसे । नृत्य करीतसे सर्व काल ॥
तीरावरि मेळा बालकांचा आला । त्यांच्या कोलाहला नसे सीमा ॥
गृहें वालुकेचीं लहान रचिती । शिंपांनीं खेळती रिकाम्या ते ॥
गलित पर्णांच्या नौका बनवूनि । सलिलीं लोटोनी देती बाल ॥
जगत्सागराच्या तीरीं बालमेळा । खेळतसे खेळा आनंदानें ॥
जाणती न बाल सागर तराया । जाल पसराया कळेना त्यां ॥
पाणबुडे तळीं बुडोनी काढिती । मौक्तिकें वरती कळेना त्यां ॥
देशोदेशीं जावोनीयां वणिग्जन । मिळविति धन व्यवहारें ॥
सागरतिरींच्या शिंपा जमविती । त्यांहीं भूषविती क्रीडास्थानें ॥
उठे फेन हांसे सागर त्या कालीं । कळा उतरली तीराठायीं ॥
गर्जना भीषण येई शिशुकर्णी । तरंग फुटोनी निघे शब्द ॥
जेंवीं हालवीतां पाळणा जननी । प्रेमें ती हांसोनी गाई गीत ॥
तेंवीं बालांसंगें खेळतां सागर । त्या कालीं भेसूर हास्य करी ॥
जगत्सागराच्या तीरावरि बाल । खेळताति खेळ निश्चित ते ॥

झंझावात सुटे धांवे नभातळीं । धरणी बुडाली नील जलें ॥
मृत्युदूत हर्षे उडत चालती । तथापि खेळती बालक ते ॥
जगत्सागराच्या तीरावरि बाल । खेळती सकल हर्षभरें ॥

**भावार्थ**—या जगताच्या समुद्रतीरावर क्रीडेसाठीं मुलें एकत्र जमलीं. मुलें नाचूं बागडूं लागलीं आणि त्यांच्या कोलाहलास प्रारंभ झाला. वाळूचीं घरें बांधणें, पानाच्या नावा बनविणें, शिंपांनीं वाळुकामय प्रदेश शृंगारणें यांतच त्यांचा काल जाऊं लागला. त्यांना पोंहतां येत नाहीं किंवा जाळीं टाकतां येत नाहींत. व्यापारी लोक या सागराचा उपयोग करून दूर प्रदेशीं जाऊन धन आणतात. पाणबुडे समुद्राच्या बुडाशीं जाऊन मोत्यें मिळवितात. परंतु मुलांना याप्रमाणें संपत्ति मिळवितां येत नाहीं. त्यांचा काल खेळण्यांत व हंसण्याखिदळण्यांत जातो. परंतु समुद्राचा शांतपणा एकाएकीं नाहींसा होतो. भयंकर लाटा उसळूं लागतात. मुलांचे सर्व खेळ एका क्षणांत नाश पावतात, आणि सर्वत्र मृत्यूचें साम्राज्य दिसूं लागतें. अनंत जलांत तारवें फुटून जातात. तथापि मुलांस या भयानक स्थितीचें ज्ञान नसल्यामुळें त्यांचा खेळ चालूच असतो.

**रहस्य**—या अफाट भवसागराच्या तीरावर सर्व मनुष्यप्राणी जमले असून त्यांचा काल नाना प्रकारचे खेळ खेळण्यामध्यें जात आहे. आनंद व उल्हास यांच्या योगानें हें जीवित सफल करावें हाच हेतु मनांत धरून मनुष्यें व्यवहारांत चूर असतात. या भवसमुद्राच्या बुडाशीं जाऊन रत्नें मिळविणारे किंवा त्यांतील वादळ किंवा ओहटी भरती यांची पर्वा न करतां तरून जाण्याचा यत्न करणारे विरळाच सांपडतात. बहुजनसमाज रात्रंदिवस सामान्य व्यवहाराचा खेळ खेळण्यांत गुंतलेला असतो; परंतु हा समुद्रच असा आहे कीं एका क्षणांत त्याचा शांतपणा नाहींसा होतो. या भवसागराच्या मोहकारक सान्निध्यांत असतां खेळ खेळण्यांत गुंग झालेल्या अज्ञानी जनांस या सागराचें भेसूर रूप दृग्गोचर होत नाहीं. ते खेळांत रंगलेले असतात. अशा वेळीं या समुद्राच्या लाटा त्यांच्यावरून जाऊन त्यांच्या क्रीडागृहांचा, शृङ्गाराचा आणि सर्व संपत्तीचा नाश होतो.

नभोमय जालें जळ । एकीं सकळ हरपलें ॥
आतां काय सारासारी । त्याच्या लहरी तयांत ॥
कैंचा तेथें यावा सांडी । आप कोंडी आपणा ॥
तुका म्हणे कल्प झाला । अस्त गेला उदय ॥

ही जी ब्राम्ही स्थिति तीच प्रापंचिकास स्थूल दृष्टया प्राप्त होऊन त्यांतच तो नाश पावतो. जे या भवसागराचें महत्व जाणतात ते मात्र त्याच्या योगानें ज्ञान-मौक्तिकांचा लाभ करून घेतात किंवा अन्य तऱ्हेनें त्याचा उपयोग करून आपली आध्यात्मिक उन्नति करून घेतात आणि शाश्वत संपत्ति वाढवितात.

बालकांच्या दृष्टीनें या सागरावरील खेळांकडे पाहिलें तर या अज्ञांस अफाट भवसागराची कल्पनाहि नसते. त्यांच्या दृष्टीसमोर प्रचंड घडामोडी चाललेल्या असतात. या घडामोडींचा परिणाम अनेक दिशांनीं आपल्या जीवितावर होतो हें त्या अर्भकांना समजत नाहीं. हींच बालकें पुढें मोठीं झाल्यावर मोहास बळी पडून किंवा विषयसुखाच्या लालसेनें व्यवहारी बनतात तेंव्हांच त्यांना चिंता, भीति, लोभ, साहस वगैरे अवस्थांचा अनुभव प्राप्त होतो. ही स्थिति कष्टमय होऊं नये असें ज्यांस वाटतें त्यांनीं बालवयांतील निर्लोभता व निष्काम वृत्ति कायम ठेविली पाहिजे. या भवसमुद्राच्या तीरावरील सर्व व्यवहार बालकांच्या क्रीडेप्रमाणें अशाश्वत व क्षणभंगुर आहे हें जाणून त्यापासून शक्य तितकें अलिप्त राहण्याचा यत्न केला पाहिजे. हा सागर तरून पैलतीरास जाणें हेंच आपलें ध्येय आहे, ही मनोभावना दृढ झाली पाहिजे.

**इहलोकीं आम्हां वसतीचें पेणें । उदासीन तेणें देहभावीं ॥**
**कार्यापुरतें कारण मारगीं । उलंघूनि वेगीं जावें स्थळा ॥**
**सोंगसंपादणी चालवितों वेव्हार । अत्यंतीं आदरें नाहीं गोवा ॥**
**तुका म्हणे वेंच लाविला संचिता । होईल घेतां देतां लाभ कोणां ॥**

---

## ॥ गीत ९७ ॥

बं.—जीबने जा चिरदिन वये गे छे आभासे ( इं. ६६ )

**सदैव मजला होतसे आभास । अंतर्यामीं वास असे त्याचा ॥**
**प्रभातप्रकाशीं न ये दृष्टीपुढें । दर्शन न घडे कधीं त्याचें ॥**
**माझ्या जीविताच्या शेष गानीं त्यातें । वेष्टूनियां तूतें देतों दान ॥**
**मन वळवितां वाचाही थकली । परि नाहीं झाली कृपा त्याची ॥**
**गान सूर यांहीं रंजवितां तया । सन्निध तो याया नसे राजी ॥**
**मोहक नवीन रूपें नाना योनी । धारण करोनी वर्ते लोकीं ॥ प्र०**

हिंडतों मी त्याजसाठीं देशोदेशीं । घेवोनी तयासी हृद्यांत ॥
त्याच्या भोंवतीं हा देह वृद्धि नाश । पावे अहर्निश वारंवार ॥
ध्यानीं मनीं क्रिया कर्म आचरितां । स्वप्नीं निद्रा घेतां त्याचें ध्यान ॥
किती काल किती लोकांमाजि त्याच्या । फिरतों द्वाराच्या बाहेरूनि ॥
बहुतां जनानीं द्वारातें लोटीलें । तया मागीतलें परी व्यर्थ ॥
निराश होवोनी जन सारे गेले । लोटोनी दिधलें सकलांसी ॥
प्रपंचीं या त्यातें कोणी न देखीलें । दर्शन घडलें नाहीं कोणा ॥
एकांतीं तो वसे अंगिकार तुवां । आपुला करावा चिंती सदा ॥

**भावार्थ**—मला भास होतो कीं तो सदैव माझ्या अंतर्यामीं आहे. परंतु त्याचें दर्शन मात्र मला घडत नाहीं. माझें जीवित संपतांना गीत गात मी त्याला तुझ्या स्वाधीन करीन. त्याला प्रसन्न करण्यासाठीं मी शिकस्तीचा यत्न केला; परंतु त्याचें मन कांहीं केल्या वळत नाहीं. अनेक देशांत मी त्याजबरोबर हिंडत आहें. हा देह त्याच्या भोंवतीं वृद्धि व नाश पावत आहे. सर्व स्थितीमध्यें अनेक व्यवहार चालत असतां त्याचें स्मरण होतें. अनेक मताचे लोक त्याला आपल्या ताब्यांत घ्यावा म्हणून मजकडे आले अर्थात् त्याला आपल्या मतास अनुकूल करण्यासाठीं आले; परंतु त्यांस मी लोटून दिलें. हा अंतर्यामींचा निवासी केवल तुझीच वाट पहात असून तुलाच स्वतःला वाहून घेण्याची आकांक्षा धरून काल कंठीत आहे. इतर कोणासहि त्याचें दर्शन होणें शक्य नाहीं.

**रहस्य**—जन्मजन्मांतरीं या देहाच्या अंतर्यामीं जीवात्म्याचा वास आहे. तो निकट सहवासी आहे तथापि त्याचें यथार्थ ज्ञान अहंभावानें दूषित झालेल्या बुद्धीला होत नाहीं. आमचे आचार विचार, आमच्या स्वप्नावस्थेंतील कल्पना, आमची धृति या सर्वांवर ताबा चालविणारा जीवात्मा आमच्या करवीं अनेक कृत्यें करवितो. इतकें असूनहि तो आमच्या बुद्धीला, तर्काला किंवा विद्येला अगम्य असा आहे. त्याचा लाभ होत नाहीं. मनाला त्याच्या अस्तित्वाचा भास मात्र होतो. याचें कारण हा देही ( जीवात्मा ) देहांत असून अलिप्त असल्यामुळें, ऐहिक कर्मांमुळें त्याची प्राप्ति होणें शक्य नाहीं. त्याला या देहाच्या क्षणिक सुखदुःखाची पर्वा नाहीं. अहंभावामुळें मात्र हा आत्मा माझा आहे असा गर्व आम्ही वाहतों. परंतु आत्मा स्वेच्छेनुसार या देहाचा त्याग करून जाण्यास मागें पुढें पहात नाहीं. आत्म्याचा ओढा स्वगृहाकडे आहे. तो जेथून आला तेथेंच तो

जाऊं पहातो. परमात्म्यापासून तो आला आणि त्याला शेवटची विश्रांति तेथेंच घ्यावयाची असते. भिन्न भिन्न धर्मांचे उपदेशक आपआपल्या धर्मांच्या द्वारा या आत्म्याचा लाभ करून देण्याचें अभिवचन देतात परंतु आत्म्यास हें धर्माचें खूळ पटत नाहीं. त्याचा धर्म व्यक्तिनिर्मित नाहीं. तो विश्वांतील महच्चैतन्याचा अंश असल्यामुळें त्रिकालाबाधित अशा विश्वधर्मांचा तो पोषक व परिपालक आहे. यासाठीं आचारांच्या गढूळ डोहांत बुडणाऱ्या व तरणाऱ्या निरनिराळया धर्मांच्या अनुशासनांची आत्म्याला पर्वा नाहीं. आत्म्याचा स्वधर्म म्हटला म्हणजे पुनः परंधाम गांठावयाचें हा एकच आहे. त्याची तळमळ तुकोबांनीं वर्णिली आहे ती यथार्थ होय:—

**आर्त माझ्या बहु पोटीं। व्हावी भेटी पायांशीं॥**
**यासी तुझी कृपावंता। माझी चिंता असों द्या॥**
**तळमळ करी चित्त। अखंडित वियोगें॥**
**तुका म्हणे पंढरिनाथा। जाणें वेथा अंतरींची॥**

याप्रमाणें परमेश्वरांत तद्रूपता पावण्यास तळमळणारा जीव या प्रपंचाच्या व्यवहारांत सदा चूर असणाऱ्या संसारी जनांस प्रगट होत नाहीं यांत आश्चर्य कोणतें? आत्म्याच्या ठायीं जेव्हां परमात्म्याविषयीं प्रेम उद्भवून वियोगदुःख असह्य होतें तेव्हांची स्थिति संतांनीं वर्णिली आहे ती अशी—

**भेटीची आवडी उतावीळ मन। लागलेंसे ध्यान जीवीं जीवा॥**
**आतां आवडीचा पुरवावा सोहळा। येवोनी गोपाळा क्षेम देईं॥**
**नेत्र उन्मळित राहिले ताटस्त। गंगा अश्रुपात वाहावली॥**
**तुका म्हणे तुम्ही करा साचपणा। मुळींच्या वचना आपुलिया॥**

---

## ॥ गीत ९८ ॥

बं.—मर्त्यवासी देर तुमि जा दियेछ प्रभु (इं. ७५)

**जें जें कांहीं देसी प्रभो तूं मर्त्यांना। त्यायोगें वासना पूर्ण होती॥**
**तरि तुझें दान रिक्त न होतसे। परिवर्ततसे तुजकडे॥**
**नदी नित्य काज चालवी अखंड। ओघ सुप्रचंड धांवे सदा॥**
**परी तिचें सारें कर्म सांग होई। जंव तुझ्या पायीं वर्षी जला॥**
**जलांजलि रूपें धारा अंतहीन। पादप्रक्षालन करिताति॥**

**कुसुम सुवासें भुलवी जगता । परि संपूर्णता न पावे तें ॥**
**पुष्प-कार्य होई सांग जंव तया । त्वत्शिरीं पूजाया अर्पिताति ॥**
**कवि गीतामाजी सांगे कथा नाना । लाविती तयांना अनेकार्थ ॥**
**परि जो अंतिम असे गीता अर्थ । तुझ्याची प्रीत्यर्थ अर्थ तोची ॥**

**भावार्थ**—परमेश्वरापासून ज्या देणग्या मर्त्यांना मिळतात त्या अंतीं परमेश्वर चरणींच पोंहोंचतात. त्या देणग्यांमध्यें अणुमात्र कांहीं कमी होत नाहीं. नदीच्या कार्याची सफलता भगवंताच्या पादप्रक्षालनाला तिच्या तीर्थाचा उपयोग करावा तेव्हांच होते. जगाला आनंद व सुवास देणारें फूल जेव्हां भगवच्चरणीं अर्पिलें जातें तेव्हांच त्याचा जन्म सफल झाला असें म्हणतां येईल. कवीच्या गीताचें सार्थक जेव्हां तें गीत ईश्वराप्रीत्यर्थ आहे तेव्हांच होतें. अनेक गीतें आणि अनेक कथा यांतून निघणाऱ्या अनेक अर्थांमध्यें ईश्वराप्रीत्यर्थ असलेला अर्थच उत्तम आहे. अर्थात् भगवत्पूजा करण्यासाठींच वाणी व वस्तुमात्र यांचा उपयोग झाला पाहिजे.

**रहस्य**—या जगामधील सर्व व्यवहारांची सांगता कर्म ईश्वरार्पण केल्यानें होते हें जाणणें म्हणजेच या विश्वाचें गूढ जाणणें आहे. समुद्रापासून बाष्परूपानें जल आकाशांत जाऊन पुनः मेघरूपानें त्याचा वर्षाव नदीच्या पात्रांत होतो. तें जल पुनः समुद्रास पोहोंचतें. तद्वत् ईश्वराच्या देणग्या परत त्यालाच पोहोंचतील तेव्हांच त्यांचा योग्य उपयोग झाला असें म्हणतां येईल. भगवंताच्या या विश्व-संसारांत प्राप्त झालेली बुद्धि, कायिक, वाचिक व मानसिक शक्ति, किंवा आर्थिक व इतर संपत्ति विश्वांतील कार्यासाठीं खर्च करणें हेंच मानवी कर्तव्य कर्म आहे. ब्रह्मार्पणासाठींच सर्व कर्में असावीं. या विश्वांतील वस्तुमात्राचा सदुपयोग ईश्वरसेवे-प्रीत्यर्थ व्हावा असें जाणणारा या विश्वाकडे आत्मैक्य दृष्टीनें पाहतो. त्याला जलीं स्थलीं काष्ठीं पाषाणीं ईश्वराची लीला दिसते. सर्व वाङ्मय, सर्व गीतें व काव्यें आणि सर्व प्रकारचा विचारविनिमय यांचें अंतिम ध्येय ईश्वरपूजा आहे असें मान-णारा सदैव शांत व निरुपाधिक असतो. सर्व लाभाचें सार्थक दानाच्या योगानें होतें. सर्व प्राप्तीची सांगता त्यागामुळें होते असें ज्या महात्म्यांनीं जाणलें त्यांचें चित्त निश्चिंत व निश्चल झालें.

**अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघीच दान दिली भूमि ॥**
**अवघाचि काळ दिनरात्रशुद्धि । साधियेली विधि पर्वकाळ ॥**

अवघींच तीर्थें व्रतें केले याग । अवघेंचि सांग झालें कर्म ॥
अवघेंचि फळ आलें आम्हां हाता । अवघेंचि अनंता समर्पिलें ॥
तुका म्हणे आतां बोलों अबोलणें । कायावाचामनें उरलों नाहीं ॥

याप्रमाणें ज्यांना सर्वत्र ईश्वर व सर्व ठिकाणीं ईश्वराचें साम्राज्य दिसतें त्यांस देवानें दिलेल्या देणग्या देवाप्रीत्यर्थ असून त्या पुनः त्यालाच जाऊन पोहोंचतात असें वाटणें साहजिक आहे.

---

## ॥ गीत ९९ ॥

बं.—एका धारे तुमिइ आकाश तुमि नीड ( ई. ६७ )

असती तूं जेवीं विस्तीर्ण आकाश । तेवीं तूं निवास पांखरांचा ॥
अत्युत्कट प्रेम विहंगमागृहीं । पूर्ण व्यक्त होई क्षणोक्षणीं ॥
नानागंध नाना गीत नाना वर्ण । यांहीं मुग्ध प्राण वेष्टिसी तूं ॥
दक्षिण करांत हेम मंजुषेतें । घेवोनीयां येते उषा देवी ॥
आणिली तियेनें माधुर्याची माला । ललाटीं वाह्याला भूमातेच्या ॥
मग संध्यादेवी नम्र मुखें येत । धेनुशून्य पथ आक्रमोनी ॥
चिह्नहीन ऐशा मार्गे ये चालत । करीं विलसत हेम पात्र ॥
प्रतीची दिशेच्या सागरांतुनीयां । आणिलें पात्रीं या शांतिजल ॥
पक्षिगृहाहूनि थोर तूं गगन । कराया उड्डाण आत्मारामा ॥
विहार कराया क्षेत्र हें अपार । अंत नसे पार संचारासी ॥
दिव्य निष्कलंक शुभ्रतम प्रभा । व्यापितसे नभा सर्व ठायीं ॥
तेथ नाहीं रात्री, नाहीं दिन, वाणी । वर्ण, जन, प्राणी नसे गंध ॥

भावार्थ—हे परमात्मन्! अखिल विश्वाला व्यापून असणारा तूं माझें लहान शरीरही व्यापून आहेस. किंवा या जीवात्म्याचें संचारस्थान व निवास किंवा आश्रय तूंच आहेस. या देहामध्यें जीवरूपी विहंगमाला तुझ्या प्रेमामुळें रंग, ध्वनि व गंध यांचें वेष्टन प्राप्त झालें आहे. उषादेवी ( प्रभात समयीं ) भूमातेस अलंकृत करण्यासाठीं सुवर्ण रश्मींची सुंदर माला हातांतील परडींत घेऊन येते. कांहीं काल लोटल्यावर संध्यादेवी शांतिजलानें भूमातेला शांत करते. त्या वेळीं कुरणांत चारा खाण्यासाठीं गेलेल्या गुरांचीं खिल्लारें घरीं येतात आणि सर्व प्रदेश निर्जन होतो. ( याप्रमाणें दिवस व रात्र किंवा प्रकाश व अंधःकार ह्या अवस्था या भू-

तलावर प्राप्त होतात. परंतु ) आत्म्याला भराऱ्या मारण्यासाठीं जें अनंत आकाश पसरलें आहे, तेथें रात्र नाहीं आणि दिवसही नाहीं. ज्याप्रमाणें पक्षाच्या घरट्याहून त्याचें उड्डाण करण्याचें नभोमंडल अत्यंत विशाल आहे, त्याचप्रमाणें आत्म्याचें वासस्थान असलेल्या देहाहून हें विश्व अत्यंत विशाल आहे. या ब्रह्मांडामध्यें आत्म्याला मनसोक्त भराऱ्या मारतां येतात. या अनंत आकाशांत सदैव निष्कलंक तेज तळपतें. तेथें रात्र, दिवस, वाचा, वर्ण, गंध, जन किंवा प्राणी या नश्वर अवस्थांचा मागमूसहि नाहीं.

**रहस्य**—भगवंतांनीं गीतेंत ( अध्याय १५ ) सांगितलें आहे कीं—

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।**
**मनःषष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥**
**शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥ ८ ॥**
**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।**
**अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥**

**अर्थ**—परमात्म्याचा सनातन अंश जीवलोकीं जीवाचें रूप धारण करितो आणि प्रकृतीमध्यें लीन असलेलीं पांच इंद्रियें आणि मन यांना ओढून घेतो. आणि जेव्हां तो शरीराचा स्वामी शरीर धारण करतो आणि मग शरीराचा त्याग करतो तेव्हां त्या इंद्रियांना आणि मनाला आपल्या संगतीं घेऊन जातो. वारा ज्याप्रमाणें गंधांच्या साठ्यांतून गंध घेऊन जातो तद्वत् तो इंद्रियें आणि मन यांस घेऊन जातो. कान, डोळे, त्वचा, जीभ, नाक आणि मन यांच्या ठायीं वस्ती करून तो शब्दादि विषयांचा उपभोग घेतो.

याप्रमाणें विषयसेवनापासून आनंद पावणाऱ्या जीवात्म्याला मुक्ति प्राप्त झाल्याशिवाय म्हणजे या कायिक बंधनापासून मोकळीक मिळाल्याशिवाय शाश्वत आनंदाची प्राप्ति होत नाहीं. इंद्रियद्वारा प्राप्त होणारे विषयोपभोग नश्वर स्वरूपाचे असल्यामुळें त्यांच्याविषयींची उदासीनता स्वाभाविकपणें जीवात्म्याच्या ठायीं व्यक्त होते. जीवात्मा हा स्वभावतः त्यागी, निष्काम आणि अत्यंत औदार्ययुक्त असतो. त्यामुळें त्याला उच्च विचार व उच्च आचार यांविषयीं सदैव प्रेम असतें. परंतु ज्या परिस्थितींत तो कोंडला गेल्यामुळें गुंतलेला असतो त्या परिस्थितींतून

मोकळा होईपर्यंत कर्मेंद्रियांच्या स्वाधीन होऊन त्याला काल कंठावा लागतो. परंतु त्याला ठाऊक असतें कीं—

**ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तंति भूयः ।**
**तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥**

ज्या स्थानीं गेलेले लोक मागें येत नाहींत तें स्थान शोधून काढूं लागावें आणि ज्या पुराण पुरुषापासून ही पुरातन संसारप्रवृत्ति चालू झाली त्याला शरणागत आहें अशी भावना धरावी. या भावनेनें आत्मोद्धार केल्याशिवाय त्या परम पदाची प्राप्ति होणें शक्य नाहीं. आणि याच पदाला—

**न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ।**
**यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥**

ज्याला प्रकाशित करण्याला सूर्य किंवा चंद्र किंवा अग्नि यांची आवश्यकता नाहीं आणि जेथें गेलेले लोक पुनः येत नाहींत, तें परमेश्वराचें परमधाम म्हणजे उत्कृष्ट पद होय. या पदाची प्राप्ति म्हणजेच सद्गति आहे. तुकोबांनीं आत्मस्थिति जाणून म्हटलें आहे कीं—

**आमचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास ॥**

याप्रमाणें विश्वाकार आत्मा बनल्यावरची स्थिति तुकोबांनीं वर्णिली आहे ती अशी—

**हारपोनि गेली निशी । निद्रा कैसी न देखों ॥**
**नारायणीं वसलें घर । निरंतर आनंद ॥**
**अवघा रुधविला ठाव । नेला वाव मी माझें ॥**

---

## ॥ गीत १०० ॥

बं.—आलो आमार आलो ( इं. ५७ )

**प्रकाशा, अखिल भुवन व्यापका । हृदयतोषका नेत्रदीपा ॥**
**नृत्य हा करीतो प्राणाठायीं माझे । वीणेवरि वाजे हृदयाच्या ॥**
**चेतवी आकाशा वायूसी चालन । देतां हें भुवन हांसतसे ॥**
**प्रकाश-प्रवाहीं पंख पसरोनी । रमती प्रयाणीं पतंग हे ॥**
**उसळतां दिव्य प्रकाशलहरी । मल्लिका मोगरी परी शोभे ॥**
**मेघांवरि प्रभा दिसे हेमापरि । माणिकें भूवरि वर्षीतसे ॥**
**तरुलतांठायीं पर्णोपर्णीं हास्य । पावतें विकास प्रभायोगें ॥**
**सुरनदीतट बुडोनियां जाती । जेधवां वाहाती सुधा-ओघ ॥**

**भावार्थ**—सर्व भुवनाला हा प्रकाश व्यापून आहे. नेत्रांठायीं पाहण्याची शक्ति प्रकाशामुळेंच प्राप्त झाली आहे. मनुष्य व इतर जीवजंतु यांच्या ठायीं प्राणरूपानें प्रकाश नर्तन करीत आहे. अंतःकरणांत अनेक विचारांस चालन देऊन अनेक प्रकारच्या लहरी उत्पन्न करणारा हा प्रकाश महच्चैतन्याचें किरण होय. या विश्वांतील सर्व व्यवहार प्रकाशाच्या योगानें चालला असून त्यामुळें अखिल भुवनाला अप्रतिम सौंदर्य प्राप्त झालें आहे.

**रहस्य**—पंचमहाभूतांच्या योगानें अखिल विश्वाची घटना झाली आहे. त्यांतील अग्नियोतक प्रकाश हें तत्त्व किंवा महाभूत इतरांप्रमाणेंच श्रेष्ठ व उपयुक्त मानिलें आहे. स्थूल दृष्टया या तेजाचा विचार केला तर असें दिसून येईल कीं अनेक अद्भुत चमत्कार या प्रकाशाच्या योगानें घडून येत आहेत. प्रकाशज्ञान व त्याचा उपयोग यामुळें या जगांत क्रांति घडत आहे. आणि मनुष्याच्या बुद्धिसामर्थ्यानें कालेंकरून कोणत्या प्रकारचे शोध मानवी सुखदुःखास कारणीभूत होतील हें सांगणें अशक्य आहे. दुसऱ्या दृष्टीनें या विश्वांतील प्रकाशाचा किंवा तेजाचा विचार केला तर असें दिसून येईल कीं तेज हेंच जगाचें जीवन आहे. तेजोहीनता म्हणजेच मृत्यु होय. चैतन्यरूपी तेजाच्या योगानें या विश्वांतील सर्व वस्तुमात्रामध्यें वृद्धि, उत्साह, सौंदर्य आणि स्नेहाकर्षण या अवस्था प्राप्त होतात. प्रकाशाच्या योगानें अंधःकार नाहींसा होतो व सत्यस्वरूप प्रगट होतें. ज्ञानसूर्याची प्रभा विश्वावर पसरली आणि नेत्रांच्या ठायीं या रविकिरणामुळें सत्यस्वरूपाचें प्रतिबिंब उठलें म्हणजे—

> धवळलें जगदाकार। अंधार तो निरसला॥
> लपों जातां नाहीं ठाव। प्रगट पाहें पसारा॥
> खरियाचा दिवस आला। वाढी बोला न पुरे॥
> तुका म्हणे जीवें साठीं। पडिली मिठी धुरेसी॥

ही धुरेला पडलेली मिठी सुटली आणि अखिल विश्व बाहूंमध्यें आलें म्हणजे त्याचें सत्यस्वरूप प्रकाशाच्या योगानें स्पष्टपणें दिसूं लागतें. अशा रीतीनें उज्ज्वलित प्रकाशानें दीप्तिमंत झालेल्या भुवनामध्यें कुरूपता, अज्ञान, अनीति, अनाचार किंवा असत्य यांचा अंधेर राहणें शक्य नाहीं. चैतन्याची व्यापकता किंवा प्रकाशाचें कार्य व सौंदर्य मनुष्याच्या लक्षांत येत नाहीं म्हणून त्याचे व्यवहार गुप्तपणें चाललेले असतात. या व्यवहाराच्या पायीं असंतोष, द्वेष, मत्सर आणि कलह यांची उत्पत्ति

व वाढ होते. अंतर्राष्ट्रीय किंवा अंतर्देशीय संबंध व व्यवहार अंधारांत न चालतां प्रकाशांत चालल्यास जगांत शांतता नांदूं लागेल. रक्तपात बंद होईल आणि जीवनार्थ कलहाचा तीव्रपणा देखील नाहींसा झाल्यावांचून राहणार नाहीं.

---

## ॥ गीत १०१ ॥

बं.—काशेर वने शून्य नदीर तीरे ( इं. ६४ )

उच्च तृणामाजी शून्य नदीतीरीं । निर्जन भूवरि होतों उभा ॥
तेथ म्यां पाहिली बालिका पुसिलें । आलीस कां बाले सांग येथें ॥
एकली या मार्गीं कोणीकडे जासी । दीप कोठें नेसी झांकोनीयां ॥
गृहीं माझ्या असे अंधार भरला । असें मी एकला देईं दीप ॥
तंव तिनें कृष्ण नेत्र केले वरि । देखे क्षणभरि मजकडे ॥
म्हणे ती बालिका दिन अस्ता जातां । अंधार जगता व्यापील कीं ॥
म्हणोनी मी आल्यें नदीपाशीं पाहीं । दीपातें प्रवाहीं तरंगाया ॥
तृणामाजी उभा राहिलों पहात । तरंगे ती ज्योत निरर्थक ॥
संध्याकाळ झाला अंधार भुवना । व्यापी वाटे मना भीति मोठी ॥
विचारिलें तिज तुझ्या गृहीं बाले । सकल पेटले दीप आतां ॥
मग कोठें जासी दीप हा घेवोनी । दे मजलागोनी दीप तुझा ॥
अंधःकारमय गृह माझें असे । संगें कोणी नसे देईं दीप ॥
माझ्या मुखाकडे कृष्ण नेत्रें पाही । साशंक ती राही क्षणभरी ॥
म्हणे ती अर्पीतें आकाश-प्रदीप । उज्वल अमूप शून्याठायीं ॥
शून्य गगनांत राहिलों पहात । दीप हा पेटत अकारण ॥
अमावास्ये दिनीं मध्यरात्री काळीं । भयानक वेळीं पुसिलें म्यां ॥
बाळे या अंधारीं काय तूं शोधिसी । दीप हृदयाशीं धरोनीयां ॥
देईं मज दीप मद्गृहीं अंधेर । पसरला घोर भयानक ॥
उभी ती राहिली तंव पळभरी । पाहे त्या अंधारीं मजकडे ॥
विचार करोनी सांगे ती मजला । आणिली ही ज्वाला उत्सवार्थ ॥
महद्दीपोत्सवीं दीप मिळवाया । आलें मी या ठायां दीपासह ॥
राहिलों मी क्षुद्र दीप हा पहात । लक्ष दीपीं ज्योत व्यर्थ गेली ॥

**भावार्थ**—एक बालिका एक दीप घेऊन नदीच्या पात्राजवळ जात होती. त्या वेळीं तिला मीं हा दिवा घेऊन जाण्याचें कारण विचारलें. तिनें सांगितलें कीं या जगांत सूर्यास्त होतांच अंधःकार पसरेल. त्या अंधकाराचें निराकरण करण्यासाठीं या दिव्याचा उपयोग करावयाचा आहे. नदींतून हा दिवा तरंगत गेला म्हणजे आसमंतात् प्रदेश प्रकाशमय होईल. त्याचप्रमाणें हा दीप आकाशांगणीं पेटविल्यासही त्याचा योग्य उपयोग होण्याजोगा आहे. (दीपावळीच्या) अमावास्येच्या अंधःकारमय रात्रीच्या वेळीं माझा दिवा महोत्सवांत शोभण्याजोगा आहे. याप्रमाणें दीपाचा विनियोग करणाऱ्या या कन्यकेचा दिवा खरोखर जगाच्या उपयोगीं पडला नाहीं. माझ्या झोंपड्यांत अंधःकार पसरला होता. आणि भयानक रात्रीमुळें मी घाबरलों होतों. तेव्हां माझ्या विनंतीप्रमाणें हा दिवा मला दिला असता तर त्याचा खरोखर उपयोग झाला असता.

**रहस्य**—या विश्वाच्या संसारामध्यें व्यवहार करणारे एकाच मार्गानें किंवा एकच हेतु मनांत धरून कार्य करतात असें नाहीं. बहुजनसमाजाची दृष्टि कार्याच्या उपयुक्ततेवर असते. ही कार्योपयुक्ततेची दृष्टि, त्या कामीं खर्च होणारें सामर्थ्य व प्रतिफल, यांकडे पहात असते. परंतु कांहींच्या मतें फलनिष्पत्ति हेंच कर्माचें अंतिम ध्येय किंवा साध्य नसतें. उदाहरणार्थ गायन, वादन, नृत्य, चित्रकला, अध्यात्मज्ञान इत्यादि विषयांचा अभ्यास करून त्यांमध्यें प्राविण्य संपादन करण्यासाठीं जे लोक काल घालवितात किंवा धनाचा व्यय करतात त्यांचें कार्य सामान्य जनांच्या दृष्टीनें निरर्थक आहे. यावरून त्या कार्याचें महत्त्व नाहीं असें म्हणणें चुकीचें होईल.

दिव्याची ज्योत विस्तीर्ण आकाशांत किंवा भयानक रात्रीच्या वेळीं नदीच्या प्रवाहांत सोडून दिल्यानें जगास प्रकाश प्राप्त होणार नाहीं. यापेक्षां या ज्योतीचा उपयोग एकाद्या दरिद्री मनुष्याच्या झोंपड्यांत केल्यानें तिचा फायदा तत्काल मिळण्याजोगा आहे. परंतु वैयक्तिक सुखदुःखाच्या विचारानें व्यग्र चित्त न होतां ईश्वराच्या दरबारीं स्वमतानुसार सेवाकार्य करणारे जे असतात, त्यांस दोष देण्याचा अधिकार इतरांस तरी कोठून प्राप्त होतो? ज्ञान, द्रव्य, किंवा बल यांचा विनयोग कसा करावा हें ठरविण्यास त्यांची गरज असलेल्या लोकांनीं पुढें यावें यांत स्वार्थपरायणता मात्र व्यक्त होते असें कां म्हणूं नये?

एकाद्या ज्ञानी पुरुषाची महत्त्वाकांक्षा आपलें ज्ञान विश्वांतील जनांच्या उपयोगीं पडावें अशी असते. खरें पहातां या ज्ञानप्रसाराचा परिणाम व्हावा तसा होत

नाहीं. हें जरी खरें आहे तरी आपलें ज्ञान जगांत पसरविण्याचा यत्न करणें हा दोष ठरत नाहीं. या जगांतील आनंदोत्सवांत ज्यानें त्यानें स्वसामर्थ्यानुसार भाग घेण्याजोगा आहे. फलाचें प्रमाण लक्षांत आणून कार्य करणें म्हटलें म्हणजे आपलें कार्यक्षेत्र संकुचित करणें आहे. या प्रकारच्या वर्तनाबद्दल स्वार्थी जग हंसणार. परंतु—

निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ।
मज हेंही तेंही नाहीं । वेगळ दोहींपासूनी ॥
देहभोग भोगें घडे । जें जें जोडे तें बरें ॥
अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुकयाचें ॥

या भावनेनें कार्य केल्यास सर्वच कार्य उपयुक्त आहे असें दिसून येईल.

---

## ॥ गीत १०२ ॥

बं.—वैराग्य साधने मुक्तिसे आमार नय. ( इं. ७३ )

न लाभत मुक्ति वैराग्य-साधनीं । निश्चय हा मनीं झाला माझ्या ॥
महानंदमय असंख्य बंधनीं । लाभे निशिदिनीं मुक्तिस्वाद ॥
मृण्मय या पात्रीं प्रेमें वारंवार । सुधारस धार ओतीसी तूं ॥
नाना वर्ण गंधमय अमृतातें । अविरत मातें देसी प्रभो ॥
लक्ष वर्तिकांतें समस्त संसार । पेटवील थोर त्वज्ज्वालेनें ॥
तुझीया मंदिरीं दीप हे उज्ज्वल । पेटतां होतील दीप्त दिशा ॥
इंद्रियद्वारांतें करोनीया रुद्ध । योगासनी, सिद्ध होई ना मी ॥
दृष्टि, गंध, गान, यांचा जो आनंद । तोची त्वदानंद सेवीन मी ॥
जळेल हा मोह अ नंद-ज्वालेंत । प्रेम होय फलित भक्तीरूपें ॥

**भावार्थ**—वैराग्यसाधनाच्या योगानें किंवा संन्यास घेतल्यानें मुक्ति मिळविणें शक्य नाहीं. या संसारांतील असंख्य बंधनांमध्येंच जो आनंद आहे, त्यापासून मुक्तीचा स्वाद घेतां येण्याजोगा आहे. तूं या मृण्मय पात्रामध्यें किंवा देहामध्यें वारंवार जीवनामृत ओतून मला वर्णगंधादि सुखानुभव घेण्याची ( पुनर्जन्माच्या योगानें ) संधि प्राप्त करून देतोस. हा विश्वांतील संसार तुझ्या तेजानें जो प्रकाशित झालेला आहे त्याच तेजाच्या ज्वालेवर हजारों दिवे पेटवून तुझ्या मंदिरांत समर्पण करतांच दशदिशा प्रकाशमान् होतील. अर्थात् सर्व विश्व दृष्टिगोचर होईल.

योगी होणें किंवा सिद्धी प्राप्त करून घेणें मला नको आहे. शब्द रूप रस गंध इत्यादिकांच्या योगानें प्राप्त होणारा आनंद तुझ्यापासूनच प्राप्त होत आहे असें समजून त्याचा उपभोग घेईन. या आनंदाच्या ज्वालेंत मोहाचा नाश होतांच अंतःकरणांत तुझ्याविषयींचें अत्युत्कट प्रेम प्रकाशित होईल आणि त्याच काळीं भक्तिफलाची प्राप्ति होईल.

**रहस्य—'कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते'** म्हणजे कर्मांचा त्याग करण्यापेक्षां भगवंतावर दृष्टी ठेवून कर्माचरण करणें विशेष बरें असें भगवंतानें अर्जुनास सांगितलें आणि

**ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ।**
**निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥ ५–३ ॥**

अर्थात् संसारांत प्राप्त होणारीं सत्यधर्मप्रणीत सर्व कर्में वेळच्या वेळीं करून तीं भगवंतास अर्पण करणें हा मनुष्याचा श्रेष्ठ धर्म आहे. कर्मत्याग करणें हा कांहीं खरा संन्यास नव्हे. याच मताचा प्रसार संतांनीं केला—

**नको सोडूं अन्न नको सेवूं वन । चिंतीं नारायण सर्व भोगीं ॥**
**नको गुंपो भोगीं नको पडों त्यागीं । लावुनी सरे अंगीं देवाचिया ॥**

या वाणींतील रहस्य हेंच आहे कीं कर्म करावें आणि तें कर्म ईश्वराचें आहे असें मानावें. परंतु कार्यांचा त्याग करून पळून जाऊं नये. या विश्वांतील सौंदर्य, उत्साह आणि आनंद यांचा उपभोग घेण्यासाठींच मनुष्याचा जन्म आहे. परंतु या सर्वांचा उगम परमेश्वर आहे हें विसरतां नये. या विश्वाच्या संसाराचें रहस्य जाणून त्यांतील सुखानुभव घेतांना विश्वाच्या स्वामीविषयीं प्रेमादर बाळगल्यास जीवास संसारांत पाशविमोचन झाल्याचें सुख प्राप्त होईल. अशा प्रकारची मुक्ति संसारांत प्राप्त होते हें जाणून संतांनीं पुनर्जन्माची अपेक्षा केली.

**घेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥**
**हरिनामकीर्तन संतांचें पूजन । घालूं लोटांगण महाद्वारीं ॥**
**आनंदें निर्भर असों भलते ठायीं । सुखदुःखा नाहीं चाड आम्हां ॥**
**आणीक सायास न करीं न धरीं आस । होईन उदास सर्व भावें ॥**
**मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी । होय सांगों तैसी तुका म्हणे ॥**

मोक्षच दासीप्रमाणें राबूं लागल्यावर त्याची मातब्बरी लेखण्यापासून फायदा कोणता ? सर्व धर्मांचें सार म्हटलें म्हणजे वेदांतधर्म आहे आणि वेदांतधर्मांचें

साध्य, ध्येय व साधन बंधविमोचन हें आहे. परंतु कर्मत्याग हें खरें विमोचन नसून कर्मफलत्याग हाच मोक्ष आहे.

मुक्त तो आशंका नाहीं जया अंगीं । बद्ध मोहोसंगीं लज्जा चिंता ॥
सुख पावे शांती धरूनि एकांत । दुःखी तो लोकांत दंभ करी ॥
तुका म्हणे लागे थोडाच विचार । परि हे प्रकार नागविती ॥

हें धर्माचें गूढ समजल्यास प्रपंचांत राहून परमार्थ साधणें शक्य आहे. नामदेवानें देवास सांगितलें कीं—

नलगे तुझी मुक्ति नलगे तुझी भक्ति । मज आहे विश्रांति वेगळीच ॥
माझें मज कळे माझें मज कळे । माझें मज कळे प्रेमसुख ॥
न करीं तुझें ध्यान नलगे ब्रह्मज्ञान । माझी आहे खूण वेगळीच ॥
नकरीं तुझी स्तुति न वाखाणी कीर्ति । धरिलीसे ते युक्ति वेगळीचि ॥
नकरीं काया क्लेश इंद्रियां निरोध । माझा आहे बोध वेगळाचि ॥
नामा म्हणे नाम गाईन निर्विकल्प । येसी आपोआप गवसीत ॥

अर्थात् ईश्वराचें चिंतन, ईश्वराविषयीं प्रेम व प्रेमजन्य भक्ति, सकल कार्यांचें ईश्वर-चरणीं समर्पण म्हणजेच मुक्ति किंवा मोक्ष आहे.

---

## ॥ गीत १०३ ॥

बं.—विधि जे दिन क्षांत दिलेन ( इं. ७८ )

ज्या दिनीं विधीनें सृष्टि पूर्ण केली । नभीं प्रकाशली तारावली ॥
नीलांबरीं देव सभा भरोनीयां । नूतन जगा या निरखिती ॥
देव वर्णिताति काय हा आनंद । काय मंत्र छंद किती रम्य ॥
किती परिपूर्ण चित्र हें विश्वाचें । ग्रहचंद्ररविंचें निर्मियेलें ॥
गर्जत उठला एक अकस्मात । म्हणे प्रकाशांत व्यंग आलें ॥
ज्योतिर्मालेमाजी एक तारा गेला । केव्हां हा तुटला गेला कोठें ॥
ऐसें सांगे तदा वीणातंतु तुटे । गायनही खुंटे सभेमाजी ॥
कोठें गेला तारा म्हणती सकल । अत्यंत उज्ज्वल हाचि स्वर्गीं ॥
भूषण स्वर्गींचा थोर सर्वांहूनि । तारका तुटोनी गेला कैसा ॥

त्या दिनापासोनी नष्ट ताऱ्यासाठीं । सकल जगतीं चाले शोध ॥
आनंदाचें गेलें एक हें निधान । ऐसें रात्रंदिन म्हणताति ॥
तृप्ति नसे कोणा विश्रांतीहि नसे । शोध चाललासे सर्व ठायीं ॥
सकल म्हणती पाहिजे तो एक । अमुल्य सुरेख सर्वांहूनि ॥
गेला तो म्हणोनी चाले आक्रंदन । सकल भुवन शोक वाही ॥
तारागण शुद्ध निशाकालीं शांत । म्हणती हांसत काय झालें ॥
व्यर्थ कासयासि शोध चाललासे । परिपूर्ण असे विश्व सारें ॥

**भावार्थ**—ज्या दिवशीं विश्वकर्म्यांनें या विश्वाच्या रचनेचें कार्य संपविलें त्या दिवशीं देवांची सभा भरली आणि या जगाकडे पाहून सर्वांनीं आनंद व्यक्त केला. ग्रह, चंद्र, सूर्य इत्यादिकांनीं विभूषित अशा या विश्वाची सर्वांनीं तारीफ केली. इतक्यांत एका सभासदानें उठून सांगितलें कीं एक दैदीप्यमान तारा नाहींसा झाला आहे. यामुळें या विश्वाच्या सौंदर्यांत उणीव उत्पन्न झाली आहे. असें म्हणतांच सर्व सभासद "तारा हरपला, तारा हरपला" म्हणून आक्रोश करूं लागले. हा एकच तारा स्वर्गाचें भूषण होता, तो गेल्यामुळें स्वर्गाची शोभाच नाहींशी झाली असें सर्वांचें मत पडलें. या तुटलेल्या ताऱ्याच्या शोधासाठीं अहर्निश धडपड चालली आहे. खरें पाहतां तारा आहे तसाच आहे. सौंदर्यांत कोणत्याही प्रकारची उणीव नाहीं. तथापि गैरसमजुतीनें भलत्याच मार्गानें सर्वजण हें सौंदर्याचें निधान शोधून काढण्याच्या मार्गाला लागले आहेत. आणि या फंदांत यांच्या आयुष्याचा व शक्तीचा नाश होत आहे.

**रहस्य**—या जगांतील सर्व प्रकारच्या सुखांची प्राप्ति झाली तरी मनुष्याला कोठें ना कोठें उणीव भासतच असते. समर्थांनीं मनास विचारलें कीं—

**जगीं सर्वसूखी असा कोण आहे । विचारी मना तूंचि शोधोनि पाहें ॥**

अर्थात् सर्वपरीनें सौख्योपभोग घेणारा या जगांत कोणी नाहीं. आणि सुखांत उणेपणा आहे ही समजूत मुळीं दुःखास कारणीभूत होत आहे. आमच्या दुःखाचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे असमाधान—वृत्ति किंवा अतृप्ति हें आहे. ही मनोवृत्ति जोंपर्यंत अंतःकरणांत चलबिचल करीत आहे तोंपर्यंत जीव त्रासलेला व कष्टी असावयाचा. ईश्वरदत्त देणग्यांचा आवश्यक तितका उपभोग घेणारे सदैव समाधानवृत्तीनें काल कंठितात. आपणास कशाची उणीव आहे या गोष्टीचें चिंतन न करतां आपणास ईश्वरकृपेनें काय प्राप्त झालें आहे याकडेच ते पहातात. आपण

कोणत्या बाबतींत दुःखी आहों या गोष्टीचा विचार न करतां, जगांतील अनेक दुःखी लोकांपेक्षां आपण किती सुखी आहों हें जाणण्याचा यत्न करणें हीच आनंद-प्राप्तीची गुरुकिल्ली आहे. काल्पनिक सुखांच्या विचारामुळें काल्पनिक दुःखें उत्पन्न होऊन प्राप्त सुखाचाहि नाश होतो.

**हारपल्याची नका चिन्तीं । धरूं खंती वायांच ॥**
**पावलें तें म्हणा देवा । सहज सेवा या नांव ॥**
**होणार तें तें भोगें घडे । लाभ जोडे संकल्पें ॥**
**तुका म्हणे मोकळें मन । अवघें पुण्य या नांवें ॥**

गेलें तें जावयाचेंच आणि प्राप्त झालें तेंही प्राप्त होण्याला योग्य आणि भोगण्या-लायक आहे असें मानल्यास दुःखाचा तीव्रपणा नष्ट झाल्यावांचून राहणार नाहीं. सुख जवळ असून त्याची ओळख नसतां तें हातचें गेलें म्हणून हळहळणारे सदैव कष्टीच असतात.

**सुख पहातां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥**

कितीही सुख प्राप्त झालें तरी तें तिलप्राय अत्यल्प आणि अत्यल्प दुःख झालें तरी तें पर्वतप्राय मानण्याची तऱ्हा बदलल्याशिवाय मनास शांतता प्राप्त होणार नाहीं.

---

## ॥ गीत १०४ ॥

बं.—ओ गो मौन ना जदिक ओ. ( इं. १९

**मौन त्वां धरीलें गोष्टी न सांगसी । मौन हें मानसीं साहीन मी ॥**
**स्तब्ध वाट पाही कष्टत रजनी । दीप पेटवोनि तारकांचे ॥**
**धरोनीयां धीर नम्रत्वें वांकोनी । अंधकारांतूनि पार पडे ॥**
**अंधार जावोनी येतां सुप्रभात । वाणी आकाशांत उमटेल ॥**
**वाणीचे सुरम्य ओघ वाहतील । मौन तें उरेल मग कैंचें ॥**
**तव रम्य वाणी माझे पक्षि गानीं । प्रेमें वासस्थानीं बोलतील ॥**
**माझ्या वनलतांवरील सुमनें । तुझ्या रम्य गानें फुलतील ॥**

**भावार्थ**—भगवंता, तुंवा मौन कां धरिलें ? तूं माझ्याशीं कां बोलत नाहींस ? बोलत नाहींस ना ? ज्याप्रमाणें बिचारी रजनी देवी ( रात्र ) तारांचा दिवा पेटवून अंधःकारांत प्रकाशाची वाट पहात जागत बसते, तद्वत् मीदेखील प्रभात

होण्याची वाट पहात बसेन. प्रभात होतांच तुझी रम्य वाणी प्रकाशाच्या रूपानें प्रगट होईल, सर्वत्र या वाणीचा ओघ दृष्टीस पडेल. तुझी वाणी माझ्या पक्ष्यांच्या मुखांतून बाहेर पडेल आणि लतांवरील सुमनें तुझ्या गानाच्या योगानें प्रफुल्लित होतील. मग तर तुझें मौन राहणार नाहीं ना?

**रहस्य**—संकटसमय प्राप्त होण्याचें कारण म्हटलें म्हणजे भगवत्कृपेचा अभाव आहे असें भाविक लोक समजतात. ईशचिंतनाच्या योगानें मनाला स्वास्थ्य प्राप्त होत असून दुःखाचे शल्य बोथट होतात. भगवद्भजन व भगवत्-प्रार्थना यांपासून आत्म्याठायीं दैविक सामर्थ्य उत्पन्न होतें, आणि या बलाचा परिपोष केल्यास त्यायोगें संकटांतून पार पडतां येतें. रात्रीमागून प्रभातसमय ज्याप्रमाणें प्राप्त होतो त्याप्रमाणें निराशा व कष्ट यांच्यामागून आशा व सौख्य यांचा प्रसाद ईशकृपेनें प्राप्त झाल्यावांचून राहात नाहीं असें मानणारे सदैव शांतचित्त व स्वकर्मरत असतात. अर्थात् ईश्वराचें मौन म्हणजे त्याच्या कृपेचा अभाव ही चिरकाल टिकणारी स्थिति नाहीं असेंच खऱ्या भक्ताला वाटतें.

**न मे भक्तः प्रणश्यति ।**

" माझ्या भक्ताचा कधीं नाश होत नाहीं " या भगवद्वाणीवर संपूर्ण विश्वास ठेवणारे ऐहिक व पारमार्थिक दृष्ट्या विजयी होतात. शांत व गंभीर समुद्रावर ज्याप्रमाणें वाऱ्याच्या झुळकेबरोबर लहान लाटा उद्भवतात त्याप्रमाणें आधिव्याधींच्या तडाक्यांत सांपडलेल्या भाविक मनुष्याच्या वृत्तींत देखील चलबिचल झाल्याशिवाय राहात नाहीं. अशा वेळीं ईश्वर आपणास सोडून गेला कीं काय या भीतीनें तो त्याची करुणा भाकितो.

**मौन कां धरिलें विश्वाच्या जीवना । उत्तर वचना देईं माझ्या ॥**
**तूं माझें संचित तूंचि पूर्वपुण्य । तूं माझें प्राचीत पांडुरंगा ॥**
**तूं माझें सत्कर्म तूं माझा स्वधर्म । तूंचि नित्यनेम नारायण ॥**
**कृपावचनाची वाट पहातसें । करूणा वोरसें बोल कांहीं ॥**
**तुका म्हणे प्रेमळाच्या प्रियोत्तमा । बोल सर्वोत्तमा मजसवें ॥**

या संसाराच्या कार्यांत पाठीराखा, मार्गदर्शक, कार्यप्रेरक आणि यशदाता परमेश्वर आहे असेंच भाविक मनुष्याला वाटतें. त्यासाठीं भगवंतानें मौन टाकून द्यावें आणि सन्मार्ग दाखवावा, सत्कार्याविषयीं प्रेरणा करावी आणि यश द्यावें म्हणून तो भगवंताची सदैव याचना करतो. अशा भक्ताला शेवटीं सुख प्राप्त झाल्यावांचून राहात नाहीं.

## ॥ गीत १०५ ॥

बं.—एखनो घोर भाडे ना तोर जे ( इं. ५५ )

अजूनि आलस्य तुज न सोडितें । निद्रा ही दिसते नयनांत ॥
वनीं कंटकांच्या कुसुम विकासे । ठाऊक का नसे तुजलागीं ॥
जाग्रत हो वेगें उठीं निद्रेंतूनि । समय हातूनि जाऊं न दे ॥
दुष्कर मार्गाच्या शेवटीं बैसला । माझा बंधु भला एकलाची ॥
नको तयाची बा करूं तूं वंचना । उघडीं नयना उठीं उठीं ॥
उग्र रवितापें नभ कंपे जरी । शुष्क तूं अंतरीं नको होऊं ॥
तप्त वालुकेच्या योगें सर्व दिशा । जरी तीव्र तृषाकुल झाल्या ॥
तरी अंतर्यामीं विवेकें तूं पाहीं । आनंद का नाहीं व्यापियेला ॥
मार्गीं चालतांना पाउलो पाउलीं । वाजते मुरली करुणेची ॥
मधुस्वरें वाजे तुज हांका मारी । ऊठ तूं सत्वरीं उठीं उठीं ॥

**भावार्थ**—अद्यापि तुला आलस्य सोडीत नाहीं. तुझ्या डोळ्यांवर अजून झोंपेचा अंमल आहे. कांट्यांच्या वनामध्यें उत्तम प्रकारचें पुष्प विकसित होतें, हें तुला ठाऊक नाहीं काय? ऊठ, जागा हो. ही संधि व्यर्थ घालवूं नकोस. मार्ग बिकट आहे खरा. परंतु त्याच्या शेवटीं माझा मित्र एकटाच बसला आहे. त्याला फसवूं नकोस. ऊठ, डोळे उघड. ज्याप्रमाणें सूर्याच्या उग्र तापामुळें आकाश कंप पावतें आणि दशदिशा तृषेनें व्याकुळ होतात तद्वत् तुझें अंतःकरण तप्त आणि शुष्क झालें असेल, तर विवेकदृष्टीनें पहा. तुझ्या अंतर्यामींच तुला आनंदाचा निधि प्राप्त होईल. मार्गक्रमण करीत असतां मुरलींतून करुणस्वर निघणें स्वाभाविक आहे. परंतु ( मार्गाच्या शेवटीं बसलेला माझा बंधु विणा वाजवीत आहे तिच्यांतून ) मधुरस्वर निघत आहे. तो तुला बोलवीत आहे. ऊठ, लवकर उठून मार्गक्रमण करूं लाग.

**रहस्य**—प्रपंच चालवीत असतां सदैव सुख प्राप्त होणें शक्य नाहीं. कारण संसारांत अनेकांशीं संबंध पोहोंचतो. प्रापंचिकांचीं सुखदुःखें जगताच्या संसाराच्या सुखदुःखांवर अवलंबून आहेत असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. अत्यंत रानटी स्थितींत असतां मनुष्याचा व्यवहार फारच लहान क्षेत्रांत चालतो. परंतु ज्ञान व बुद्धि यांच्या बलावर मनुष्याच्या प्रपंचाची वाढ होत गेली म्हणजे तो एकदेशीय राहूं शकत नाहीं. तो सर्व जगताचा एक अवयव बनतो आणि जगाच्या सुख-

दुःखांची थोड्याअधिक प्रमाणानें त्याला बाधा होते. अशा रीतीनें बाधा होणें जर अपरिहार्य आहे तर जी चुकवितां येत नाहीं त्या स्थितीबद्दल कष्टी होण्यापासून फायदा कोणता ? सर्वांत श्रेष्ठ मार्ग म्हटला म्हणजे स्वतःच्या सामर्थ्यांची मर्यादा जाणणें हाच आहे. जो मर्यादा जाणतो तो अतिक्रम करून सृष्टिनियमांचें उल्लंघन केल्याच्या दोषास किंवा शिक्षेस पात्र होत नाहीं. मनुष्यप्राण्याची एकंदर धडपड केवळ मानसिक आनंदाची प्राप्ति करून घ्यावी एतदर्थ आहे. कायिक शक्ति वाढविणें, संतति व संपत्ति यांचा विपुल लाभ करून घेणें, अनेक प्रकारच्या भोगांच्या योगानें पंचेंद्रियांस सुखी करणें वगैरे जे मानवी व्यवहार चालतात त्यांचें अंतिम ध्येय व साध्य मानसिक शांति हें आहे. या शांतीचा लाभ होण्यासाठीं ज्या साधनांचा उपयोग करावयाचा तीं साधनेंच जर सदोष असतील तर हें शांतिसुख मिळणें शक्य नाहीं. त्यासाठीं संसारपथानें जात असतां प्राप्त होणाऱ्या लहान मोठ्या संकटांच्या योगानें घाबरून न जातां आपली दृष्टि या पथाच्या शेवटीं असणाऱ्या भगवंताकडे लावली पाहिजे. या संसारपथाच्या योगानेंच आपणास भगवत्कृपेचा लाभ होऊन मनःस्वास्थ्य प्राप्त होईल असा दृढ विश्वास धरला पाहिजे. सर्व प्रकारचा व्यवहार चालवीत असतां वृत्ति ठेवावयाची ती अशी कीं—

हरुष आनंदाचा । घोष करा हरिनामाचा ।
कोण हा दैवाचा । भाग पावे येथील ॥ १ ॥
पुण्य पाहिजे बहुत । जन्मांतरींचें संचित ।
होईल करीत । आला अधिकारी तो ॥ २ ॥
काय पाहातां हे भाई । हरुषें नाचा धरा घाई ।
पोटभरी कांहीं । घेतां उरी न ठेवा ॥ ३ ॥
जें सुख दृष्टि आहे । तेंच अंतरीं जो लाहे ।
तुका म्हणे काय । कळिकाळ तें बापुडें ॥ ४ ॥

याप्रमाणें अखिल सृष्टीमध्यें जें सुख, जो उल्हास आणि जें सौंदर्य आहे त्यांचा अंतर्यामीं उपभोग घेणारा सदैव सुखी, आणि उल्हासयुक्त असतो.

---

## ॥ गीत १०६ ॥

बं.—पारबि ना कि योग दिते एइ छन्देरे ॥ इं. ७० ॥

साऱ्या त्रिभुवनीं भरला आनंद । नृत्य ताल छंद चालतसे ॥
ऐशा या आनंदीं एकतानतेनें । समरस होणें असाध्य कां ॥
आनंदाच्या तळीं जाईं येईं वरि । भंग नानापरि होऊंदे रे ॥
दश दिशांमाजीं आकाशीं सुंदर । मृत्युवीणा-स्वर ऐकेना कां ॥
शशिसूर्यतारा यांतही सुस्वर । निघे हा मधुर आनंदाचा ॥
धावें ठायीं ठायीं आनंदाची ज्वाला । पेटवी अग्नीला आनंदाच्या ॥
गीताचे सुस्वर वेड लाविताति । कोठोनी कां येती नकळे तें ॥
गति ही थोपेना मागुति वळेना । बांधितां येईना विलक्षण ॥
आनंदाची लूट ब्रह्मांडीं चालली । आनंदीं शोधिली मुक्ति जनीं ॥
चराचर सारें आनंदीं गुंतलें । नित्य अनुसरलें आनंदातें ॥
याची महानंदें करितां चरणपात । हांसत नाचत येत ऋतु ॥
नाना वर्ण गान मधुर परिमल । यांहीं धरातल बुडविती ॥
आनंद विस्तारे आनंद हा सरे । आनंद तो मरे आनंदींच ॥

**भावार्थ**—सर्व विश्वाच्या ठायीं आनंद भरला असून रात्रंदिवस या आनंदाचें नृत्य आणि गान चाललें आहे. अशा या आनंदांत मिळून जा आणि अंतर्बाह्य आनंदमूर्ति हो. या जगामध्यें उत्पन्न झालेल्या सर्व पदार्थांस, शशिसूर्यादिकांस देखील, नाश हा आहेच. परंतु या नाश होण्याच्या अवस्थेंत देखील आनंद भरला आहे. ज्याप्रमाणें वडवाग्नीची ज्वाळा एकसारखी धांवत असते आणि ती मार्गे वळत नाहीं, थांबत नाहीं किंवा थोपवितांहि येत नाहीं, त्याप्रमाणें या विश्वांत जो आनंदाचा प्रवाह चालला आहे तो अव्याहत वहातच आहे. सृष्टींतील सर्व प्रकारच्या स्थित्यंतरास कारणीभूत हाच आनंद आहे. असा हा आनंद विश्वामध्यें पसरला आहे आणि याची उत्पत्ति, याचा अंत आणि व्यय आनंदांतच आहे.

**रहस्य**—तैत्तिरीयोपनिषदांत असें सांगितलें आहे कीं—

आनंदाध्द्येव खल्विमानि भूतानि जायन्ते ॥
आनंदेन जातानि जीवन्ति । आनंदं प्रयन्त्यभिसंविशन्ति ॥

म्हणजे आनंदापासून हे सर्व प्राणी उत्पन्न होतात. उत्पन्न झाल्यावर आनंदाच्या योगानें जगतात आणि शेवटीं आनंदाप्रत जातात आणि आनंदामध्यें लय पावतात.

उत्साह, गति आणि सौंदर्य यांच्या योगानें विश्वामध्यें आनंद व्यक्त होतो. उत्पत्तीस आणि अस्तित्वास आनंद कारणीभूत आहे, हें त्रिकालाबाधित सत्य जाणणें म्हणजे जगाचें रहस्य जाणणें आहे. परंतु विकारवश मनाला या विश्वव्यापी आनंदाची ओळख पटत नाहीं. म्हणून तें सदैव व्यथित असतें. क्षणभंगुर सुखाच्या कल्पनांस बळी पडणाऱ्या मनाला शाश्वत सुखाची व तज्जन्य शाश्वत आनंदाची कल्पना होत नाहीं. ज्यानें या विश्वाचें उगम स्थान जाणलें, त्याला आनंदाचा बीजमंत्र प्राप्त झाला असें म्हणतां येईल.

**यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह ॥**
**आनंदं ब्रह्मणो विद्वान् । न बिभेति कुतश्चन ॥**

ज्याचा आनंद प्राप्त न होतां मनाप्रमाणें वाणी देखील ज्या ब्रह्मापासून निवृत्त होते, त्या ब्रह्माचा साक्षात्काररूपी आनंद जो जाणतो त्याला कसलेंही भय रहात नाहीं. या अभयाची प्राप्ति म्हणजेच ब्रह्मानंदप्राप्ति आहे. हा महदानंद ज्यांनीं प्राप्त करून घेतला ते अभय झाले. त्यांना या विश्वामध्यें भयाचें कारण राहिलें नाहीं. आनंदमग्न जीवात्म्याला यावयाचा अनुभव तुकोबांनीं वर्णिला आहे तो असा—

**आनंदाचे डोहीं आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचें ॥**

आणि हा आनंद अखिल विश्वामध्यें भरून राहिला आहे असा अनुभव संतांस आला म्हणून त्यांनीं जाहीर केलें आहे कीं—

**आसन शयन भोजन गोविंदें । भरलें आनंदें त्रिभुवन ॥**

या प्रकारचा त्रिभुवनांतील आनंद अंतर्यामीं भरून जातो.

**आनंदाच्या कोटी । सांठविल्या आम्हां पोटीं ॥**
**प्रेम चालला प्रवाहो । नाम ओघ लवलाहो ॥**
**अखंड खंडेना जीवन । रामकृष्ण नारायण ॥**
**थडी आहिक्य परत्र । तुका म्हणे सम तीर ॥**

जगाशीं प्रेमैक्य पावलेल्या जीवन्मुक्ताला इह आणि पर हा भेद रहात नाहीं. त्याला सर्वत्र आनंदी आनंद दिसतो.

---

## ॥ गीत १०७ ॥

बं—राजार मत वेशे तुमि साजा ओ जे शिशुरे ( इं. ८ )

राजपुत्रापरि शिशु सजविलें । तया भूषविलें रत्नहारें ॥
वस्त्रभूषणांचा भार हा शिशूला । नसे खेळायाला त्या आनंद ॥
सुंदर प्रावणें होतील मलीन । कोणी आभरण चोरितील ॥
भीतीनें या दूरीं राहे तो बालक । जनासंगें सुख न लाभे त्या ॥
आई कां घालिशी शिशुअंगावरि । राजपुत्रापरि रत्नमाला ॥
काढीं हीं भूषणें उघडीं तूं द्वार । जाऊं दे बाहेर मार्गावरि ॥
रौद्रवायुमाजि हर्षें धूलीकेली । खेळोनीयां धूलि उडवूं दे ॥
जेथ रंगताहे विश्वजन मेळा । नव्या नव्या खेळां तेथ खेळो ॥
चहूंकडे वाजे वाद्य मनोहर । सहस्र सुस्वर ऐकूं येती ॥
तेथ जाया नसे जरी अधिकार । रत्नाचे ते हार कासया ते ॥

**भावार्थ**—एकाद्या राजपुत्राला ज्याप्रमाणें अलंकारादिकांनीं सजवितात त्याप्रमाणें वस्त्रभूषणांनीं सजविलेल्या बाळकाला मोकळेपणानें खेळण्यासाठीं घराबाहेर जाणें शक्य नाहीं. कोणी आभरणें चोरून नेतील किंवा अंगावरील मौल्यवान् पोषाख मलीन होईल या भीतीनें मातापितर आपल्या बालकाला लोकांच्या समुदायामध्यें जाऊं देत नाहींत. हे ( बालकाच्या ) आई, तुझ्या या शिशूच्या अंगावर हे मौल्यवान् वस्त्रालंकार घातले आहेत त्यांमुळें त्याला मोकळेपणानें खेळतां येत नाहीं. अलंकार कोणी काढून घेतील किंवा पोषाख धुळींत मलीन होईल म्हणून हा बालक घराबाहेर जात नाहीं. त्याचीं हीं बंधनें काढून टाक म्हणजे तो विश्वामध्यें जनांशीं मिळून मिसळून जाईल. आणि खेळांत चूर होईल. विश्वांतील उत्साहांत सामील होण्याच्या कामीं अडथळा आणणारा पोषाख किंवा अलंकार काय कामाचे ?

**रहस्य**—लहान आणि मोठा असा कृत्रिम भेद या मानवी संसारांत उत्पन्न झाला आहे. राव आणि रंक या जणूं काय दोन भिन्न मानव जाती आहेत अशा रीतीनें सर्व व्यवहार चालतो. त्यामुळें सुखदुःखाची विषमता सर्वत्र दृग्गोचर होते. सत्यास स्मरून विचार केला असतां असें दिसून येईल कीं मनुष्य मनुष्यामध्यें उच्चनीचपणाचा भेद मानणें हें ईश्वरी नियमाच्या विरुद्ध आहे. हा भेद न मानणें म्हणजे व्यवहारांतील दुःखास कारणीभूत होणारें वैषम्य काढून टाकणें आहे. जगतामध्यें लहानांस आणि मोठ्यांस खेळ खेळावयाचा आहे. हा खेळ शांततामय

असो किंवा युद्धोत्साहयुक्त असो. तो खेळाप्रमाणें मन गुंतविण्याचें एक साधन असून तत्कालीं हर्ष किंवा दुःख देणारा आहे. हा खेळ सुखकारक व यशस्वी व्हावा असें ज्यांस वाटतें, त्यांनीं खेळगड्यांबरोबर समानतेनें मिळून मिसळून त्यांच्यांत एक जीव व्हावयास पाहिजे. जेथें उच्चनीचपणाच्या भेसूर कल्पना कार्यास चालन देतात तेथें खेळ खेळणारांचीं मनें समरस होणार नाहींत. यासाठीं ही भेदबुद्धि काढून टाकून सर्वांबरोबर कर्मधूलिक्रीडा खेळण्यास सज्ज झालें पाहिजे.

**उंचनीच कांहीं नेणें भगवंत। तिष्ठे भाव भक्ति देखोनीयां ॥**

या विश्वाच्या ठायीं जीं कार्यें घडतात त्यांचें श्रेय धनिकांसच आहे असें नाहीं. अत्यंत क्षुद्र मानलेल्या व्यक्तींच्या शक्तीचा देखील अशा कार्याप्रीत्यर्थ विनयोग झालेला असतो. एकाद्या राजानें उंच बांध्याचे लोक तेवढेच युद्धोपयोगी किंवा राज्यकारभाराच्या कामीं लायक आहेत असें म्हणणें हास्यास्पद होईल. बुद्धिमत्ता, ज्ञान, दूरदर्शीपणा, स्वार्थत्याग इत्यादि गुण दीन दुबळे मानलेल्या लोकांतही असतात. विश्वांतील खेळ खेळण्यास असे दीन दुबळेदेखील लायक आहेत. भगवंताचें कार्य करण्यासाठीं हा जन्म आहे असें मानल्यास या कार्यास लावण्याचा आणि शक्तीप्रमाणें कार्य नेमून देण्याचा अधिकार त्यासच पोहोंचतो—

**उंचनीच कैसी पाईकाची ओळी। कोण गांढे बळी निवडिले ॥**
**स्वामिकार्जीं एक सर्वस्वें तत्पर। एक ते कुचर आशाबद्ध ॥**
**प्रसंगावांचूनी आणिती आविर्भाव। पाईक तो नांव मिरवी वांयां ॥**
**गणतीचे एक उंच नीच फार। तयांमध्यें शूर विरळा थोडे ॥**
**तुका म्हणे स्वामी जाणें त्यांचा मान। पाईक पाहोन मोल करी ॥**

मिथ्या गर्व मानण्यापासून ऐहिक किंवा पारमार्थिक सुख प्राप्त होत नाहीं. या गोष्टीचा अनुभव व्यक्तींस व राष्ट्रांस सारखाच आला आहे. म्हणून ज्या थोरपणाच्या अहंभावनेमुळें आत्मनाश होतो तें थोरपण नको अशी याचना साधुसंतांनीं केली.

**कोठें देवा आलें अंगा थोरपण। बरें होतें दीन होतों तरी ॥**

याप्रकारची दीन स्थिति जेव्हां आत्म्याला आवडूं लागते तेव्हांच तो आत्मा विश्वांतील आनंद सेवन करण्यास समर्थ होतो. अलंकार आणि उत्तम वस्त्रें यांचा त्याग करून नम्र वृत्तीनें या विश्वांतील महदानंदांत भाग घेण्यास येणाऱ्या मानवांस खरा आनंद व खरें सुख लाभतें. दंभ आणि दर्प यांच्याशीं सहवास असेपर्यंत हें सुख प्राप्त होणार नाहीं.

## ॥ गीत १०८ ॥

बं.—हे रि अहरह तोमारि विरह ( इं. ८४ )

**अहर्निश तुझ्या विरहाचि व्यथा । आक्रमी जगता सर्व ठायीं ॥**
**विरह विराजे गिरींत काननीं । सागरीं गगनीं नाना रूपें ॥**
**तारांतूनि मूक भावें निशाकालीं । दुःख हें न्याहाळी विरहाचें ॥**
**जंव मेघधारा वर्षति श्रावणीं । वियोग हा गानीं प्रगटतो ॥**
**तरुवरांमाजी पल्लवांचे दलीं । दिसे बिंदुजलीं विरह हा ॥**
**चराचरींच्या या विरहवेदना । करिती वासना, प्रेम, दृढ ॥**
**सुख-दुःख-कार्यीं नित्य घरोघरीं । उसळे लहरी विरहाची ॥**
**विरह जीवांना उदास करितो । त्यांतुनी वहातो गानस्वर ॥**
**निर्झर जसा ये उचंबळोनियां । विरहांतुनीयां जीविताच्या ॥**
**तुझाही विरह उचंबळे त्यातें । येतसे भरतें अमृतत्वा ॥**

**भावार्थ**—हे परमात्मन्, तुझा वियोग घडल्यापासून या जीवात्म्याला जी विरहव्यथा होत आहे त्या व्यथेचीं चिन्हें या विश्वामध्यें सर्व ठिकाणीं दृष्टीस पडतात. या विरहामुळें या जगाला उदासीनता प्राप्त झाली आहे. पर्वत, अरण्य, समुद्र किंवा आकाश यांच्याकडे पहातां तुझ्या वियोगाची विशेष आठवण होते. आणि नाना प्रकारचे कल्पनातरंग दृष्टीसमोर उठतात. रात्रीच्या वेळीं तारकांकडे पाहिलें किंवा श्रावणमासीं मेघधारांमुळें उत्पन्न होणारा विरहगीताप्रमाणें करुणापर स्वर कानीं आला म्हणजे तुझा विरह असह्य होतो. घरोघरीं सुखदुःखाच्या वेदनांस कारण तरी हा तुझा विरहच आहे. तुझा विरह झाला नसता ( अर्थात् जीवात्म्यानें आत्मस्वरूप जाणलें असतें ) तर त्याला हे सुखदुःखाचे विकार शिवलेच नसते. याप्रमाणें विरहव्यथा अंतर्यामीं सदैव आहे म्हणूनच अंतःकरण उचंबळतें आणि तुझ्या प्रीत्यर्थ गीतोद्गार मुखावाटे बाहेर पडतात. अशा वेळीं या जीवात्म्याला अल्पकाल तरी अमृतत्वाचा लाभ होतो आणि तुझ्याविषयींचें प्रेम वृद्धिंगत होतें.

**रहस्य**—ज्या विषयाचा निदिध्यास करावा तोच विषय अत्यंत प्रिय होतो, आणि अशा विषयाची वासना आणि प्रेम अत्युत्कट होतें. ज्यांचा आवडीचा विषय "नारायण" झाला त्यांस त्यावांचून इतर सर्व वस्तुमात्र त्याज्य व तुच्छ वाटतें

यांत आश्चर्य कोणतें ? प्रपंचांतील सुखदुःखें, रागद्वेष, इच्छा-निरिच्छा, आशा-निराशा यांस कारण प्रिय मानलेल्या विषयाचा योग व वियोग हें आहे. योग घडतांच आनंद आणि वियोगांमुळें दुःख असा हा व्यवहारक्रम अबाधित चालला आहे. हाच क्रम पारमार्थिक विचारांच्या व्यक्तींस लागू पडतो. सर्वत्र ईश्वराची कार्यकुशलता त्यांस दिसते. परंतु त्यांच्या चित्ताची व्यग्रता कांहीं केल्या त्यांस जिंकतां येत नाहीं. प्रपंचाच्या वातावरणांत वावरणाऱ्या जीवात्म्यास परमात्म्याची गांठ पडत नाहीं म्हणून तो सदैव कष्टी असतो. ईश्वराशीं त्याचा सदैव प्रेमकलह चाललेला असतो.

तुझे चित्तीं चित्त रंगलें अनुरागें । बहु जन्मीं वियोगें शिणलें होतें ॥
आहाळलें पोळलें तापत्रयीं वहिलें । तृष्णें विभांडलें नानापरि ॥
काम क्रोध लोभ दंभ मदमत्सर । इहीं निरंतर जाजावलों ॥
बुडतिया अवचटें लाभे तिया सांगडी । ते जीवें न सोडी तैसें जों ॥
नामा म्हणे तूं केशव कृपेचा सागर । झणी माझा अव्हेर करसी देवा ॥

याप्रमाणें ईश्वराचें सान्निध्य, त्याचा सहवास आणि त्याचें अखंड स्मरण यांपासून प्राप्त होणारा दिव्यानंद घेण्यास जे उत्सुक आहेत त्यांस सृष्टींतील कोणत्याही प्रकारच्या वस्तुमात्रापासून आनंद प्राप्त होणें शक्य नाहीं. त्यांना सर्वत्र विरहाचीच स्थिति दिसते आणि ही विरहव्यथा नाहींशी व्हावी म्हणून ते रात्रंदिवस तळमळत असतात.

---

## ॥ गीत १०९ ॥

In desperate hope I go ( ई. ८७ )

गेली ती निघोनी नसे माझे घरीं । मिथ्याशेनें परि शोधीयेलें ॥
प्राप्त न जाहाली शोधांतीं मजला । व्यर्थ शीण झाला शोधण्याचा ॥
माझें गृह असे अत्यंत लहान । न लाभे त्यांतून कांहीं जातां ॥
तुझें निकेतन भव्य अप्रतिम । विश्वमय धाम अनंत हें ॥
शोधाया तिजसी तुझ्या द्वारीं आलों । उभा मी राहिलों नभातळीं ॥
सजल नयन तुझ्या मुखावरि । स्थिरावले हरि दयाघना ॥

जीवनींचें सुख तृष्णा आशा सारी । येतां तुझे द्वारीं दृष्टी पडे ॥
वियोग जयांचा घडे त्यांचें मुख । तेंहीं दिसे चोख तुझे घरीं ॥
बुडवीं जीवनपात्र या सागरीं । बुडूं दे अंतरीं सखोल तें ॥
प्रेमस्पर्श मज नष्ट जो जाहला । पुन्हा प्राप्त मला होऊं देईं ॥
विश्वाच्या या सर्वव्यापित्वाचे ठायीं । सत्प्रेमाच्या डोहीं रंगावें म्यां ॥

**भावार्थ**—हाय हाय, माझी प्रिया माझ्या गृहाचा त्याग करून गेली. माझ्या लहान घराच्या कोंपऱ्यान् कोंपऱ्यांतून तिचा शोध केला. परंतु ती कांहीं सांपडली नाहीं. माझें घर लहान आहे. यांतून एकदां वस्तु हरवली म्हणजे ती पुन्हा मिळण्याची आशा नाहीं. परंतु भगवंता ! तुझा वाडा भव्य आणि अप्रतिम आहे. हें अखिल विश्व म्हणजेच तुझें घर आहे. या घरामध्यें शोधण्यासाठीं तुझ्या द्वारापाशीं आलों आहें. माझ्या नेत्रांतून अश्रु वहात आहेत; अशा स्थितींत तुझ्या मुखाकडे पहातांच माझ्या जीवितांचें चारित्र्य, सर्व सुख, सर्व वासना आणि आशा यांचें प्रतिबिंब दृष्टीस पडूं लागलें. ज्यांचा मला वियोग घडला आहे तेदेखील तुझ्याच घरीं आहेत. भगवंता, हें माझें जीवनपात्र या विश्वमय अमृतोदधींत बुडव. तें अतिशय खोल बुडूं दे. या विश्वाच्या सर्वव्यापित्वामध्यें म्यां समरस व्हावें, आणि मला प्रेमानुभव प्राप्त व्हावा. ( हीच तुझ्या पाशीं माझी प्रार्थना आहे. )

**रहस्य**—भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें कीं—

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥

जो जन्मास येतो तो मृत्यु पावणार हें निश्चित आहे. त्याच प्रमाणें मृताचा पुनः जन्मही होणार. या प्रकारची ही अपरिहार्य व्यवस्था असल्यामुळें तिजविषयीं दुःख करणें योग्य नाहीं. मृत्यु कोणासही चुकवितां येत नाहीं, हें सत्य प्रत्येकास माहीत आहे; परंतु मृत्युजन्य वियोगामुळें प्राप्त होणारें दुःख विचारी जनांसही पीडा देतें. याचें कारण जन्म आणि मृत्यु या अवस्थांच्या मधल्या स्थितींत ज्यांच्याशीं आपला संबंध पोहोंचतो त्यांच्याबद्दल ममत्वबुद्धि उत्पन्न होते. ही ममत्वबुद्धि सुख आणि दुःख यांच्या बुडाशीं आहे. या बुद्धीचा आघात म्हणजेच दुःख होय. या ममतेचे पाश तोडून टाकून विवेक दृष्टीनें जगाकडे पाहावें असें भगवंतांनीं सांगितलें.

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।
गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पंडिताः ॥ गी. २–११
नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ गी. २–१६
यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ ।
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ गी. २–१५.

या भगवदुक्तींत सांगितल्याप्रमाणें प्रज्ञ म्हणणारे देखील शहाणपणाच्या गोष्टी सांगतात. परंतु ज्याविषयीं दुःख करूं नये त्याविषयीं दुःख करतात. खरा ज्ञानी असतो तो जन्म आणि मृत्यु यांबद्दल दुःख बाळगीत नाहीं. जें असत्य आहे तें टिकत नाहीं आणि जें सत्य आहे तें कधीं मरत नाहीं. हें जगत् सृष्टीचें रहस्य तत्त्वदर्शी लोकांनीं जाणलें. ज्यांच्या मनाला या अवस्था पाहून सुख-दुःखाची बाधा होत नाहीं आणि ज्यांची वृत्ति समतोल आणि निर्विकार असते ते अमरत्वाला योग्य होतात.

हें अमरत्व परमात्मस्वरूप जाणल्यानें प्राप्त होतें. भगवंताच्या दरबारीं जाऊन त्याच्या विश्वमय निकेतनाकडे पहातांच आपल्या मनोवेदना नाहींशा होतात. सर्व जीवात्म्यांचें परंधाम जो परमात्मा त्याजपाशीं गत जीवात्मे जाऊन पोहों-चलेले असतात. सजल नेत्रांनीं या परमात्म–स्वरूपाकडे पहातांच आपल्या सर्व नष्ट झालेल्या कामना आणि आपले सर्व नष्ट झालेले इष्टमित्र यांचा लाभ होतो. अर्थात् भगवत्प्राप्ति म्हणजेच सर्व प्राप्ति आहे. कारण—

जीवाचें जीवन अमृताची तनु । ब्रह्मांड भूषणु नारायण ।
सुखाचा सांगात अंतकासी अंत । निजांचा निवांत नारायण ॥
गोडाचे हीं गोड हर्षाचेंही कोड । प्रीतिचाही लाड नारायण ॥
भावाचा निजभाव नांवाचाही नांव । अवघा पंढरिराव अवतरलासे ॥
तुका म्हणे जें हें साराचें हें सार । माझा अंगिकार तेणें केला ॥

भगवंतानें ज्याचा अंगिकार केला त्याला अमृतत्व प्राप्त झालें. विश्वास व्यापून असलेल्या प्रेमोदधींत त्याला स्नान घडलें आणि तो दुःख, क्लेश, वियोगव्यथा इत्यादिकांपासून मोकळा झाला.

## ( शिशु गीत. )

### ॥ गीत ११० ॥

The sleep that flits on baby's eyes ( इं. ६१ )

बालाचे नयनीं निद्रा जी मोहिनी । घाली ती कोठोनी येई सांगा ॥
कोण जाणें तिचें वसतीचें स्थान । येई ती कोठोन जाई कोठें ॥
वनछायेमाजी ग्रामीं देवतांच्या । पडे खद्योतांच्यायोगें प्रभा ॥
तयेठायीं दोन कलिका मोहाच्या । लोंबती तरूच्यावरी वनीं ॥
बाल–नयनांतें कलिका चुंबिती । निद्रेसी आणिती तदा नेत्रीं ॥
घोर निद्रेमाजी ओष्ठीं बालकाच्या । लहरी हास्याच्या येती कैशा ॥
ऐशा या हास्याचा कोठें जन्म झाला । मज सांगायाला कोण जाणें ॥
तेजेहीन ऐसें बालेंदु किरण । जंव शरदूघन स्पर्शिताति ॥
तंव हिमस्नात–प्रभाताचे स्वप्नीं । जन्म घे भुवनीं मृदु हास्य ॥
निद्रेमाजि हास्य ओष्ठीं बालकाच्या । रश्मी सुप्रभेच्या पाडीतसे ॥
इंद्रियीं बालाच्या माधुरी विलसे । कोमलता दिसे सर्व गात्रीं ॥
कोमलता राही कोठें गुप्त सांगा । भूषवी जी अंगा बालकाच्या ॥
बालाची जननी असतां किशोरी । वसते अंतरीं कोमलता ॥
कोमल निर्वाच्य प्रेमाचे अंतरीं । असे जी माधुरी अनुपम ॥
तीच बालकाचे इंद्रियीं विकासे । आनंद देतसे सर्व काल ॥
बालकाचे शिरीं आशिष वर्षती । कोठोनी ते येती सांगा मज ॥
फाल्गुनीं संचरे नव मलयश्वास । श्रावणीं सुवास मृत्तिकेचा ॥
आश्विनीं नूतन धान्यदलें येती । आषाढीं वहाती नव नीरें ॥
यांतुनी निघे हा आशिर्वाद जाण । बालाचें कल्याण करीतसे ॥
कोमल बालाच्या कल्याणाचा भार । वाही कोण थोर कृपावंत ॥
अखिल विश्वाचा धनि दयाघन । करीत जतन बालकाचें ॥

## ॥ गीत १११ ॥

बं.—रङीन् खेलेना दिले ओराराङा हाते. ( ई. ६२ )

रंगाचीं खेळणीं रंगलेल्या हातीं । देतां ये प्रचीति मज बाळा ॥
मेघाठायीं रंग कासया शोभती । उदकीं उठती रंग कां ते ॥
कुसुमदलांसी रंग कां दिधले । कारण तें कळे तदा मज ॥
तुज नाचवाया करितों मी गान । तंव माझें मन जाणतसे ॥
वनीं पल्लवांत ध्वनि कां उठतो । कळे जंव गातों तुझ्यासाठीं ॥
श्रवणलोलुप पृथ्वीसी कां गीतें । गाती तरंग ते तंव कळे ॥
तुझ्या लोभी हातीं देतों नवनीत । तंव मुख हात माखोनीयां ॥
घरीं तूं आनंदें उड्या मारितोसी । तंवचीं मजसी कळतसे ॥
सरितेच्या जलीं गोडी कां निर्मिली। कां ते पुष्पीं फलीं मधुरस ॥
कळे मज याचें कारण तुजला । जंव देतों बाळा नवनीत ॥
जंव घेतों तुझें वदन-चुंबन । हास्य तयांतून फुटतसे ॥
तदा मज कळे कासया आकाश । पाडीतें प्रकाश माझ्या मुखीं ॥
वायु कां आणोनी देतसे अमृता । तुज मी चुंबितां कळे मज ॥

**भावार्थ**—या बालगीतांचें रहस्य फार गहन आहे. या गीतांत ध्वनित केलें आहे कीं बालकाचा जन्म झाल्यावर त्याच्या कल्याणाची काळजी परमेश्वरास असते आणि मातापितरांपेक्षांही अधिक काळजी बाळगणाऱ्या परमेश्वराच्या कृपे-मुळेंच त्याची वाढ होते. जगांतील अत्युत्तम व अत्यंत कल्याणकारक अशी जी रचना व व्यवस्था ती मनुष्याच्या सुखासाठींच ईश्वरानें घडवून आणिली असून अखिल मानवजात भगवंताच्या बालकांप्रमाणें आहे. बालकांस रंग, गीत, रस इत्यादिकांच्या योगानें सदैव आनंदयुक्त करण्यासाठीं मातापितर यत्न करतात. हीच पद्धति सृष्टीमध्येंहि दृष्टोत्पत्तीस येते. मनुष्यमात्रास आनंद प्राप्त व्हावा म्हणून सृष्टीच्या ठायीं रंग, गीत, रसादिकांची समृद्धि भगवंतानें केली आहे. अर्थात् अखिल सृष्टीशीं ऐक्यता पावणें आणि या ऐक्याच्या योगानें आनंद अनुभवणें हेंच मनुष्याचें ध्येय असलें पाहिजे.

## ॥ ब्रह्मार्पण ॥

## गीत ११२

बं.—फुलेर मतन आपनि फुट ओ गान.

प्रफुल्ल सहज होई पुष्प जैसें । गीत खुले तैसें त्वत्प्रसादें ॥
पाहोनीयां पुष्प आनंद जाहला । कुसुम हें तुला अर्पितों मी ॥
स्नेहें हास्ययुक्त सुमन स्वीकारीं । घेईं निजकरीं दयानिधे ॥
करीं कृपा प्रभो राखीं अभिमान । स्वीकारीं सुमन या दीनाचें ॥
पूजा सांग होतां गीतपुष्प तळीं । भूमीवरि धूळीमाजी पडो ॥
तरी न विषाद मनीं बाळगीन । पूर्ण समाधान मानीन मी ॥
अजस्र धनाचा सांठा तव करीं । विश्वीं नानापरि व्यय होई ॥
लुटती या धना विश्वजन सारे । कधीं निज भारें पडे धन ॥
जरी क्षणकाळ गीत पुष्प ऐसें । विकसोनी नासे या जीवनीं ॥
तरी मी आनंद सदैव मानीन । सार्थक गणीन जन्माचें या ॥

भगवंता ! ज्याप्रमाणें तुझ्या कृपेमुळें सहज रीतीनें पुष्प विकसित होतें तद्वत् तुझ्या प्रसादामुळेंच माझें गीत खुलत आहे. हे दयाघन, प्रेमानें आणि हास्ययुक्त होऊन या पुष्पाचा स्वीकार कर. या दीनानें अर्पिलेलें पुष्प स्वीकारून त्याला धन्य कर, त्याच्या अभिमानाचें रक्षण कर. पूजेसाठीं अर्पिलेलें हें पुष्प तुंवा स्वीकार-ल्यानंतर निर्माल्यवत् तें जरी खालीं धुळीमध्यें पडलें तरी मला वाईट वाटणार नाहीं. या जगामध्यें तुंवा संपत्ति निर्माण केली असून त्या संपत्तीचा तूंच मालक आहेस. या धनाचा अनेक परीनें लोक उपभोग घेत आहेत. ते लुटत असतात. तथापि त्यांच्यावर आपोआप या धनाचा वर्षाव होत असतो. ही तुझी मह-त्कृपा होय. माझें हें गीतपुष्प क्षण काल जरी टिकलें आणि तुझ्या सेवेप्रीत्यर्थ त्याचा उपयोग झाला तरी मी आनंद मानीन आणि या जन्माचें सार्थक झालें असें समजेन.

# पदें.

—:०:—

खालीं दिलेलीं पदें मूळ बंगालीवरून रचलेलीं आहेत. यांपैकीं पद ६ हें डी. एल्. रॉय यांच्या गीताचा व इतर सर्व पदें गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या गीतांचा अनुवाद आहेत.

## पद १

अंतर माझें विकसित करिं बा, दयाघना देवा ॥
निर्मल करिं तें उज्ज्वल ही करीं, अति सुंदर देवा ॥
करिं त्या जागृत उद्यत, निर्भय करीं तया देवा ॥
निरलस तैसें करिं निःसंशय, मंगलमय देवा ॥
तुजसंगें त्या युक्त करीं तूं, मुक्त करीं भवबंध ॥
सकल कर्म आचरितां त्यातें, लागो त्वत्पदछंद ॥
चरणपद्मिं मच्चित्त करीं हें, निष्पंदित देवा ॥
मग्न करीं आनंदीं अंतर, आनंद देईं देवा ॥

## पद २

अखंड ब्रह्मांडाच्या राज्यीं विराजतो पाहीं ॥
परम श्रेष्ठ या राजेंद्राहुनि अन्य थोर नाहीं ॥
वर्षे भूवरि अनंत निर्मल आनंद सुधाधारा ॥
नभामाजि रव अनादि चाले वाजत नगारा ॥
आकाशांगणिं अगणित रचिले रविचंद्रतारा ॥
शरणागत त्या दीनवत्सला जीवन-आधारा ॥
मौनत्वानें भक्ति परिप्लुत चित्तें तत्स्मरणीं ॥
सुविनत विस्मित रिघतों मोदें विश्वाच्या चरणीं ॥

## पद ३

तव चरणाच्या धूळीमाजी ठेवियला माथा ॥
अश्रुजलीं हा बुडवीं सारा अहंकार नाथा ॥
निज गौरव हे कथितीं कोणी ।
अपमान करीति किति अभिमानी ।

अहंपणातें घेरुनि घेरुनि।
हरि घडी ऐसे किति तरि जाती वेगें मृत्युपथा ॥ अश्रु ॥
तव कार्यार्थंचि जीवन होवो स्वीकारीं सेवा ॥
जीवनयोगें पूर्ण करुनि घे तव इच्छा देवा ॥
याचितसें तव अनुपम शांति।
दे मज्जीवा तव शुभ कांति।
निरसीं वेगें मनिंची भ्रांति।
हृत्पद्मदलीं वास करीं तूं दीनार्तत्राता ॥ अश्रु ॥

## पद ४

या संध्याकाळीं सुंदर वेषें येसी।
करितों नमस्कार तव चरणासी ॥
अंधःकारीं बैसुनियां तूं आनंदें हंससी ॥ करितों ॥
नम्र शांत गंभीर सौम्य या सुंदर आकारीं ॥ करितों ॥
प्रशांत निर्मल वायू वाहे त्यामाजी बससी ॥ करितों ॥
श्रमित धरेच्या श्यामलांचलीं आसन मांडीसी ॥करितों॥
स्तब्ध तारका करिती मौनें मंत्रार्पण तुजसी ॥ करितों ॥
कर्मांतीं जीवात्मे गांठिति स्वपांथशाळेसी ॥ करितों ॥
अर्पितसें पदिं गुंफुनि सुंदर सुमनमालिकेसी ॥करितों॥

## पद ५

हरि तारो हरि मारो। बोल सदा तूं धन्य हरि ॥ धृ. ॥
भवनाट्यीं हा धन्य हरि। राज्यपाटीं तो धन्य हरि ॥
स्मशानघाटीं धन्य हरि ॥ बोल ॥
सौख्य शांति दे जीवित जोंवरि। धन्य हरि धन्य हरि ॥बोल॥
व्यथा दुःख तो देइ जरी। धन्य हरि धन्य हरि ॥ बोल ॥
आत्मजनां दे सौख्य कृपेनें। धन्य हरि ये हास्यमुखानें ॥
गृहसौख्यातें भस्म करी तरि। धन्य हरि धन्य हरि ॥
देशोदेशीं हिंडवि तो जरि। धन्य हरि धन्य हरि ॥ बोल ॥
धन्य हरि तो स्थलीं जलीं। धन्य हरि तो फुलीं फळीं ॥
धन्य हरि हृत्पद्मदलीं। चरण-प्रकाशें धन्य करी ॥ बोल ॥

## पद ६.

पूजूं केवीं प्रतिमारूपें । हें विश्व सकल तव प्रतिमा माते ॥ धृ. ॥
विशाल कैसें बांधूं मंदिर । मंदिर केवळ दिगंत अंबर । प्रतिमा तव जगिं शशि तारा रवि । सागर निर्झर भूधर अटवी । निकुंज-भवनीं वसंत-पवनीं । विलसे प्रतिमा मधुफलसुमनीं । सतिच्या निर्मल प्रणयालिंगनिं । शिशुहास्यीं निज जननी-चुंबनिं । साधुजनांची उज्ज्वल भक्ति । कविंची प्रतिभा जीवनशक्ति । यांमाजीं तव प्रतिमा दिसते । हें विश्व ॥ १ ॥

सकल दिशा तूं विश्वीं व्यापिसि । शत रूपें जगिं नित्य विराजसि । वसंत समयीं शीतल काळीं । दिवसा अथवा रात्री वेळीं । तव वैभव किती विकसित होतें ॥ हें विश्व ॥ २ ॥

तरि प्रतिमा तव मृण्मय मंदिरिं । पूजितसें मी भावें ईश्वरी ॥ अमर कवीच्या हृदयांतुनि जरि । शब्द न निघती वर्णायातें ॥ हें विश्व ॥ ३ ॥

## पद ७

जीवनीं जी पूजा । सांग न झाली ॥
जाणतसें मी । ती व्यर्थ न गेली ॥ धृ. ॥
पुष्पविकासा आधीं । दळें गळोनी पडलीं ॥
वालुका प्रदेशीं सरिता । नामशेष जी झाली ॥
जाणतसें मी । ती व्यर्थ न गेली ॥ १ ॥
संसारीं ज्या मनुजाची । प्रगति कुंठित झाली ॥
ऐशाही दीन नराची । सत्कृति व्यर्थ न गेली ॥
चाल—अव्यक्त सर्व सुविचार ।
जे गाइले न ते सूर ।
तव वीणेवरि ते मधुर ।
असती व्यर्थ न कांहीं जगतीं । प्रचीति मजसी आली ॥
जरि सांग न झाली । पूजा व्यर्थ न गेली ॥

## पद ८

तूंचि बंधु तूंचि नाथ । निशिदिनीं तूं माझा ॥
तूंचि सौख्य तूंचि शांति । अमृत तूं माझा ॥
तूंचि आनंदलोक । निरसि शोक माझा ॥
तापहरण चरण तुझे । सेवी दास तुझा ॥ तूंचि ॥

## पद ९

वर्षी निरंतर अनंत आनंदधारा ।
तुझ्या कीर्तिचा अंबरिं वाजे सदैव नगारा ॥
जागति अगणित रवि शशि तारा ॥
अखंड ब्रह्मांडाच्या राज्यीं तुझाचि दरारा ॥
श्रेष्ठ एक तूं महेंद्र राजा ॥
विश्वचरणीं मी विनत सुविस्मित झालों महाराजा ॥

# भगवद्भजन.

अंतःकरणपूर्वक केलेल्या भगवद्भजनाच्या योगानें मनाला शांतता प्राप्त होते. कष्टलेल्या जीवाला ईशप्रार्थनेनें सामर्थ्य व समाधान यांचा लाभ होतो. ' माझा भक्त कधींहि नाश पावत नाहीं ' न मे भक्तः प्रणश्यति या भगवदुक्तींतील सत्याचा भक्ताला अनुभव येतो.

' ऋग्वेदी '

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ।
निर्वैरः सर्व भूतेषु यः स मामेति पांडव ॥ ११-५५ ॥
श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति ॥ ४-३९ ॥

श्री भगवद्गीता.

## अभंग १ ( गीतारहस्य )

श्रुतिसार गीता सांगे भगवंत । बोधा या वेदान्त ऐसें नाम ॥
वेदान्ताचें ध्येय वासनेचा छेद । आपपर भेद वर्ज्य तया ॥
अकर्म न योग्य कुकर्म तें निंद्य । निज कर्म वंद्य सांगे प्रभु ॥
फलेच्छा त्यागोनी कर्म आचरावें । अर्पण करावें ब्रह्मपदीं ॥
यज्ञार्थ हा जन्म यज्ञार्थचि कर्म । जाणतां हें वर्म ज्ञानी झाला ॥
कर्ता कर्म फल भिन्न त्रिगुण भेदें । श्रुति स्मृति वेदें वर्णियेलें ॥
सत्वगुणें रजतमासि जिंकावें । तंव जीव पावे आत्मरूपा ॥
मोहयुक्त संग दुःखासि कारण । निःसंग जें मन मुक्त सदा ॥
कर्तव्यपालन स्वधर्मसेवन ॥ हरिचें चिंतन सर्व कार्यीं ॥
रहस्य जन्माचें देवें कथियेलें । तेंचि निवेदीलें वामनानें ॥ १ ॥

## अभंग २ ( भजन प्रकार )

त्रीविध असती भजन प्रकार । ज्यायोगें संसार होय धन्य ॥
चराचरीं सर्व ब्रह्म ओळखावें । ईश्वरा पहावें ठायीं ठायीं ॥
बुद्धि प्रेम दया उत्साह सौंदर्य । नियमन धैर्य विश्वीं दिसे ॥
गुण हे ईश्वरी चैतन्य दर्शक । त्यांमाजी ओळख ईश्वरत्व ॥
प्रकार पहिला हाचि भजनाचा । जगां ईश्वराचा साक्षात्कार ॥ त्रि. ॥
वृद्धि, क्षय, जन्म, मृत्यु, सृष्टि, नाश । अंधार, प्रकाश स्थिति ऐसी ॥
सहज स्थिति ही नये चुकवितां । मग व्यर्थ व्यथा का मानसीं ॥
अनिवार्य ऐशा मोहीं गुंतूनीयां । सुखदुःख वायां कां भोगावें ॥
भवकार्य सारें मानावें देवाचें । फलही धन्याचें मानावें तें ॥
धृत्युत्साहयुक्त कर्म आचरावें । निःसंग करावें स्वकर्तव्य ॥
भजनाचा ऐसा प्रकार दुसरा । ब्रह्मार्पण करा सर्व कर्में ॥ त्रि. ॥
कृमीकीटकांत पशुपक्ष्यांठायीं । मानवांहृदयीं जें चैतन्य ॥
तेंची परमात्म्यापासोनी निघालें । सृष्टीमाजी व्यालें नाना रूपें ॥
ग्रह-तारांमाजी तरु-लतांठायीं । चैतन्य तूं पाहीं विराट हें ॥
अनुभव येतां देव विश्वीं दिसे । जगद्रूप भासे वासुदेव ॥
सर्व भूतीं आत्मा पूर्ण ओळखीतां । आत्म्याठायीं भूतां मन पाहे ॥
भेद भाव गळे, जनीं जनार्दन । दिसे तंव ज्ञान खरें झालें ॥

प्रकार तिसरा ऐसा भजनाचा । उद्धार जीवांचा होय तेणें ॥ त्रि. ॥
ईशभजनाच्या पायऱ्या या तिन्ही । जातां ओलांडोनी मोक्ष लाभे ॥
सगुण निर्गुण घट पट वाद । नको त्याचा स्वाद दंभदायी ॥
ओळखीं रहस्य श्रेष्ठ जीविताचें । अखिल विश्वाचें वामना रे ॥२॥

## अभंग ३ ( ब्रह्मसाक्षात्कार )

ब्रह्म ओळखावें सर्वत्र जगतीं । ऐसें निवेदिति ब्रह्मज्ञानी ॥
चराचरीं सर्व ब्रह्मचि भरलें । विश्व व्यापियेलें एका ब्रह्में ॥
कथितां सुलभ ऐसें ब्रह्मज्ञान । त्यापरि वर्तन अवघड ॥
वाचा आणि क्रिया यांत मेळवण । घालितां कठीण प्रतीची ये ॥
चैतन्य संचरे सदा सर्व ठायीं । जाणतां हें नाहीं भेद भाव ॥
उच्चनीच थोर सान शुद्ध भ्रष्ट । भेद हे अनिष्ट मग जाती ॥
सर्वांठायीं प्रेम जनीं नारायण । ब्रह्मज्ञान खूण ऐशी आहे ॥
नाना धर्म शाखा द्वैताद्वैत पंथ । ब्रह्मज्ञानी संत न जाणति ॥
सर्व ब्रह्ममय ऐशी सद्भावना । केंवी या वामना जिंकील तीं ॥३॥

## अभंग ४ ( संसार सत्यत्व )

संसार लटिका आहे हा सकल । माया-मोह-जाल सांगताति ॥
कासया हा देवें निर्मिला संसार । जरी तो असार पापमूल ॥
रहस्य कळेना प्रपंचाचें जयां । वाटे भव तयां दुःखभार ॥
प्रेम भक्ति दया सेवा उपकार । यासी मूलाधार प्रपंच हा ॥
प्रपंचीं शिकावे अमूप हे गुण । दैविक ही खूण ओळखावी ॥
खूण नोळखिती प्रपंच त्यां खोटा । दुःखद वोखटा मायामय ॥
विश्वाच्या सुरम्य संसारचालका । वामना याचका दावीं सत्य ॥४॥

## अभंग ५ ( संसार रहस्य )

संसार सर्वत्र जगतीं निर्मिला । कैसा म्हणूं त्याला लटिका मी ॥
दिसे वृक्ष वेली कृमि कीटकांत । खग मानवांत संसारची ॥
सुखदुःख माया प्रेम आनंदाच्या । कला प्रपंचाच्या विराजति ॥
तेज या कलांतें आलें तुजमुळें । माझें मन भोळें गुंतविलें ॥
ह्मणोनी तुज मी प्रपंचाचा नाथ । मानितों ही मात साच करीं ॥

संसार तुझा हा प्रेमें चालवावा । परि न गुंतावा जीव माझा ॥
सुख तरी तुझें दुःखही तुझेंची । वाटावें प्रपंचीं तुझें सर्व ॥
यश अपयश स्तुति निंदा तुझी । भावना ही माझी दृढ व्हावी ॥
चालवीन तुझें कार्य मी प्रेमानें । तुटलीं बंधनें वासनाचीं ॥ ५ ॥

## अभंग ६ ( विषय वासना )

काय माझ्या मना वेड हें लागलें । विषयें घेरीलें सर्व ठायीं ॥
सदैव आसनीं शयनीं भोजनीं । श्रवणीं नयनीं विषयचि ॥
न सुटे तयांची आस मनांतूनि । विचार विरूनी जाती सारे ॥
कासया तूं देवा विषयां-अंतरीं । आनंद लहरी सांचविल्या ॥
काय माझा दोष त्यांत सांपडतां । विषय अनंता त्वाची केले ॥
जरी मी तयांच्या हातीं सांपडेन । दोष ही ठेवीन तुझे माथां ॥
विषयवासना जरी ती वाईट । तूंचि तिचा वीट उपजवीं ॥
तयांहूनि अन्य स्थान आनंदाचें । देईं वासनाचें दैन्य फेडीं ॥ ६ ॥

## अभंग ७ ( प्रेम-धन )

जरी तुझे चित्तीं जगत्प्रेम असे । तरी देव वसे अंतर्यामीं ॥
झाला पूर्ण प्रेमी साऱ्या जगताचा । कार्यभार त्याचा होय मोठा ॥
प्रचंड संसार कार्यही प्रचंड । सुसेवा अखंड हेंची कार्य ॥
संपोनी संपेना नये चुकवितां । कर्ता करविता नारायण ॥
वीरापरी यत्न करावा मरावें । तंवचि लाभावें अमृतत्व ॥
दुःख संकटातें सोशी प्रेमयोगें । तोची नित्य भोगे आनंदातें ॥
प्रेमाठायीं वास अखंड सत्याचा । प्रत्यय तयाचा स्वार्थ-त्यागें ॥
सत्य हाचि धर्म प्रेम त्याचें मर्म । तत्प्रेरित कर्म तेंची श्रेष्ठ ॥
निष्कंचन दीन घाबरे त्यागाला । कृपण जीवाला नको त्याग ॥
आनंद वेंचाया धन धनिकासी । परि निर्धनासी न औदार्य ॥
तैसें प्रेम असे आत्म्याची संपत्ति । विपुल ज्या हातीं तोची वेंचे ॥
इतर बापुडे संपत्तिविहीन । वेंचतील धन कोठोनी हें ॥
प्रेमाची प्रचीति येई साहसांत । घडे जनहित याचसाठीं ॥
प्रेम प्रसवीतें जगीं शौर्य धैर्य । साहस औदार्य यथाकालीं ॥

लाभ हानी सुख दुःख निंदा स्तुति । यांची न महति गणी प्रेम ॥
जग आनंदावें आनंदीं रहावें । आनंदीं मरावें हेंची प्रेम ॥
लाभो जन्मोजन्मीं संपत्ति प्रेमाची । ईशपदीं याची वामन हा ॥७॥

## अभंग ८ ( देवाची संगति )

सर्वव्यापी सर्व सुखाचा संचय । थोर जो आश्रय सर्वांहूनी ॥
तयासी अर्पिता जीवन सर्वस्व । सकल वैभव आलें हातीं ॥
गेली सर्व भीति दैन्य तेंहि गेलें । मरणही मेलें ऐशियाचें ॥
राजभय लोकभय मृत्युभय । यांवरी विजय प्राप्त झाला ॥
पर्णकुटिकेंत किंवा तरुतळीं । नौकेवरी जलीं प्रासादीं वा ॥
बंदिशालेमाजी हर्षें करी वास । न शिवे मनास दुःख भीति ॥
सर्व नृपतींचा सार्वभौम राजा । जीव तया काजा समर्पितां ॥
वाहूं मी कासया अन्य जनभीति । त्याची कृपा प्रीति संपादितां ॥
तयावरि श्रद्धा अखंड विश्वास । असावा हा ध्यास लागलासे ॥
लोपेल ही श्रद्धा एक मज भीति । लोपेल त्वत्प्रीति म्हणोनियां ॥
गणी ना मी लोकां गणी ना मी राजा । नित्य त्याचा माझा सहवास ॥
निरंतर त्याची लाभावी संगति । अन्य नसे खंती वामनासी ॥८॥

## अभंग ९ ( ईश–ध्यास )

अहर्निश देवा गातों तुझें नाम । चित्तासी विराम परी नसे ॥
दिन मास वर्षें ऐसीं हीं लोटती । परि तुझी भेटी होईना रे ॥
माझ्या जीवप्राणा कोठें तूं असशी । कोठें लपलासी सांग वेगें ॥
हृदयविरामा सर्वस्व तूं माझें । दावीं रूप तुझें मनोहर ॥
केवीं कंठूं काळ तुजवांचोनीयां । विश्रांती हृदया मुळीं नसे ॥
सारें विश्व मज शून्य भासतसे । टाकूं मी उसासे किती देवा ॥
अर्पियेलें माझें सर्वस्व तुजला । नाहीं पदराला कांहीं आतां ॥
माझी आशा श्रद्धा माझी लाज लज्जा । तुझीया पदाब्जा अर्पियेली ॥
कोठें तूं गेलासी न कळे मजला । जीवासी लागला नित्य ध्यास ॥
विरहाग्निज्वाला करिती दहन । भस्मसात् जीवन होत असे ॥
घर दार धंदा धन पुत्र दारा । यांपायीं न थारा लाभे जीवा ॥

विषयाची तृष्णा असे अनावर । परी घरदार आवडेना ॥
ऐसें व्हावयासी देवा तूं कारण । माझें अंतःकरण चोरिलेंसी ॥
सर्वस्व तूं माझें हरिलेंसी हरि । वामना कैवारी होई आतां ॥ ९ ॥

## अभंग १० ( ईश दर्शन लालसा )

हृद्यांतरीं हा बैसे जिवलग । परी नलगे थांग हृदयासी ॥
दृष्टिमाजि दृष्टा तोचि बैसलासे । परी न गवसे दृष्टिसी हा ॥
शोध म्यां तयाचा सर्व ठायीं केला । परि न लाभला अभाग्यासी ॥
सर्वव्यापी असे विश्वींचा हा नट । परि न प्रगट होई कैसा ॥
भक्त भावबळें जिंकाया त्या जाती । प्रार्थना करिती मंदिरांत ॥
रात्रंदिन त्याचा ध्यास लागलासे । परि तो न दिसे कोठें कोणा ॥
दिव्य दृष्टि द्याया करिती याचना । प्रसन्न तयांना न होई तो ॥
माझ्या अंतर्यामीं बैसोनी चालवी । योगक्षेम भवीं तोची तारी ॥
परि न प्रगटे दृष्टिसी न पडे । कष्टें जीव रडे दुःखाकूल ॥
देईं बा दर्शन वेगें या पामरा । तुजविण थारा नसे जीवा ॥
ऐसें आक्रंदन चाले अहर्निश । परि हा परेश न प्रगटे ॥
व्यर्थ झाला शोध भांबावलें मन । असह्य जीवन झालें आतां ॥
साक्षात्कार तुझा व्हावा वामनासी । येवोनी जन्मासी धन्य व्हाया १०॥

## अभंग ११ ( मानवी दैन्य )

काय देवा अर्पूं तुझीया चरणीं । त्वांची केलें ऋणि दातृत्वानें ॥
तुझें कृपाफल सेवितों सदैव । व्यर्थ माझा गर्व दयानिधे ॥
हितगुज माझें कथूनि अनंता । शिर नमवितां शांति लाभे ॥
अंतरीं भक्तीच्या प्रेमळ लहरी । उठवुनि करीं धरितोसि ॥
विश्वाचा तूं बंधु मज बाळकाला । घालूनि जन्माला केलें धन्य ॥
प्रेमोदधींतूनि उठती तरंग । माझें अतरंग उचंबळे ॥
विश्व संपत्तीचा तूंचि स्वामी एक । तुझा मी सेवक दीन हीन ॥
सिंहासनापुढें नम्र म्यां याचकें । मागावें भातुकें हेंचि भाग्य ॥
सर्वस्व तूं माझें मान्य मज झालें । तुजहुनी भलें नसे कांहीं ॥
जें जें मज देसी तेंची तुज मागें । देतों अनुरागें नम्रपणें ॥
तुझे पाय माझें शिर तयांखालीं । व्हावें भाग्यशाली वामनानें ॥ ११ ॥

## अभंग १२ "आत्माराम"

चैतन्य स्वरूप आत्माराम राहे । अंतर्यामीं पाहे विश्व सारें ॥
श्रोत्र नायकति देखती न नेत्र । ऐके पाहे क्षेत्रवासी आत्मा ॥
इंद्रियां चेतवी तोचि आत्माराम । प्रकृतीचें प्रेम म्हणोनीयां ॥
सदनीं आपुल्या वसे यजमान । तथा अभिमान सदनाचा ॥
तेंवीं प्रकृतीचा स्वामी आत्माराम । असोनी निष्काम पडे मोहीं ॥
निघोनी तो जातां नुरे हा संसार । इंद्रियव्यापार थडकती ॥
साधा आत्मोन्नति करा आत्मोद्धार । जिंका हा संसार स्वार्थत्यागें
देह जावो राहो सुख मिळो पळो । सच्चित्त न ढळो आत्म्याठायीं ॥
सर्व लाभ झाला होतां आत्मज्ञान । तुटोनी बंधन जाय सारें ॥
संपादिलें वित्त वैभव सामर्थ्य । परि सारें व्यर्थ आत्म्यावीण ॥
प्रगट हें होवो गुप्त आत्मधन । वांछितो वामन अहर्निश ॥ १२ ॥

## अभंग १३ "प्रपंची परमार्थ"

प्रपंचीं परमार्थ एकीं दुजा लीन । होतां हें प्राक्तन बापुडें तें ॥
संचित प्रारब्ध पूर्वकर्मबल । होउनी निष्फळ जाय सारें ॥
संतांचे प्रसादें जिंकूं ये प्राक्तन । परमार्थी मन विंधिती ते ॥
आत्मज्ञानें नर होय नारायण । संचित क्रियमाण जळे तदा ॥
कायावाचामनें विश्वाच्या संसारीं । पुरुषार्थ चारी साधावे ते ॥
धर्में अर्थ धर्में काम जो मिळवी । तयासी या भवीं मोक्ष लाभे ॥
संसार देवाचा कार्यही देवाचें । मानी जो तयाचें हित होय ॥
असोनी बंधन असे सदा मुक्त । ऐसा देवभक्त धन्य खरा ॥
प्रवृत्ति निवृत्ति यांचें संमिश्रण । सदैव वामन अनुभवो ॥ १३ ॥

## अभंग १४ ( आसुरी सुधारणा )

जगीं नाना शोध नाना सुधारणा । पाहूनीयां मना वाटे चोज ॥
धृत्युत्साहयुक्त नर जे जन्मती । चालन ते देती प्रगतीला ॥
परि तियेमाजीं शिरे अहंभाव । विसरे मानव देव धर्म ॥
सामर्थ्यासी जोड सत्वाची नसतां । वाढते अहंता दुःखमूळ ॥
प्रगति ही झाली दुःखासी कारण । झालें जग दीन बळी-हातीं ॥

युद्ध अधोगति दैन्य दुःख त्रास । स्वातंत्र्याचा नाश यातना या ॥
भोगिती असंख्य जन भूमिवरि । कोण त्यां उद्धारी हरिवीण ॥
जेथ धना मान कोण पुसे दीना । गांजिती मूकांना बळवंत ॥
होतां येणें परि बहु भूमिभार । घेई अवतार प्रभुराय ॥
आसुरी संपत्ति जाई तदा लया । पुन्हा ये उदया सत्त्यधर्म ॥
तेवीं अवतार प्राप्त होवो वेगें । वामन हें मागे हरिपदीं ॥१४॥

## अभंग १५ (अधोगति)

ऋषि जन्मा आले जेथ असंख्यात । अनेक विख्यात तत्त्वज्ञानी ॥
विद्यावंत ज्ञानी जन साधुसंत । आचार्य महंत उपजले ॥
शूर वीर योद्धे दयाळू नृपति । जेथ जन्म घेती एका काळीं ॥
कला, काव्य, शास्त्र, भक्ति, धर्म, नीति । विशारद किति जन्मा आले ॥
तया ठायीं कैंवी आली अधोगति । जन कां विपत्ति भोगिताति ॥
पतनाकारण विसरले धर्म । स्वकर्तव्यकर्म जन येथें ॥
विसरले पूर्ण खऱ्या विश्वदेवा । वैदिकांची सेवा पोटासाठीं ॥
नसे भक्तिभाव नसे अर्थज्ञान । ऐसें हें अर्चन चाललेंसे ॥
नाहीं ऐक्य प्रेम नसे सहकार । स्वार्थ हेंची थोर ध्येय सर्वां ॥
उच्च नीचत्वाचे पिशाच्चें घेरीलें । ऐशीयांचें भलें होय कैसें ॥
क्रिया वाचा यांत नसे कधीं मेळ । दांभिक वाचाळ झाले नेते ॥
नसे यत्न, दैववादें आत्मघात । झाला अधःपात म्हणोनीया ॥
नर नारी चक्रें संसार रथाचीं । असमान त्याची गति कुंठे ॥
अनाथ दुबळे कष्टी दीन हीन । ऐसे झाले जन आत्मनाशें ॥
काया वाचा मन करावें समर्थ । प्राप्त पुरुषार्थ मग चारी ॥
विनवितो पायीं वामन सकलां । आत्म-उद्धाराला लागा वेगें ॥ १५ ॥

## अभंग १६ (कर्मयोगी)

धरोनीयां हातीं सत्त्याचें निशाण । सत्कार्यासि प्राण प्रेमें वाही ॥
निश्चित निर्भय जागरूक वीर । गंभीर उदार जीवावरि ॥
वाचा आणि क्रिया राखी यांचा मेळ । निरिच्छ कुशल कार्यीं सदा ॥
शूर हा राऊत देवाचा झुंजाया । भोगाया त्यागाया सदा सिद्ध ॥
यश ही देवाचें अपयश त्याचें । आलें गेलें याचें काय तया ॥

जन्ममृत्यु सुखदुःख लाभहानी । द्वंद्वा या जिंकोनी झाला धन्य ॥
ऐसा नरश्रेष्ठ असे कर्मवीर । तोची योगी थोर हरीभक्त ॥
असंख्यात होती जाती जगांतूनि । कोण तयां मानी कीटकातें ॥
कर्मयोगीयाचा दास हा वामन । करीत वंदन नम्रपणें ॥ १६ ॥

## अभंग १७ ( गुरूचा शोध )

कोठें कोण आहे दावा मज गुरु । ज्ञानाचा जो तरु मोक्षदायी ॥
नाना संप्रदाय मतमतांतरें । यांत गुरु सारे गुंतलेती ॥
पिटताति कोणी भक्तीचा डांगोरा । कोणी कर्मभारा वहाताति ।
ज्ञानयोगें लाभे पुण्य पुरुषार्थ । ज्ञानाविण व्यर्थ भक्ती कर्म ॥
ऐसें कोणी सांगे उपजे संशय । आत्म्यासी अभय नच लाभे ॥
भोळ्या भाविकांसी किती फसविती । कीर्ति त्यांची गाती परिवार ॥
ऐसें जगीं चाले कैसा ओळखावा । सद्गुरु तो दावा खूण त्याची ॥
संशयाचि ग्रंथी शीघ्र जो छेदील । गुरु का लाभेल वामनासी ॥१७॥

## अभंग १८ ( खरा गुरु परमेश्वर )

हिंडलों मी किति गुरुशोधासाठीं । जनीं वनीं हाटीं शोधियेलें ॥
पहातां जयातें शरण जाई जीव । विसरे देहभाव ऐसा गुरु ॥
बंधनांतुनी जो मुक्त शांत सूज्ञ । ज्ञानी स्थितप्रज्ञ महात्माची ॥
ऐसा श्रेष्ठ गुरु लाभला न देवा । म्हणुनि पादसेवा स्वीकारिली ॥
नाथा तूंची माझा गुरु परात्पर । प्रेमळ उदार मोक्षदाता ॥
तुंवा रचियेला विश्वाचा हा ग्रंथ । तोची भाग्यवंत वाचूं जाणें ॥
एक पंथ एक काज एक साध्य । एकही आराध्य ग्रंथ बोले ॥
ग्रंथ हा वाचाया मज बुद्धि देईं । नमितों मी पायीं गुरुवर्या ॥
जिव्हा घ्राण दृष्टी श्रोत्र हस्त पाद । यांयोगें प्रसाद सेवावा मी ॥
रस गंध रूप वाणी स्पर्श यांहीं । सर्व विश्वाठायीं दिसो देव ॥
हाची गुरुमंत्र हाचि उपदेश । जीवित-संदेश देवा तुझा ॥
तुजविण अन्य गुरु न मी जाणें । घातली वामनें मिठी पायीं ॥१८॥

## अभंग १९ ( गुरुप्रार्थना )

निबिड अंधारें व्यापियेलया दिशा । चेतवीं प्रकाशा भगवंता ॥
वाट दावीं मज संकटीं अभया । त्वरें गुरुराया दावीं दीप ॥
दृष्टि शक्तिहीन झाली भासे छाया । कोणत्या मी ठाया जाऊं कैसा ॥
ग्रह माझें कोठें राहिलें न जाणें । करुणावचनें देईं धीर ॥
अंध मी अभागी तुजवरि भार । घातला संसार चालवीं तूं ॥
सांगाती हो माझा हातासी धरोनी । नेईं सांभाळोनी मायबापा ॥
धर्म कर्म नेणें नेणें श्रद्धा भक्ती । न जाणें मी मुक्ति पाप पुण्य ॥
तुझा दास व्हावें तुझा म्हणवावें । तुझें यश गावें जन्मभरी ॥
आस एक ध्येय ध्यान एक हेंचा । वामन हा याची पायांपाशीं ॥१९ ॥

## ॥ आत्म-समर्पण. ॥ *

शरण शरण तुज जगन्नायका गळला अभिमान ।
शरणागत मी बहु अपराधी अज्ञानी दीन ॥ धृ० ॥

तरुणपणीं जंव उत्साहें मी पडलों व्यवहारीं ।
प्रकाशमय हें जीवित दिसलें सुंदर सुखकारी ॥
सामर्थ्याच्या गर्वें कार्यें क्रीडेपरि दिसलीं ।
हांसत खेळत रम्य विनोदीं वेळ निघुनि गेली ॥
चिंताविरहित प्रसन्न वदनें विश्वीं या नटलों ।
निर्भय निश्चल चित्तें सहजचि भवसागरिं शिरलों ॥१॥ शरण०

सरळ मार्ग तंव वक्र जाहला वाट बिकट झाली ।
भार शिरावरि वाढत जातां मति माझी भ्याली ॥
उच्च पदावरि होतों तेथुनि धूळिमाजि पडलों ।
पदभ्रष्ट पुरा होउनि दुःखें पुनः पुन्हा रडलों ॥
श्रद्धा गेली आकांक्षांचा लेश नसे उरला ।
सामर्थ्याचा वृथाभिमानहि पूर्ण गळुनि गेला ॥ २ ॥ शरण ०

म्हणोनि आलों धांवत आजी तव सन्निध देवा ।
विश्वाधार परात्पर तूंची शांतीचा ठेवा ॥
अपार विश्वा व्यापियलें त्वां जिंकियलें काला ।
पार न लागे रूपाचा तव महिमा हा कळला ॥
विश्व निरखितां शांतपणें मनिं विचार उद्भवले ॥
कोण कुठिल मी आलों कोठें विश्व कुठें चाले ॥ ३ ॥ शरण०

विश्वांतिल या शांतिसुधारस चाखितसें हर्षें ।
शाश्वत सरिता शांतीची चिर सुधा-स्रोत वर्षे ॥

---

* कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या “ आयुष्याचा मध्यकाल ” या पदाचा अनुवाद.

रजनीसमयीं स्वर्गोप्रति मम नयनें निरखीतां ।
आकाशांगणिं असंख्य तारे दिसती भगवंता ॥
चंद्र सूर्य ग्रह नक्षत्रें तव तेज प्रगट करिती ।
अव्यक्त असा तम तूं तेज हि व्यक्त होय दीप्ती ॥ ४ ॥ शरण०

होता जंव संसार-भार लघु, होतों निष्पाप ।
नच ओळखिलें जरि तूं देवा असासि मायबाप ॥
लीला शक्ती अद्भुत महिमा अपार सौंदर्य ।
नाहिं जाणिलें ब्रह्मांडांतिल अतुल महत्कार्य ॥
विस्मित नयनें मौनत्वें अति नम्र विनत चित्तें ॥
नाहिं पाहिलें परब्रह्मिणे म्यां तव सृष्टीतें ॥ ५ ॥ शरण०

सूर्यास्ताचीं मृदुतम किरणें दुःखद गंभीर ।
स्फटिकापरि, निर्मल, अघहारक गंगेचें नीर ।
निद्रित जगतावरी संचरे जागत पूर्ण शशी ।
सप्तमहर्षी लीला पाहत बसले आकाशीं ॥
दृश्य असें हें सुंदर पाहुनि मन मोदित झालें ।
जीवित आजी तुझ्या दर्शनें धन्य धन्य फळलें ॥ ६ ॥ शरण०

उषःकालिं वायुचा परिमलेंयुक्त मंद श्वास ।
प्रभात समयीं कनकरश्मिचा श्याम पर्णि वास ।
निबिड वनाची छाया, निष्प्रभ दीन शशी गगनीं ।
नव धान्याचीं कणसें सुंदर शोभविती अवनी ॥
अतर्क्य लीला पाहतां येई हृदय उचंबळुनी ।
ब्रह्मांडाचा प्राण वाहतो स्वांतरिंच्या प्राणीं ॥ ७ ॥ शरण०

चित्ताठायीं विचार नाना वेगें उद्भवती ।
दुःख वियोगव्यथा वितळुनी अश्रुबिंदु गळती ॥
त्यायोगें या विश्वजननिचें वक्ष मृदु द्रवलें ।
विलीन होतां सृष्टीमाजी देहभान नुरलें ॥
प्रवाह पातक-दुःखाचा अति मलीन वाहोनी ।
गेला लोपुनि महा सागरीं पावन होवोनी ॥ ८ ॥ शरण०

जाग्रत होई प्रेम अंतरीं मधुर सौख्यदायी ।
आयुष्याची गती वाढली कर्मवृद्धि होई ॥
ज्ञानाग्नीमधें दुःख ताप यां येई निर्मलता ।
आनंदाच्या मूर्तीपरि ये तयांसि उज्ज्वलता ॥
मुक्तपाश होउनियां आत्मा व्यापि विश्व सारें ।
सच्चित्‌आनंदाच्या लहरी उसळति हर्षभरें ।
नूतन प्राणाठायीं विश्वश्वास जगीं खेळे ।
गीताचा तंव निनाद उठुनी उल्हासीं मिसळे ॥ ९ ॥ शरण०

२३७
३८२१

## ॥ पूजा ॥

विश्वव्यापि मूर्ति ध्यातों तुझी देवा। स्वीकारावी सेवा या दासाची ॥१॥
आवाहन तुझें हृदयमंदिरीं। करितों मी हरि प्रेमादरें ॥ २ ॥
निष्कलंक पूर्ण करोनीयां मन। अर्पितों आसन तुजलागीं ॥ ३ ॥
प्रेमाश्रुजलानें प्रक्षालितों पाद। क्षमस्व प्रमाद दयानिधे ॥ ४ ॥
अर्घ्य मी वाहतों सकल कर्मांचें। हर्षें घेत वाचे तुझें नाम ॥ ५ ॥
आचमनीयासी प्रेमजल घेई। विनवितों पायीं बहु दीन ॥ ६ ॥
प्रेम शांति दया शुचित्व सच्छील। अर्पितों निर्मल पंचामृत ॥७॥
भक्तितीर्थें स्नान घालितों तुजला। दिव्य रूप मला प्रगटों दे ॥८॥
श्रद्धेच्या वसनें शृंगारितों नाथा। भाव-उपवीता स्वीकारावें ॥९॥
माझें यश धन सकल संसार। यांचा अलंकार समर्पितों ॥१०॥
अगरु चंदनापरि सुवासिक। सुकृत-तिलक निटिलीं घे ॥११॥
"अखंड निश्चल सेवा" या अक्षता। वाहातों अनंता शिरावरि ॥१२॥
कायावाचामन यांहीं जीं सत्कर्मे। केलीं तीं सुमनें घेई देवा ॥१३॥
निःस्वार्थ हा शुद्ध धूप पेटविला। सुगंध सुटला सेवेसाठीं ॥१४॥
सत्त्व रज तम पेटविल्या वाती। स्वीकारीं आरति कृपासिंधो ॥१५॥
रसाळ मधुर जें माझ्या जीवनीं। नैवेद्या अर्पोनी झालों धन्य ॥१६॥
गुणसमुच्चय मेळवुनि केला। तांबुल हा भला सेवेसाठीं ॥१७॥
अनंतजन्मींचें पुण्य हेंचि धन। दक्षिणा म्हणोन घ्यावी देवा ॥१८॥
तव पदिं फल सकल कर्मांचें। वाहतों जन्माचें सार ऐसें ॥१९॥
पेटवोनि घोर अज्ञानाची ज्योति। मंगल आरति करितों मी ॥२०॥
काम क्रोध दंभ कर्पूर लाविला। प्रकाश पडला दीप्तिवंत ॥२१॥
आत्मजाग्रति हा घंटानाद झाला। निद्राभ्रम गेला पूर्ण आतां ॥२२॥
सत्कृति पुष्पांची मंत्रपुष्पांजली। तुजला अर्पिली विश्वनाथा ॥२३॥
जन्म जन्मांतरीं तुझीया भोंवतीं। प्रदक्षिणा किति घालितां मी ॥२४॥
अंतीं करद्वय जोडोनी नमितों। भक्तीनें प्रार्थितों पादसेवा ॥२५॥
पूजा सांग झाली पुरें हें जीवन। त्वत्पदीं वामन अर्पी देह ॥२६॥

## ॥ करुणाष्टक ॥

तूंची मला या जगिं जन्म देसी ।
माता पिता होउनि पाळितोसी ॥
प्रेमें सदा बालक अंगिकारी ।
तुजवीण देवा मज कोण तारी ॥ १ ॥
नानास्वरूपें धरुनी जगीं या ।
येसी सहाया मज देवराया ॥
गेलों बुडोनी जरि दुर्विकारीं ।
तूंची प्रभो धांवुनि येइं तारीं ॥ २ ॥
संसारबाधा बहु कष्टदायी ।
दृष्टी न थारे तव दिव्य पायीं ॥
तापत्रयातें सदया निवारी ।
वेगें कृपाळा दीनासि तारीं ॥ ३ ॥
संसारिं येतां व्यसनीं बुडालों ।
कर्तव्य कर्मा विसरोनि गेलों ॥
आलों तुझा सेवक दीन दारीं
शरणागतातें सप्रेम तारीं ॥ ४ ॥
निष्काम कर्मीं मज आवडी दे ।
अर्पीन पायीं फल सर्व तूं घे ॥
आशा फलाची मनिंची निवारीं ।
दुर्वासनांतें निरसोनि तारीं ॥ ५ ॥
कोठोनि कैसा जगतीं कशाला ।
आलों न ठावें मज विश्वपाला ॥
दावीं सुमार्गा तम दूर सारीं ।
अज्ञान डोहांतुनि दीन तारीं ॥ ६ ॥
लीला तुझी या जगतीं विराजे ।
डंका यशाचा त्रिजगांत गाजे ॥
माया मला मोहवि, तापहारा ।
वर्षीं प्रभो मत्शिरिं शांति-वारी ॥ ७ ॥
निश्चिंत झालों नच भीति कांहीं ।
आशा न आतां, पदरांत घेईं ॥
आला प्रभो वामन दीन दारीं ।
तुजवीण देवा मज कोण तारी ॥ ८ ॥

## ॥ आरति ॥

जय जय परमानन्दा जय जय परमात्मन् ।
अखिल चराचर व्यापक जय जय विश्वात्मन् ॥ ध्रु० ॥
जड नश्वर प्रकृतितें केवीं चेतविसी ।
स्वतेज बुद्धी कैसी विश्वीं प्रगटीसी ।
चाळवुनी हृदया कां कर्मे घडवीसी ।
अतर्क्य अद्भुत लीला नकळे मनुजासी ॥ जय० ॥
उकलेना गूढ तुझें कवणासी जगतीं ।
ऋषि-जन थकले स्तवुनी तुज " नेति नेति " ।
ब्रह्मांडाचें नियमन आहे तव हातीं ।
सुनियंत्रित चालतसे सृष्टीची प्रगति ॥ जय० ॥
जनिता विश्वाचा तूं पोषक मायाळू ।
उग्र भयानक भेसुर कृतांतकाळू ।
जगतीं या कोण शके मृत्यूभय टाळूं ।
जन्म स्थिति मृत्यूचा खेळसि कां खेळू ॥ जय० ॥
फलकांक्षा त्यागुनियां होता निःसंग ।
मृत्यु मरे जन्म नुरे संपे कर्मांग ।
जंव आशा नैराश्यहि पावतसे भंग ।
चित्स्वरुपीं समरस हा जिव होय दंग ॥ जय० ॥
अनुभव हा लाभावा त्वन्मय म्यां व्हावें ।
जीवितकार्य फलातें त्वत्पदिं अर्पावें ।
तव आज्ञा पालनिं हें आयुष्य जावें ।
अंतीं त्वदंशिं जीवें ऐक्या पावावें ॥ जय० ॥
परमात्मन् परमपदा नच मी वांछितसें ।
मुक्ति स्वर्ग सुखाची आशा मनिं न वसे ।
पतित असो पावन वा तव पद मज कैसे ।
कधिं मिळतिल यामन हें निशिदिनिं चिंतितसें  जय० ॥

॥ श्री सच्चिदानंदार्पणमस्तु ॥

REFBK-0003721

REFBK-0003721